


म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
नं. क्र. 192
REFBK-0029364

रजि. नं. ८५९२०/संदर्भ
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ९१२
२९३६४
२९।७।९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
संदर्भ
भू-प्रवास
९१२
२९३६४
२९।७।९८

# शापित सौंदर्यभूमी पूर्वांचल

जयश्री देसाई

REFBK 0029364
REFBK-0029364
९१५.४
देसाई

चंद्रकला प्रकाशन

**चंद्रकला प्रकाशन – ११४**

**प्रकाशिका**
सौ. शशिकला उपाध्ये.
चंद्रकला प्रकाशन,
१३८, कसबा पेठ,
पुणे - ४११ ०११.

© **जयश्री देसाई**
ए - ७, स्वानंद, गोखले रोड,
नौपाडा, ठाणे ( प. )

**प्रथमावृत्ती**
नोव्हेंबर १९९७

**मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी.

**मुखपृष्ठ व आतील छपाई**
जंगम कलामुद्रण, २५/१०, नांदेड फाटा,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

**अक्षरजुळणी**
पॅम आर्टस् ॲण्ड प्रिंट
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ, पुणे ४११०११.

**मूल्य रु. ८०/-**

आपल्या वर्तमानाचं अर्घ्य देऊन
रुधिराचा अभिषेक घडवत
पूर्वांचल भारतात राखण्यासाठी,
जीवघेण्या धोक्यांशी, आव्हानांशी
हसत - खेळत सामना करणाऱ्या,
लष्कर आणि निमलष्करी दलांच्या
असंख्य ज्ञात - अज्ञात जवानांना!

# मनोगत

ही एका प्रवासाची कहाणी आहे पण रूढार्थाने हे प्रवासवर्णन नाही. यात पर्यटनविषयक माहिती आहे, आपल्यापासून शेकडो मैल दूर असलेल्या पूर्वांचलातील भटकंतीत आलेले विलक्षण अनुभव आहेत, पण त्या भागाची पर्यटनविषयक माहिती करून देणे एवढाच या लेखनाचा मर्यादित हेतू नाही.

ही कहाणी आहे भारताच्या पश्चिमेला पूर्वेशी जोडणारी. ही कहाणी आहे पूर्वेविषयी बऱ्याच प्रमाणात अनभिज्ञ असलेल्या पश्चिमेला पूर्वेविषयी सजग करणारी. ही कहाणी आहे आपल्याच देशाच्या एक कोपऱ्यात, तीन शत्रुराष्ट्रांनी वेढलेल्या प्रदेशात, पूर्वांचलात घडणाऱ्या घडामोडींची, तिथल्या प्राकृतिक सौंदर्याची आणि त्याच बरोबर तिथल्या धुमसत्या वातावरणाची, अशांततेची!

पंजाब वा काश्मीरमध्ये काही घडलं की साऱ्या देशाचं लक्ष तिकडे जातं. साऱ्या देशभर चिंता व्यक्त होते, पण तिथल्यापेक्षाही पूर्वांचलात भीषण परिस्थिती असून उर्वरित भारताला त्याची फारशी जाणीवही नाही अशी स्थिती आहे. 'कलकत्त्याच्या पुढेही भारत आहे याची दिल्लीला जाणीवच नाही' अशी खंत आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांना व्यक्त करावी लागली यातच सगळं काही आलं. ज्यांनी नियोजन करायचे त्यांच्या लेखी तो प्रदेशच अस्तित्वात नसेल, भारत सरकारने प्रसिद्ध केलेल्या नकाशातच जर पूर्वांचलाला स्थान मिळत नसेल तर लाखो - करोडो सर्वसामान्य नागरिकांना त्या भागाची माहिती नाही याबद्दल त्यांना दोष कसा देणार? या उपेक्षेच्या पार्श्वभूमीवर चीन, ब्रह्मदेश (म्यानमार), आणि बांगला देश या तीन राष्ट्रांनी वेढलेल्या, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या आणि तस्करांच्या विळख्यात सापडलेल्या पूर्वांचलातील सात राज्यात अस्वस्थता, अशांतता, असली तर त्यात नवल ते काय?

पूर्वांचलात फिरताना हे सारं जाणवून अस्वस्थ व्हायला होत होतं. ती अस्वस्थता तुमच्यापर्यंत पोचवावी म्हणून हा लेखनप्रपंच. पाश्चिमात्यदेशांची यच्चयावत माहिती ठेवणाऱ्या या देशाच्या सुबुद्ध नागरिकांना पूर्वांचलातली सात राज्यं कोणती आणि त्यांच्या राजधान्या कोणत्या हेही माहीत नसतं. त्यांच्यापर्यंत त्या राज्यांचा उज्ज्वल इतिहास, संस्कृती, सद्यस्थिती आणि रमणीय सौंदर्य पोहोचवावं आणि सर्वंकष प्रयत्न न केल्यास जिथे केव्हाही बोस्नियासारखी स्थिती उद्‌भवू शकते त्या धोक्याबाबत जागरूक करावं हाच उद्देश या लिखाणामागे आहे.

पुस्तकाची छपाई सुरू असताना आसाममधील काही धक्कादायक गोष्टी बातम्यांमधून पुढं आल्या. त्यांचा परामर्ष येथे थोडक्यात घेते आहे. उल्फा आणि बोडो अतिरेक्यांना मिळणारं अर्थसहाय्य थांबविल्याशिवाय आसामातील दहशतवाद संपवणं अशक्य आहे

अशी भूमिका लष्करानं प्रारंभापासून घेतली होती. भरपूर अर्थसहाय्य, पोलिस व नोकरशहांची अतिरेक्यांना मिळणारी सहानुभूती कायम असल्यानेच सात वर्षं आसामात मुक्काम ठोकून, तीन व्यापक कारवाया केल्यानंतरही आपलं सामर्थ्यवान लष्कर आसामातील दहशतवाद संपुष्टात आणू शकलेलं नाही. मात्र आसाममधील दहशतवाद संपुष्टात आणण्याची 'निवडणूक वचनं' देणाऱ्या आणि या बाबतीत मोठे - मोठे दावे करणाऱ्या आसाममधील आत्तापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी तिकडं दुर्लक्ष केल्यानंच आसाममधील दहशतवाद असंख्यांचे बळी घेत राहिला.

आसामचे मुख्य सचिव बदलले, आसाममधील सत्तारूढ महंत सरकारचे अतिरेक्यांबाबतचे धोरण बदलले आणि मग मात्र आसाममध्ये एक स्वागतार्ह बदल घडून यायला लागला. सत्तारूढ आसाम गण परिषद उल्फाबद्दल कायमच नरमाईचं धोरण स्वीकारत आली आहे. आ.ग.प. च्या अनेक कार्यकर्त्यांचे महंत सरकारमधील अनेक मंत्र्यांचे उल्फाशी घनिष्ट संबंध असल्याचेही आरोप होत आले आहेत. त्यात बऱ्याच प्रमाणात तथ्यही आहे. मात्र आता परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागल्याने असेल कदाचित पण महंत सरकारला कठोर भूमिका घ्यावी लागली आहे.

नॅशनल डेमॉक्रेटिक फ्रंट ऑफ बोडोलँड (NDFB) या बोडो अतिरेक्यांच्या कुख्यात संघटनेबाबत घडलेला ताजा प्रकारही असाच आहे. डिसेंबर १९९६ मध्ये लष्कराने या संघटनेच्या खाते - वह्या जप्त केल्या. त्या खाते - वह्यांमधून धक्कादायक माहिती सरकारच्या हाती लागली होती. अनेक सरकारी अधिकारी तसंच आसाममध्ये 'बिझिनेस' करणाऱ्या चहा कंपन्या या बोडो अतिरेक्यांच्या संघटनेला अर्थसहाय्य करीत असल्याचे पुरावेच या वह्यांच्या माध्यमातून सरकारच्या, पोलिसांच्या हाती लागले होते. मात्र सप्टेंबर १९९७ पर्यंत पोलिसांनी त्यावर काहीही कारवाई केली नाही. आता दहा महिन्यांचा कालखंड उलटल्यावर त्यावर कारवाई सुरू झाली आहे. त्या खातेवह्यांतील नोंदींच्या आधारावरच आता दहा सरकारी अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. अन्य ३० सरकारी अधिकाऱ्यांना अटकपूर्व जामीन मिळविण्यात यश आलं आहे. हे सर्व सरकारी अधिकारी विक्रीकर, वन व परिवहन खात्यात कामाला होते, आणि पूर्वांचलाचं प्रवेशद्वार असलेल्या श्रीरामपूर चेक गेटवर त्यांतील बहुतेकजण तैनात होते.

प्रख्यात 'टाटा टी' कंपनीसह आसामातील सर्व चहा कंपन्यांना सध्या 'मायक्रोस्कोप' खाली धरण्यात आलं आहे. या सर्वच कंपन्यांनी उल्फा व बोडो अतिरेक्यांना अर्थसहाय्य केल्याचा आरोप आहे. अतिरेक्यांशी आपले कसलेही संबंध नाहीत हा सदर कंपनीचा दावा पहिल्यांदा खोटा ठरला तो ऑक्टोबर १९९७ मध्ये उघड झालेल्या एका बातमीमुळे. प्रणती डेका या उल्फाच्या क्रियाशील सदस्य स्त्रीचा मुंबईच्या विमान प्रवासाचा आणि बॉंबे हॉस्पिटलमधील बाळंतपणाचा खर्च 'टाटा

टी'ने केल्याचं सिद्ध झालं त्या दिवशी. 'टाटा'चा वारसा सांगणारी ही कंपनी कसं खोटं बोलते हेही आता उघड झालं आहे.

आपण सरकारपासून चोरून काहीही केलेलं नाही, आपले हात स्वच्छ आहेत असं दाखवण्याचा कंपनीचा प्रयत्न होता. मात्र नंतर जाहीर होत गेलेल्या माहितीमुळे आणि विशेषत: प्रख्यात 'टाटा टेप्स'मुळे तो प्रयत्न तर फसलाच पण कंपनीचे पाय आणखी चिखलात रुतले. मग जनमत आपल्या विरुद्ध जात असल्याचे पाहताच 'टाटा टी'ने वृत्तपत्रांतून पाव पान जाहिराती देऊन त्यांची बाजू साफ करण्याचा प्रयत्न केला. मात्र या सगळ्याच प्रकरणातून काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात.

'टाटा टी'नं राज्य सरकारकडं व राज्य पोलिसांकडं संरक्षण मागितलं होतं का? मागितलं असल्यास ते का दिलं गेलं नाही? पोलिसांनी वा राज्य सरकारनं संरक्षण दिलं नाही म्हणून 'टाटा टी' सारख्या धनाढ्य व प्रतिष्ठित कंपनीनं देशद्रोही, अतिरेकी संघटनांशी हातमिळवणी करणं, त्यांना अर्थसहाय्य करणं कितपत उचित आहे? पोलिसांनी संरक्षण नाकारल्यास खाजगी सुरक्षा संस्थांची मदत घेण्याचा पर्याय 'टाटा टी'ला उपलब्ध नव्हता का?

वरिष्ठांशी असलेल्या कंपनीच्या संबंधांचा वापर करत कंपनीला या घोटाळ्यातून बाहेर काढण्याचा, प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न कंपनीनं कसा चालविला होता— यावर या 'टाटा टेप्स' नी प्रखर प्रकाश टाकला. असं टॅपिंग हे बेकायदा असलं व 'प्रायव्हसी'च्या मूलभूत अधिकाराचं हरण करत असल्यानं निषेधार्ह असलं तरीही याच टॅपिंगमुळं 'टाटा टी' कसा खोटारडेपणा करते आहे ते उघड झालं. 'टाटा टी' तपासात सहकार्य करत नसल्याचा व महत्त्वाची माहिती दडवून ठेवत असल्याचा मुख्यमंत्री महंत यांचा आरोपही आता खरा ठरला आहे. या प्रकारे घेरलं गेल्यामुळं तरी टाटा टी व तिची गत पाहून अन्य चहा कंपन्या अतिरेक्यांना अर्थसहाय्य थांबवतील अशी आशा आहे. त्याशिवाय आसामच नव्हे तर संपूर्ण पूर्वांचलातील दहशतवादाचं कबरडं मोडणं केवळ अशक्य आहे.


पूर्वांचलातल्या या भ्रमंतीत अनेकांनी साथ दिली. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. मुंबईच्या बँक ऑफ बडोदातील सतीशचंद्र हर्डीकर, रिझर्व्ह बँकेतील उल्हास साठे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ठाकूरद्वार शाखेतील श्री. म्हात्रे यांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करू इच्छिते. मला सर्वतोपरी सहकार्य करणारे, माझी जिद्द वाढवणारे माझे पती सुधीर, आई - वडील सौ. सुधा व श्री. प्रभाकर अत्रे आणि भाऊ अजय यांच्याशिवाय तर माझं लिखाण होणंच शक्य नव्हतं. पण ते मला इतके जवळचे आहेत की आभारातला 'आ' उच्चारण्याचंही मला धाडस होत नाही. वाचकांचा उदार आश्रय, प्रतिसाद तर हवाच. त्यासाठीच ही सारी धडपड!

– जयश्री देसाई

# अनुक्रमणिका

१ / पूर्वांचलाचे द्वार : आसाम / ९
२ / 'आसामचे आणखी तुकडे होणार नाहीत!' / ३०
३ / आकाशाशी नाते जोडणारा मेघालय / ३६
४ / दहशतवादात दडपलेला नागालॅंड / ४६
५ / 'हो! परदेशातून आम्हाला मदत येते.' / ५७
६ / निसर्गरम्य मणिपूर / ६२
७ / अरुणाचल : जणू दुसरा स्वर्गच! / ८४
८ / टेकड्यांचे राज्य : मिझोराम / ९७
९ / रवींद्रनाथांचा आवडता प्रदेश : त्रिपुरा / १०६
१० / ब्रह्मपुत्रेची साद / ११७
परिशिष्ट - १ : इनर लाईन परमिटस् / १२३
परिशिष्ट - २ : बोडो चळवळ / १२५
परिशिष्ट - ३ : उल्फाची रचना / १२८

# पूर्वांचल


अरुणाचल प्रदेश
इटानगर
आसाम
नागालॅण्ड
गुवाहाटी
कोहिमा
मेघालय
शिलाँग
इंफाळ
मणिपूर
आगरताळा
त्रिपुरा
ऐझॉल
मिझोराम

भ्र-प्रवास
(92
२९३६४
२०।१।९८

# १ / पूर्वांचलाचे द्वार – आसाम

कुठे मैलोन् मैल पसरलेली भाताची शेतं तर कुठे विस्तीर्ण पठारावर वा डोंगर उतारावर नजर ठरेल इतक्या दूरवर पसरलेले हिरवेगार चहाचे मळे...

कुठे केळी, नारळ, सुपाऱ्यांच्या झाडांच्या गर्दीत लपलेली, शेणानं वा मातीनं लिंपलेली टुमदार, कौलारु घरं व त्या घरांवरची अप्रतिम चित्रकारी तर कुठे बांबूच्या विणलेल्या चटयांचे बहारदार नमुने दाखवणाऱ्या झोपडया...

कुठे शुभ्र पांढऱ्या पुळणीतून वाहणारा ब्रह्मपुत्रेचा विशाल, शांत प्रवाह, तर कुठे गावा - गावांतून दिसणारी, आसामी घरांचं वैशिष्ट्य असणारी, आणि त्या घरांची मच्छीची गरज भागविणारी सुंदर रंगीबेरंगी कमळांनी फुललेली, 'पुखुर' म्हणून ओळखली जाणारी नेटकी तळी...!

हा आसाम! हे आसामचं आसाममध्ये पाय ठेवता क्षणी दिसणारं रूप! थोडंसं आपल्या कोकणाची आठवण करून देणारं, खूप दूर वाटणाऱ्या पूर्वांचलाचं भारताशी नातं जोडणारं अतिशय लोभस रूप!

गेल्या दशकात आसामी विद्यार्थ्यांनी परकीय घुसखोरांविरुद्ध चालविलेल्या अहिंसात्मक आंदोलनामुळे साऱ्या देशाच्या मनात ठसलेल्या, सध्या उल्फा, बोडो अतिरेक्यांच्या हिंसाचारामुळे एखाद्या वेदनेसारख्या मनात ठुसठुसणाऱ्या आणि दर पावसाळ्यात ब्रह्मपुत्रेच्या पुराने उद्‌ध्वस्त होऊन पुन्हा सावरून उभ्या राहणाऱ्या या आसामला बघाण्याची खूप वर्षांपासून इच्छा होती. तिथे जाऊन आलेल्या आणि त्या परिसराच्या प्रेमात पडलेल्या काही मित्रांमुळे यावेळी तो योग आला आणि १९९६ च्या दिवाळीच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही गीतांजली एक्स्प्रेसने कलकत्त्याकडे प्रस्थान ठेवले.

आसामला दोन - तीन प्रकारे जाता येते. एक तर गीतांजली एक्स्प्रेस व हावडा

मेलने वा विमानाने कलकत्त्याला जाऊन तेथून पुढे विमानाने वा कामरूप एक्स्प्रेसने गुवाहाटी गाठता येते किंवा सरळ दादर - गुवाहाटी एक्स्प्रेसने मुंबईहून थेट गुवाहाटीला जाता येते. प्रवास खूप लांबचा आहे. देशाच्या पश्चिमेकडून निघून पूर्व टोक गाठायचे असल्याने दोन - तीन दिवस प्रवासातच घालवावे लागतात. गीतांजली एक्स्प्रेस वेळेत गेली तरी कलकत्त्याला पोहोचायलाच ३६ तास घेते. तर हावडा मेलने कलकत्त्याला जायचं झाल्यास दोन रात्री आणि एक दिवस गाडीत घालवून मग कलकत्त्याचे दर्शन होऊ शकते. कलकत्त्याला पोहोचल्यावर लगेच पुढच्या प्रवासाला लागायची ताकदच राहात नाही. त्यामुळे कलकत्त्याला एक रात्र मुक्काम करणे चांगले. आम्हीही कलकत्त्याला एक रात्र महाराष्ट्र निवासात काढून दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता डमडम विमानतळावरून गुवाहाटीकडे उड्डाण केले.

भारताचा नकाशा पाहिल्यास कलकत्ता व गुवाहाटीचे स्थान लक्षात येईल, आणि हा प्रवास रोमांचक का होतो तेही लक्षात येईल. कलकत्ता खालच्या बाजूस आहे तर गुवाहाटी जरा वरच्या. त्यामुळे विमान उडते ते बांगलादेशच्या हद्दीतून. विमानातून आपल्याला ठिकठिकाणी पाण्याने वेढलेल्या बांगलादेशच्या भूभागाचे दर्शन घेता येते आणि गुवाहाटी जवळ आल्यावर आसामची ओळख असलेल्या ब्रह्मपुत्रेचंही दर्शन होतं. जर उन्हं असतील तर ब्रह्मपुत्रेच्या पात्रातील रुपेरी पुळण चमचमत असते. आजूबाजूच्या हिरवाईच्या कोंदणातली रुपेरी चमचम आणि त्यातून संथपणे वाहणारा ब्रह्मपुत्रेचा विशाल प्रवाह आपल्या मनावर एक अविस्मरणीय असं दृश्य कोरून ठेवतो.

कलकत्त्याहून कामरूप एक्स्प्रेसनेही गुवाहाटीला जाता येते. हा मार्ग तुलनेने कमी खर्चाचा, पण जास्त वेळ खाणारा आहे. विमानानं कलकत्ता - गुवाहाटी प्रवासाला फक्त एक तास लागतो तर रेल्वेने हेच अंतर कापायला पूर्ण एक दिवस लागतो.

गुवाहाटीचा शब्दश: अर्थ आहे— गुवा म्हणजे सुपारी व हाट म्हणजे बाजार. सुपारीचा बाजार! हे शहर पूर्वीपासून कच्च्या सुपारीच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. ती सुपारी एखाद्या पातळ कापाच्या स्वरूपात जरी खाल्ली तरी एकदम मस्तकात जाते, त्यामुळे सुपारीच्या व्यसनींमध्ये ती अतिशय लोकप्रिय आहे. जेवल्यानंतर झोपताना ती दातात ठेवली असता शांत झोप लागते असाही तिचा एक उपयोग ऐकायला मिळाला.

या शहराला गुवाहाटी हे नाव नेमकं केव्हापासून पडलं माहिती नाही. पूर्वी ते शहर प्राग्ज्योतिषपूर म्हणून ओळखलं जात होतं. नरकासुरानं हे शहर वसविलं असा उल्लेख पुराणात येतो. प्राग्ज्योतिषपूर या नावाचा संबंध बहुधा ज्योतिषाशी असावा. आसामामध्ये पूर्वीच्या काळी गूढ विद्यांचं बरंच प्राबल्य होतं. आसामी स्त्रिया वशीकरणाच्या कलेत अत्यत प्रवीण समजल्या जात होत्या. ती समजूत काही प्रमाणात आजही कायम आहे.

पूर्वीच्या काळी कामरूप या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आजच्या आसामची ही प्रागृज्योतिषपूर ही राजधानी होती. आजच्या आसामलाच पूर्वी कामरूप म्हणून ओळखलं जात असलं तरी त्याची व्याप्ती आजच्या आसामच्या तुलनेत बरीच मोठी होती. कामरूपमध्ये ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील प्रदेशाबरोबरच आजचा बांगला देश व भूतानचाही समावेश होत असे. या कामरूपला बराच प्राचीन इतिहास आहे. रघुवंशापासून कामरूपाचे उल्लेख सापडतात. या प्रांताचे कामरूप हे नाव कसं पडलं यामागेही एक मोठी पौराणिक कहाणी आहे. दक्षानं केलेल्या शिवपत्नी सतीच्या अपमानाची व तो अपमान सहन न होऊन तिने केलेल्या आत्मदहनाची कहाणी आपल्याला माहिती आहे. ते शंकराला समजाताच त्याने यज्ञकुंडातून सतीचं शव बाहेर काढून ते हातात घेऊन तांडवनृत्य करायला सुरुवात केली. त्यामुळं सारं चराचर भयभीत झालं. तेव्हा भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्रानं सतीच्या शवाचे तुकडे - तुकडे केले. त्यानंतर शंकराचा राग निवळला आणि शांत होऊन तो तपश्चर्येला बसला. त्याचं घोर तप पाहून ते पूर्ण झाल्यास त्या तपोबलाच्या आधारे उद्या तो इंद्रपदावरही दावा सांगेल अशी धास्ती इंद्राला वाटू लागली. त्यामुळं शंकराचा तपोभंग करण्याची जबाबदारी इंद्राने कामदेवावर सोपविली. त्याने रतीच्या सहाय्याने कामशर सोडून शंकराची तपश्चर्या भंग केली. शंकर भयंकर संतापला, आणि त्या संतापाच्या भरात त्याने आपला तिसरा नेत्र उघडून कामदेवाचेच दहन केले. ही घटना येथे घडली म्हणून या भागाला कामरूप असे नाव पडले.

कामरूपमध्ये हिंदू धर्माला उदार आश्रय होता. त्यामुळे येथे हिंदुधर्माचा प्रसार फार वेगाने झाला. पण इथे शैव पंथीय राजांचे जसे उल्लेख आढळतात, तसेच इतिहासावर नजर टाकली असता इथे शाक्त पंथही शैव पंथाच्याच जोडीने फोफावलेला दिसतो. हिंदुधर्मातल्या तांत्रिक शाक्त पंथाची तर स्थापनाच प्रागृज्येतिषपूरमध्ये झाल्याचं मानलं जातं. या शाक्त पंथात कालीमातेला बळी देणं हा एक मुख्य आचार होता. त्यामुळे आसाममध्ये शिवाची व कालीची बरीच मंदिरं आढळतात. तत्कालीन राजांचा वैष्णव पंथालाही विरोध नव्हता. राजांनी त्यांनाही मोठ्या प्रमाणावर दान दिल्याचे उल्लेख आजही ऐकायला मिळतात. पण वैष्णवांनी राजाश्रय संपादन करण्याचा फारसा प्रयत्न केल्याचं दिसत नाही- त्यामुळे कामरूपावर पगडा राहिला तो प्रामुख्याने शैव व शाक्त पंथीयांचाच.

इ. स. १२८२ मध्ये ब्रह्मदेशातून आलेल्या आहोम राजांनी कामरूपावर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केलं आणि इथली परिस्थिती थोडी बदलली. हे आहोम राजे हिंदू नव्हते. त्यांचा वंश 'ताई' किंवा 'शान' नावाने ओळखला जात होता. सहाशे वर्षे त्यांनी कामरूपावर राज्य केले, पण त्यांनी त्यांचा धर्म इथल्या प्रजेवर लादण्याचा प्रयत्न केला नाही. उलट पारशी लोकांप्रमाणेच तेही हळूहळू या मातीशी इतके एकरूप

होत गेले की त्यांनीही तांत्रिक हिंदुधर्म स्वीकारला. त्यांच्यामुळेच या भागाला 'आसाम' हे नाव पडले. असामिया साहित्याच्या वृद्धीचंही बरंचसे श्रेय त्यांच्याकडेच जातं. त्यांनी कवींना, पंडितांना फार मोठ्या प्रमाणावर आश्रय दिला होता असे उल्लेख असलेले ताम्रपटही सापडले आहेत. कामाख्या ही तर त्यांची उपास्य देवता बनली होती. या कामाख्येची कहाणीही फार रंजक आहे.

दक्षाने केलेल्या सतीच्या अपमानाची व त्या नंतरच्या घटनाक्रमाची माहिती वर आली आहे. विष्णूने सुदर्शनचक्राने सतीच्या देहाचे तुकडे केल्यावर ते ५१ ठिकाणी विखरून पडले. ती ५१ ठिकाणं आज शक्तिपीठे म्हणून पूजली जातात. कामाख्या हे या ५१ शक्तिपीठांपैकीच एक पीठ आहे. सतीच्या योनीचा भाग इथे पडला म्हणून कामाख्या सर्जक देवताही मानली जाते.

कामरूपचा राजा नरकासूर या कामाख्येच्या प्रेमात पडला होता. त्याने तिला विवाहासाठी मागणीही घातली. त्यावर या विवाहासाठी कामाख्येने त्याला एक अट घातली. एका रात्रीत तिचे मंदिर व मंदिरापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या बांधून देण्याचे आव्हान नरकासुराने पेलल्यास त्याच्याशी विवाह करण्याची तयारी कामाख्येने दर्शविली. गुवाहाटीतील नीलाचल टेकडीवर कामाख्येचे मंदिर आहे. म्हणजे या टेकडीवर जाण्यासाठी पायऱ्या आणि मंदिर नरकासुराला बांधायचे होते. त्याने हे बांधकाम पूर्ण करतही आणले होते, पण कामाख्येने सूर्योदयापूर्वीच कोंबड्याला आरवायला लावून तिच्याशी विवाह करण्याचा नरकासुराचा बेत उधळून लावला. त्यामुळे तो प्रचंड संतापला व त्या संतापाच्या भरात त्याने त्या कोंबड्याला तिथल्या तिथे ठार मारले. कदाचित या कथेचा पौराणिक संदर्भ असल्यामुळेच असेल पण आजही कामाख्येच्या मंदिरात कोंबड्यांचे, पशुपक्ष्यांचे बळी दिले जातात. त्या मूक पशुपक्ष्यांचे रक्त मंदिराच्या पायऱ्यांवर वाहात असते.. आणि कोणतीही मूर्ती नसलेल्या कामाख्येच्या मंदिरात मात्र शांतपणे एक दिवा तेवत असतो. आज तरी तिथे केवळ पशुपक्ष्यांचेच बळी दिले जातात पण पूर्वी आहोम वा कोच राजांच्या राजवटीत या मंदिरात शेकड्यांनी नरबळी दिले गेल्याचेही उल्लेख इतिहासात सापडतात. मुस्लिमांनी या मंदिराचा विध्वंस केल्यावर नरनारायण नावाच्या कोच राजाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि त्या नव्या मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी तब्बल एकशे चाळीस नरबळी दिले असा उल्लेख इतिहासात आढळतो. कामाख्येचे दर्शन घेतानाही हा रक्तरंजीत इतिहास मनात घोळत होता. त्यामुळे मन त्या दर्शनात नव्हते. निष्पापांचे बळी घेणाऱ्या त्या देवीला देवी कसे म्हणावे हा प्रश्न मनात होता. त्यामुळेच शक्य तितक्या लवकर तिथून बाहेर पडायची इच्छा होती. गुवाहाटीपासून पाच कि. मी. वर असणाऱ्या या मंदिरात जाण्यासाठी सतत बसेस मिळतात.

कामाख्येच्या मंदिराच्या मानाने तिथूनच वरती एक मिनिटाची चढण चढून

गेल्यावर लागणाऱ्या भुवनेश्वरी मंदिराचा भाग मात्र बराच शांत, पवित्र वाटतो. तिथे गर्दीही फारशी नसते. त्यामुळे गुवाहाटीचे व ब्रह्मपुत्रेचे दर्शन तिथून अधिक चांगल्या प्रकारे होते. याही मंदिरात मूर्ती नाही. हुआन् युआ च्वांग हा चिनी प्रवासी इ. स. ६४० मध्ये या भागात आला होता, तेव्हा त्याने येथे असंख्य ब्राह्मण व खूप हिंदू मंदिरे पाहिल्याची नोंद करून ठेवली आहे. पूर्वांचलाचा बराचसा भाग ख्रिस्ती झाल्यानंतर आजही गुवाहाटी व एकूणच आसाममध्ये मात्र बरीच लहान मोठी मंदिरे आढळतात व हिंदुधर्माचा प्रभावही आसाममध्ये स्पष्टपणे आढळतो. डमडम विमानतळावरून गुवाहाटी शहराकडे येताना ठिकठिकाणी अनेक लहान - मोठी मंदिरे दिसत असली तरी इथली काही मंदिरे मात्र विशेष धार्मिक महत्त्वाची आहेत.

ब्रह्मपुत्रेच्या पात्रात असलेल्या पीकॉक आयलंडवरील उमानंद मंदिर हे त्यापैकीच एक. ते कायमच भाविकांच्या गर्दीने गजबजलेले असते. येथे शिवरात्रीचा उत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा होतो. ब्रह्मपुत्रेचा प्रवाह बोटीने कापत तिथे जावे लागते. बोटी सहज मिळतात. गुवाहाटीच्या पूर्वेला चित्रशाळा टेकडीवर असलेले नवग्रहाचे मंदिर हे या प्राचीन प्रागृज्योतिषपूरच्या आठवणी जागवणारे मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे पूर्वीच्या काळी खगोल व ज्योतिषाचे मोठे अभ्यासकेंद्र होते. त्यावरूनच या शहराला प्रागृज्योतिषपूर हे नाव पडले असण्याची शक्यता वर्तवली जाते. गुवाहाटी शहराच्या मध्यभागी असलेले शुक्लेश्वर टेकडीवरील जनार्दन मंदिर, दर्शनीभागी अप्रतिम कोरीव काम असलेले कृष्ण मंदिर, ही गुवाहाटीतील आणखी काही आकर्षण स्थळे आहेत.

गुवाहाटीतल्या आकर्षण स्थळांची यादी मात्र एवढ्यावरच संपत नाही. गुवाहाटीत गुवाहाटीचे जोडशहर व आता आसामची राजधानी असलेल्या दिसपूरमध्ये आणि गुवाहाटीच्या आसपास बघण्यासारखे बरेच काही आहे. गुवाहाटीपासून सोळा कि. मी. वर असलेला वसिष्ठाश्रम हे असेच एक रमणीय स्थान, आसामचा संबंध थेट रामायण काळाशी जोडणारे! संध्या, कांता आणि ललिता या तीन नद्यांचे संगमस्थळ असल्याने पवित्र मानल्या गेलेल्या या ठिकाणी वसिष्ठ ऋषींचा आश्रम होता अशी श्रद्धा आहे. हिरव्यागर्द झाडीने वेढलेल्या या आश्रमस्थळी एक शंकराचे व एक गेल्या दशकातच बांधलेले गणपतीचे मंदिर आहे. हा परिसर सुंदर, शांत आहे पण इथे तीन नद्यांचा संगम होत असूनही त्या नद्यांना फारसे पाणी नसल्याने या संगमस्थळाचे दर्शन मात्र मनाला खटकले. आज तरी त्या नद्यांचे स्वरूप एखाद्या ओढ्यासारखेच आहे. पण पावसाळ्यात मात्र जेव्हा या नद्या कडेकपारीतून उड्या घेत दुथडी भरून वाहतात तेव्हा या साऱ्या परिसराचे सौंदर्य अनुपम दिसते. वसिष्ठाश्रमापासून थोडासाच वर असलेला सती अनुसूयेच्या तपोवनाचा परिसरही देखणा आहे.

देशाच्या भौगोलिक रचनेचा व वेगवेगळ्या स्थानांचा विचार केला तर कोठे

अयोध्या आणि कोठे आसाममधील गुवाहाटी असा विचार मनात येतो व अयोध्येत राजगुरू, कुलगुरूंचा मान असलेल्या वसिष्ठ ऋषींचा आश्रम इतक्या दूर आसाममध्ये असणे शक्य तरी आहे का असा विचार आपल्या मनात येतो, व गुवाहाटीजवळचा वसिष्ठाश्रम म्हणजे निव्वळ लोकांची श्रद्धा असावी, वसिष्ठांचा आश्रम तिकडे असणेच शक्य नाही, असा तर्कही लढविला जातो पण या तर्काला आधार नाही. इतिहासात खोलवर बुडी मारून शोध घेतला तर असे लक्षात येते की या भागात आर्य येण्यापूर्वीच हिंदुकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यामुळेच रामायण - महाभारतातले अगणित पुरावे या भागात अक्षरश: पावलो पावली सापडतात. आसामचा राजा असलेल्या भगदत्ताने महाभारतातील कुरुक्षेत्रावरील युद्धात कौरवांच्या बाजूने भाग घेतल्याचा उल्लेख सापडतो. परशुरामाने पित्याच्या आज्ञेवरून मातेचा वध केल्यावर ब्रह्मपुत्रेच्या पात्रात परशू धुतल्याचा उल्लेख सापडतो आणि म्हणूनच आजही ब्रह्मपुत्रा हा अपवित्र नद समजला जातो. चैत्र शुद्ध अष्टमी वगळता अन्य कोणत्याही दिवशी त्यात स्नान करणे शुभ समजले जात नाही. अर्जुनाने उलुपीशी केलेल्या विवाहाची कहाणी याच भूमीत रुजलेली आहे. त्यांचा पुत्र बभ्रुवाहन याने अश्वमेधाचा घोडा अडवला ते ठिकाण येथेच (पूर्वीच्या कामरूपमध्ये) सांगितले जाते. कृष्णाचा नातू अनिरुद्ध आणि नरकासुराची कन्या उषा यांच्या प्रेमकहाणीचा संदर्भ येथेच आजच्या तेझपूरमध्ये सापडतो आणि आज मेघालयात असलेल्या एका गुहेत भीम - हिडिंबापुत्र घटोत्कचाचे वास्तव्य झाल्याचेही सांगितले जाते.

हे इतके प्राचीन संदर्भ आजतागायत जिवंत ठेवण्याचे श्रेय येथील ब्राह्मणांकडे जाते. आसामचे राजे ब्रह्मदेशातून आलेले व मंगोलॉईड वंशाचे असले तरी मगध, मिथिला, कनोज या ठिकाणाहून फार मोठ्या प्रमाणावर ब्राह्मणांना आणून त्यांना आश्रय देण्याची, त्यांच्या सल्ल्यानुसार राज्यकारभार चालविण्याची या राजांची रीत होती. हे ब्राह्मण जे या भागात आले त्यांनी या भागातील हिंदुकरणाच्या गतीला फार मोठ्या प्रमाणावर चालना दिली. त्यांनी कशा प्रकारे हिंदुकरण केले याचेही दाखले उपलब्ध आहेत. तेव्हाच्या कामरूपमध्ये जे उच्चवर्णीय होते त्यांच्यापेक्षाही रानटी टोळ्यांचे प्रमाण फार मोठे होते. निसर्गातल्या वेगवेगळ्या देवता व चक्क दगड ही त्यांची दैवते होती. पण आसाममध्ये भारताच्या उत्तर भागातून आलेल्या ब्राह्मणांनी या टोळीप्रमुखांकडे जाऊन त्यांचे पूर्वज कसे हिंदू होते हे सांगायला व त्यांच्या दैवतांचा संबंध हिंदू दैवतांशी जोडायला सुरुवात केली. हे पटल्यावर तो टोळीप्रमुख आनंदाने त्याच्या जमातीसह हिंदू धर्म स्वीकारत असे. याच प्रकारे ब्राह्मणांनी या भागातल्या कोच राजांना शिवाचे वंशज ठरवले. काचारी राजांना भीमाचे वंशज ठरविण्यात आले. मणिपूरच्या राजांचा संबंध अर्जुनाशी जोडण्यात आला, तर आहोमांना इंद्राचे वंशज ठरवण्यात आले. अशा तऱ्हेने या भागाचे हिंदूकरण करत असताना

या ब्राह्मणांनी येथे रामायण, महाभारत अक्षरश: रुजवले, आणि त्यामुळेच पूर्वांचलातील सात राज्यांपैकी बऱ्याचशा भागाचे ख्रिस्तीकरण करण्यात ख्रिश्चन धर्मप्रसारकांना यश आलेले असले तरी १८३६ पासून त्यांनी आसामला ख्रिस्ती करण्याचे चालवलेले प्रयत्न मात्र यशस्वी झालेले नाहीत.

या भागावर हिंदू धर्माचा जेवढा प्रभाव जाणवतो तेवढाच प्रभाव बौद्ध धर्माचाही जाणवतो. गुवाहाटीपासून २२ कि. मी. वर असलेल्या हाजोमधील मंदिर समूहही त्याचेच प्रतीक आहे. यापैकी हायग्रीबा माधाब या मंदिरात भगवान गौतम बुद्धाचे निर्वाण झाला असे मानले जाते. हाजो हे केवळ बौद्धांचेच नव्हे तर मुस्लिमांचेही तीर्थस्थान आहे. पीर गियासुद्दीन औलियाने बांधलेल्या इथल्या पाओ मक्का मशिदीला मुस्लिमांच्या मनात मोठे स्थान आहे. मक्केच्या मशिदीचे एक चतुर्थांश पावित्र्य या मशिदीत एकवटलेले आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे इथे त्यांचीही गर्दी असते.

या सगळ्यांव्यतिरिक्त गुवाहाटीतील आवर्जून बघायलाच हवी अशी दोन ठिकाणे म्हणजे स्टेट म्युझियम आणि आसाममधील प्रख्यात झू आणि बोटॅनिकल गार्डन. आसाममध्ये ज्या वेगवेगळ्या राजांनी राज्य केले, ज्या वेगवेगळ्या संस्कृतींचा संगम येथे झाला त्या सगळ्यांचे दर्शन जिथे एका छपराखाली होते, आसामचा इतिहास जिथे जागा होऊन मूकपणे तुम्हाला बरेच काही सांगायाला लागतो ते ठिकाण म्हणजे गुवाहाटीतील स्टेट म्युझियम! गुवाहाटीजवळील अंबारी येथे झालेल्या उत्खननात चौथ्या शतकातील इथल्या वसाहतींचे जे अवशेष मिळाले तेही या म्युझियममध्ये आपल्याला बघायला मिळतात आणि आसाम कसा विकसित होत गेला याची झलक बघायला मिळते.

गुवाहाटीतले प्राणीसंग्रहालय आणि बोटॅनिकल गार्डन हे असेच एक प्रेक्षणीय ठिकाण आहे. अनेक दुर्मिळ जातींचे वृक्ष, झुडुपे जशी इथे बघायला मिळतात तसेच अनेक दुर्मिळ पशुपक्षीही इथे जवळून न्याहाळता येतात. १९५८ साली स्थापन झालेल्या व १३० हेक्टरच्या ऐसपैस परिसरात पसरलेल्या या उद्यानात आसामची ओळख असलेला एकशिंगी गेंडा 'ऱ्हिनो' तर बघायला मिळतोच पण त्याच्या जोडीने हरणे, सांबर, हत्ती, सिंह, बेंगॉल टायगर म्हणून सुपरिचित असलेला पिवळा धम्मक– चट्टेरी पट्टेरी वाघ, पांढरा वाघ, अस्वल, गोल्डन कॅट ही व्याघ्र कुळातलीच मांजरीपेक्षा मोठी पण वाघापेक्षा आकारमानाने छोटी अशी सोनेरी रंगाची कॅट, हिमालयात आढळणारे काळे अस्वल, नीलगाय आदि भारतातील अनेक जंगलांत आढळणारे प्राणीही बघायला मिळतात. त्यांच्या जोडीला असतात चिंपांझी, आफ्रिकन हत्ती, झेब्रा, जिराफ व जपान आणि कांपुचियात आढळणारी माकडे, ५२ वेगवेगळ्या प्रकारचे अद्‌भुत पक्षी, नाग, साप, मगरीही. या प्राणीसंग्रहालयातही पूर्वी हत्तीवरून सफारीची व्यवस्था होती पण काही अपघात झाल्यामुळे ती बंद करण्यात आली. त्यामुळे त्या आनंदाला

आम्ही मुकलोच पण एवढ्या विस्तीर्ण परिसरात फिरता - फिरता पाय इतके दुखून आले की चालायचे त्राणच उरले नाही.

या प्राणीसंग्रहालयातली एक गोष्ट मात्र आम्हाला खूप आवडली. इथले काही प्राणी जरी पिंजऱ्यात असले तरी बाकी बहुतांश प्राण्यांना बाजूने उंचच उंच भिंती उभारून मोकळ्यावरच ठेवले होते. त्यामुळे पिवळा धम्मक बेंगॉल टायगर हा पांढऱ्या वाघाच्या शेजारी बसून समोरच्या मांसावर ताव मारताना बघायला मिळाला. सिंहराज वामकुक्षी करताना बघायला मिळाले. अस्वलाचे चिंतन चालू असलेले बघायला मिळाले व महाकाय एकशिंगी गेंडा चपल अशा हरणा - सांबरांच्या जोडीने गवतात चरताना दिसला.

आमचा पुढचा टप्पा होता अर्थातच आसाममधील सुप्रसिद्ध काझीरंगा अभयारण्य. प्राणीसंग्रहालयात प्राणी कितीही मोकळ्यावर ठेवलेले असले तरी का कुणास ठाऊक ते केविलवाणेच वाटतात. जंगलात मोकळेपणाने फिरणाऱ्या प्राण्यांच्या अंगावर जी तकाकी दिसते ती प्राणीसंग्रहालयातल्या प्राण्यांच्या अंगावर नसते. त्यामुळे मनाला ओढ होती ती काझीरंगाला भेट देऊन जंगलात मोकळेपणाने फिरणारे ऱ्हिनो पाहण्याची.

ब्रह्मपुत्रेच्या दक्षिण किनारपट्टीवरील ४३० चौ. कि. मी. परिसरात पसरलेल्या काझीरंगा अभयारण्याकडे जाणाऱ्या वाटेवर ठिकठिकाणी चहाचे मळे आहेत. देशभरातील चहाच्या एकूण उत्पन्नापैकी ५५ टक्के चहा आसामात तयार होतो. १८२३ मध्ये म्हणजेच ब्रिटिशांनी आसामवर आपला अंमल बसवल्यानंतर अपघातानेच आसाममध्ये रानटी चहाच्या झाडाचा शोध लागला आणि तिथपासून आसाममध्ये चहाची लागवड सुरू झाली. या झाडांचे आयुष्य चाळीस वर्षांचे असते. या चहाच्या लागवडीसाठीच आसाममध्ये बिहारी आणि बंगाली मजूर मोठ्या प्रमाणावर आणले गेले. हे मजूर बाहेरून आणावे लागले कारण मूळचे आसामी लोक हे चहा खुडणीचे, झाडांच्या मशागतीचे काम कमीपणाचे मानतात. त्यामुळे मजूर बाहेरून आणण्याशिवाय पर्याय नव्हता. एक तर चहाच्या मळ्यांची मालकीही गैर आसामींकडे म्हणजे प्रामुख्याने बंगाली लोकांकडे आहे आणि दुसरे म्हणजे या चहा मळ्यांसाठी फार मोठ्या संख्येने मजूर आणले गेले तेही बाहेरून. त्यामुळे मूळ आसामींच्या मनात आपल्या संधी, आपली संस्कृती वांध्यात आल्याची धास्ती निर्माण झाली.त्यातूनच आसाममध्ये १९८० नंतरच्या दशकात परकीय घुसखोरांविरुद्ध आंदोलन सुरू झाले. त्यानंतर आजतागायत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे पण आजही ते मजूर आहेत तिथेच आहेत. चहाच्या मळ्यांची मालकी आजही गैर आसामींच्या हातातच आहे. त्यामुळे यापासून होणारा घसघशीत नफाही गैरआसामींच्या, प्रामुख्याने बंगाल्यांच्या हातातच जातो आहे

आणि ते चहा मळे अजूनही तसेच बहरलेले आहेत.

आसामी चहा दार्जिलिंगच्या चहापेक्षा अधिक लोकप्रिय आहे, कारण आसामचा चहाचा द्राव दार्जिलिंगच्या चहापेक्षा अधिक दाट असतो, पण पिकते तिथे विकत नाही या म्हणीचा प्रत्यय वारंवार आसाममध्ये फिरताना येतो. खुद्द आसाममध्ये एवढा चहा पिकत असूनही आपल्या इथल्या सारख्या तिथे जागोजागी चहाच्या टपऱ्या वा स्टॉल्स नाहीत. त्यामुळे काकडविणाऱ्या थंडीतही चहाची तल्लफ समोर दिसणाऱ्या मैलोन्‌मैल पसरलेल्या चहाच्या मळ्यांकडे बघूनच भागवावी लागते. त्या हिरवाईचे दर्शनच मन तृप्त करणारे असते. ती तृप्ती मनात साठवतच आपण गुवाहाटीपासून २१७ कि. मी. वर असलेल्या काझीरंगाच्या गेटवर येऊन ठेपतो.

काझीरंगाला पर्यटन विभागाचे अप्रतिम निवासस्थान आहे. 'वनश्री' हे त्याचे नाव सार्थ आहे. तिथे डॉर्मेटरी, डबल बेडस्‌वाल्या खोल्या आणि त्याहीपेक्षा महागड्या अशा खोल्या मिळू शकतात. साधारणत: १७० ते २५० रु. इतका या खोल्यांचा दर असतो. आम्ही गेलो तेव्हा डॉर्मेटरी बंद होती, त्यामुळे ती बघायला मिळाली नाही मात्र तिचा दर साधारणपणे रोज १५ ते २५ रु. इतका असतो, असे तिथल्या व्यवस्थापकांकडे चौकशी करता समजले.

आसाम पर्यटन विकास महामंडळातर्फे काझीरंगातील भटकंती, निवास व भोजन अशा कंडक्टेड टूर्सही गुवाहाटीपासून चालविल्या जातात. त्यांच्यासाठी २६५ रु. भरावे लागतात, पण आपण जाऊन सगळ्या व्यवस्था करण्याचा, हत्तीवरून सफारी मिळविण्यासाठी धडपड करण्याचा ताप मात्र वाचतो. आमच्या ग्रुपला या सगळ्या सोयी मिळाव्यात म्हणून आमच्यातल्या दोघांना दोन दिवस आधी पुढे जाऊन पहाटे चार वाजता तिथे थडकून, उपाशीपोटी, थंडीत कुडकुडत रात्र काढावी लागली होती. कारण एक तर खाजगी ट्रॅव्हल एजंटसूही काझीरंगाचे बुकिंग करत असतात आणि दुसरे म्हणजे आपण मुंबईहून कितीही पत्र्यव्यवहार केला तरी आसामी लोक जात्याच आळशी असल्याने ते तुमच्या पत्राला उत्तर देतील याची सुतराम शक्यता नसते.

एकशिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या काझीरंगा अभयारण्यात फेरफटका मारण्यासाठी प्रशिक्षिताशिवाय हत्तीची सोय उपलब्ध आहे, जीपही मिळू शकते. हत्तीवरच्या सफारीसाठी भारतीयांना माणशी १०० रु. इतका दर आकारला जातो तर परदेशी पर्यटकांसाठी हाच दर ५०० ते ५५० रु. इतका प्रचंड असतो. 'एलिफंट राईड' न मिळल्यास एक तास उघड्या जीपमधून भटकंती करायचीही संधी तुम्ही घेऊ शकता. त्यासाठी सरकारी जीप ठरवल्यास २५० रु. व खाजगी वाहन घेऊन जायचे झाल्यास ५००रु. इतका दर आकारला जातो. मात्र वाहन सरकारी असो की खाजगी या अभयारण्यातून फेरफटका मारायचा झाल्यास बरोबर त्यांचा सुरक्षा रक्षक घ्यावाच लागतो. कारण हे अभयारण्य एकशिंगी गेंड्यांसाठी प्रसिद्ध असले तरी तिथे हत्ती,

आम्ही मुकलोच पण एवढ्या विस्तीर्ण परिसरात फिरता-फिरता पाय इतके दुखून आले की चालायचे त्राणच उरले नाही.

या प्राणीसंग्रहालयातली एक गोष्ट मात्र आम्हाला खूप आवडली. इथले काही प्राणी जरी पिंजऱ्यात असले तरी बाकी बहुतांश प्राण्यांना बाजूने उंचच उंच भिंती उभारून मोकळ्यावरच ठेवले होते. त्यामुळे पिवळा धम्मक बेंगॉल टायगर हा पांढऱ्या वाघाच्या शेजारी बसून समोरच्या मांसावर ताव मारताना बघायला मिळाला. सिंहराज वामकुक्षी करताना बघायला मिळाले. अस्वलाचे चिंतन चालू असलेले बघायला मिळाले व महाकाय एकशिंगी गेंडा चपल अशा हरणा-सांबरांच्या जोडीने गवतात चरताना दिसला.

आमचा पुढचा टप्पा होता अर्थातच आसाममधील सुप्रसिद्ध काझीरंगा अभयारण्य. प्राणीसंग्रहालयात प्राणी कितीही मोकळ्यावर ठेवलेले असले तरी का कुणास ठाऊक ते केविलवाणेच वाटतात. जंगलात मोकळेपणाने फिरणाऱ्या प्राण्यांच्या अंगावर जी तकाकी दिसते ती प्राणीसंग्रहालयातल्या प्राण्यांच्या अंगावर नसते. त्यामुळे मनाला ओढ होती ती काझीरंगाला भेट देऊन जंगलात मोकळेपणाने फिरणारे ऱ्हिनो पाहण्याची.

ब्रह्मपुत्रेच्या दक्षिण किनारपट्टीवरील ४३० चौ. कि. मी. परिसरात पसरलेल्या काझीरंगा अभयारण्याकडे जाणाऱ्या वाटेवर ठिकठिकाणी चहाचे मळे आहेत. देशभरातील चहाच्या एकूण उत्पन्नापैकी ५५ टक्के चहा आसामात तयार होतो. १८२३ मध्ये म्हणजेच ब्रिटिशांनी आसामवर आपला अंमल बसवल्यानंतर अपघातानेच आसाममध्ये रानटी चहाच्या झाडाचा शोध लागला आणि तिथपासून आसाममध्ये चहाची लागवड सुरू झाली. या झाडांचे आयुष्य चाळीस वर्षांचे असते. या चहाच्या लागवडीसाठीच आसाममध्ये बिहारी आणि बंगाली मजूर मोठ्या प्रमाणावर आणले गेले. हे मजूर बाहेरून आणावे लागले कारण मूळचे आसामी लोक हे चहा खुडणीचे, झाडांच्या मशागतीचे काम कमीपणाचे मानतात. त्यामुळे मजूर बाहेरून आणण्याशिवाय पर्याय नव्हता. एक तर चहाच्या मळ्यांची मालकीही गैर आसामींकडे म्हणजे प्रामुख्याने बंगाली लोकांकडे आहे आणि दुसरे म्हणजे या चहा मळ्यांसाठी फार मोठ्या संख्येने मजूर आणले गेले तेही बाहेरून. त्यामुळे मूळ आसामींच्या मनात आपल्या संधी, आपली संस्कृती धोक्यात आल्याची धास्ती निर्माण झाली.त्यातूनच आसाममध्ये १९८० नंतरच्या दशकात परकीय घुसखोरांविरुद्ध आंदोलन सुरू झाले. त्यानंतर आजतागायत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे पण आजही ते मजूर आहेत तिथेच आहेत. चहाच्या मळ्यांची मालकी आजही गैर आसामींच्या हातातच आहे. त्यामुळे यापासून होणारा घसघशीत नफाही गैरआसामींच्या, प्रामुख्याने बंगाल्यांच्या हातातच जातो आहे

आणि ते चहा मळे अजूनही तसेच बहरलेले आहेत.

आसामी चहा दार्जिलिंगच्या चहापेक्षा अधिक लोकप्रिय आहे, कारण आसामचा चहाचा द्राव दार्जिलिंगच्या चहापेक्षा अधिक दाट असतो, पण पिकते तिथे विकत नाही या म्हणीचा प्रत्यय वारंवार आसाममध्ये फिरताना येतो. खुद्द आसाममध्ये एवढा चहा पिकत असूनही आपल्या इथल्या सारख्या तिथे जागोजागी चहाच्या टपऱ्या वा स्टॉल्स नाहीत. त्यामुळे काकडविणाऱ्या थंडीतही चहाची तल्लफ समोर दिसणाऱ्या मैलोन्‌मैल पसरलेल्या चहाच्या मळ्यांकडे बघूनच भागवावी लागते. त्या हिरवाईचे दर्शनच मन तृप्त करणारे असते. ती तृप्ती मनात साठवतच आपण गुवाहाटीपासून २१७ कि. मी. वर असलेल्या काझीरंगाच्या गेटवर येऊन ठेपतो.

काझीरंगाला पर्यटन विभागाचे अप्रतिम निवासस्थान आहे. 'वनश्री' हे त्याचे नाव सार्थ आहे. तिथे डॉर्मेटरी, डबल बेडस्‌वाल्या खोल्या आणि त्याहीपेक्षा महागड्या अशा खोल्या मिळू शकतात. साधारणत: १७० ते २५० रु. इतका या खोल्यांचा दर असतो. आम्ही गेलो तेव्हा डॉर्मेटरी बंद होती, त्यामुळे ती बघायला मिळाली नाही मात्र तिचा दर साधारणपणे रोज १५ ते २५ रु. इतका असतो, असे तिथल्या व्यवस्थापकांकडे चौकशी करता समजले.

आसाम पर्यटन विकास महामंडळातर्फे काझीरंगातील भटकंती, निवास व भोजन अशा कंडक्टेड टूर्सही गुवाहाटीपासून चालविल्या जातात. त्यांच्यासाठी २६५ रु. भरावे लागतात, पण आपण जाऊन सगळ्या व्यवस्था करण्याचा, हत्तीवरून सफारी मिळविण्यासाठी धडपड करण्याचा ताप मात्र वाचतो. आमच्या ग्रुपला या सगळ्या सोयी मिळाव्यात म्हणून आमच्यातल्या दोघांना दोन दिवस आधी पुढे जाऊन पहाटे चार वाजता तिथे थडकून, उपाशीपोटी, थंडीत कुडकुडत रात्र काढावी लागली होती. कारण एक तर खाजगी ट्रॅव्हल एजंटसूही काझीरंगाचे बुकिंग करत असतात आणि दुसरे म्हणजे आपण मुंबईहून कितीही पत्रव्यवहार केला तरी आसामी लोक जात्याच आळशी असल्याने ते तुमच्या पत्राला उत्तर देतील याची सुतराम शक्यता नसते.

एकशिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या काझीरंगा अभयारण्यात फेरफटका मारण्यासाठी प्रशिक्षिताशिवाय हत्तीची सोय उपलब्ध आहे, जीपही मिळू शकते. हत्तीवरच्या सफारीसाठी भारतीयांना माणशी १०० रु. इतका दर आकारला जातो तर परदेशी पर्यटकांसाठी हाच दर ५०० ते ५५० रु. इतका प्रचंड असतो. 'एलिफंट राईड' न मिळल्यास एक तास उघड्या जीपमधून भटकंती करायचीही संधी तुम्ही घेऊ शकता. त्यासाठी सरकारी जीप ठरवल्यास २५० रु. व खाजगी वाहन घेऊन जायचे झाल्यास ५००रु. इतका दर आकारला जातो. मात्र वाहन सरकारी असो की खाजगी या अभयारण्यातून फेरफटका मारायचा झाल्यास बरोबर त्यांचा सुरक्षा रक्षक घ्यावाच लागतो. कारण हे अभयारण्य एकशिंगी गेंड्यांसाठी प्रसिद्ध असले तरी तिथे हत्ती,

वाघ, अस्वलांसारखे अनेक हिंस्त्र प्राणीही राहतात, आणि प्रसंगी ते पर्यटकांवरही हल्ला करण्याची भीती लक्षात घेऊन सावधानता तर बाळगावी लागतेच.

आम्हाला हत्तीवरून काझीरंगात फेरफटका मारण्याची - आसामचे वैभव असलेल्या एकशिंगी गेंड्याला जवळून पाहण्याची खूप इच्छा होती. पहाटे साडेपाच वाजता हत्तींची सफारी सुरू होते. आंघोळ घातल्याने ताजेतवाने झालेले हत्ती एक, एक करत मनोऱ्याला येऊन उभे राहात होते. प्रत्येक हत्तीवर चार - चार पर्यटक बसल्यावर सरळ मुख्य रस्ता सोडून जंगलाच्या आत घुसत होते. इथले जंगल म्हणजे आपल्या कल्पनेतले, भरपूर झाडे व वेलींच्या जाळ्या असलेले जंगल नाही. इथे खाली खूप दलदल आणि त्यात वाढलेले अजस्त्र गवत आहे. त्या दलदलीत एक पाय जरी आपण टाकला तरी पार बुडून जाऊ इतकी ती दलदल भयानक आहे, पण ते गजराज मात्र संपूर्ण पाय चिखलात रुतत असूनही सहजपणे पाय पुन्हा काढून, सोंडेने गवत उपटून त्याचा फराळ करत पुढे चालले होते. अचानक माहुताने हत्ती थांबवला. समोरच्या उंच, दाट गवतात लपलेला अजस्त्र, एकशिंगी गेंडा आमच्यापासून अवघ्या चार फुटांवर कुणीची तरी चाहूल घेत असल्यासारखा उभा होता. मानेवर व मांड्यांवर जाड - जाड कातडीच्या वळ्या व समोर फेंदारलेल्या नाकासारखे ताठ उभे असलेले शिंग– असे त्याचे स्वरूप! 'गेंड्याची कातडी' हा शब्दप्रयोग कसा रूढ झाला असावा हे त्याच्याकडे बघताच कळते. चौदा फूट लांब, साडे सहा फूट रुंदीचा, तीन ते पाच टन वजनाचा हा एकशिंगी गेंडा पूर्णत: शाकाहारी असतो. एकटे राहणेच तो पसंत करतो. त्याला आवाजाचेही जबरदस्त वावडे आहे. त्यामुळे अभयारण्यात शिरतानाच आम्हाला बडबडच नाही तर कुजबूजही न करण्याचा सल्ला माहुताने दिला होता, आम्हालाही त्या गेंड्याला जवळून बघायचे असल्याने, त्याची हालचाल न्याहळायची असल्याने आम्हीही तोंडाची टकळी थांबवून अगदी गप्प बसलो होतो.

या गेंड्याच्या त्वचेत अप्रतिम टॉनिक असल्याचे व त्याच्या शिंगात प्रबळ कामोत्तेजक गुणधर्म असल्याचे सिद्ध झाल्याने या प्राण्याला विदेशात खूप मागणी आहे. त्याचे शिंग हेही खरे तर शिंग नसते. केराटीन व केसांपासून तयार झालेला तो एक आकार असतो. पण त्यात एक कामोत्तेजक गुणधर्म असल्याचे सिद्ध झाल्यापासून त्यांची विशेषत: ब्रिटिश काळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर हत्या करण्यात आली की त्यांची संख्या जेमतेम डझनावर येऊन पोहोचली. त्यामुळे त्यांची संख्या वाढविण्यासाठी खास मोहीम हाती घेण्यात येऊन १९७४ मध्ये काझीरंगा हे अभयारण्य म्हणून घोषित करावे लागले. त्यांची संख्या वाढविण्याच्या सततच्या प्रयत्नांमुळे आज त्यांची संख्या हजारावर जाऊन पोहोचली असली तरीही अजूनही यात गुंतलेल्या माफिया टोळ्या त्यांची हत्या करून तस्करी करण्याचा प्रयत्न करतच आहेत. गेल्या तीन वर्षांत खुद्द काझीरंगातच २२९ गेंडे मेले. त्यांतले ८१ गेंडे शिकाऱ्यांनी मारले तर उरलेले नैसर्गिक

मृत्यू पावले अशी माहिती खुद्द सरकारने आसाम विधानसभेत दिलेली आहे. आताही हे प्रकार टाळण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न चालू आहेत. पण लक्षावधी रुपयांचा फायदा गुंतलेला असल्यावर एका निरपराध मूक प्राण्याच्या जीवाची कोण पर्वा करणार?

आम्हाला काझीरंगात गेंड्यांव्यतिरिक्त हत्ती, हरणे, सांबरे, गरूड, फेल्किनसारखे पशुपक्षीही दिसले, पण अस्वल, वाघ, सिंहासारखे हिंस्त्र प्राणी दिसू शकले नाहीत. काझीरंगातले पुरूष - पुरूष उंचीचे गवत दर जानेवरीत जाळले जाते. त्यानंतर हे प्राणी उघड्यावर येतात व दिसू शकतात, असे समजले. आमच्या नशिबी ते नव्हते. पण बेढब, महाकाय, अजस्त्र अशा त्या एकशिंगी गेंड्याचे मुक्तपणे वावरताना झालेले दर्शन मात्र तृप्त करणारे होते... वाघ, अस्वले काय कुठेही दिसू शकतात पण आसामचे वैभव असलेल्या, आसाम ऑईलच्या पेट्रोल पंपावरील लोगोपासून ते आसामी सिल्कच्या साडीवरील डिझाईनपर्यंत सर्वत्र दर्शन देणाऱ्या ऱ्हिनोच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी मात्र काझीरंगालाच जायला हवे.

काझीरंगापासून जोरहाट फक्त ९७ कि. मी. आहे, आणि या जोरहाटपासून जेमतेम ६० कि. मी. वर आसामला आसाम हे नाव देणाऱ्या आहोम राजांची राजधानी शिवसागर बघायला मिळते. शिवसिंह या आहोम राजाने बांधलेल्या शिवसागर या विशाल तळ्यामुळे या शहराला शिवसागर हे नाव मिळाले. या शिवसागर तलावाच्या किनारी असलेली शिव डोल, विष्णू डोल, व देवी डोल ही मंदिरे म्हणजे तत्कालीन वास्तुशास्त्राचा तर नमुना आहेतच, पण भाविकांच्या दृष्टीने अतिशय श्रद्धेची तीर्थस्थाने आहेत. शिवसागरमध्ये व त्याच्या परिसरात अहोम साम्राज्याचे अनेक अवशेष बघायला मिळतात. हत्तींच्या लढती, मुष्टियुद्धे आदींच्या अवलोकनासाठी बांधण्यात आलेले रंग घर, १७८० च्या सुमारास रुद्रसिंह या राजाने बांधलेला जयसागर हा तलाव व मंदिर, गौरीसागर, दिखॉव्ह नदीशी एका बोगद्यामार्फत जोडला गेलेला तालाताल घर हा राजवाडा, करेंग घर हा विटांनी बांधालेला सात मजली राजवाडा अशा अनेक वास्तूंचे अवशेष बघून मन खिन्न होते. नकळतपणे मनात ओळी उमटतात.

आज उरल्या फक्त त्यांच्या
वास्तुच्या शतभग्न खुणा ॥

असाच प्राचीन इतिहास असलेले आसाममधले आणखी एक शहर पाहण्याची मनोमन इच्छा होती म्हणून आम्ही तिथेही जाऊन धडकलो. ते शहर म्हणजे तेझपूर! एकेकाळी त्याचे नाव होते शोणितपूर! बाणासुराची ही राजधानी. बाणासुराची कन्या उषा आणि श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध यांच्या अजरामर प्रेमकहाणीने इतिहासात अमर झालेले हे गाव.

आम्ही तेझपूरमध्ये पाय ठेवला तेव्हा मनात महाभारताचा हा संदर्भ होता. उषा - अनिरुद्धाच्या हळव्या प्रेमकहाणीची आठवण होती. महाभारत काळातल्या काही

खाणाखुणा, काही अवशेष आता मिळणे अशक्य आहे हे माहीत असूनही मन नकळतपणे, एका अनावर ओढीने त्या खाणाखुणा शोधण्याचा प्रयत्न करत होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. उषा - अनिरुद्धाच्या भावुक प्रेमकहाणीने फुललेले शोणितपूर आम्हाला दिसणारच नव्हते. आम्हाला दिसणार होते ते चिनी सैन्याच्या बुटांखाली चिरडले गेल्याने आता लष्कराच्या सुसज्ज तळांसह सामोरे येणारे तेझपूर! अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्या, कायम 'पोझीशन'मध्ये असलेल्या दक्ष सैनिकांच्या करड्या नजरांखाली सुरळीतपणे दैनंदिन व्यवहार उरकणारे तेझपूर! उल्फा या अतिरेकी संघटनेने आम्ही गेलो त्याच्या एकच दिवस आधी उलुबारीजवळील बोंगाईगाव इथली तेलाची पाईपलाईन बॉंबस्फोटाने उडवून दिल्याने अधिकच कडक बंदोबस्तात, पहाऱ्यात आवळले गेलेले तेझपूर! ज्या दिवशी आम्ही तेझपूरमध्ये पाय ठेवला त्याच्या आदल्याच दिवशी उल्फाने तेलाची पाईपलाईन आर. डी. एक्स. च्या सहाय्याने उडवून देण्याचे जे घातपाती कृत्य केले होते त्या घटनेचे सावट तर शहरावर होतेच, पण आमच्यासारख्या, लष्कराच्या सोबतीची सवय नसलेल्या मुंबईकरांच्या मनावरही ते सावट होते. तेझपूरमधला सामान्य आसामी मात्र शांत होता. हा विरोधाभास आमच्यासारख्या नवख्या पर्यटकांना चक्रावून टाकत होता, पण आसामींच्या मात्र तो दैनंदिन जीवनप्रणालीचा एक अविभाज्य हिस्सा बनला होता.

एकीकडे वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डुलणारी हिरवीगार शेते, नारळांच्या, केळीच्या बागा तर दुसरीकडे या हिरव्यागार पात्यांनीच जणू भाल्याचे रूप घेऊन चालवलेला हिंसाचार, रक्तपात. एकीकडे सर्वसाधारण आसामींचे शांत, तृप्त जीवन तर दुसरीकडे बोडोंमध्ये आणि उल्फाच्या नियंत्रणाखालील भागात खदखदणारा, ज्वालामुखीसारखा उसळणारा असंतोष!

आर्थिक, सामाजिक, राजकीय शोषणापासून आसामची मुक्तता करून स्वतंत्र आसाम देश स्थापना करण्याचे व 'आसामींच्या' हिताला बाधक अशा सर्व शक्तींशी संघर्ष करण्याचे व्रत घेऊन उल्फा जन्माला आली. '१८२६ मध्ये यांदाबूचा करार होईपर्यंत आसाम कधीही भारताचा भाग नव्हता' असा प्रचार करत उल्फाने खंडणीच्या, लूटमारीच्या, खुनाखुनीच्या मार्गाने स्वतंत्र आसाम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यासाठी शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नात्याने देशांतर्गत व शेजारी राष्ट्रांतील सर्व दहशतवादी संघटनांशी तसेच भारताच्या शत्रुराष्ट्रांशी संधान बांधून हिरव्यागार आसामला रक्ताच्या लालभडक रंगात न्हायला लावले आहे. हे करताना ज्या बांगलादेशी घुसखोरांविरूद्ध आंदोलन चालवले त्याच बांगलादेशची सक्रिय मदत घ्यायला, तिथे तळ उभारायला, तिथे आश्रय घ्यायला उल्फाने कमी केलेले नाही. आसामच्या हिताला बाधक ठरतील अशा शक्तींशी संघर्ष करायची शपथ घेतलेल्या उल्फाला आसाममधील तेलाची पाईप लाईन उडवताना आपण आसामच्या हिताला धोका पोहोचवतो आहोत

याचा विधीनिषेध राहिलेला नाही आणि आज चीनपासून पाकिस्तानपर्यंत आणि बांगलादेशापासून ब्रह्मदेशापर्यंत (म्यानमार) अनेक देशांची, त्यांच्या दहशतवादी संघटनांची मदत घेऊन आसाममध्ये दहशतीचे साम्राज्य उभे करताना, स्थापनेनंतरची काही वर्षे रॉबिनहुडची प्रतिमा जपत आसाममध्ये रस्ते बांधणारी, विहिरी खोदणारी, गोरगरिबांना अन्न-धान्य पुरविणारी, मदत करणारी ही संघटना आज एक देशद्रोही, फुटीर संघटना म्हणून कशी उरली हे कदाचित त्यांचे त्यांनाच कळलेले नाही, किंवा कळलेले असूनही वळलेले नाही.

आम्ही तेझपूरमध्ये होतो तो भाग उल्फाच्या वर्चस्वाचा नाही, तो बोडोंच्या वर्चस्वाचा विभाग आहे. संपूर्ण पूर्वांचलातील सैन्याचे नियंत्रण जिथून केले जाते असा लष्कराचा प्रचंड मोठा तळ तेथे आहे. त्यामुळे पाईपलाईनच्या स्फोटानंतर भूमिगत झालेले उल्फाचे, वा गेल्या लष्करी कारवाईनंतर (ऑपरेशन ऱ्हिनो) शरण आलेले सल्फाचे (सरेंडर्ड उल्फा) कुणी दहशतवादी तेथे भेटू शकतील अशी शक्यताच नव्हती. तेझपूर तर सोडाच, पण गुवाहाटीतसुद्धा प्रयत्न केल्यानंतरही कुणी उल्फा अतिरेकी भेटू शकले नाहीत. ते आसाममध्ये एखादी कारवाई करून आश्रयाला त्वरित परत बांगला देश वा भूतानमध्ये जातात, त्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधायचा असल्यास एखाद्या 'कॉंटॅक्ट'च्या माध्यमातून तेथे निरोप पाठवून ते इकडे यायला सात दिवस तरी लागतात. तेवढे दिवस अर्थातच आमच्यापाशी नव्हते, पण उल्फाविषयी असंख्य सर्वसामान्य लोकांशी बोलायची संधी मिळाली. त्यात गुवाहाटीतील कॉलेज कन्यकांपासून ते उद्योगपतींपर्यंत व सामान्य रिक्षा चालकांपासून ते हॉटेल चालकांपर्यंत अनेकांची उल्फाविषयीची मते कळली. त्यांतून एक जाणवले की उल्फाची रॉबिनहुडची प्रतिमा केव्हाच गळून पडली आहे. उल्फा आता लोकांना आपली तारणहार वाटत नाही. उल्फाविषयीची दहशत मात्र अद्याप कायम आहे. आजही उल्फाने केलेल्या एखाद्या बंदच्या आवाहनाला शंभर टक्के प्रतिसाद लाभतो. पण तो प्रतिसाद त्यांच्या समर्थनार्थ नसतो तर त्यांच्या भीतीपोटी असतो. त्यामुळेच आज आसाममधील सर्वसामान्य लोक लष्कराकडे शत्रुत्वाच्या भावनेने बघत नाहीत, तर उल्फाने हे ओढवून घेतले आहे. उल्फाने शत्रुराष्ट्रांशी संधान बांधून घातपाताचा मार्ग अवलंबल्यावर भारत सरकारपुढे दुसरा पर्यायच नव्हता असेच सर्वसामान्यांना वाटते, मग ते समाजाच्या कुठल्याही थरातले असोत आणि म्हणूनच तेझपूरमध्ये लष्कराच्या गाड्या फिरत असतानाही लोक शांत होते. फेब्रुवारी १९९१ मध्ये सुरू झालेल्या व अवघ्या तीन महिन्यांत आटोपत्या घ्याव्या लागलेल्या लष्कराच्या उल्फाविरुद्धच्या पहिल्या 'बजरंग' मोहिमेपेक्षा दुसऱ्या मोहिमेला – 'ऑपरेशन ऱ्हिनो' ला मिळालेले व्यापक यश हे उल्फाची लोकप्रियता व विशेषत: प्रशासनातून त्यांना मिळणारा पाठिंबा घटल्याचेच निदर्शक होते. उल्फाच्या अनेक अतिरेक्यांनी लष्करापुढे स्वत:हून शरण यायची जी तयारी दाखवली त्यालाही

उल्फाची झालेली घसरण व त्यांनी घेतलेला देशद्रोही मार्गच कारणीभूत होता.

ऑपरेशन व्हिनोमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले ब्रिगेडीयर श्रीवास्तव सांगत होते, 'या लष्करी मोहिमेदरम्यान पकडण्यात आलेल्या उल्फा अतिरेक्यांना बोलते करण्यासाठी त्यांचा काही छळ करायचीही गरज पडली नाही. एक तर नवीन आसाम घडवायचा प्रारंभीच्या काळातला उत्साह एकदा लूटमार, खुनाखुनी व खंडणीसत्र सुरू झाल्यावर ओसरला होता आणि दुसरे म्हणजे उल्फाने बरीच वर्षे त्यांना त्यांच्या नातेवाईकांपासून दूर ठेवल्याने ते त्यांच्याशी बोलायला इतके उत्सुक होते, की त्यांनी मोकळेपणाने लष्कराला माहिती दिल्यास, सहकार्य केल्यास त्यांना त्यांच्या नातेवाईकांबरोबर बोलू दिले जाईल एवढे लष्कराचे आश्वासनच त्यांना बोलते करायला पुरेसे ठरले.'

त्यांनी दिलेली माहिती उल्फाचे व्यापक जाळे उघड करणारी, हादरविणारी होती. 'उल्फा ही संघटना भारताला अस्थिर करण्याच्या जागतिक कारस्थानाचा भाग बनली आहे', असे खळबळजनक विधान आसामचे माजी मुख्यमंत्री हितेश्वर सैकिया यांनी केले होते. ते किती बरोबर होते हे या शरण आलेल्या वा पकडलेल्या उल्फा अतिरेक्यांनी दिलेल्या माहितीवरून तसेच लष्कराच्या हाती लागलेल्या धाग्यादोऱ्यांवरून स्पष्ट झाले.

बांगला देश, ब्रह्मदेश (म्यानमार) व भूतानमध्ये तर उल्फाने प्रशिक्षण तळ उभारले आहेतच पण चीन, थायलंड, पाकिस्तान व श्रीलंकेतील दहशतवाद्यांबरोबरही उल्फाने हातमिळवणी केल्याचे धक्कादायक पुरावे या दोन लष्करी मोहिमांच्या दरम्यान लष्कराच्या हाती लागले आहेत. या दहशतवादी संघटनांकडून उल्फाला पैसा, प्रशिक्षण व एके-४७, एके-५६ सारखी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व आर.डी.एक्स. सारखी महाभयानक स्फोटके हाती लागत आहेत. ऑपरेशन बजरंग ही पहिली लष्करी मोहीम सुरू होण्यापूर्वीच उल्फाकडे ५०० कोटी डॉलर्स जमा झाले होते. या मोहिमेदरम्यानच पकडल्या गेलेल्या एका अतिरेक्याने लष्कराला दिलेल्या माहितीनुसार उल्फाला डॉलर्सची कमी कधीच जाणवत नाही. त्यांनी अमेरिकेतूनही शस्त्रास्त्रे खरेदी केली आहेत. त्यांना श्रीलंकेच्या धोकादायक अशा लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम (LTTE) या तामिळी वाघांच्या संघटनेने स्फोटकांचे प्रशिक्षण दिल्याचे पुरावेही लष्कराच्या हाती लागले आहेत व उल्फाचा अध्यक्ष अरविंद राजखोवा याने ब्रिटनला जाऊन, खलिस्तानी अतिरेक्यांच्या धर्तीवर तेथे उल्फाचे एक मिशन स्थापून ब्रिटिश राजकीय वर्तुळात उल्फाला पाठिंबा मिळावा यासाठी आखलेल्या योजनेचा कागदोपत्री तपशीलही लष्कराला मिळाला आहे. बोडो अतिरेक्यांनी कितीही बॉंबस्फोट केले वा हत्या केल्या तरी दूरगामी विचार करता 'उल्फा' अधिक धोकादायक आहे हे लष्कराचे मत बनले आहे ते त्यामुळेच.

पूर्वांचलातील दहशतवादी संघटनांची जननी मानल्या गेलेल्या नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडनेच (NSCN) प्रशिक्षण व आश्रय देऊन उल्फाचा राक्षस पोसला आहे. त्यामुळेच या एन्.एस्.सी.एन्. चे आश्रयस्थान व प्रशिक्षण तळ असलेल्या म्यानमारमधील कचिन टेकड्यांच्या परिसरातच उल्फाही वाढली. उल्फाचे आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित झाले तेही म्यानमारमार्गेच, तेथील लष्करी राजवटीशी झुंज घेणाऱ्या कचिन इंडिपेंडंट आर्मी (KIA) च्या माध्यमातून झाले. इकडे आसूशी संबंधित असल्याने उल्फा बांगलादेशी घुसखोरांच्या विरोधात होती; पण नव्वदीच्या दशकाच्या प्रारंभी मात्र सारेच चित्र बदलले. पूर्वांचलातील सगळ्या अतिरेकी संघटनांशी हातमिळवणी केलेल्या उल्फाने एन्.एस्.सी.एन्. च्या खफलांग गटाच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या इंडो - बर्मीज रिव्होल्यूशनरी फ्रंट (IBRF) या सर्व अतिरेकी संघटनांच्या आघाडीतही प्रवेश मिळविला आणि तिथून उल्फाच्या अडचणींना सुरुवात झाली.

खफलांग गटाने उल्फाला ब्रह्मदेशातील कचिन टेकड्यांत प्रवेशाचे मुक्तद्वार उघडून देण्याचे आश्वासन दिले होते. पण कचिन इंडिपेंडंट आर्मीने सांगितल्यानुसार मादक द्रव्यांची तस्करी करायला उल्फाने नकार दिल्याने व त्याच दरम्यान म्यानमारमधील लष्करी राजवटीविरूद्धच्या संघर्षासाठी भारत सरकारची मदत मिळविण्याचा प्रयत्न कचिन इंडिपेंडंट आर्मी व त्यांची मित्र आघाडी असलेल्या नॅशनल डेमोक्रेटिक अलायन्सने सुरू केल्याने उल्फाचे म्यानमारशी असलेले संबंध वांध्यात आले आणि उल्फाला बांगलादेशाचा आश्रय घ्यावा लागला. जून १९९० मध्ये उल्फाचे बांगला देशाशी असलेले हे संबंध प्रथम उजेडात आले.

आपली सुरक्षा दले त्यांच्या हद्दीत जाऊ शकत नाहीत आणि राजनैतिक स्तरावरील प्रयत्नांना बांगलादेश सरकार दाद देत नाही ही आपली अडचण आहे. बांगला देशात शेख हसीना वाजेद या मुजिबूर कन्येच्या नेतृत्वाखाली अवामी लीगचे सरकार सत्तारूढ झाल्यानंतर तेथील उल्फा व अन्य अतिरेकी संघटनांचे प्रशिक्षण तळ, अड्डे बंद करण्याची प्रक्रिया सुरू झाली असली तरी ती इतक्या धीम्या गतीने चालू आहे की त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. इतकी वर्षे तर बांगला रायफल्सचे जवानही या अतिरेक्यांना प्रशिक्षण देण्यात सामील होते अशी गुप्तचरांची माहिती आहे. बांगला देशातील आलमगंज, भानुगाच व मौलवी बाजार या तीन ठिकाणी उल्फाचे प्रशिक्षण तळ अद्यापही कार्यरत आहेत, अशी आपल्या गुप्तचरांची माहिती आहे. म्यानमारमध्येही असेच तळ असून बहुतांशी खाजगी असलेले हे तळ म्हणजे एक अत्यंत फायदेशीर धंदा झाला असून येथे प्रशिक्षणासाठी एक लाख रुपये इतका प्रचंड पैसा मोजावा लागतो. या तळांवर प्रशिक्षणार्थी अतिरेक्यांना लहान शस्त्रे, ग्रेनेडस्, ॲसॉल्ट रायफल्स, मशीनगन्स व रॉकेट लाँचर्सच्या वापराचे प्रशिक्षण दिले जाते. चार ते सहा आठवडे चालणाऱ्या या झटपट प्रशिक्षणात गनिमी युद्धाचेही शिक्षण दिले जाते. या दोन

देशांत मिळून असे शंभर तळ असून प्रत्येक तळावर २० ते २५ जण प्रशिक्षण घेत असतात. या तळांच्या माध्यमातूनच बांगलादेशमार्गे उल्फाचे हात पाकिस्तानपर्यंत पोहोचले आहेत. बांगलादेशमध्येच त्यांच्या पाकिस्तानी आयू.एसू.आयू. बरोबर बैठका होत आहेत आणि आपले आंतरराष्ट्रीय संबंध अबाधित राखण्यासाठी व आसाममधील लष्करी कारवाईपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी उल्फा बांगला देशाचा तळ म्हणून वापर करत आहे.

आयू.एसू.आयू. च्याच मदतीने फोफावलेल्या नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडनेच (इसाक मुईवा गट) बोडो अतिरेक्यांनाही प्रशिक्षण दिले असले तरी बोडोंचा प्रश्न थोडा वेगळा आहे. त्यांनीही दहशतवादी कारवाया, घातपात केले असले तरी निदान अजून तरी त्यांनी स्वतंत्र राष्ट्राची मागणी केलेली नाही. त्यांना बोडोंची स्वतंत्र अस्मिता जपायची आहे आणि बोडोंचे स्वतंत्र राज्य हवे आहे. या नवीन राज्याचे प्रस्तावित नाव काहींना 'उदयाचल' असे हवे आहे तर काहींना 'बोडोलँड' असे. लखिमपूरचा उत्तर भाग व गोलपारा, कामरूप आणि दरांग हे जिल्हे वेगळे काढून त्यांचे हे राज्य बनवावे अशी बोडो आणि कचारी या आसाममधील आदिम जमातींची जुनी मागणी आहे.

१९६० साली आसामी भाषेला राजभाषेचा दर्जा दिला गेल्यानंतर बंगालच्या प्रमाणेच बोडोंनीही त्याला विरोध सुरु केला आणि बोडोंचे आधिक्य असलेल्या भागात बोडो या प्रगत भाषेचाच वापर केला जावा अशी मागणी लावून धरली. १९५२ मध्ये स्थापन झालेल्या बोडो साहित्य सभेने आणि त्यांची राजकीय आघाडी असलेल्या प्लेन्स ट्रायबल कौन्सिल ऑफ आसामने (PTCA) या मागणीसाठी आंदोलन चालू ठेवले आणि अखेर एप्रिल १९६८ मध्ये बोडोंचे आधिक्य असलेल्या भागांतील शाळांत माध्यमिक स्तरापर्यंत बोडो भाषेला अध्यापनाच्या माध्यमाचा दर्जा देणे शासनाला मान्य करावे लागले. त्यांची ही मागणी मान्य झाली असली तरी त्यांना सापत्न वागणूक दिली जात असल्याची, पद्धतशीरपणे त्यांच्या भागातून त्यांना हद्दपार करण्याचे प्रयत्न घुसखोर मुस्लिम, आसामी उच्चवर्णीय हिंदू, नेपाळी व देशाच्या अन्य प्रांतांतून तेथे गेलेले लोक करत असल्याची भावना इतक्या वर्षांच्या अनुभवांतून त्यांच्या मनात दृढ झाली आहे, आणि म्हणूनच त्यांना त्यांचे स्वत:चे राज्य हवे आहे.

त्यासाठी मार्च १९८७ पासून त्यांनी सातत्याने आंदोलन चालवले आहे. आधी त्यांची मागणी मर्यादित होती. त्यांना भारतीय राज्यघटनेच्या चौकटीतच बोडोंसाठी, स्वायत्त केंद्रशासित प्रदेश हवा होता, पण लवकरच ती मागणी 'डिव्हाईड आसाम फिफ्टी - फिफ्टी' अशी बदलली आणि ती अर्थातच आसामच्या कोणत्याही राज्यकर्त्याला मान्य होणे शक्य नाही. मग ते सरकार काँग्रेसचे असो वा आसाम गण परिषदेचे! आसामची आधीच एवढी शकले झाली आहेत की यापुढे आसामचे विभाजन नाही

अशी भूमिका आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांनी मला मुलाखत देताना मांडली. आसामचे या आधी विभाजन झाले आहे व पूर्वांचलातील इतर राज्ये ही आसाममधूनच वेगळी काढण्यात आली आहेत हे खरे असले तरी बोडोंसाठी स्वतंत्र राज्य नाही या भूमिकेला आणखी एक पदर आहे. बोडोंसाठी स्वतंत्र राज्य दिल्यास आसाममधील अन्य जमातीही स्वतंत्र राज्य मागतील आणि या जमातींसाठी आसामचा एकेक भाग तोडून दिला तर उरलेल्या आसाममध्ये बंगाल्यांच्या तुलनेत आसामीच अल्पसंख्यांक ठरतील ही आसामी हिंदूंच्या मनातील भीतीही या नकारामागे आहे. कारण आत्तापर्यंत बोडोलँड प्रमाणेच ९० टक्के बांगालीभाषिक असलेला कचार जिल्हा आसामपासून वेगळा काढून त्याचे राज्य करण्याची मागणी झाली आहे. त्याचप्रमाणे ब्रिटिशांनी आसामचा ताबा स्वत:कडे घेईपर्यंत सहाशे वर्षे आसामवर राज्य करणाऱ्या आहोमांचा विकास ब्रिटिश काळात व स्वातंत्र्योत्तर भारतातही पूर्णपणे खुंटला आहे. ब्रिटिशांनी त्यांना पूर्वाश्रमीचे राजे म्हणून किरकोळ तनखे दिले तरीही १८४१ मध्ये गुलामीच्या प्रथेवर बंदी आणून आणि 'खेल' पद्धतीप्रमाणे त्यांचा हक्क असलेल्या- मजुरांना फुकट राबविण्याच्या अधिकारावर गदा आणून त्यांना जबर आर्थिक दणकेही दिले आहेत. त्यातच आहोमांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण न दिल्याने ब्रिटिश काळापासून बंगाली व आसामी हिंदूंपुढे त्यांची नोकरीतही पीछेहाट झाली आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने १९६७ साली आसामच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव ठेवताच आपल्यासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करणारे पहिले आहोम वंशीय होते. हा संदर्भ असल्यानेच आसामचे कोणतेही सरकार आसामच्या पुन्हा विभाजनाला तयार नाही.

आसामचे विभाजन न करता बोडोंचा प्रश्न सोडविण्यासाठीच मग बोडो ऑटोनॉमस कौन्सिलची स्थापना केली गेली. कृषी व कापूस यांच्यासह एकूण ३८ उद्योगक्षेत्रे त्यांच्या अधिकारात येणार होती. सहा महिन्यांच्या आत त्यांच्या निवडणुका होणार होत्या पण काहीच झाले नाही आणि त्यांच्या स्वप्नातले बोडोलँड हिंसाचाराच्या मगरमिठीत अधिकाधिक आवळत गेले. त्यांच्या दहशतवादी संघटना, त्यांच्या आर्मीज अधिकाधिक कडव्या होत गेल्या आणि मग बोडोबहुल विभागात राहणारे आसामी, बंगाली, मारवाडी, नेपाळी त्यांच्या गोळ्यांचे, बॉंबचे लक्ष्य ठरत राहिले. आज या बोडोंच्या संघटनांतही फाटाफूट झालीय. पण त्याने त्या भागातल्या गैरबोडोंच्या नरकयातना संपलेल्या नाहीत. कारण बोडो सिक्युरिटी फोर्सच्या बोडोलँड आर्मीने व बोडोलँड लिबरेशन टायगर फोर्सने तथाकथित बोडोलँड आपापसात वाटून घेतले आहे. राष्ट्रीय महामार्ग ३१ (सी) ही त्या दोन्ही संघटनांच्या कार्यक्षेत्रांना विभाजित करणारी सीमारेषा झाली आहे आणि सर्वसामान्य माणूस तर सोडाच पण या विभागातला एखादा बोडोही त्या विभागात संरक्षणाशिवाय जाऊ शकत नाही अशी स्थिती आहे.

या दोन्ही संघटनांपैकी बोडोलँड आर्मी व बोडो सिक्युरिटी फोर्स आधिक

ताकदवान, अधिक सुसज्ज आहेत आणि बोडो ऑटोनॉमस कौन्सिलचा बहुतांश भाग बोडो लिबरेशन टायगर फोर्सच्या अधिकार क्षेत्रात येतो. प्रामुख्याने कोकराझार जिल्हा व राष्ट्रीय महामार्ग ३१ (सी) च्या दक्षिणेकडचा भाग येतो. उत्तरेकडचा व विशेष म्हणजे भूतान सीमेला लागून असलेला भाग बोडो सिक्युरिटी फोर्सच्या कब्जात आहे आणि या कडव्या संघटनांनी बोडो ऑटोनॉमस् कौन्सिलचे काम चालणे तर अशक्य केलेच आहे पण गैर बोडोंना वेचून - वेचून ठार करून त्यांना या भागातून पलायन करणे भाग पाडले आहे. खरे तर उल्फापेक्षाही अधिक प्राधान्याने बोडोंच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे, कारण बोडोंच्या कब्जातील भाग हा केवळ आसामलाच नव्हे तर संपूर्ण पूर्वांचलाला उर्वरीत भारताशी जोडणारा भाग आहे. ते केव्हाही महत्त्वाच्या ठिकाणी बॉंबस्फोट घडवून आणून देशाशी असलेला पूर्वांचलाचा संबंध तोडू शकतात. १९९६ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस घडवून आणलेल्या तीन बॉंबस्फोटांनी त्यांनी ते दाखवून दिलेच आहे. त्यामुळेच त्या भागात आधीच तैनात असलेल्या निमलष्करी दलाच्या ५० कंपन्यांच्या जोडीने लष्करही तैनात करावे लागले आहे.

बोडोंच्या प्रश्नाला आणखी एक भीषण किनार आहे अतिरेकी वंशशुद्धीच्या कल्पनांची. त्यातूनच आता बोडोंनी या भागातील दिमासा, संथाल आदि, अन्य जमातींकडे आपल्या शस्त्रांचा रोख वळवला आहे. संथालांचे शिरकाण आरंभले आहे. मे १९९६ मध्ये बोडोंनी संथालांवर केलेल्या हल्ल्यात दोनशेजण ठार आणि दोन लाखांच्या आसपास विस्थापित झाले आहेत. ते अजूनही निर्वासित शिबिरातच आहेत. मात्र आता त्यांनीही बंगालमधील काही नक्षलवादी संघटनांच्या तसेच काही झारखंडी संघटनांच्या मदतीने स्वत:ला शस्त्रसज्ज करायला प्रारंभ केला आहे. त्यामुळेच तेथे केव्हाही वांशिक दंगली उसळतील अशी शक्यता आहे.

बोडो आणि उल्फा व्यतिरिक्त आणखी एका संघटनेच्या रूपाने आसामपुढे जबरदस्त संकट उभे राहते आहे आणि ती संघटना आहे 'मुल्फा' – मुस्लिम युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम. पाकिस्तानच्या कुख्यात इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आय्.एस्.आय्.) ने सुरू केलेली ही संघटना आहे. तेझपूरमध्ये, तसेच अरुणाचल प्रदेशच्या वाटेवर आम्हाला भेटलेल्या काही लष्करी अधिकाऱ्यांकडून, (त्यांच्यापैकी एक तर देहूरोडचा होता) आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांच्याकडूनही या संघटनेविषयी बरीच माहिती मिळाली. आसाममध्ये बांगलादेश, बिहार, बंगालमधूनही मोठ्या प्रमाणावर मुस्लिम येत राहिल्याने आसाममध्ये मुस्लिममांची संख्या लक्षणीय राहिली आहे. आय्.एस्.आय्. ने त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर जाळे निर्माण केले असून त्यांची मुल्फा ही सशस्त्र संघटना तर स्थापन केलीच आहे पण जातीय विद्वेष पसरवायचे कामही मोठ्या प्रमाणावर चालविले आहे. त्यामुळे या ठिणगीचा भडका उडणार नाही ही खबरदारी घेण्यासाठी लष्कराला खास 'कम्युनल सेल' स्थापन करावा

लागला आहे, आणि आय्.एस्.आय्. चे धारिष्ट्य इतके की बोडो आणि उल्फा अतिरेकी शस्त्रप्रशिक्षणासाठी शेजारील राष्ट्रांत जातात पण आय्.एस्.आय्. ने मुल्फाच्या सदस्यांना खुद्द आसाममध्येच प्रशिक्षण देऊन शस्त्र सज्ज केले आहे. आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांनी स्वत: माझ्याशी बोलताना ही माहिती दिली. गुवाहाटीपासून जवळच असलेल्या रिव्हर आयलंडवर त्यांचा शस्त्रास्त्र प्रशिक्षणाचा कँप चालू असताना लष्कराने तेथे धाड घालून ६० जणांना अटक केली आहे आणि त्यांच्याकडून मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. आसामची राजधानी असलेल्या दिसपूरचे जोडशहर असलेल्या गुवाहाटीमध्येही त्यांच्या कारवाया वाढल्या आहेत.

या मुल्फाच्या जोडीने आता हुल्फा (हिंदू युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम) अशीही एक संघटना आसाममध्ये स्थापन झाली असून तिच्याविषयी फारसे काही माहीत नसले तरी आसाममधील हिंदूंच्या हितरक्षणाचा पवित्रा या संघटनेने घेतला आहे. अलीकडेच नलबारी जिल्ह्यातला १९३३ पासून सुरू असलेला राममहोत्सव किती दिवस चालू ठेवायचा यावरून झालेल्या वादंगाच्या वेळी या 'हुल्फा'नेही या वादंगात पाकिस्तानी आय्.एस्.आय्. चा हात असल्याचे पत्रक प्रसिद्ध करून आपले अस्तित्व दाखवून दिले होते.

आसाममध्ये एकीकडे विघटनवादी शक्तींची कारस्थाने, घातपात, दुसरीकडे जातीय आधारावर आसाममध्ये विद्वेष पसरविण्याचे प्रयत्न– एवढे सगळे चालू असतानाही आसामचे मला एक वैशिष्ट्य जाणवले की या सगळ्या परीस्थितीतही आसाम शांत आहे, अगत्यशील आहे, भारताला आपला मानणारा आहे! एक ना एक दिवस मुंबई पाहण्याचे स्वप्न बाळगून असलेला आहे. गुवाहाटी तर पूर्वांचलाचे प्रवेशद्वार असल्याने रात्री उशीरापर्यंत जागे असते पण आसामच्या इतर कुठच्याही गावात, शहरात गेले तरी आपल्यासारख्या नवख्या पर्यटकालाही तिथे भीती वाटत नाही. नागालँड, मणिपूरमध्ये सूर्यास्तानंतर बाहेर पडायला भीती वाटते, तसे आसाममध्ये होत नाही. नागालँडमध्ये माणसांचा भरवसा वाटत नाही, तसे आसाममध्ये होत नाही. प्रख्यात वैष्णव संत शंकरदेव यांच्यापासून फोफावलेल्या वैष्णव पंथाचा आजही आसाममध्ये प्रचंड पगडा आहे. या शंकरदेवांनीच आसाममधील हिंदू धर्माला जारण - मारण, जादूटोणा, तंत्र - मंत्र यांच्या पकडीतून सोडवले आणि आसामला दृढपणे भारताशी एका घट्ट धाग्याने बांधून ठेवले आहे. ते आसामला भारताचा एक भाग मानत. त्यांची नाटके, कविता, गीतांच्या माध्यमातून त्यांनी तसे विचार आसामच्या जनतेच्या मनावर ठसवले आहेत. आसाम आजही स्वत:ला भारतीय संस्कृतीचा वारस मानतो त्याचे बहुतांशी श्रेय शंकरदेवांकडे जाते. त्यामुळेच आज देशातील व देशाबाहेरील शक्तींद्वारे आखली जात असलेली आसामसकट संपूर्ण पूर्वांचलाला वेगळे काढून बांगलादेश निर्मितीचा सूड उगविण्याची कारस्थाने धुळीला मिळत आहेत.

या कारस्थानांविषयी आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांना विचारले असता ते हसले. म्हणाले, 'अशी. काही कारस्थानं आहेत की नाही मला माहीत नाही पण असलीच तर आसामच्या सहभागाशिवाय ती तडीला जाणं शक्य नाही आणि आसाम कधीही या कारस्थानांना साथ देणे शक्य नाही इतका आसाम स्वत:ला भारताचा भाग समजतो.' (त्यांची पूर्ण मुलाखत सोबत दिली आहे.)

असा हा आसाम! मुंबई सोडून तिथेच जाऊन राहावेसे वाटायला लावणारा. कला व संस्कृतीचं माहेरघर असणारा– हिरव्यागार निसर्गाकडून तृप्तीचे लेणे घेणारा, अगत्य घेणारा-आणि 'बिहू'च्या गाण्यांवर मनसोक्त नाचणारा, रंगणारा आसाम!

आम्ही जेव्हा आसाममध्ये गेलो तेव्हा बिहूचे दिवस नव्हते, त्यामुळे आम्हाला इच्छा असूनही बिहू नृत्य बघता आले नाही पण बिहू हा आसाममधला फार मोठा सण आहे. अगदी आपल्या दिवाळीसारखा आणि तो वर्षातून तीनदा साजरा केला जातो. त्यांपैकी एक असतो माघ बिहू. हा आसामातल्या वर्षारंभी साजरा केला जाणारा आपल्या होळीसारखाच सण आहे. या दिवशी होळी पेटवतात. त्यामुळे त्याला अग्निपूजा असेही म्हणतात. पण त्यांची होळी आपल्यासारखी नसते, ती झोपडीच्या आकाराची असते. माघ बिहूच्या मध्यरात्री ती पेटवली जाते. एरवी ब्रह्मपुत्रेत स्नान करणे अशुभ मानले जात असले तरी या दिवशी ब्रह्मपुत्रेतले स्नान पुण्यदायी मानले जाते.

ब्रह्मपुत्रेबाबतच्या त्यांच्या शुभाशुभ कल्पना विलक्षण आहेत. ब्रह्मपुत्रा हा आसाममधला एक महानद. भारतातलाही! भारतात बाकी कुठे नद पाहायला मिळत नाही. या शब्दाच्या दोन उत्पत्ती आहेत. एक तर ब्रह्माचा पुत्र म्हणून पुल्लिंगी नद ब्रह्मपुत्र! तर संस्कृतिकोशात दिलेल्या माहितीप्रमाणे हा शब्द मूळ बुलुम - बुथुर (बुडबुडचांची नदी) या शब्दांचे संस्कृतीकरण होऊन बनला आहे. नाम -दाओ - फी (तारकांची नदी), लौहित्य (लाल नदी) अशीही तिची आणखी काही नावे आहेत. तिच्या लौहित्य या नावामागे दडलेली कथा तिला अशुभ का म्हटले जाते हे स्पष्ट करणारी आहे. भगवान परशुरामाने क्षत्रियसंहार तसेच मातेची हत्या केल्यानंतर आपला परशु हिच्या पाण्यात धुतला. त्यामुळे नदीचे पाणी लाल झाले. त्यामुळे ती लौहित्य नावाने ओळखली जाऊ लागली. त्यानंतर हजारो वर्षे गेली, ब्रह्मपुत्रेतून बरेच पाणी वाहून गेले. ब्रह्मपुत्रेच्या जोडीने वाहात आला पण आजही ही नदी अशुभ आहे ही जनमानसातली भावना काही दूर झाली नाही. माघ बिहूसारख्या अपवादानेच हिच्यात स्नान केले जाते. काहींच्या मते ही नदी तिबेटमध्ये हिमालयात उगम पावली आहे, तर हिंदू धर्मग्रंथांतील उल्लेखांप्रमाणे आसाममधील सदियापासून पूर्वेला ५० मैलांवर असलेल्या मिचिमी पर्वतातील ब्रह्मकुंडात उगम पावलेली आहे. १८०० मैल अंतर कापत समुद्राला जाऊन मिळण्यापूर्वी अवघा प्रदेश सुपीक करत जाणारी ब्रह्मपुत्रा

अशुभ मानली जाते हे मात्र खरे! याविषयी तिथल्या लोकांकडून ऐकताना मनात सहज एक विचार आला. माणसासाठी एवढे केल्यानंतरही त्याने आपल्याला अशुभ ठरवावे याचा राग येऊन तर ही नदी दर पावसाळ्यात अवघा प्रदेश जलमय करून टाकत विध्वंस मांडत नसेल?

आसाममधला बिहूचा दुसरा सण वसंतात येतो. तो बोहाग बिहू. त्या दिवशी केले जाणारे नृत्य अनेकदा आपण छायाचित्रांतून वा टीव्हीवरून बघितलेले असते. त्यामुळे त्या विषयी जास्त काही लिहिण्याची आवश्यकता नाही. यालाच रंगाली बिहू असेही म्हणतात. ऑक्टोबरच्या मध्यास जेव्हा सर्वसामान्यांच्या घरात अन्नधान्याचा खडखडाट होतो तेव्हा साजरा केला जातो तो कंगाली बिहू. दैन्य सुद्धा उत्सवाच्या स्वरूपात साजरे करण्याची ही प्रथा विलक्षण आहे, नाही?

हा बिहूचा उत्सव मंगोल परंपरेतून आला असावा असे मानले जाते. कारण असेच उत्सव चीन व आग्नेय आशियातही प्रचलित आहेत. बिहू गीतांतही कपौसारख्या चिनी फुलांची नावे मिळतात.

सगळ्या संस्कृतीतून चांगले ते घेऊन समृद्ध झालेला हा आसाम आहे, हिंसाचाराचे चटके सोसत असतानाही पूर्वांचलात प्रवेश करणाऱ्यांना आपल्या अगत्यशीलतेने भारून टाकणारा हा आसाम आहे. एकदा भेट देऊन आल्यावर याला विसरणे शक्य नाही.

— —

# २ / ‘आसामचे आणखी तुकडे होणार नाहीत!’

–प्रफुल्लकुमार महंत

---

ओल्ड एम. एल. ए. हॉस्टेल, ६४ क्रमांकाची क्वार्टर, दिसपूर– हा आज सर्वात महत्त्वाचा आणि सुरक्षेच्या दृष्टीने सर्वाधिक काळजी घेतला जाणारा पत्ता आहे. कारण बोडो आणि उल्फा अतिरेक्यांच्या हिंसाचाराने हादरलेल्या आसामचे मुख्यमंत्री–प्रफुल्लकुमार महंत हे तिथे राहतात. परदेशी घुसखोरांविरुद्ध शांततामय संघर्ष करून सर्वांत तरुण वयात मुख्यमंत्री होण्याचा मान मिळविलेले महंत आता पुन्हा दुसऱ्यांदा निर्विवाद बहुमत मिळवून सत्तारूढ झाले आहेत, पण सत्ता त्यांच्या डोक्यात गेलेली नाही. अजिबात ओळख नसतानाही माझ्यासारख्या एका पत्रकाराने फोन करताच स्वत: फोनवर येणारे, मनमोकळेपणाने बोलणारे, अत्यंत गंभीर विषयावर बोलतानाही दिलखुलासपणे हसून त्या विषयाचा ताण नाहीसा करणारे असे हे व्यक्तिमत्व आहे. ही मुलाखत झाली त्याच्या दोनच दिवस आधी उल्फाने एका तेल रिफायनरीची पाईपलाईन आर. डी. एक्स. च्या शक्तिशाली स्फोटाने उडवून दिली होती. उल्फाने अशा प्रकारे तेल रिफायनरीवर केलेला हा पहिला हल्ला होता. उल्फाने १९८९ पासूनच्या त्यांच्या आंदोलनात केलेले हे पहिले मोठे आसामच्या हिताला धक्का पोहोचवणारे कृत्य होते. बोडोंचा हिंसाचारही चालू होताच. पण २९ डिसेंबरपासून १ जानेवारीपर्यंत बोडोंनी ज्या व्यापक प्रमाणावर बॉम्बस्फोट घडवून प्राणहानी केली आहे व बोडोभूमी मुख्य आसामपासून तोडण्यात यश मिळविले आहे. तेवढ्या मोठ्या प्रमाणावर हिंसाचार डिसेंबरमध्ये मुलाखत झाली तेव्हा त्यांनी केला नव्हता. त्यामुळे मुलाखतीत बोडोंबद्दल प्रश्न असले तरी ताज्या बॉंबस्फोटांचा संदर्भ त्यात नाही. पण मुख्यमंत्री महंत यांच्या उत्तरांतून या समस्येचे– तसेच एकूण आसाममधील परिस्थितीचे स्वरूप स्पष्ट होते.

**तुमच्या या सहा महिन्यांच्या कारकीर्दीत एकूण ६० लोक बोडो व उल्फा अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी पडले आहेत. उल्फाने आता तेलाची पाईपलाईनही स्फोटाने उडवून दिली आहे. तुमच्या राज्यात कायदा व सुव्यवस्था स्थिती इतकी खराब का?**

आम्ही जेव्हा सत्ता हाती घेतली तेव्हा कोकराझार आणि बोंगाईगाव जिल्ह्यात बोडोंनी प्रचंड हिंसाचार चालवला होता. जातीय दंगली चालू होत्या. आम्ही ती परिस्थिती नियंत्रणाखाली आणली. तुम्ही म्हणता ते तुरळक प्रकार आहेत, ते पूर्णत: थांबवणं कठीण आहे. कारण एक तर हे अतिरेकी गनिमीतंत्र वापरतात. असं काहीतरी अपराधिक कृत्य करतात आणि भूतान किंवा बांगलादेशात जाऊन आश्रय घेतात. तिथे आपले सुरक्षा जवान जाऊ शकत नाहीत. त्यामुळे आम्ही केंद्र सरकारच्या कानावर ही समस्या घातली असून त्यांना या शेजारी राष्ट्रांबरोबर हा प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली आहे. हे फक्त उल्फाच करते आहे असं नाही तर बोडो सिक्युरिटी फोर्स (BDSF), पीपल्स डेमोक्रेटिक फोर्स (पी. डी. एफ.), बी. एल. टी. एफ. (बोडोलँड लिबरेशन टायगर फोर्स) आदी सगळे अतिरेकी हाच मार्ग अवलंबताहेत.

**उल्फाचा प्रश्न तुम्ही कसा सोडवणार?**

याबाबत बरीच मतमतांतरे आहेत. आम्ही निवडणूक लढवताना लोकांना असं आश्वासन दिलं होतं की आम्ही जर निवडून आलो तर त्यांच्या जिवाचं व मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. आम्ही त्या वचनाला बांधील आहोत. त्यामुळे आम्ही पोलिस - निमलष्करी दलं व सैन्याला त्या दृष्टीने सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. आणि त्याच वेळी आम्ही उल्फा, बीडीएसएफ वगैरेंना चर्चेसाठी पुढं यायचं आवाहनही केलं आहे. कारण शेवटी हिंसाचारानं कुठलाच प्रश्न सुटणार नाही.

**चर्चेसाठी यायला या संघटना तयार आहेत?**

अंतिम निर्णय केंद्रानं घ्यायचा आहे पण या संघटनांचं म्हणाल तर नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडने (NSCN) पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन चर्चा करायची तयारी दर्शविली आहे अणि हीच संघटना संपूर्ण पूर्वोत्तर भारतातील सर्व अतिरेकी संघटनांची मूळ स्रोत आहे.

**बोडोंचं काय?**

त्यांचं प्रकरणच वेगळं आहे. त्यांना स्वतंत्र देश नकोय तर देशांतर्गत एक स्वतंत्र राज्य हवं आहे.

**तुम्ही घटक पक्ष असलेल्या संयुक्त मोर्चा सरकारने उत्तराखंडची घोषणा केली आहे. हा बोडोलँडसाठीचा हिरवा कंदील मानायचा का?**

(नाखुषीने) आसाम आधीच सात राज्यांमधे विभागला गेला आहे. नागालँड,

मेघालय, मिझोराम वगैरे सगळी राज्यं म्हणजे पूर्वी आसामचाच भाग होती. आमचेच जिल्हे होते. त्यामुळेच आता आसामचं आणखी विभाजन करण्याची काही योजना नाही.

**पण मग बोडोंची समस्या तुम्ही कशी सोडवणार?**

आम्ही बोडोंबरोबर झालेल्या कराराची कटाक्षानं अंमलबाजवणी करणार आहोत. तसंच बोडो स्वायत्त मंडळाच्या (ऑटोनॉमस कौन्सिल) निवडणुकाही येत्या एप्रिलमध्ये घेणार आहोत. बोडोंबरोबर चर्चाही चालू आहेत.

**उल्फा व बोडो अतिरेकी संघटनांच्या मागे असलेल्या शक्ती कोणत्या?**

बोडो सिक्युरिटी फोर्स, बोडोलँड लिबरेशन टायगर फोर्स, पीपल्स डेमॉक्रेटिक फोर्स या सगळ्या अतिरेकी संघटना आहेत. हिंसाचारावर विश्वास ठेवणाऱ्या व हिंसाचारच करणाऱ्या एन. सी. सी. एन., उल्फा यासारख्या अतिरेकी संघटनांना त्या सामील आहेत. त्यात त्यांना आपल्या शेजारी देशांकडून मदत मिळते. तेथे आश्रय मिळतो. कधी नेपाळ, कधी भूतान, कधी ब्रह्मदेश, कधी बांगलादेश... कधी ते थेट जिनिव्हाला जाऊन तिथे एखाद्या बैठकीत सामील होतात.

**ऐतिहासिक आसाम आंदोलनाच्या काळात उल्फा तुमच्याबरोबर होती...**

(प्रश्न मध्येच तोडून) हे चुकीचं आहे. काँग्रेसनं त्यांचं हित साधण्यासाठी केलेला तो प्रचार आहे. उल्फा कधीही आमच्याबरोबर नव्हती. कारण आमचे विचारच सर्वस्वी वेगळे ओत. ते मार्क्सवादी विचारांचे आहेत. चीनची तळी उचलून धरणारे आहेत.

**पण तुमच्या पहिल्या सत्ताकाळात तुम्ही त्यांना मदत केलीत. त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना पाठीशी घातलेत...**

हे चूक आहे. आम्ही कारवाई केली, पण आमची समस्या ही होती की केंद्रात काँग्रेस सत्तारूढ होती आणि काँग्रेसला राज्याच्या विकासात नव्हे तर आमचं सरकार बरखास्त करून राज्यावर पुन्हा मध्यावधी निवडणुका लादण्यातच रस होता. त्यामुळं ही बदनामीची मोहीम राबविली गेली.

**उल्फाने त्यांच्या आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच आसामच्या हिताला धोका पोहोचविणारा असा हा पाईपलाईमध्ये स्फोट घडवून आणला आहे. उल्फा इतकी आसामविरोधक कशी बनली?**

मला असं वाटतं की त्यांना त्यांच्या अस्तित्वासाठी प्रसिद्धीची नितांत गरज आहे. त्यातून ते या गोष्टीला प्रवृत्त झाले असावेत. ज्या देशात ते आश्रय घेतात त्यांचा, त्यांना मदत करणाऱ्या बाह्य शक्तींचाही दबाव असावा. उल्फा अशी काही घातपाती कृत्य करेल याचा सुगावा गुप्तचरांना लागला होता. त्यांनी तसा संदेशही या स्फोटापूर्वीच दिला होता. पण तो संदेशही दैनंदिन ठरवून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तिकडं काणाडोळा केला. त्यातून हा स्फोट घडला.

**पाकिस्तानच्या इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सनेही आसामात जाळे उभारले आहे. त्यांना कसे रोखणार?**

आय. एस. आय. ला रोखण्याचा आमचा सर्वतोपरी प्रयत्न चालू आहे. हा विषय केंद्राच्या अखत्यारीतील असल्यान आम्ही त्यांनाही सांगितलं आहे. आणि राज्याच्या स्तरावरही प्रयत्न चालू आहेत. त्यांचे काही तळ आम्ही उद्ध्वस्त केले आहेत.

**कोणत्या अतिरेकी संघटनांना त्यांचा पाठिंबा आहे?**

त्यांची स्वत:चीच अतिरेकी संघटना आहे. मुल्फा (MULFA) मुस्लिम युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम. त्या व्यतिरिक्त त्यांच्या आणखी पाच लहान अतिरेकी संघटना आहेत. मध्यंतरी मुल्फाचा एक तळ आम्ही उद्ध्वस्त केला. गोहाटीजवळच 'रिव्हर आयलंड' या नावानं ओळखला जाणारा एक भाग आहे. तिथं त्यांचा ट्रेनिंग कॅंप चालू होता. लष्कराच्या मदतीनं आम्ही तो उद्ध्वस्त केला आणि ६० जणांना पकडलं.

**आसाममध्ये शस्त्रास्त्रांचा व मादक द्रव्यांचा चोरटा प्रवाह सतत येत आहे...**

(प्रश्न मध्येच तोडून) खरं आहे. मणिपूरमधील ब्रह्मदेशाला लागून असलेल्या मोरे या गावातून हा सगळा माल येतो.

**आम्ही तिथे जाऊन आलो. तपासणीच्या नावाखाली तिथे जो भ्रष्टाचार चालू आहे, त्यामुळे ही तपासणी हास्यास्पद ठरते आहे...**

(हसून) हे सगळं कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर चालतं. ते तस्कर माल येण्यापूर्वी पोलिसांना सिग्नल देतात. वेळ, दिवस कळवतात.. आणि लोड शेडिंगच्या वेळी राजरोसपणे माल येतो. सर्वांत धक्कादायक आणि गंभीर गोष्ट ही आहे की यात सुरक्षा रक्षकांपासून ते नोकरशहा व राजकारण्यांपर्यंत सगळेच सामील आहेत.

**परदेशी घुसखोरांविरुद्ध आंदोलन करून तुम्ही सत्तेवर आलात, पण त्यांना हाकलवून लावण्याच्या दृष्टीने तुमच्या दोन्ही कार्यकाळात तुम्ही काही केले नाही. त्यामुळे देशात अशी सर्वसाधारण भावना आहे की, सत्तेच्या राजकारणात, अल्पसंख्यांकांच्या मतांच्या हव्यासात ती निकड तुम्ही गमावून बसलात. याबद्दल तुमची प्रतिक्रिया?**

(गंभीर होत) आमची मुख्य समस्या अशी आहे की, आमच्या देशबांधवांना या पूर्वांचलाच्या समस्या समजत नाहीत, आणि दुसरी समस्या आहे, दिल्लीत सत्तारूढ असलेल्यांना कलकत्त्याच्या पुढेही भारत आहे याची जाणीव नाही. हा जाणिवेचा अभाव, पूर्वांचलाबाबतची ही अनास्था प्रथम काढून टाकण्याची गरज आहे. ताजं उदाहरण आहे. केंद्रात आमच्या संयुक्त मोर्चाचं सरकार सत्तारूढ आहे. पण आत्ता कृषी खात्याने भारताचा जो नकाशा प्रसिद्ध केला होता त्यात पूर्वांचलाचा समावेशच

नव्हता. आमच्या एका खासदाराने तो नकाशा पाहून आक्षेप नोंदवल्यावर मग तो नकाशा मागे घेण्यात आला. ही केंद्राची आमच्याबाबतची भूमिका आहे. या भागातल्या अशांततेलाही ही भूमिकाच जबाबदार आहे. अतिरेकी संघटनाही त्याचाच फायदा घेऊन लोकांच्या मनावर असं बिंबवतात की बघा, भारताला तुमची कुठे फिकीर आहे? भारत तुम्हाला विसरलाच आहे, तुम्हीही भारताला विसरा.

आता परकीय घुसखोरांच्या हकालपट्टीबद्दल बोलायचं तर ती एक प्रदीर्घ प्रक्रिया आहे. त्यात काही अडथळे आहेत. एक तर सुरक्षा दलांनी घुसखोरांना पकडल्यावर त्यांना कोर्टापुढे उभं करावं लागतं. तिथे त्यांना स्थगिती मिळू शकते. दुसरं म्हणजे घुसखोर मुस्लिम असेल तर त्याच नावाचे आणखी ५० लोक निघू शकतात. पुन्हा सगळ्यांचे वेष सारखे, भाषा सारखी, पद्धती सारख्या. त्यामुळे त्यांना ओळखून काढणं कठीण जातं.

**तुमच्या सरकारने अलीकडेच चहाच्या उत्पादकांबरोबर राज्याच्या विकासासाठी एक करार केला आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला उद्योगपतींबरोबर असा करार करण्याची गरज का पडावी?**

आसाम नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे हे खरं आहे पण ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात तसेच राज्याच्या आणखी काही भागात अजिबात उद्योग नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे राज्याच्या विकासाच्या दृष्टीनं काहीही केलं तरी ब्रह्मपुत्रेच्या दर वर्षी येणाऱ्या पुरात ते वाहून जातं, त्यामुळे आम्ही जलसंसाधन विकास मंत्री ज्ञानेश्वर मिश्र यांना येथे बोलावलं होतं. त्यांनी पाहणी केलीय– इथे गोहाटीत ब्रह्मपुत्रा बोर्ड आहे त्यांनीही या नैमित्तिक समस्येवर तोडगा काढण्याच्या दृष्टीनं काही तात्कालिक स्वरुपाच्या तर काही दूरगामी योजना आखल्या आहेत. त्यायोगे पूरग्रस्तांना मदत करणं व या समस्येचं कायमस्वरूपी निराकरण करणं शक्य व्हावं– त्यासाठी आम्ही पंतप्रधानांकडेही मदत मागितली आहे. केवळ आसामच्याच नव्हे तर संपूर्ण पूर्वांचलाच्या विकासासाठी केंद्राने तातडीने काही करण्याची गरज आहे हे त्यांना पटविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. त्यांनी केंद्राच्या ताब्यातील निधीपैकी ६ हजार कोटींचा निधी पूर्वांचलाच्या विकासासाठी देण्याचं मान्य केलं आहे आणि चहाच्या उत्पादकांबरोबरचा करार हाही या विकासासाठीच्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

**पण अशा मदतीच्या घोषणा पूर्वीही केल्या गेल्या आहेत. मात्र त्या कागदावरच राहिल्या आहेत. असे का?**

नाही, नाही. अशी घोषणा पहिल्यांदाच झाली आहे. यापूर्वी विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान असताना त्यांनी ९० टक्के मदत व १० टक्के कर्ज अशा स्वरुपात आर्थिक मदत घोषित केली होती, तो शब्द त्यांनी पाळला. आजही आमची अर्थव्यवस्था या ९० टक्के केंद्राकडून येणाऱ्या आर्थिक मदतीवर व १० टक्के कर्जावर निर्भर आहे.

आता हे ही पंतप्रधान प्रयत्न करत आहेत बघू या.

**चहाच्या उत्पादकांबरोबर झालेल्या तुमच्या कराराची वैशिष्ट्ये कोणती?**

इतर उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करत असतानाच चहा उद्योगही वाढला पाहिजे या उद्देशाने आम्ही लहान - लहान चहा उत्पादकांनाही उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहित करणार आहोत. तसंच या उद्योगालाही शेतीला मिळणाऱ्या सर्व सवलती, एक्साईजचा काही भाग मिळावा यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांबरोबर बोलणी चालू आहेत.

**IMRDT ॲक्ट बदलला जावा अशी तुमची मागणी आहे, पण त्याला काँग्रेसनेही विरोध केला आहे आणि संयुक्त मोर्चात तुमच्यासह सामील असलेल्या डाव्या पक्षांनीही त्याला विरोध केला आहे. या पेचप्रसंगातून मार्ग कसा काढणार?**

त्यांनी विरोध चालवला असला तरीही १९७१ नंतर आलेल्या घुसखोरांना बाहेर हाकललं पाहिजे यावर तेही ठाम आहेत. आणि तो घुसखोर आहे की नागरिक हे सिद्ध करण्यासाची जबाबदारी त्याच्यावरच टाकली पाहिजे. सगळ्या देशात जर तसा कायदा लागू आहे तर एकट्या आसामलाच वेगळं का काढलं जातं आहे? अशाच आशयाचा जर नवीन कायदा आला तर मार्क्सवादी त्याला विरोध करणार नाहीत हे निश्चित.

**असा एखादा नवीन कायदा आणण्याच्या दृष्टीने काही हालचाल चालू आहे?**

राजीव गांधींनी ते पंतप्रधान असताना तसं आश्वासन दिलं होतं पण त्या दिशेनं पुढे काहीच झालं नाही. खरं तर ही आमची फार मोठी समस्या आहे. कारण आम्हाला लागून असलेला बांगलादेश अतिशय गरीब आहे. त्यामुळे घुसखोरीची समस्या तर आहेच पण तिथल्या गरिबीमुळे गहू, तांदूळ, बटाट्यापासून अनेक गोष्टींची आसाममधून तस्करी होते. दुसरीकडं घुसखोरीमुळं आसामची लोकसंख्याही अनिर्बंध वाढते आहे. त्यामुळे आसाममध्ये पिकणारं धान्य आम्हालाच पुरत नाही. ते आम्हाला पंजाब - हरियाणाकडून विकत घ्यावं लागतं. यातून आम्ही उभं राहायचा प्रयत्न करतोय – अशी बरीच घरं इथं आहेत की ज्यांचं घर - आंगण इथं आहेत आणि स्वयंपाकघर बांगलादेशात. ते सगळं निस्तरायचा आमचा प्रयत्न आहे. तसं केंद्रालाही सांगितलंय आणि बांगला देशालाही कळविण्यात आलेलं आहे.

**राज्यात लष्कराच्या असण्याला उल्फा आणि बोडोंनी विरोध चालविला आहे. लष्कर काढून घ्यावं अशी त्यांची मागणी आहे. लष्कर केव्हा काढून घेणार?**

ज्या क्षणी हे अतिरेकी शस्त्रं खाली ठेवतील त्या क्षणी, २४ तासांच्या आत राज्यातून लष्कर काढून घेतलं जाईल. त्यांनी शस्त्रं खाली ठेवून चर्चेसाठी पुढं यावं म्हणून आमचे शर्थीच प्रयत्न चालू आहेत. केंद्र सरकारही प्रयत्नशील आहे.

— —

# ३ / आकाशाशी नाते जोडणारा मेघालय!

मेघालय! शब्दश: अर्थ घेतला तर ढगांचे निवासस्थान!

पांढरे शुभ्र, सावरीच्या कापसासारखे ढग, जिथे मोठ्या प्रेमाने, हिरव्यागार वनश्रीने वेढलेल्या उन्नत गिरिशिखरांच्या आश्रयाला येतात ते हे राज्य! मेघालय!

इतके सार्थ नाव क्वचितच दुसऱ्या एखाद्या प्रदेशाला लाभले असेल..

कुणी म्हणतात, की स्वर्ग-स्वर्ग जो म्हणतात ना तो याच प्रदेशात होता.. तिथे पोहोचणेही त्या काळी सर्वसामान्यांना कठीण होते... निबिड अरण्यातून वाट काढत या डोंगरमाथ्यावर, ढगांच्या मोरपिसासारख्या हळुवार स्पर्शाच्या छायेत पोहोचले की कदाचित स्वर्गात पोहोचल्यासारखा आनंद होत असेल.. कुणास ठाऊक? पण हे राज्य आहे मात्र आपल्या कल्पनेतल्या स्वर्गासारखेच सुंदर!

गर्द हिरव्या झाडीने वेढलेल्या नागमोडी रस्त्यांनी, निसर्गाच्या अनुपम सौंदर्याचा आस्वाद घेत आम्ही गुवाहाटीहून मेघालयाच्या दिशेने निघालो होतो.. गारो, खासी व जैंतिया अशा टेकड्यांचा मिळून बनलेला हा मेघालय एकेकाळी आसामचाच भाग होता. पण आसाममध्ये राहून आपला विकास होईल, आपले स्वतंत्र अस्तित्व, आपली संस्कृती टिकविणे शक्य होईल असे या प्रदेशाचे मूल रहिवासी असलेल्या गारो, खासी व जैंतिया या जमातींना वाटेना. त्यातूनच या परिसरात स्वतंत्र राज्यासाठीचे आंदोलन उभे राहिले. परंतु मुळातच हे लोक शांतताप्रिय असल्याने या भागातील लोक नागांप्रमाणे हिंसाचाराच्या पूर्णत: आहारी गेले नाहीत. त्यांनी स्वतंत्र देशाची मागणी केली नाही. त्यांनी भारतीय राज्य घटनेच्या चौकटीत राहूनच स्वतंत्र राज्याची मागणी केली आणि १९७२ साली त्यांची ती मागणी मान्यही झाली. २२,४२९ चौ. कि. मी. चे नवीन राज्य अस्तित्वात आले. तेच हे बारा महिने अभ्राच्छादित असलेले, लोक संस्कृती आणि आधुनिकता जिथे हातात हात घालून नांदतात ते

मेघालय!

भारताचे पहिले गृहमंत्री, पोलादी पुरूष म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांनी काश्मीर, ते कन्याकुमारीपर्यंत सारी संस्थाने खालासा केली असे आपण वाचत आलो असलो तरी ते खरं नाही विशेष म्हणजे मेघालयात आजही छोटी छोटी २५ संस्थाने अस्तित्वात आहेत. त्यांचे राजे आहेत, दिवाण आहेत, मंत्रिमंडळे आहेत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारने सरदार पटेलांच्याच हयातीत त्यांच्याशी केलेल्या एका करारानुसार भारत सरकारची त्यांना मान्यता आहे!

या करारानुसार जमिनीची मालकी, पाणीपुरवठा, जंगले आदि विषय या राजांच्या अधिकारकक्षेत येतात. या क्षेत्रांतली करवसुली ते करतात. तो महसूलही त्यांच्याकडे जातो. भारत सरकारच्या अधिकारात असलेली जी उर्वरित क्षेत्रे आहेत त्यांतली करवसुली भारत सरकारच्यावतीने करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्याप्रमाणे ते ती करवसुली करतात आणि तो महसूल भारत सरकारच्या खजिन्यात जमा करतात.

या संस्थानांनीही भारतात सामील व्हावे, सामीलनाम्यावर सह्या कराव्यात असा प्रयत्न सरदार पटेलांनी केला होता. पण या इवल्याश्या संस्थानांनी सामीलनाम्यावर सही करायला ठाम नकार दिला. आणि त्या इतक्या छोट्याश्या, एकेका टोळीपुरत्या मर्यादित असलेल्या संस्थानांविरुद्ध लष्करी कारवाई करावी असेही सरदार पटेलांना वाटेना. शेवटी भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत, काही मोजकी क्षेत्रे त्यांच्या ताब्यात ठेवून बाकी अधिकार भारत सरकारच्या ताब्यात ठेवणारा असा करार करण्यात आला. या करारानुसार त्यांना त्यांचं स्वतंत्र मंत्रिमंडळ, कारभारी ठेवायला परवानगी देण्यात आली. त्यांना त्यांच्या संस्थानात स्वतंत्रपणे न्यायदान करायचाही अधिकार मिळाला. सी. एम. म्हणूनच ओळखले जाणारे हे राजे जेव्हा न्यायदान करतात तेव्हा राज्यातले नामवंत वकील त्यांच्यापुढे आपल्या अशिलाची बाजू मांडण्यासाठी हजेरी लावतात. यांच्या न्यायालयाला सबॉर्डिनेट डिस्ट्रिक्ट कोर्टाचा दर्जाही आहे.

या सी. एम. ची निवड पूर्वी त्या-त्या जामतीचा प्रमुख करत असे पण नंतरच्या काळात त्याची जागा वंशपरंपरेने घेतली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने काही वर्षांपूर्वी दिलेल्या एका निकालानुसार डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटही त्यांची उचलबांगडी करू शकतात इतके त्यांचे अधिकार मर्यादित आहेत.

गर्द हिरव्या झाडीने वेढलेल्या नागमोडी रस्त्यांनी, निसर्गाच्या या अनुपम सौंदर्याचा आस्वाद घेत गुवाहाटीहून मेघालयाच्या दिशेने जाताना मेघालयाची ही अजब कहाणी मनात तरळत होती.. मेघालय हे स्वतंत्र राज्य होण्यापूर्वी अविभाजित आसामची राजधानी असलेल्या शिलाँगकडे आमचा प्रवास सुरू झाला होता.. डोंगर उतारावर मधूनच दिसणारी अननसाची शेती.. जंगली केळ्यांची, बांबूची झाडे, अत्यंत आकर्षक अशी विविध मनमोहक रंगांची फुले, त्या फुलांवर मनसोक्त बागडणारी चित्रविचित्र

फुलपाखरे, डोंगर उतारावरून खाली उड्या घेणारे, मोत्यांसारखे तुषार उडवणारे धबधबे, मधूनच दिसणारे निर्झर, खोल दरीतून खळाळत वाहणाऱ्या, ओढ्यासारख्या लहानशा नद्या आणि निसर्गाच्या या साऱ्या अनुपम खजिन्याला आपल्या कुशीत घेऊन स्थिरावलेली, एखाद्या मऊसूत शालीसारखी चराचरावर पसरलेली तृप्त शांतता! तो प्रवास खरेच अविस्मरणीय होता.

दुपारी दीड-दोनच्या सुमारास आम्ही गुवाहाटीहून प्रवास सुरू केला होता आणि तीन-साडेतीनच्या सुमारास म्हणजे अवघ्या दीड-दोन तासांच्या प्रवासानंतरच सावल्या दाटून येऊ लागल्या.. पूर्वेकडे उजाडतेही लौकर आणि अंधारतेही लवकर.. हे आम्ही वाचले होते आणि तरीही तीन साडेतीनला म्हणजे आपल्या हिशोबी चक्क भर दुपारी इतकी संध्याकाळ व्हावी, इतका अंधार दाटून यावा, हिरवाई डोळ्यात भरून घेण्यापूर्वीच अंधाराची काळी शाई त्याच्यावर सांडून सगळे काही दृष्टिआड व्हावे हे मनाला पटतच नव्हते! पण ते पटवून घेणे भाग होते. दुपारी चार साडेचारच्या सुमारास आम्ही चहासाठी गुवाहाटी शिलाँग रस्त्यावरील नांगपोला थांबलो तेव्हा तर रात्री नऊ साडेनऊला पडावा तसा अंधार पडला होता.. बोचरी थंडी आमच्या, मुंबईच्याच थंडीला योग्य अशा स्वेटर्समधून आत शिरून आम्हाला गोठवून टाकत होती. वाटेतच इतकी थंडी आहे तर पूर्वेकडील स्कॉटलंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिलाँगमध्ये ती किती असेल याचा विचार वाफाळणाऱ्या चहाच्या वाफे बरोबरच आमच्या मनात भरून राहात होता..

चहा पिण्यासाठी आम्ही जिथे थांबलो होतो तिथेच शेजारी फळे आणि भाज्यांची दुकाने होती. तिथले अक्षरशः राक्षसी आकारचे मुळे, फ्लॉवर, कोबी-मिरच्या व अननस पाहून अवाक व्हायला होत होते. अननस तर एवढे रसदार की प्लॅस्टिकच्या पिशवीत कापून ठेवल्यास त्यांचा रस पिशवीत जमा व्हायलाच हवा. तिथे मुळे, कोबी, फ्लॉवर एवढे मोठे कसे होतात, त्यासाठी कोणते खत वापरतात– हे जाणून घ्यायची खूप इच्छा होती. त्या भाजी विक्रेत्यांना ते विचारायचा प्रयत्नही केला, पण भाषेची अडचण आडवी आली– मेघालयात साक्षर-सुशिक्षितांचे प्रमाण बरेच असले तरी खेड्यातल्या लोकांना मात्र ना हिंदी येते ना इंग्रजी. त्यांची भाषा आम्हाला येत नव्हती. त्यांना खाणाखुणांनी विचारायचा आमचा प्रयत्नही फसला. त्यांनी महाराष्ट्राचे नावही कधी ऐकलेले नव्हते पण मुंबईविषयी त्यांनी ऐकले होते मुंबईत भाज्या-फळे एवढ्या मोठ्या आकाराची नसतात– हे बहुधा आम्ही खाणाखुणांनी त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात यशस्वी झालो असू, पण मुंबईच्या नावाबरोबर त्यांच्या नजरेत जी उपेक्षा प्रगटली, त्यांनी जे तिरस्कारयुक्त हातवारे केले ते मात्र आम्हाला धक्कादायक, अनपेक्षित होते. पूर्वांचलातून भारत द्वेषाचे वारे वाहताहेत हे वाचले होते, ऐकले होते, त्याचा चटका त्या लोकांच्या नजरेतील उपेक्षेने आम्हाला दिला. या उपेक्षेची

बोच मनात ठेवूनच आमचा शिलाँगच्या दिशेने पुन्हा प्रवास सुरू झाला.

शिलाँग हे समुद्रसपाटीपासून पंधराशे मीटर्स उंचीवर वसलेले थंड हवेचे ठिकाण आहे. अविभाजित आसामची राजधानी म्हणून मिरविण्याचे भाग्य लाभलेले हे मोठे शहर विकसित आहे. हिवाळ्यातही जिथे वसंताचा स्पर्श कायम राहतो आणि उन्हाळ्यातही जिथे थंडीचा सुखद गारवा अनुभवायला मिळतो असे हे ठिकाण आहे. या शहराला अतिशय प्राचीन इतिहास आहे. या शहराला त्याचे नाव मिळाले आहे तेही शिलाँग (Shyllong) या देवीमुळे. सहा हजार फूट उंचीवर असलेल्या आणि आता 'शिलाँग पीक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्वत शिखरावर या देवीचे वास्तव्य असल्याचे मानले जाते. हे शहर ब्रिटिशांनी वसवले. ईस्ट इंडिया कंपनीचा तळ याच 'शिलाँग पीक'वर होता पण तिथे पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने पुढे ब्रिटिशांनी तो तळ हलवून त्या डोंगराच्या पायथ्याशी नेला. शिलाँगवर पाश्चिमात्य, संस्कृतीचा प्रभाव आजही स्पष्टपणे जाणवतो. अनेक देखणी चर्चेस, १८ होलचे गोल्फ कोर्स आदि पाश्चिमात्य प्रभाव वागविणाऱ्या प्रेक्षणीय स्थळांबरोबरच असंख्य सुंदर तलाव, धबधबे यांनी शिलाँगचा परिसर नटला आहे. पर्यटन विषयक माहितीपत्रकात या विषयी बरेच काही वाचले होते त्यामुळे शिलाँग बघण्याची खूप उत्सुकता होती. पण या डोंगरावर वसलेल्या शिलाँगला आम्ही पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे सहा वाजताच रात्रीचे दहा वाजले असावे असा मिट्ट अंधार पसरला होता. त्यामुळे शिलाँगचे पहिले दर्शन आम्हाला झाले ते डोंगरावर लुकलुकणाऱ्या असंख्य दिव्यांच्या रूपातच. सुरक्षा निर्बंधांमुळे बस आमच्या 'हॉटेल एम्बसी' पर्यंत जाऊ शकत नव्हती - शेवटी शिलाँगमधील प्रख्यात गोल्फ ग्राउंडच्या वाहनतळावर बस उभी करून पायीच हॉटेलवर जाणे भाग पडले. शिलाँगच्या मोहक रूपाच्या दर्शनासाठी दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापर्यंत वाट बघणे भाग होते.

सूर्योदयाला घडलेले शिलाँगचे दर्शन अविस्मरणीय होते. आजूबाजूच्या डोंगरांवरुन हलकेच खाली उतरणारी सूर्यकिरणे दाट धुक्याच्या दुलईत गुरफटून झोपलेल्या शिलाँगला साखरझोपेतून बाहेर काढत होती. खिडक्यांच्या काचांवर, झाडांच्या पानांवर, रस्त्यांवर, घरांच्या छपरांवर पडलेले दवबिंदू उन्हात चमकत होते.. रस्ते झाडले जात होते.. बघता बघता उन्हे चांगलीच वर आली. घड्याळातली सकाळची सातची वेळ आणि बाहेरचे प्रखर ऊन याचा कुठे ताळमेळ बसत नव्हता, पण विशेष म्हणजे ऊन एवढे वर येऊनही वातावरणातली थंडी अजिबात कमी झाली नव्हती. शिलाँगच्या आसपास असलेली पर्यटन स्थळे बघण्यापूर्वी भूगोलाच्या धड्यातून, सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण म्हणून आपल्या परिचयाचे झालेले चेरापुंजी बघायला जायचे आम्ही ठरवले होत. त्यामुळे ब्रेकफास्ट करून लगेचच बाहेर पडलो.

चेरापुंजी बघायची खूप उत्सुकता होती. चेरपुंजी हे आता जरी सर्वाधिक पाऊस

पडणारे ठिकाण राहिले नसले, आणि तो मान आता चेरापुंजीजवळच्याच मौसिनराम या गावाकडे गेला असला तरी चेरापुंजीला आजही प्रचंड म्हणजे ३६६ इंच इतका पाऊस पडतो. या ठिकाणाचे असे काय वैशिष्ट्य आहे की ज्यामुळे येथे एवढा प्रचंड पाऊस पडतो हे जाणून घ्यायची खूप उत्सुकता होती, कुतूहल मनात होते. खडबडीत रस्त्यांवरचा चार-पाच तासांचा प्रवास हादरे खात करतानाही उत्सुकता कायम होती. चेरापुंजीजवळच प्रख्यात रामकृष्ण मिशन आहे, हे आधी पर्यटन विभागाच्या माहिती पत्रकातून वाचले होते. त्यामुळे शेला या गावी एका वळणावर असलेल्या उंच टेकाडावरील रामकृष्ण मिशनचा आश्रम दिसताच चेरापुंजी जवळ आल्याची खूण पटली.

शिलाँगपासून चेरापुंजी फक्त ५६ कि. मी. वर आहे यावर विश्वास बसू नये इतका वेळ चेरापुंजीला जायला लागतो. समुद्रसपाटीपासून तेराशे मीटर्स उंचीवर असलेल्या चेरापुंजीला चहुबाजूंनी उंचच उंच डोंगरांनी वेढले आहे. मेघालयाच्या खासी टेकड्यांचा हा भाग. याला इतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्व आहे आणि भूगोलाच्याही. भूगोलाच्या दृष्टीने महत्त्व आहे कारण पश्चिमी मौसमी पाऊस सर्वांत प्रथम याच टेकड्यांवर येऊन धडकतो, आणि एकाही झाडाला तग धरता येऊ नये इतक्या धुवांधारपणे कोसळतो. चेरापुंजीत बाराही महिने पाऊस असतो हा समज मात्र साफ चुकीचा आहे. इथे जो काही पाऊस पडतो त्यापैकी बहुतांश पाऊस हा एकट्या जुलै महिन्यात पडतो आणि वाहून जातो. त्यामुळे एवढा पाऊस पडत असूनही चेरापुंजीला घनदाट जंगल तर नाहीच पण चेरापुंजी अगदी ओसाड आहे. वाळलेल्या पिवळ्या गवताने आणि पत्र्याच्या वास्तूंमधील विविध सरकारी, निमसरकारी कार्यालयांच्या फलकांनी चेरापुंजी आपले स्वागत करते. चेरापुंजी हे मोठे शहर आहे. चेराबाजार तर संपूर्ण मेघालयात प्रसिद्ध आहे. अणि पूर्वांचलातील अनेक राज्यांप्रमाणेच मेघालयातही मातृसत्ताक पद्धतीच अस्तित्वात असल्याने हा बाजारही प्रामुख्याने स्त्रियांच्याच हातात आहे.

या भागातल्या प्रचलित कथांवरून वेध घ्यायचा म्हटला तर या परिसराचा इतिहास महाभारत काळापर्यंत मागे जातो. चेरापुंचीच्या जवळच असलेल्या क्रेम उमलॉव या प्राचीन व आशियातल्या चौथ्या क्रमांकाच्या लांब गुहेमध्ये भीम व हिडिंबेचा पुत्र घटोत्कच राहात होते अशी कथा स्थानिक गावकरी सांगतात. या गोष्टीची खातरजमा करणे कठीण आहे. पण चेरापुंजीचा आधुनिक इतिहासही ब्रिटिश काळापर्यंत मागे जातो. चेरापुंजीला ब्रिटिशांनी आपला तळ उभारला होता आणि वेल्स मिशनरी समाजसेवेच्या माध्यमातून प्रथम उतरले तेही याच भागात. खासी साहित्याचे जन्मस्थळही हेच असल्याचे सांगितले जाते.

चेरापुंजीला पडणाऱ्या प्रचंड पावसामुळे या परिसरात अनेक नयनरम्य धबधबे आहेत. चेरापुंजीपासून १ कि. मी. वर असलेल्या मौसमाई खेड्याजवळ असलेला

मौसमाई धबधबा, जगातला चौथा उंच धबधबा– अशी ख्याती असलेला नोहकालीकाई धबधबा, मौसमाई शेला रस्त्यावरील उमहीन आणि किनरेम हे धबधबे आणि एका दंतकथेच्या माध्यमातून नागदेवतेशी जोडला गेलेला देंथलेन धबधबा हे पाचही धबधबे नजर बांधून ठेवतील असे आहेत.

खुद्द चेरापुंजीला पर्यटन विभागाचे एक रेस्टॉरंट आहे. तिथे पुरीभाजी, ऑम्लेट यांसारखे मोजके पदार्थ मिळू शकतात. या रेस्टॉरंटचा परिसर मात्र सुंदर आहे. थोडासा माळशेज घाटातील रेस्टॉरंटची आठवण करून देणारा आहे. गरम गरम, चविष्ट पुरी भाजीवर ताव मारताना भिंतीवरील काचांच्या खिडक्यांतून आजूबाजूचा हिरवागार निसर्ग पाहण्याची मजा काही औरच आहे. याच ठिकाणाहून ठिकठिकाणी पाण्याने वेढलेला बांगला देशचा सिल्हेट जिल्हा, तिथली शेते यांचे सुस्पष्ट दर्शन होते. चेरापुंजीच्याच थोडे पुढे असलेल्या थांगखरांग बोटॅनिकल गार्डनमधूनही बांगलादेश स्पष्टपणे दिसतो. एकाच उपखंडातले, एकमेकांत तसूभरही फरक नसलेले हे दोन देश.. कधीकाळी हा प्रदेशसुद्धा आपल्याच देशाचा हिस्सा होता, ही जाणीव हृदयात सूक्ष्म कळ उमटवून जाते.

चेरापुंजीच्याच परिसरात अनेक गुहा आहेत. मौसमाई गुंफा ही त्यांपैकीच एक. चेरापुंजी व मौसमाई दरम्यानची लुम लॉवबाह गुंफा हेही असेच एक आकर्षण स्थळ. या गुहेचे दुसरे टोक नेमके किती खोलवर आहे, कुठे निघते– याचा शोध अद्याप लागलेला नाही, त्यामुळे साहसी पर्यटकांना ही गुहा म्हणजे एक आव्हान आहे. एकूणच मेघालयात खूप गुहा आहेत. मेघालय ॲडव्हेंचर असोसिएशनचे सरचिटणीस बी. बी. खारप्रन डॅली यांनी दिलेल्या माहितीनुसार मेघालयात एकूण दोनशे गुहा असून त्यांपैकी पन्नासच गुहा आत्तापर्यंत अभ्यासल्या गेल्या आहेत. संपूर्ण आशिया खंडातल्या सर्वांत मोठ्या गुहेचा शोधही मेघालयातच लागला असून आम्ही चेरापुंजीजवळच्या ज्या क्रेम उमलॉव गुहेत गेलो होतो ती आशिया खंडातली चौथ्या क्रमांकाची लांब गुहा मानली जाते.

गर्द झाडीत लपलेली ही गुहा बाहेरून दिसतही नाही. शेलाहून चेरापुंजीकडे जाणाऱ्या रस्त्यावर उजवीकडे एक लहानशी गल्ली आत जाते. त्या गल्लीच्या तोंडावरच असलेले पाच लहान मोठ्या उंचीचे एका ओळीतील शिलाखंड या प्राचीन गुहेकडे निर्देश करतात. त्या शिलाखंडांवर शिलालेख नाहीत, पण हे असे पाच शिलाखंड केवळ मेघालयातच नव्हे तर आसाम व मणिपूरमध्येही आढळतात. या प्रदेशावर पूर्वी ज्या अहोम राजांची सत्ता होती त्यांनी ते उभारले असावेत, पण त्यांचा अर्थ काय, ते कशाचे निदर्शक आहेत, हे समजू शकले नाही.

त्या शिलाखंडांना बाजूला ठेवून त्या गल्लीतून आत गेले की एक मोकळे मैदान लागते. तिथपर्यंत गेल्यावरही गुहेचा पत्ता लागत नाही, पण गुहा उजव्या बाजूला

आहे असं स्थानिक लोकांनी सांगितल्याने उजव्या बाजूच्या झाडीत घुसलो. उजवीकडच्या टेकडीवर डोंगरात खोदलेल्या पायऱ्यांवरून वर चढले की या गुहेचे तोंड लागते. गुहेत एवढा मिट्ट काळोख आहे की बॅटरीचा उजेडही तो भेदू शकत नाही. तसेच थोडे आत गेल्यावर दोन फाटे फुटलेले दिसतात. डावीकडे जाणाऱ्या फाट्याने गेल्यास तो टेकडीच्या दुसऱ्या अंगाला बाहेर पडतो असे स्थानिक मुलांनी सांगितले, पण उजवीकडचा फाटा कुठे जातो हे त्यांनाही माहीत नव्हते. मेघालय ॲडव्हेंचर असोशिएशन व जर्मनीच्या काही तज्ज्ञांनी मात्र तो उजवीकडचा फाटा कुठे जातो याचा शोध लावला आहे.तो फाटा ४५०३ मीटर्स लांबीवर जाऊन निघतो असे तपासात निष्पन्न झाले आहे.

सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण हा मान चेरापुंजीकडून हिरावून घेणारे मौसिनराम हे ठिकाण चेरापुंजीपासून जवळच आहे. गेली काही वर्षे चेरापुंजीपेक्षा जास्त पावसाची नोंद तेथे होत आहे. तिथली गुहाही प्रेक्षणीय आहे, आणि आज जरी मेघालयावर ख्रिश्चन संस्कृतीचा प्रभाव जाणवत असला तरी एकेकाळी हे राज्य हिंदुसंस्कृतीच्या प्रभावाखाली होते याची साक्ष देणारी ही गुहा आहे. या गुहेत एक शिवलिंग असून त्या शिवपिंडीच्या बरोबर वर, गुहेच्या छताला गाईच्या आचळासारखा आकार प्राप्त झाला असून त्यातून शिवपिंडीवर अविरत जलाभिषेक होत असतो. त्यामुळे निसर्गाचा हा अद्भुत चमत्कार बघण्यासाठी तिथे पर्यटकांची व श्रद्धाळू भाविकांची खूप गर्दीही असते.

चेरापुंजीहून परत येताना वाटेतच शेला या गावी असलेली रामकृष्ण आश्रमाची भव्य वास्तू बघण्याची खूप इच्छा होती. ख्रिश्चन धर्मप्रसारकांच्या वाढत्या कारवायांना आळा घालण्यासाठी खरेतर रामकृष्ण मिशनने या भागात आश्रमशाळा सुरू केल्या पण या शाळांत प्रवेश देताना मात्र मुलाचा धर्म कोणता या मुद्यांवरून भेदाभेद करण्यात येत नाही. तसेच आश्रमात स्वामी विवेकानंदांच्या, रामकृष्ण परमहंसांच्या उपदेशानुसार शिक्षण दिले जाते पण हिंदुधर्माच्या प्रसाराचा प्रयत्न केला जात नाही. त्यामुळेच या संपूर्ण परिसरात रामकृष्ण मिशनची विश्वासर्हता मोठी आहे.

शेलाच्या रामकृष्ण आश्रमात स्वामी वैभवानंदांची भेट झाली. ते सांगत होते, 'या भागात रामकृष्ण मिशनच्या एकूण ३४ शाळा आहेत. मेघालयचे माजी मुख्यमंत्री बी. बी. लिंगडोह, माजी खासदार व आसामचे माजी मुख्यमंत्री प्रा. जी. जी. स्वेल, लोकसभेचे सभापती पी. ए. संगमा असे अनेक मान्यवर रामकृष्ण मिशनच्या शाळांतून शिकून मोठे झाले आहेत.

स्वामीजींनी शाळेच्या कामकाजाविषयी माहिती दिली. या शाळेत रोजगाराच्या दृष्टीने अत्यावश्यक असे व्यवसायाभिमुख शिक्षणही मुलांना दिले जाते. त्यामुळे संस्थेत शिवणापासून ते छपाईपर्यंत विविध विभाग आहेत. तिथे ही मुले त्यांच्या आवडीच्या

व्यवसायाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊ शकतात.

स्वामीजी सांगत होते, 'या भागात गरिबी फार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षणाचा खर्च परवडत नाही. अशी दीडशे गरीब मुले आश्रमाच्याच वसतिगृहात राहतात. आश्रमाला सरकारी मदत आहे. देणग्याही मिळतात.'

आश्रमाचा परिसर विस्तीर्ण आहे. शाळांच्या इमारती, वसतिगृहाची इमारत, वाचनालय, व्यवसाय प्रशिक्षण देणारे कक्ष, स्वामीजींच्या तसंच व रामकृष्ण परमहंसांच्या साहित्याची, शुभेच्छा पत्रांची, तसबिरी, लॉकेटस् यांची विक्री करणारा स्वतंत्र कक्ष आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एका अतिशय देखण्या प्रार्थना कक्षाने हा सारा परिसर सजला आहे. या प्रार्थना कक्षात स्वामी विवेकानंदांची देखणी मूर्ती आहे. रोज सकाळ-संध्याकाळ सर्व मुले तेथे प्रार्थना करतात. आम्ही गेलो तेव्हा दुपारचे साडे तीन वाजले होते, म्हणजे तिकडच्या हिशेबाने संध्याकाळ झाली होती. त्यामुळे शाळा सुटून मोकळ्या झालेल्या मुलांचे खेळ सुरू होते. त्यांच्याशी गप्पा मारायचा प्रयत्न केला. पण एक तर आमच्यासारख्या परक्या, अनोळखी, व्यक्तींशी गप्पा मारायला ती मुले बुजत होती, भाषेचीही अडचण आडवी आली. त्यामुळे रामकृष्ण आश्रमाच्या त्या मोकळ्या पठारावरून मावळतीच्या सूर्याला नमस्कार करून विजेच्या दिव्यांनी लुकलुकणाऱ्या, अंधाराच्या दुलईत लपेटलेल्या शिलाँगकडे परतलो.

शिलाँग– चेरापुंजी हे अंतर केवळ ५६ कि. मी. असलं तरी त्या भागातले वळणा-वळणाचे खराब रस्ते आणि लवकर पडणारा अंधार या दोन गोष्टी लक्षात घेऊन चेरापुंजीला जायचे झाल्यास संपूर्ण दिवस मोकळा ठेवावा लागतो. त्या एका दिवसात तेवढा एकच भाग बघून होऊ शकतो. बाकी खुद्द शिलाँगमध्ये व त्याच्या परिसरात असलेली असंख्य रमणीय स्थळे बघण्यासाठी आणखी एक दिवस ठेवावा लागतो. शिलाँगच्या मध्यभागी असलेले वॉर्डस् लेक हे तुम्ही संपूर्ण दिवसही व्यतीत करू शकाल इतके सुंदर ठिकाण आहे. तिथे बोटिंगची सुविधा उपलब्ध आहे आणि हौस म्हणून मासे पकडायचे असतील तर त्याचीही परवानगी आहे. वॉर्डस् लेक प्रमाणेच लेडी हैदरी पार्क हे ही शिलाँगमधले पर्यटकांचे एक आकर्षण स्थळ आहे. विविध जातीच्या झाडांनी, फुलांनी बहरलेल्या या उद्यानात लहान मुलांसाठी विविध खेळ तर उपलब्ध आहेतच पण एक छोटेसे प्राणी संग्रहालयही या उद्यानात बघायला मिळते.

मेघालय हा पर्वतांचा, घनदाट वनराईने नटलेला, विविध आकर्षक रंगांच्या फुलांनी, ऑर्किडस्नी बहरलेला असा प्रदेश आहे. त्यामुळे अर्थातच असंख्य सुंदर सुंदर फुलपाखरांचेही हे वसतिस्थान आहे. उद्यानात किंवा घनदाट झाडीतून फेरफटका मारत असाना ती तुम्हाला दर्शन देतातच पण त्यांचे अगणित प्रकार, भुरळ पाडणारी रूपे, जर एकाच ठिकाणी पाहायची तुमची इच्छा असेल तर शिलाँगमधील

'ऍन्टॉमॉलॉजिकल म्युझियम' हे खाजगी म्युझियम बघायलाच हवे. शिलाँगमधील सरकारी वस्तुसंग्रहालयही प्रेक्षणीय आहे. मेघालयाच्या पूर्वेतिहासाची, तिथल्या लोकजीवनाची जर झलक पाहायची असेल तर ती इथे निश्चितच मिळू शकते.

शिलाँगच्या आसपास असंख्य नयनरम्य धबधबेही आहेत. एलिफंट फॉल्स, मार्गारेट फॉल्स, स्प्रेड ईगल फॉल्स, बिशप फॉल्स, बीडन फॉल्स, स्वीट फॉल्स.. नावं तरी किती घ्यायची? आम्हाला वेळे अभावी सगळेच धबधबे पाहणे शक्य नव्हते, पण आम्ही एलिफंट फॉल्स बघायला गेलो. मी पाहिलेल्या अप्रतिम धबधब्यांपैकी तो एक धबधबा होता. वरून त्याची जराही कल्पना येत नाही पण जसे-जसे ती टेकडी उतरून आपण त्या धबधब्याच्या पायथ्याशी जायला लागतो तसे तसे त्याचे सुंदर स्वरूप लक्षात यायला लागते. हत्तीच्या पायाच्या आकाराचा हा धबधबा असल्याने त्याला एलिफंट फॉल्स असे नाव पडले असावे. गर्द झाडीमुळे उन्हाचा स्पर्शही न होणाऱ्या टेकड्यांवरून मौक्तिकांसारखे तुषार उधळत खाली झेप घेणाऱ्या त्या धबधब्याचे रूप डोळ्यात साठवताना, त्याच्या गोठवणाऱ्या थंड पाण्यात खेळताना मनाची तृप्तीच होत नव्हती.

मेघालय हा एकूण तीन टेकड्यांचा बनलेला आहे. गारो, खासी आणि जैंतिया या त्या तीन टेकड्या. या तीनही टेकड्यांच्या परिसरात असंख्य पर्यटन स्थळे आहेत. कुठे विस्तीर्ण तलाव आहेत. तर कुठे गंधकाचे झरे, कुठे आकर्षक धबधबे आहेत तर कुठे गूढ विश्वात घेऊन जाणाऱ्या गुहा... मेघालयाचा कानाकोपरा धुंडाळायचा तर सहा महिनेही कमी पडतील इतका निसर्ग सौंदर्याचा खजिना मेघालयात दडलेला आहे. पण थोड्या दिवसांची रजा घेऊन तिथे जाणाऱ्या आपल्यासारख्यांना थोड्या दिवसांत सगळे बघणे काही शक्य होत नाही. पण जे बघितले ते आणखी बघण्याची ओढ लावणारे असते.

शिलाँगहून गुवाहाटीकडे परतताना शिलाँगपासून अवघ्या १६ कि. मी. वर लागणारे उमियाम लेक हे असेच एक अतृप्ती जागविणारे ठिकाण. हा तलाव म्हणजे नैसर्गिकरीत्या तयार झालेला, केवळ पावसाच्या पाण्याने भरलेला एक अतिविस्तीर्ण जलाशय आहे. हा जलाशय इतका मोठा आहे की त्याच्या या स्वरूपामुळेच त्याला 'बडा पानी' हे नाव पडले आहे. मेघालय सरकारच्या पर्यटन विभागाने तिथे 'वॉटर स्पोर्टस्'चीही सोय केली आहे. जवळच नेहरू पार्क आहे. चहूबाजूंनी डोंगराच्या कुशीत वसलेल्या व क्षितिजापर्यंत पसरलेल्या या जलाशयाची खोली २७६ फूट इतकी प्रचंड आहे. या जलाशयात आमचा नौकाविहार चालू असतानाच अंधाराच्या सावल्या दाटून येऊ लागल्या होत्या. भर दुपारी साडे तीन-चार वाजता अंधार- हे अजून आमच्या अंगवळणी पडत नव्हते, पण त्याला इलाज नव्हता. सारा आसमंत दाट अंधाराच्या व बोचऱ्या थंडीच्या दुलईत लपेटला जाण्यापूर्वी परतणे भाग होते.

मेघालयाची सफर म्हणजे जणू स्वप्नातली सफर होती.. आणि स्वप्न त्यातही विशेष करून सुरेख स्वप्ने ही अल्पजीवीच असतात, नाही का?

— —

# ४ / दहशतवादात दडपलेला नागालँड

हिरव्या गर्द झाडीत लपलेली, वळणा - वळणाने पुढे सरकणारी वाट... सोबतीला दोन्ही बाजूंना दिसणारे उंचच उंच डोंगर आणि रस्त्याच्या कडेला खोल दरीतून खळखळत वाहणाऱ्या खोल नद्या म्हणजे नागालँड!

कुठे डोंगर उतारावर, दिसणारी अननसाची शेती तर कुठे डोंगर उतारावरील केळींची झाडे...

हा नागालँड!

कुठे कधी काळी नागालँडवर राज्य करणाऱ्या कचारी - अहोम राजघराण्याच्या राजवटीचे अवशेष म्हणून समोर येणारी देवळे, स्तंभ, काही पडझड झालेले ढिगारे तर कुठे उत्तुंग, देखणी चर्चेस!

हा नागालँड!

बसने दिमापूरला प्रवेश करताच चेहेरेपट्टी, वेष आणि त्याचबरोबर नैसर्गिक व राजकीय वातावरणही बदललेले लक्षात येते. दिमापूरच्या पुढे नागालँडमध्ये ठिकठिकाणी लष्कराच्या गाड्या, रस्त्याच्या बाजूला पोझिशनमध्ये उभे असलेले सैनिक दिसतात. दिमापूरमध्ये स्टेट बँकेच्या बाहेर सीमेवर असल्याच्या थाटात बंकर लावून त्याच्या आडून बंदुका सरसावून, येणाऱ्या - जाणाऱ्यांवर नजर रोखून असलेले जवान बघायला मिळतात आणि मेघालय - आसाममध्ये अनुभवलेले मोकळे वारे कुठे तरी बंदुकांच्या संगिनींच्या आड कैदेत पडल्यासारखे वाटू लागते. या कडेकोट बंदोबस्ताला आणि लष्कराच्या उपस्थितीला कारण म्हणजे मनाने कधीच भारतात सामील न झालेला, स्वत:ला कायमच स्वतंत्रच मानत आलेला हा प्रदेश आहे.

दिमापूर हे आसाम - नागालँडच्या सीमेवरचे, नागा - कुकी संघर्षामुळे सदैव गाजत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ वरचे एक मोठे शहर आहे. नागालँडचे प्रवेशद्वार

आहे. ईशान्य रेल्वेवरचे एक अत्यंत महत्त्वाचे स्थानक आहे आणि नागालँडमधला एकमेव विमानतळ असलेले शहर आहे.

दिमापूर ही आजच्या नागालँडची राजधानी नाही, पण एकेकाळी कचारी राजघराण्याची राजधानी बनण्याचे भाग्य लाभलेली ही नगरी आहे. उत्तर पाषाण संस्कृतीचे हे महत्त्वाचे केंद्र होते. तेराव्या शतकात अहोम राजांच्या आक्रमणानंतर त्यांची सत्ता कायम होण्यापूर्वी येथे कचारी संस्कृती अस्तित्वात होती. त्यांची येथे सत्ता होती. त्यांनी बांधलेले तलाव, टाक्या, घाट- नाजूक वेलबुट्टीचे कोरीव काम केलेली देवळे यांचे अवशेष आजही तेथे बघायला मिळतात आणि विशेष म्हणजे हे आर्येतर लोक असूनही त्यांनी बांधलेल्या या वास्तूंच्या अवशेषांवर हिंदू प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

दिमापूर हे एक मोठे व्यापारी केंद्रही आहे. त्यामुळे अर्थातच सर्व प्रांतातले लोक इथे भेटू शकतात. हे व्यापारी केंद्र असल्यानेच नागालँडमधील अन्य भागांप्रमाणे व विशेषत: राजधानी कोहिमाप्रमाणे इथे भीतीचे वातावरण फारसे जाणवत नाही. कोहिमाप्रमाणे हे शहर अंधारल्यानंतर दारे - खिडक्या बंद करून चार भिंतींआड दडत नाही, व इथेही लष्कर असले तरी कोहिमाप्रमाणे ते जरब बसविणाऱ्या आक्रमक रूपात आपल्यासमोर येत नाही. गुवाहटीपासून इंफाळपर्यंत अनेक शहरे दिमापूरला रस्त्याने जोडली गेलेली असल्याने सरकारी आणि खाजगी बस कंपन्यांची वाहतूक इथून रात्रंदिवस चालू असते. खाजगी कंपन्यांच्या भाड्याची एक मजा म्हणजे त्यांच्या दराबाबत चक्क 'बार्गेनिंग' होऊ शकते. दिमापूरचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तुमचे खाजगी वाहन असेल तर ठीक अन्यथा सूर्यास्तानंतर म्हणजे दुपारी चार - साडेचार नंतर सर्व सरकारी व खाजगी बसेसना दिमापूरच्या सीमेवर लष्करी तपासणीला सामोरे जावे लागते.

१ डिसेंबर १९६३ रोजी भारतीय संघराज्यात भारताचे सोळावे राज्य म्हणून सामील झालेल्या नागालँडच्या पश्चिमेला आसाम, पूर्वेला म्यानमार, उत्तरेला अरुणाचल प्रदेश व आसामचा काही भाग आणि दक्षिणेला मणिपूर आहे. आजचा भारत अस्तित्वात येण्यापूर्वीच्या काळी ब्रह्मदेशचा कचिन टेकड्यांचाही परिसर या नागभूमीत समाविष्ट होता. त्यामुळे नागांच्या काही जमातींची वसती आजही तिथे आहे. नागालँडमधील नागांचेही तिथे येणे - जाणे आहे. नागालँडमधील अतिरेक्यांना सीमेपलीकडून मिळणाऱ्या आश्रयालाही हीच स्थिती कारणीभूत आहे आणि त्यामुळेच नागालँडमध्ये एक - दोन नव्हे तर असंख्य अतिरेकी संघटनांनी हैदोस घातला असून लष्कराची मोठी उपस्थिती अनिवार्य बनली आहे.

नागालँड हे १६ हजार ५२७ चौ. कि. मी. क्षेत्रफळात पसरलेले राज्य एकूण सात जिल्ह्यांत विभागले गेलेले आहे. कोहिमा, मोकाकचुंग, मॉन, फेक, च्युएनसँग, वोखा व झुन्हेबोटो हे ते सात जिल्हे.

'नागा' लोक म्हणजे सगळे एकसारखे असे आपण मानत असलो तरी त्यांच्यात एकूण १६ जमाती आहेत. अंगामी, एओ, सेमा, लोथा, रेंगमा, चाखेसँग, संगताम, कोनयाक आणि पाचुरी ही त्यांपैकी प्रमुख जमातींची नावे आहेत. नागा म्हणजे नग्न लोक असा जो अर्थ उर्वरित भारतात प्रचलित आहे तो साफ चुकीचा असून यांतील बहुतांशी जमाती अतिशय प्रगत आहेत. फॅशन डिझायनिंगमध्येही त्यांनी चांगला जम बसविला असून दिमापूर, कोहिमासारख्या ठिकाणी फॅशन शोज, सौंदर्यस्पर्धा वगैरे सतत होत असतात. त्यांची ग्रामव्यवस्थाही अतिशय प्रगत आहे. आपल्या स्वातंत्र्यावर ते जिवापाड प्रेम करतात. ते दगडांचे पूजक आहेत, कारण आपला जन्म दगडांपासून झाला अशी त्यांची धारणा आहे. मोठमोठे दगड समारंभपूर्वक ओढत न्यायचे असा एक सणही ते साजरा करतात. समाजशास्त्रज्ञांच्या मते मात्र इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर ईशान्य भारतात जे वेगवेगळे गट वेगवेगळ्या भागांतून आले त्यांपैकी दक्षिण आणि आग्नेय चीनमधून आलेल्या नेग्रॉईडस् पासून या नागा लोकांची उत्पत्ती झाली आहे. त्यांच्या समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुषांना समान अधिकार असले तरी स्त्रियांनी राजकारणात येणे त्यांना अजिबात मान्य नाही. त्यामुळे नागालँड विधानसभेत किंवा नागालँडमधून संसदेत स्त्रियांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे.

दोन ते अडीच हजार मि.मी. इतका प्रचंड पाऊस होत असलेल्या नागालँडमध्ये ऑक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान हिवाळा असतो, पण थंडी सहन करण्याजोगी असते. त्यामुळे नागालँडला पूर्वेकडील स्वित्झर्लंड म्हणूनही ओळखले जाते. नागालँडमध्ये मनमुराद भटकंती करावी अशी अनेक खोरी आहेत. प्रस्तरारोहण आणि जंगलात कँपिंग करण्याचीही संधी आहे.

पूर्वांचलातील इतर काही राज्यांप्रमाणेच नागालँडलाही महाभारतकालीन वारसा आहे. पांडवांच्या वनवासाच्या काळात अर्जुन या भागात आला होता आणि येथेच त्याचा विवाह नागकन्या उलुपीशी झाला होता असा उल्लेख महाभारतात आढळतो. नागालँडचा आधुनिक इतिहास मात्र तेराव्या शतकानंतरचाच उपलब्ध आहे. तेराव्या शतकाच्या प्रारंभी ब्रह्मदेशातील शान जमातीचा प्रमुख सुखपा याने नाग लोकांना जिंकून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले होते असे इतिहास सांगतो. पण त्याची सत्ता कमजोर झाल्यावर अहोम राजांनी या भागावर आपली सत्ता स्थापन केली. त्यांचे व नागांचे संबंध बरेचसे मित्रत्त्वाचे राहिले व नंतर तर हा सगळाच भाग ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली गेला. आज हा भाग स्वतंत्र व सार्वभौम भारताचा भाग आहे, पण तरीही या जमातींचे वेगळेपण, त्यांची संस्कृती टिकविण्यासाठी म्हणून ब्रिटिशांच्या कालखंडात सुरू झालेली 'इनर लाईन परमिट'ची पद्धत आजही अस्तित्वात आहे. नागालँडला जाण्यासाठी आपल्याला पाच रुपये भरून प्रवेशाचा परवाना; 'इनर लाईन परमिट' मिळवावे लागते. हा परवाना दिल्ली किंवा कलकत्ता येथील नागालँड

हाऊसमध्ये तसेच दिमापूर येथील ॲडिशनल डेप्युटी कमिशनर व मेघालयातील शिलाँग येथील असिस्टंट रेसिडंट कमिशनर यांच्या कार्यालयात मिळू शकतो. विशेष म्हणजे हा परवाना फक्त पर्यटकांनाच काढावा लागतो असे नाही तर कामानिमित्त तिथे जाणारे व्यापारी, नोकरदार आदींनाही अशाच स्वरूपाचा परवाना काढणे अत्यावश्यक आहे. हा परवाना काढण्याचा त्रास आणि तिथे कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांनी चालवलेला धुमाकूळ हा त्रास सोसूनही नागालँड बघण्यासाठी जावे असे मात्र तिथे बरेच काही आहे. दहशतवादी संघटनांच्या कारवायांचा फटका सगळ्यांना, सगळ्यावेळी बसतोच असे नाही. आम्ही कोहिमाला गेलो त्याच्या फक्त दोनच दिवस आधी दिमापूरजवळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ वर दहशतवाद्यांनी बाँबस्फोट घडवून आणला होता. आम्हाला मात्र सुदैवाने या अतिरेकी कारवायांचा काही त्रास झाला नाही.

दिमापूरकडून कोहिमाकडे जाताना वाटेत पाफेमी नावाचे एक छोटे गाव लागते. तिथे आम्ही चहासाठी थांबलो होतो. तिथे आपल्या लष्कराचा एक तळ आहे. तिथे विजय पाठारे नावाचा एक महाराष्ट्रीय जवान आम्हाला भेटला. तो गेली आठ वर्षे तिथे आहे. तो आसाम रेजिमेंटचा आहे. त्याचे पहिले पोस्टिंग त्रिपुराला झाले होते. पण गेली काही वर्षे तो नागालँडमध्ये तैनात आहे. आसाम रेजिमेंटच्या एकूण २४ बटालियन्स सध्या नागालँडमध्ये तैनात आहेत. एकेका बटालियनमध्ये पंधराशे - सोळाशे जवान आहेत. त्यांत काही जवान महाराष्ट्राचे आहेत असे त्याने सांगितले. तिथे या सैनिकांना रात्रंदिवस युद्धाच्या प्रसंगाशी कसा सामना करावा लागतो आहे त्याच्या रोमांचक कहाण्या त्यांच्याकडून ऐकायला मिळाल्या. तिथे नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडचे दोन्ही गट कसा हिंसाचार करत असतात, त्यांच्यातही आपापसात कशा सतत मारामाऱ्या चालू असतात, याची माहिती तर त्यांनी दिलीच पण टेकडीवरून खाली निर्देश करून नागा अतिरेक्यांचे अड्डे कुठे - कुठे आहेत याचीही माहिती दिली.

तो सांगत होता, 'एक दिवस संध्याकाळीच अतिरेक्यांनी लष्कराच्या तुकडीवर हल्ला केला आणि आम्हाला तातडीने तिकडे जावे लागले. ती चकमक रात्रभर चालू होती. इकडे बायकोला कळवायलाही जमले नव्हते. तिला एवढेच कळले होते की काही तरी चकमक वगैरे चालू आहे. ती भीतीने, काळजीने वेडीपिशी झाली पण लहान मुलीला घेऊन ती जाणार तरी कुठे?'

परप्रांतात, नवऱ्याशिवाय आपले कुणीही नाही अशी स्थिती असताना नवरा चकमकीत गुंतला आहे हे कळल्यावर त्या तरुण पत्नीची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाही करणे अवघड आहे. आम्ही त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या पत्नीशीही बोललो. महाराष्ट्रातून कुणी आले आहे म्हटल्यावर माहेरचे कुणी भेटावे असा आनंद त्यांना झाला होता. त्यांची ती टेकडावरची झोपडीवजा घरे पाहून आमचे काळीज

मात्र गलबलत होते. त्यांच्या घरी जेवण घ्यायचा त्यांचा आग्रह मोठ्या मुश्किलीने टाळून आम्ही कोहिमाच्या दिशेने प्रवास सुरू केला. पाठारेंनी सांगितलेले किस्से मन अस्वस्थ करत होते आणि त्या पार्श्वभूमीवर नागालँडचा रक्तरंजित, बंडखोर इतिहास व वर्तमान एखाद्या चलत् - चित्रपटाप्रमाणे डोळ्यापुढून सरकत होते.

नागालँड हे असे राज्य आहे की देश स्वतंत्र झाल्याला ५० वर्षे होत आली तरी आजही तिथे प्रतिसरकार चालते... अतिरेकी संघटना सर्वसामान्यांपासून ते थेट पोलिसमहासंचालकांपर्यंत सगळ्यांकडून स्वतंत्र कर वसूल करतात.

स्वातंत्र्याची आस, स्वातंत्र्याची धगधगती ज्वाला नागालँडमध्ये अद्याप शंत होत नाही. त्यांना आपण या प्रजासत्ताकाचा भाग आहोत असे वाटतच नाही. आणि लष्करी बळाच्या जोरावरच आजही तिथे भारत सरकारचे अस्तित्व जाणवून द्यावे लागते.

आजही तिथे स्वातंत्र्यदिनावर, प्रजासत्ताक दिनावर बहिष्कार टाकला जातो. राष्ट्रध्वजाची होळी केली जाते, स्वयंनिर्णयाचा अधिकार मागितला जातो, त्या अधिकाराचा कौल घेण्यासाठी खाजगीरीत्या सार्वमत घेतले जाते, त्या निकालाच्या आधारे या देशाचा त्यांच्यावरचा हक्क धुडकावला जातो, बॉंबस्फोट घडवून आणले जातात, मंत्र्यांना ठार मारले जाते... परदेशांतून शस्त्रे आणली जातात, परदेशी जाऊन गनिमी युद्धाचे शिक्षण घेतले जाते, त्याच्या आधारे या देशाविरुद्ध उघड युद्ध पुकारले जाते, या देशाच्या सर्वशक्तिमान लष्कराशी उघड संघर्ष केला जातो. विशेष म्हणजे तिथे एवढे सगळे होत असूनही त्याची दखल उर्वरित देशात अजिबात घेतली जात नाही.

नागालँड कायम स्वत:ला स्वतंत्रच मानत आला आहे. त्याने कधीही नागांव्यतिरिक्त अन्य कुणाचीही सत्ता, मग ती अहोमांची असो वा ब्रिटिशांची, मनोमन मान्यच केलेली नाही. सोळा जमातींमध्ये विभागला गेलेल्या नागा समाजात प्रत्येक जमातीची आपापले वैशिष्ट्ये कायम टिकविण्याची इच्छा कायम असूनसुद्धा ब्रह्मदेशातील कचिन टेकड्यांपासून ते आसामच्या खोऱ्यापर्यंत एकसंध नागभूमीची स्वप्ने नागालँड आजही पाहतो आहे.

नागालँडचा प्रश्न हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. परकीयसत्तांनी स्थानिक असंतुष्टांना हाताशी धरून आपल्या देशाविरुद्ध चालवलेल्या घातपाती कारवाया वा आपल्या देशाविरुद्ध पुकारलेले अघोषित युद्ध असेही याचे स्वरूप नाही. नागा अतिरेक्यांच्या या चळवळीचे स्वरूप स्वातंत्र्ययुद्धाचेच आहे. स्वातंत्र्याच्या त्यांच्या या ज्वालेला परकीयसत्तांनी व काही प्रमाणात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी तेल ओतून भडकावले आहे हे जरी खरे असले तरी त्यांची ती मूळ इच्छा गेली दोन शतके वारंवार विधायक व हिंसक अशा दोन्ही मार्गांनी वर येत राहिली आहे.

आजच्या नागालँडचा इतिहास जर पाहिला तर १९२३ साली ब्रिटिशांनी नागालँडवर

आपले नियंत्रण कायम करेपर्यंत नागा हे स्वतंत्र राहिले आहेत. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी ज्या अहोम राजघराण्याची आसामवर सत्ता होती त्यांना ब्रह्मदेशाशी असलेला त्यांचा व्यापार तसेच ब्रह्मदेशातील त्यांच्या मूळ वंशाशी असलेले त्यांचे संबंध कायम ठेवण्यासाठी नागालँडमधून जाणाऱ्या मार्गाचा वापर करावा लागे. अत्यंत शूर व कडवे लढवय्ये असलेल्या नागांनी हा मार्ग बंद करू नये म्हणून अहोम राजांनी नेहमीच नागांशी सलोख्याचे संबंध ठेवले. नागांच्या सर्व जमाती स्वत:ला श्रेष्ठ समजत असल्या व त्यांचे रीतिरिवाज वेगळे असले तरी फिझोच्या चळवळीमुळे ते एका झेंड्याखाली यायची प्रक्रिया तरी सुरू झाली. त्यापूर्वी मात्र त्यांचा स्वतंत्र राष्ट्रवाद हा त्यांच्या-त्यांच्या जमातीपुरता, टोळीपुरता मर्यादित होता. पण त्यांनी काही विघ्न आणू नये म्हणून अहोम राजांनी त्यांचा प्रदेश काबीज करण्याच्या फंदात न पडता फक्त त्यांनी जर यांच्या राज्यात येऊन लुटालूट केली तरच त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले होते.

ब्रिटिशांनी ईशान्य भारताकडे आपला मोहरा वळवून ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात आपला जम बसविल्यानंतरही नागा टेकड्या काबीज करण्याच्या फंदात ते पडले नाहीत. ते त्यांना जमले नसते असे नाही पण ते फायदेशीर आहे असे त्यांना वाटले नाही.

१९२३ मध्ये नागालँडवर आपले नियंत्रण मिळविल्यानंतरही त्यांनी मुख्यत्वेकरून नागालँडच्या मध्यवर्ती भागावरच नियंत्रण बसवले होते. तिबेट आणि ब्रह्मदेशाकडचा भाग कोणत्याही प्रशासनाविना मोकळाच सोडला होता. त्यामुळे ब्रिटिश राजवटीतही नागालँडचा बराचसा भाग स्वतंत्रच होता. ज्या भागावर नियंत्रण होते तेही नागांनी सहजपणे मानले नव्हते. ब्रिटिशांनी कोहिमा ताब्यात घेतल्यावर अंगामी नागांनी ११ दिवस कोहिमाला वेढा घालून ब्रिटिशांना हुसकावून लावण्याचा निकराचा प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आले नाही. परिणामी तात्पुरते का होईना पण त्यांना परकीयसत्तेचे आधिपत्य मानावे लागले. ते त्यांनी मनोमन मात्र कधीच स्वीकारले नाही. त्यामुळेच त्यांनी सायमन कमिशनला तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश हा देश सोडून परत जाणार असे निश्चित झाल्यावर ब्रिटिशांकडे वारंवार निवेदने देऊन ब्रिटिश गेल्यावर त्यांना भारत सरकारच्या अंमलाखाली न आणता पूर्वीप्रमाणे स्वातंत्र्य देण्यात यावे अशा मागण्या केल्या होत्या.

ते तेवढेच करून थांबले नाहीत, फिझोच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ महात्मा गांधींनाही भेटले होते आणि त्यांच्याकडेही या शिष्टमंडळाने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली होती. त्यावर गांधीजींनी त्यांच्या मताचा आदर केला जाईल व भारतात सामील होण्यासाठी त्यांच्यावर कोणतीही जबरदस्ती केली जाणार नाही असे आश्वासनही त्यांना दिले होते. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच आपल्यालाही स्वातंत्र्य मिळणार अशा भ्रमात हे नागा लोक होते. त्यामुळे इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट मंजूर झाल्यावर

आपल्याला आपल्या संमतीविना भारताचा हिस्सा बनविण्यात येत आहे हे ध्यानात आल्यावर नागा बिथरले आणि नागालँडच्या इतिहासातील एका नव्या रक्तरंजित पर्वाला प्रारंभ झाला.

नागा नॅशनल कौन्सिलच्या अध्यक्षपदी फिझो यांची निवड झाल्यावर बंडखोरांचा जोर वाढला. फिझोंच्या नेतृत्वाखाली १९५१ मध्ये नागा नॅशनल कौन्सिलने संपूर्ण नागालँडमध्ये सार्वमतही घेतले. या सार्वमताचा कौल अर्थातच 'होम रूल' च्या बाजूने गेला. मग सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. १९५२ च्या निवडणुकीवर बहिष्कार घातला गेला. पंतप्रधान पं. नेहरू यांच्या भेटीवर बहिष्कार घातला गेला. भारत सरकारपुढे कठोर कारवाईशिवाय पर्यायच राहिला नाही. नागालँडमध्ये लष्कर तैनात करण्यात आले. कौन्सिलचे सगळे नेते भूमिगत झाले. फिझो लंडनला पळून गेले व तिथून सूत्रे हलवू लागले. नागांच्या या असंतोषावर तोडगा काढण्यासाठी १ डिसेंबर १९६३ रोजी नागालँड या स्वतंत्र राज्याची स्थापना करण्यात आली. त्यामुळे काही मवाळ प्रवृत्तीचे नागा बंडाचा पवित्रा सोडून देऊन राष्ट्रीय प्रवाहात सामील आहे. नागा नॅशनल कौन्सिल काँग्रेसमध्ये विलीन झाली, पण जहाल नागांची समजूत पटली नाही. त्यांना स्वतंत्र राष्ट्रच हवे होते. त्यामुळे फिझोंचा सहकारी असलेला एगालिंग मुईवा व इसॅक स्वू यांच्या नेतृत्वाखाली नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड ही जहाल उग्रवादी संघटना स्थापन झाली आणि दहशतवादाचा नवा अध्याय नागालँडमध्ये सरकारी अधिकारी, मंत्री आणि गैरनागांच्या रक्ताने लिहिला जाऊ लागला. पुढे या नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडमध्येही (NSCN) फूट पडली आणि एक खफलांग गटही स्थापन झाला. एन्.एस्.सी.एन्. मध्ये फूट पाडण्यात भारत सरकारचा— विशेष करून भारतीय लष्कराचा फार मोठा हात होता असे बोलले जाते. कोहिमाच्या वाटेवर आणि कोहिमातही आम्हाला भेटलेल्या काही लष्करी अधिकाऱ्यांनी व जवानांनी खाजगीत बोलताना या गोष्टीची पुष्टी केली- खफलांग गट हा त्यांच्यात फूट पाडण्याच्याच उद्देशाने आपण उभा केलेला गट आहे असेही सांगितले. असेलही कदाचित, पण त्यामुळे नागालँडमधल्या दहशतवादी कारवायांत काही घट झाल्याचे जाणवत नाही.

नागालँडमधल्या आजच्या दहशतीच्या साम्राज्याचा उलगडा व्हावा एवढेच हा इतिहास सांगण्याचे प्रयोजन आहे. एका निमलष्करी दलाचे नेतृत्व करणारे लेफ्टनंट कर्नल के. वाय. एस्. पन्वर सांगत होते, 'एन्.एस.सी.एन्. चे जाळे इतके व्यापक आहे आणि त्यांच्या हातात एवढी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आहेत की रोज सकाळी जेव्हा आम्ही उठतो तेव्हा मनात विचार येतो की रात्री आपण परत या अंथरुणावर पडू शकू की नाही कुणास ठाऊक?'

एका लष्करी अधिकाऱ्याने तर अशीही माहिती दिली की अलीकडेच एका

लष्करी मोहिमेत मणिपूरमध्ये एन्.एस्.सी.एन्. च्या काही अतिरेक्यांना अटक करण्यात आली. त्यांनी बंगलोरहून काही अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी केली होती आणि नागालँड तसेच मणिपूरमध्येही मोठ्या प्रमाणावर घातपात घडवायची त्यांची योजना होती.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे पैसा येतो कुठून? त्यांना परदेशांतून आर्थिक मदत मिळते का? असे प्रश्न आपल्या मनात येतात पण तिकडे हा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही अशी स्थिती आहे.

पाफेमीला आम्हाला भेटलेला एक जवान सांगत होता, 'पूर्वी त्यांना परदेशातून पैसा मिळायचा, नाही तर बनावट नोटांचा कारखाना असतोच...' त्याने जवळच्याच दरीकडे बोट दाखवून तिथला बनावट नोटांचा कारखाना लष्कराने कसा उध्वस्त केला याची माहिती सांगितली, तर नागालँडची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिमापूरमध्ये एक वेगळाच भीषण किस्सा अनेकांकडून ऐकायला मिळाला. नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (मुईवा गट) च्या प्रतिसरकारची ही कहाणी आहे. नागालँडमध्ये आज या संघटनेच्या प्रतिसरकारची हुमूकत चालते आहे. त्यांच्यात आपल्या लष्कराप्रमाणे सर्व हुद्देही आहेत आणि त्या-त्या हुद्द्यांवर नेमणुका झालेले अधिकारी या प्रतिसरकारचा कारभार चालवत आहेत. दिमापूरमध्ये आमची एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याशी योगायोगाने भेट झाली. त्याने दिलेल्या माहितीनुसार हे प्रतिसरकार करवसुलीही करते. लष्कराने अलीकडेच एका धाडीत या प्रतिसरकारच्या काही स्वघोषित मंत्र्यांना आणि सरकारी, लष्करी अधिकाऱ्यांनाही अटक केली आहे.

या प्रतिसरकारच्या करवसुलीबद्दलही अनेकांकडून ऐकायला मिळाले. मात्र या संघटनेच्या दहशतीमुळे उघडपणे कुणी बोलत नाही. हे प्रतिसरकार सरसकट सगळ्यांकडून मग तो सरकारी शिक्षक, एखादा वरिष्ठ सचिव, पोलिस दलातला शिपाई असो की पोलिस आयुक्त, या सगळ्यांकडून त्यांच्या वेतनातून २५ टक्के रक्कम परस्पर (ॲट सोर्स) कर म्हणून वसूल करते आहे. तिथली कायदा व सुव्यवस्था स्थिती इतकी दयनीय आहे की त्याविरुद्ध आवाज करायची हिंमत ना सरकारी अधिकाऱ्यांना आहे ना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना... सर्वसामान्यांबाबत तर बोलायलाच नको... याच तऱ्हेने मणिपूर-नागालँड सीमेवरील माओ या गावापर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ वरून जाणाऱ्या प्रत्येक ट्रककडून हे प्रतिसरकार ट्रकमागे ८-१० हजार रुपये कराच्या नावाखाली वसूल करत आहे. मग त्यांच्याकडे पैसा मुबलक आहे यात नवल ते कसले? दुर्दैवाने या पैशाचा उपयोग आपल्या देशाविरुद्ध, आपल्या जवानांविरुद्ध, व्यापारासाठी, नोकरीसाठी देशाच्या कोनाकोपऱ्यांतून तिथे गेलेल्या आपल्याच देश बांधवांविरुद्ध होतो आहे...

प्रख्यात क्रांतीकारी कवी दुष्यंतकुमार यांच्या एका गझलेतले दोन शेर या विषण्ण करणाऱ्या आठवणींबरोबर मनात घोळायला लागले...

आपल्याला आपल्या संमतीविना भारताचा हिस्सा बनविण्यात येत आहे हे ध्यानात आल्यावर नागा बिथरले आणि नागालँडच्या इतिहासातील एका नव्या रक्तरंजित पर्वाला प्रारंभ झाला.

नागा नॅशनल कौन्सिलच्या अध्यक्षपदी फिझो यांची निवड झाल्यावर बंडखोरांचा जोर वाढला. फिझोंच्या नेतृत्वाखाली १९५१ मध्ये नागा नॅशनल कौन्सिलने संपूर्ण नागालँडमध्ये सार्वमतही घेतले. या सार्वमताचा कौल अर्थातच 'होम रूल'च्या बाजूने गेला. मग सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. १९५२च्या निवडणुकीवर बहिष्कार घातला गेला. पंतप्रधान पं. नेहरू यांच्या भेटीवर बहिष्कार घातला गेला. भारत सरकारपुढे कठोर कारवाईशिवाय पर्यायच राहिला नाही. नागालँडमध्ये लष्कर तैनात करण्यात आले. कौन्सिलचे सगळे नेते भूमिगत झाले. फिझो लंडनला पळून गेले व तिथून सूत्रे हलवू लागले. नागांच्या या असंतोषावर तोडगा काढण्यासाठी १ डिसेंबर १९६३ रोजी नागालँड या स्वतंत्र राज्याची स्थापना करण्यात आली. त्यामुळे काही मवाळ प्रवृत्तीचे नागा बंडाचा पवित्रा सोडून देऊन राष्ट्रीय प्रवाहात सामील आहे. नागा नॅशनल कौन्सिल काँग्रेसमध्ये विलीन झाली, पण जहाल नागांची समजूत पटली नाही. त्यांना स्वतंत्र राष्ट्रच हवे होते. त्यामुळे फिझोंचा सहकारी असलेला एगालिंग मुईवा व इसॅक स्वू यांच्या नेतृत्वाखाली नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड ही जहाल उग्रवादी संघटना स्थापन झाली आणि दहशतवादाचा नवा अध्याय नागालँडमध्ये सरकारी अधिकारी, मंत्री आणि गैरनागांच्या रक्ताने लिहिला जाऊ लागला. पुढे या नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँडमध्येही (NSCN) फूट पडली आणि एक खफलांग गटही स्थापन झाला. एन्.एस्.सी.एन्. मध्ये फूट पाडण्यात भारत सरकारचा– विशेष करून भारतीय लष्कराचा फार मोठा हात होता असे बोलले जाते. कोहिमाच्या वाटेवर आणि कोहिमातही आम्हाला भेटलेल्या काही लष्करी अधिकाऱ्यांनी व जवानांनी खाजगीत बोलताना या गोष्टीची पुष्टी केली- खफलांग गट हा त्यांच्यात फूट पाडण्याच्याच उद्देशाने आपण उभा केलेला गट आहे असेही सांगितले. असेलही कदाचित, पण त्यामुळे नागालँडमधल्या दहशतवादी कारवायांत काही घट झाल्याचे जाणवत नाही.

नागालँडमधल्या आजच्या दहशतीच्या साम्राज्याचा उलगडा व्हावा एवढेच हा इतिहास सांगण्याचे प्रयोजन आहे. एका निमलष्करी दलाचे नेतृत्व करणारे लेफ्टनंट कर्नल के. वाय. एस्. पन्वर सांगत होते, 'एन्.एस.सी.एन्. चे जाळे इतके व्यापक आहे आणि त्यांच्या हातात एवढी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आहेत की रोज सकाळी जेव्हा आम्ही उठतो तेव्हा मनात विचार येतो की रात्री आपण परत या अंथरुणावर पडू शकू की नाही कुणास ठाऊक?'

एका लष्करी अधिकाऱ्याने तर अशीही माहिती दिली की अलीकडेच एका

लष्करी मोहिमेत. मणिपूरमध्ये एन्.एस्.सी.एन्. च्या काही अतिरेक्यांना अटक करण्यात आली. त्यांनी बंगलोरहून काही अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी केली होती आणि नागालँड तसेच मणिपूरमध्येही मोठ्या प्रमाणावर घातपात घडवायची त्यांची योजना होती.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे पैसा येतो कुठून? त्यांना परदेशांतून आर्थिक मदत मिळते का? असे प्रश्न आपल्या मनात येतात पण तिकडे हा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही अशी स्थिती आहे.

पाफेमीला आम्हाला भेटलेला एक जवान सांगत होता, 'पूर्वी त्यांना परदेशातून पैसा मिळायचा, नाही तर बनावट नोटांचा कारखाना असतोच...' त्याने जवळच्याच दरीकडे बोट दाखवून तिथला बनावट नोटांचा कारखाना लष्कराने कसा उध्वस्त केला याची माहिती सांगितली, तर नागालँडची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिमापूरमध्ये एक वेगळाच भीषण किस्सा अनेकांकडून ऐकायला मिळाला. नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (मुईवा गट) च्या प्रतिसरकारची ही कहाणी आहे. नागालँडमध्ये आज या संघटनेच्या प्रतिसरकारची हुमूकत चालते आहे. त्यांच्यात आपल्या लष्कराप्रमाणे सर्व हुद्देही आहेत आणि त्या - त्या हुद्द्यांवर नेमणुका झालेले अधिकारी या प्रतिसरकारचा कारभार चालवत आहेत. दिमापूरमध्ये आमची एका निवृत्त पोलिस अधिकाऱ्याशी योगायोगाने भेट झाली. त्याने दिलेल्या माहितीनुसार हे प्रतिसरकार करवसुलीही करते. लष्कराने अलीकडेच एका धाडीत या प्रतिसरकारच्या काही स्वघोषित मंत्र्यांना आणि सरकारी, लष्करी अधिकाऱ्यांनाही अटक केली आहे.

या प्रतिसरकारच्या करवसुलीबद्दलही अनेकांकडून ऐकायला मिळाले. मात्र या संघटनेच्या दहशतीमुळे उघडपणे कुणी बोलत नाही. हे प्रतिसरकार सरसकट सगळ्यांकडून मग तो सरकारी शिक्षक, एखादा वरिष्ठ सचिव, पोलिस दलातला शिपाई असो की पोलिस आयुक्त, या सगळ्यांकडून त्यांच्या वेतनातून २५ टक्के रक्कम परस्पर (ॲट सोर्स) कर म्हणून वसूल करते आहे. तिथली कायदा व सुव्यवस्था स्थिती इतकी दयनीय आहे की त्याविरुद्ध आवाज करायची हिंमत ना सरकारी अधिकाऱ्यांना आहे ना वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना... सर्वसामान्यांबाबत तर बोलायलाच नको... याच तऱ्हेने मणिपूर - नागालँड सीमेवरील माओ या गावापर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ वरून जाणाऱ्या प्रत्येक ट्रककडून हे प्रतिसरकार ट्रकमागे ८-१० हजार रुपये कराच्या नावाखाली वसूल करत आहे. मग त्यांच्याकडे पैसा मुबलक आहे यात नवल ते कसले? दुर्दैवाने या पैशाचा उपयोग आपल्या देशाविरुद्ध, आपल्या जवानांविरुद्ध, व्यापारासाठी, नोकरीसाठी देशाच्या कोनाकोपऱ्यांतून तिथे गेलेल्या आपल्याच देश बांधवांविरुद्ध होतो आहे...

प्रख्यात क्रांतीकारी कवी दुष्यंतकुमार यांच्या एका गझलेतले दोन शेर या विषण्ण करणाऱ्या आठवणींबरोबर मनात घोळायला लागले...

*इस कदर पाबन्दी - ए - मजहब की सदके आपके*
*जबसे आजादी मिली है मुल्क में रमजान है।*
*कल नुमाईश में मिला वो चीथडे पहने हुए*
*मैने पूछा नाम तो बोला कि हिंदुस्तान है।।*

या ओळी मनात घोळत असतानाच कोहिमा आले. दिमापूरपासून कोहिमा फक्त ७४ कि.मी. वर आणि पाफेमीपासून तर जेमतेम २५-३० किलोमीटरवर असेल. पण कोहिमात पोहोचेपर्यंत साडेचार - पाच वाजताच मिट्ट अंधारले होते. एखाद्या हिलस्टेशनसारख्या असलेल्या कोहिमाच्या रस्त्यांवर शुकशुकाट होता आणि रस्त्याच्या दुतर्फा, विशेषत: बाहेरच्या, दरीच्या बाजूला, खाली दरीकडे तोंड करून उभे असलेले सैनिक दिसत होते. अक्षरश: चार - चार पावलांवर उभ्या असलेल्या त्या सैनिकांचे अस्तित्वच अस्वस्थ करणारे होते. आपण युद्धभूमीवर आलो आहोत असा आभास निर्माण करणारे असले तरी पण नागांनी स्वातंत्र्यासाठी हिंसक आंदोलन चालू ठेवल्याने त्याला पर्यायही नाही.

कोहिमात आमचे मुक्कामाचे ठिकाण होते 'जाफू' हे तारांकित हॉटेल. जाफू हे उंचीत नागालँडमधल्या दुसरा क्रमांक पटकाविणाऱ्या (उंची ३०४८ मीटर्स) शिखराचे नाव आहे. नोव्हेंबर ते मार्च दरम्यान तेथे ट्रेकिंग करता येते आणि विशेष म्हणजे ते कोहिमापासून अवघ्या १५ कि.मी. वर आहे. त्याचेच नाव दिलेले 'जाफू' हे हॉटेल अप्रतिम आहे. कोहिमातले हे पहिल्या क्रमांकाचे हॉटेल असल्याने काही सरकारी, खाजगी कार्यक्रम, कुणी अतिमहत्त्वाचे देशी - विदेशी पाहुणे आले तर त्यांच्याबरोबरच्या बैठकी याच हॉटेलमध्ये पार पडतात. इथे खोल्या तर सुंदर आहेतच पण जातीच्या खवय्यांनाही पसंत पडेल असे हे हॉटेल आहे. या हॉटेलचा दर डबल रूमसाठी दिवसाला साडेसातशे इतका जास्त असला तरी विशेष करून शाकाहाऱ्यांसाठी सुरक्षित असे हे हॉटेल आहे. कारण नागा लोक नृत्य - संगीताचे कितीही भोक्ते असले तरी असंस्कृत, क्रूर आहेत. त्यामुळे ते केवळ मासे, कोंबडी, बकरीच नव्हे तर कोणताही प्राणी मारून खातात.

तिथे नोकरीनिमित्त महाराष्ट्रातून गेलेले एक गृहस्थ आमच्या एका मित्राला भेटले होते. त्यांनी नागांच्या या क्रूर खानपद्धतीचे अतिशय नेमक्या शब्दांत वर्णन केले. ते म्हणाले, 'नागालँडमध्ये पहाटे पक्षी चिवचिवत नाहीत, कोंबडा आरवत नाही, रस्त्याने चालायला लागलात तर मांजर आडवं येत नाही, कुत्रा भुंकत नाही... कारण ते लोक सगळंच मारून खातात...'

त्यांच्या बोलण्यात अतिशयोक्ती नाही हे तिथला बडा बाजार बघितला तर कुण्याच्याही लक्षात येईल. तिथले वर्णन ऐकूनच तिथे जायचे धाडस आम्हाला झाले नाही. पण ज्यांनी तिथे जाऊन बघितले त्यांच्या अंगावर अक्षरश: शहारे आले.

त्यांची खाण्यावरची वासनाच उडाली. त्या बाजारात गनी बॅग्समध्ये कुत्री बांधून ठेवली होती. ती केविलवाणी ओरडत होती. घोड्यांची मुंडकी छाटून ती हारीने विकण्यासाठी ठेवलेली होती. इतर प्राणी तर होतेच. मांसाहारी माणूसही मांसाहार सोडेल असा तो शहारे आणणारा प्रकार होता. या बडा बाजाराचे तर सोडूनच द्या पण कोहिमात ठिकठिकाणी असे प्राणी मारून सोलून ठेवलेले, टांगलेले दिसतात.

कोहिमातला हा न बघण्याजोगा भाग असला तरी आवर्जून बघण्याजोगी एक गोष्ट कोहिमात आहे आणि ती म्हणजे ब्रिटिश व आझाद हिंद सेनेच्या लढाईत धराशाही झालेल्या असंख्य ज्ञात-अज्ञात वीरांची दफनभूमी- वॉर सिमेट्री! इथल्या तत्कालीन डेप्युटी कमिशनरच्या (ब्रिटिशकालीन भारतात नागालँड हे राज्य नव्हते. हा प्रदेश नागा हिल्स डिस्ट्रिक्ट कौन्सिल म्हणून ओळखला जात होता.) टेनिस कोर्टवर एप्रिल १९४४ मध्ये ब्रिटिश सैन्य आणि आझाद हिंद सेना यांच्यात तुंबळ युद्ध झाले आणि असंख्य सैनिक आपल्या प्राणांना मुकले. त्या वीरांचे हे स्मारक अतिशय उत्कृष्ट देखभाल असलेले आणि त्यांचे गांभीर्य आणि पावित्र्य कुठेही भंग होणार नाही अशा तऱ्हेने जपलेले आहे. आत प्रवेश करताच त्या वातावरणाचे गांभीर्य मनावर दडपण आणते. आणि त्या-त्या वीराच्या स्मारकावरचे त्याचे नाव, वय, आणि खाली लिहिलेला हृदयाला भिडेल असा मजकूर वाचल्यावर जीव गलबलतो. त्यात काही ब्रिटिशांचीही थडगी आहेत पण बहुतांशी स्मारके आहेत ती भारतीयांची. कारण दुसऱ्या महायुद्धात घडलेल्या या भीषण संग्रामात दोन्हीकडून जे रक्त सांडले ते भारतीयांचेच होते, मग ती आझाद हिंद सेना असो वा ब्रिटिश सेना. या युद्धातच जपान्यांच्या मदतीने लढणाऱ्या आझाद हिंद सैन्याला निर्णायक हार पत्करावी लागली आणि सुभाषबाबूंचे 'चलो दिल्ली' चे स्वप्न धुळीला मिळाले.

असंख्यांच्या बलिदानाने पवित्र झालेली ती धूळ मस्तकी लावताना नजर समोरच्या स्मारकांवरून फिरत होती. हिंदू वीरांच्या स्मारकावर भगवद्गीतेच्या ओळी होत्या. मुस्लिम वीरांच्या स्मारकावर बहुधा कुराणाच्या आयता कोरलेल्या होत्या, तर ख्रिश्चन वीरांच्या स्मारकावर क्रॉस होता व बायबलमधील वचन होते. प्रत्येकाच्या रेजिमेंटचे चिन्ह त्या स्मारकावर कोरलेले होते त्यात प्रधान, तांबे, पाठारे अशी मराठी सैनिकांचीही नावे दिसत होती. धारातीर्थी पडलेले बहुसंख्य वीर तरुण होते आणि एक अनाम वीर तर अवघा सतरा वर्षांचा होता. आज ज्या वयातील मुले कॉलेज, पार्ट्या, डिस्कोथेकमध्ये गर्क असतात, फॅशन्सच्या विश्वात आणि कॅसिनोच्या भूलभुलैयात गुंतलेली असतात, त्या वयात त्या अनाम तरुणाने देशाच्या एका टोकाला असलेल्या कोहिमापर्यंत जाऊन देशासाठी बलिदान केले ते पाहिल्यावर आमचे सगळ्यांचेच डोळे पाणावले. तिथे फुले तोडायला बंदी आहे, पण आम्हाला राहवले नाही, तिथली फुले तोडून आम्ही त्या कोवळ्या वीराच्या स्मारकावर वाहिली आणि तेथून बाहेर पडलो. तिथल्या

एका चिऱ्यावर ओळी कोरलेल्या होत्या -

*'When you go home*
*Tell them of us and say*
*For your tomorrow*
*We gave our today.'*

बाहेर आलो तेव्हा आमची मने जड झालेली होती. सारेच जण मूक झाले होते पण त्या स्मारकाच्या आवाराबाहेरच्या दुनियेला वास्तवाचा प्रखर स्पर्श होता. स्मारकाच्या आवारात फुललेल्या फुलांना तेथे स्थान नव्हते. तिथेही 'मारेन किंवा मरेन' हाच मंत्र होता पण त्याचा रोख चुकीचा होता. आपल्याच देशाविरूद्धचा होता.

या स्मारकाच्या आवारातच काही जवान पहारा देत होते तर एकाच्या हातात वॉकी टॉकीचा संच होता. समोरच असलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर 'नागा पीपल्स मूव्हमेंट फॉर ह्यूमन राईटस्' चा बोर्ड होता. त्या सैनिकाला तो कुठचा, महाराष्ट्रातला आहे का असे विचारले पण तो महाराष्ट्रातला नव्हता, तामिळनाडूचा होता. घरापासून इतक्या दूर असलेल्या प्रांतात रोजच्या रोज नवनवीन आव्हाने झेलत असताना या प्रांतांच्या सीमांनी अर्थच कसा गमावलेला असतो हे त्याच्याशी बोलताना जाणवले, 'आम्ही सारे भारतीय' हे आपण जे निव्वळ पुस्तकांतून वाचतो ते प्रत्यक्षात ते जवान कसे जगत असतात ते जाणवले. अतिरेक्यांनी हैदोस घातल्याने रोजच युद्धसदृश बंदोबस्त कसा ठेवावा लागतो आणि लष्कराचा कॉन्वहाय जर कोहिमाहून इंफाळकडे जाणार असेल तर थेट इंफाळपर्यंत कसा बंदोबस्त ठेवावा लागतो हे तो सांगत होता. लष्कराशी टक्कर घेणे अशक्य झाल्याने आता मानवी हक्कांच्या रक्षणाच्या नावाखाली लष्कराला कायदेशीर लढाईत अडकविण्याची व बदनाम करण्याची खेळी कशी खेळली जात आहे याचीही माहिती त्याने दिली.

तीन चित्रे डोळ्यापुढे होती... नागालँड स्वतंत्र देश व्हावा अशी इच्छा व हा स्वतंत्र देश झाला तरी स्वतंत्र देश म्हणून जगू शकणार नाही अशी खंत हे दोन्ही एक दमात बोलून दाखवणारा हॉटेल जाफूचा रिसेप्शनिस्ट मला आठवत होता. 'तुमच्या भविष्यासाठी आम्ही आमचा वर्तमान दिला - हे परत जाल तेव्हा आपल्या देशबांधवांना सांगा!' असे सांगत देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांची स्मारक मनात रुतून बसली होती आणि बाहेर भारतीयांच्या 'आज' आणि 'उद्या' साठी देशाच्या कानाकोपऱ्यातून येऊन तिथे मोर्चा लढविणारे सैनिक आम्हाला दिसत होते...

कोणाच्या तरी उद्यासाठी तिथे कोणीतरी आपला आज देत आहेत आणि तिथून शेकडो मैल दूर असलेल्या उर्वरित भारताला त्याची जाणीवही नाही ही वस्तुस्थिति दाहक आहे.

भू-प्रवास
क्र. ६९२
२०३६४
२११९८
शाखा

# ५ / 'हो! परदेशातून आम्हाला मदत येते!'

## –श्री. एन्. संगमा (सरचिटणीस, कौन्सिल ऑफ बाप्तिस्ट चर्चेस, नॉर्थ ईस्ट)

---

"आजही अनेक तरूण आमच्याकडे येतात आणि आम्हाला विचारतात की 'आम्ही जर ख्रिश्चन धर्म स्वीकारला तर आम्हाला शिक्षणासाठी परदेशी पाठवाल का? नोकरी मिळवून द्याल का?' आम्ही सांगतो की 'या भौतिक गोष्टी आहेत, त्यात आम्हाला रस नाही पण तुला येशू जवळचा वाटत असेल तर ये. आम्ही जो येशूच्या प्रेमाचा अनुभव घेतो आहोत तो तूही घे.' कारण शेवटी शिकायला वा नोकरीसाठी परदेशी पाठविणे,आमच्या मिशनच्या हॉस्पिटलमध्ये, शाळांत वा अन्य कुठे नोकरी मिळवून देणे हे आम्हाला कठीण नाही."

संपूर्ण पूर्वांचलात कार्यरत असलेल्या कौन्सिल ऑफ बाप्तिस्ट चर्चेसचे सरचिटणीस श्री. एन्. संगमा मला खास मुलाखत देताना त्यांच्या संघटनेच्या कामावर प्रकाश टाकत होते.

संपूर्ण पूर्वांचलात असा जरी मी उल्लेख केला असला तरी पूर्वांचलातील सात राज्यांपैकी मिझोराम आणि त्रिपुरा ही दोन राज्ये या शिखर संघटनेच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत. प्रामुख्याने दक्षिण आसाम, मेघालयातील गारो टेकड्यांचा भाग, नागालँड, मणिपूर व आता अरुणाचलप्रदेशमधील चर्चेसच्या संघटना या शिखर संघटनेशी संलग्न आहेत. ज्यांचा बाप्तिस्मा झालेला आहे असेच ख्रिश्चन केवळ या शिखर संघटनेचें सदस्य होऊन शकतात आणि संगमांनी दिलेल्या माहितीनुसार १९९४च्या नोंदीप्रमाणे उपरोल्लेखित पाच राज्यांतील बाप्तिस्मा झालेले ६ लाख ६५ हजार ख्रिश्चन या शिखर संघटनेचे सभासद आहेत. श्री. संगमा यांनीच दिलेल्या माहितीनुसार १८३६ साली अमेरिकेच्या मेरी सुदरमन या पहिल्या ख्रिश्चन मिशनरी स्त्रीने पूर्वांचलात पाऊल टाकले आणि आज १६० वर्षांनंतर मिझोरामची ८९ टक्के, नागालँडची ८६ टक्के, आणि

मेघालयाची ५० टक्के जनता, या शिखर संघटनेच्या प्रभावाखाली आली आहे. नव्यानेच आलेल्या अरुणाचलप्रदेशमधील १० टक्के जनता व आसामातील ३ टक्के जनता ख्रिश्चन झालेली आहे.

पूर्वांचलात मोठ्या प्रमाणावर सामूहिक धर्मांतरे चालू असल्याची माहिती आसाम, मेघालयमधील पत्रकार, राजकारणी, रामकृष्ण मठातील गुरुजन व काही सामाजिक कार्यकर्ते देतात. त्याबाबत श्री. संगमा यांना विचारले असता त्यांनी अर्थातच त्याचा इन्कार केला, पण धर्मप्रसाराचे नवनवीन मार्ग ठरविण्यासाठी ५ ते ८ डिसेंबर १९९६ च्या दरम्यान गुवाहाटीमध्येच आपण एक परिषद कशी आयोजित केली आहे आणि त्याला रा. स्व. संघाने कसा विरोध चालवला आहे याची माहितीही दिली.

ते म्हणाले, 'एखादा तरूण वा तरुणी ख्रिश्चन व्हायला तयार झाले तर जोपर्यंत त्यांचे अन्य कुटुंबीय धर्मांतर करत नाहीत तोपर्यंत त्याचे वा तिचे हाल होणार, ते त्याला घरातून हाकलून देणार. त्यापेक्षा सगळं कुटुंबच धर्मांतरित झाले तर ते सगळेच आनंदात राहू शकतात असा आमचा विचार असतो...'

कौन्सिल ऑफ बाप्तिस्ट चर्चेसच्या स्थापनेमागची भूमिकाही त्यांनी सांगितली. ते म्हणाले, '१८३६ साली अमेरिकेच्या बाप्तिस्ट फॉरिन मिशन सोसायटीने पाठविलेल्या मेरी सुदरमन या मिशनरी स्त्रीने आसाममधील जोरहाटजवळील, आता पाण्याखाली गेलेल्या सदिया येथे पहिले चर्च उभारले- त्यानंतर विविध देशांतील मिशनरी येथे काम करत होते. पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० साली भारत सरकारने सर्व गोऱ्या मिशनऱ्यांना तातडीने देश सोडून जाण्याचे आदेश दिले. त्यामुळे त्यांच्या कारभाराची सूत्रे स्थानिकांकडे हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने तेव्हा अस्तित्वात असलेल्या आसाम बाप्तिस्ट ख्रिश्चन कन्व्हेन्शन या दोन संघटनांचे विलीनीकरण होऊन आमच्या कौन्सिलची स्थापना झाली. आता शिलाँग वगळता संपूर्ण पूर्वांचलात एकही गोरा मिशनरी नाही. शिलाँगमध्ये असलेले गोरे मिशनरी जोडपेही एप्रिल १९९७ मध्ये निवृत्त होईल. त्यानंतर कुणीच पाश्चात्य मिशनरी येथे उरणार नाही, पण ते जरी कुणी राहिले नाहीत तरी आम्ही सगळे मिशनरीच आहोत...'

या कौन्सिल व्यतिरिक्त, त्यांचे अस्तित्व नसलेल्या ठिकाणी ५ मोठ्या ख्रिश्चन संघटना कार्यरत आहेत. मिझोराममध्ये ब्रिटिशांशी संलग्न असलेली संघटना (बाप्तिस्ट चर्च ऑफ मिझोराम) काम करत आहे. आसामच्या उत्तर भागात कार्यरत असलेली बाप्तिस्ट असोसिएशन अमेरिकेच्या बाप्तिस्ट जनरल कॉन्फरन्सशी संलग्न आहे. लोअर आसाम बाप्तिस्ट युनियन ही ऑस्ट्रेलियन बाप्तिस्टशी संलग्न आहे. त्रिपुरा बाप्तिस्ट कौन्सिल युनियन न्यूझिलंडमधील संघटनेशी संलग्न आहे. या संघटनांच्या व्यतिरिक्त चर्च ऑफ नॉर्थ इंडिया, साल्वेशन आर्मी, ल्यूटेरान ग्रुप अशा अनेक लहान-लहान ख्रिश्चन संघटना संपूर्ण पूर्वांचलात कार्यरत आहेत. या संघटनांना परदेशांतून मोठ्या

प्रमाणावर निधी येतो आहे.

श्री. सगमा सांगत होते, 'पाच राज्यांत आम्ही एकूण ५४ शाळा व सहा इस्पितळे चालवतो. आमच्या शाळा, इस्पितळे या धर्मादाय संस्था असल्या तरी आम्हाला सरकारी मदत मिळत नाही, त्यामुळे आम्हाला काहीही आवश्यकता भासली तर आम्ही परदेशांतील आमच्या संघटनांशी संपर्क साधून त्यांची मदत घेतो. आता मणिपूरमधील नागा, कुकी संघर्षात आम्ही 'कासा' (CASA) या गैरसरकारी संघटनेच्या माध्यमातून हस्तक्षेप करून शांतता प्रस्थापनेचा प्रयत्न केला. त्या 'पीस मिशन' मध्ये मी होतो. या संघर्षाचा फटका बसलेल्यांना पैसे - भांडी अशी मदत करणे भाग होते. तेव्हा १५ कोटी रुपयांची मदत आम्हाला परदेशातून आली. नंतरही येत राहिली... आणि यात आम्ही लपवून काही करत नाही. ज्या 'नॉर्थ ईस्ट इंडिया कमिटी ऑन रिलीफ अँड डेव्हलपमेंट' (NEICORD) च्या माध्यमातून ही व अन्य मदत आली, येते आहे. त्या संस्थेचे काम बघणारे मेजर जे. के. मायकल हे आमच्या 'कासा' चे संचालक आहेतच पण केंद्र सरकारच्या प्लॅनिंग कमिशनचेही सदस्य आहेत. हे सगळे सरकारला माहीत आहे. आम्ही देशाविरूद्ध काहीही करत नाही, पण तरीही आमच्याबाबत सतत संशय घेतला जातो. 'उल्फा' उघड - उघड स्वातंत्र्याची मागणी करते तरीही त्यांना देशद्रोही ठरवले जात नाही पण जेव्हा - जेव्हा कॅथलीक्स बिशप्स एकत्र येतात तेव्हा - तेव्हा लगेच 'इंटेलिजन्स' वाले चौकशी करायला येतात. संशय घेतात...'

तुमच्यावरच असा संशय का घेतला जातो याचे उत्तर शोधण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे का या प्रश्नाचे मात्र ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. त्यांच्या बोलण्यातून तक्रारीचा सूर मात्र सतत प्रगट होत होता. पूर्वांचलातले लष्कराचे अस्तित्व त्यांना सलत होते, त्यांच्या बोलण्यातून ते वारंवार प्रगट होत होते.

ते सांगत होते, 'या भागात अजिबात विकास झालेला नाही - तरीही पैसा विकासावर खर्च न करता लष्करावर खर्च केला जातो आहे. पुन्हा या भागात बेकारी मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्यातच ख्रिश्चन तरूण - तरुणींनी पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या वा अन्य परीक्षा द्यायच्या म्हटले तर त्या नेमक्या रविवारी ठेवल्या जातात. रविवार हा ख्रिश्चनांचा प्रार्थनेचा दिवस असतो हे सगळ्यांना माहीत आहे तरीही त्या मुद्दाम रविवारी ठेवल्या जातात, त्यामुळे आमच्या मुलांना या परीक्षांना बसता येत नाही. हे सरकार आमच्या धार्मिक भावनांशी मुद्दाम खेळ करते आहे. अशी परीक्षा ते ईदला ठेवतील का?'

'पण पूर्वांचलातल्या अनेक राज्यांत तर ख्रिश्चनच बहुसंख्येने सत्तारूढ आहेत, मग तुम्ही जे म्हणता ते त्यांना समजत नाही का?' असे विचारल्यावर ते गडबडले. पण 'नाही, नाही - मी केंद्र सरकारच्या परीक्षांबाबत बोलतोय!' असे सांगून त्यांनी स्वतःला सावरले. पण या अशाच मुद्यांवरून असंतोष भडकाविण्याचा त्यांचा प्रयत्न

स्पष्ट जाणवत होता. त्यांनी म्हणजे कौन्सिल ऑफ बाप्तिस्ट चर्चेसने (नॉथ ईस्ट सेक्टर) आता एक मानवीहक्करक्षण समितीही स्थापन केली असून लष्करातर्फे होणाऱ्या मानवी हक्कांच्या प्रत्येक उल्लंघनाची दखल घ्यायचे ठरवले आहे.

मादक द्रव्यांच्या चोरट्या व्यापारातही चर्च सहभागी आहे असा आरोप तिकडे बऱ्याचजणांकडून ऐकायला मिळाला होता. त्याबाबत त्यांना छेडले असता ते म्हणाले, 'अनेक ठिकाणी लष्करी अधिकारीसुद्धा मादक द्रव्यांचा तस्करीत सामील असतात. चर्चेसचेही काही गट त्यात सामील आहेत हे खरे आहे, पण एक संस्था म्हणून चर्च त्यात सहभागी नाही.'

'चर्चशी संबंधित काहींनी मादक द्रव्यांच्या तस्करीत सहभागी होणे बरोबर आहे का?' असे विचारले असता त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. पण ते म्हणाले, 'आता मिझोराममध्ये मोठ्या प्रमाणावर तस्करी होते, तर त्यात गुंतलेल्यांना त्यापासून परावृत्त करण्यासाठी चर्चेसनी महत्त्वाची भूमिका वाढवायला हवी, पण ते आमच्या कार्यकक्षेत येत नाही, मग आम्ही काय बोलणार?'

'मणिपूर आणि नागालँडचे काय? कारण तिथे तर मिझोरामपेक्षाही मादक द्रव्यांच्या तस्करीचे प्रमाण जास्त आहे आणि ते तुमच्या कौन्सिलच्या अंतर्गतच येतात.' असे विचारल्यावर त्यांनी सरळ उत्तर टाळून कौटुंबिक संस्कारांच्या आवश्यकतेवर भर दिला.

नवख्रिश्चनांना आरक्षण देण्याच्या मुद्यावरून सध्या देशभर वादंग चालू आहे. त्याबाबत त्यांच्या कौन्सिलची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला. 'आम्ही या आरक्षणाच्या बाजूचे आहोत, कारण जर या सवलती नवबौद्धांना दिल्या जातात, नव्याने शीख झालेल्यांना दिल्या जातात, तर त्या नवख्रिश्चनांना का दिल्या जाऊ नयेत? ते ख्रिश्चन झाले म्हणून त्यांची आर्थिक स्थिती बदलते थोडीच?' असा प्रतिप्रश्न त्यांनी उत्तरादाखल केला.

'पूर्वांचलात कार्यरत असणाऱ्या सर्व ख्रिश्चन संघटनांनी, त्यांची 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' असलेल्या बाप्तिस्ट कौन्सिलने सध्या पूर्वांचलातल्या कोणत्या समाजगटावर आपले लक्ष केंद्रित केले आहे?' या माझ्या थेट प्रश्नाला त्यांनीही सरळ उत्तर दिले.

ते म्हणाले, 'झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या उत्थानासाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत. आमचे सगळे लक्ष आम्ही त्यांच्यावर केंद्रित केले आहे. मद्रासमध्ये मुख्यालय असलेली 'वर्ल्ड व्हिजन ऑफ इंडिया' नावाची आणखी एक समाजसेवी संघटना आहे. त्यांनी गुवाहाटीतल्या रस्त्यांवरच्या मुलांसाठी एक मोठा प्रकल्प हाती घेतला आहे, पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आम्हाला विरोध करू नये. आमचे समाज सेवेतले योगदान त्यांनी लक्षात घ्यावे, आणि आपला देश 'सेक्युलर' आहे, इथे

आम्हालाही काम करण्याचा अधिकार आहे. ते आम्हाला विरोध का करतात?'

श्री. संगमा हे अत्यंत मृदूभाषी, अगत्यशील आहेत. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्या भागात गेली जवळजवळ दीडशे वर्षे शिक्षण, वैद्यकीय सेवा आदी पुरविण्याचे, त्या आदिम जमातींना त्यांच्या जंगली स्थितीतून बाहेर आणण्याचे जे काम केले आहे त्याला तोड नाही. पण आजही काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे का नाहीत, देशात अन्यत्र राहणाऱ्या ख्रिश्चनांबद्दल जो संशय मनातही येत नाही तो या सीमावर्ती, संवेदनाशील भागातील ख्रिश्चन संघटनांबाबत एवढे उग्र रूप का धारण करतो, तो संशय दूर करण्यासाठी त्यांना काहीच करावेसे का वाटत नाही, हे सगळेच मुद्दे त्यांच्या कारवायांबद्दल गूढ निर्माण करणारे आहेत. हे गूढ जितक्या लवकर उलगडेल तितके ते अस्वस्थ पूर्वांचलाला स्वस्थ, शांत पूर्वांचल बनवायला उपयोगी पडणार आहे.

— —

# ६ / निसर्गरम्य मणिपूर

साधे पर्यटन सुद्धा जिथे लष्कराच्या सोबतीशिवाय पार पडू शकत नाही असे नागालँडसारखेच त्याचे शेजारी असलेले दुसरे राज्य म्हणजे मणिपूर. कोहिमाहून निघून मणिपूरची वाट धरल्यावर तुमच्या गाडीला अपरिहार्यपणे जिथे थांबावे लागते त्या माओ या गावी पोहोचल्यावर याची पहिली सलामी मिळते. माओच्या एका बाजूला धगधगता नागालँड आहे तर दुसऱ्या बाजूला नागालँडच्या तुलनेत शांत असल्याने माफिया टोळ्यांच्या वर्चस्वाखाली असलेले व नागा - कुकी जमातींच्या रक्तरंजित संघर्षात विव्हल झालेले मणिपूर आहे. खुद्द माओमध्येही नागा व कुकी या दोन्ही जमातींचे वास्तव्य असल्याने तिथेही कधी भडका उडेल याचा नेम नसतो, आणि त्यामुळेच माओ हे १७५० मीटर्स उंचीवरचे गाव म्हणजे मणिपूरमधले एकमेव सर्वाधिक उंचीवरचे थंड हवेचे ठिकाण असले तरी त्यासाठी ते फारसे प्रसिद्ध नाही. ते प्रसिद्ध आहे ते तिथल्या चकमकींसाठी, लष्करी तळासाठी आणि तिथून लष्करी बंदोबस्त घेतल्याशिवाय तुम्ही मणिपूरमध्ये प्रवेश करू शकणार नसल्याने तिथे लष्करी काफिला बरोबर येईपर्यंत तुम्हाला कराव्या लागणाऱ्या कंटाळवाण्या प्रतीक्षेसाठी!

या भागात आधी फिरलेल्या आमच्यातल्या एकाने केलेल्या सूचनेनुसार आम्हीही ठीक दहा वाजता माओ गेट गाठले होते. माओ हे गाव आणि तिथे नागालँड व मणिपूरला विभाजित करणारे गेट असल्याने त्याची ओळख आहे ती 'माओ गेट' म्हणूनच. या माओ गेटला दोन्हीकडून येणाऱ्या वाहनांना थांबणे अनिवार्य असल्याने तिथे अर्थातच भरपूर दुकाने व टपरीवजा रेस्टॉरंटस् आहेत. तिथे ब्रह्मदेशमार्गे मोठ्या प्रमाणावर परदेशी माल आणणे शक्य असल्याने अर्थातच इथलीही दुकाने परदेशी मालाने खचाखच भरलेली होती. आम्हाला कुणालाच खरेदीत रस नव्हता, पण लष्कराच्या गाड्या आमच्या बंदोबस्तासाठी येऊन आम्हाला इंफाळच्या वाटेवर नेईपर्यंत तिथे

वेळ व्यतीत करणे भागच होते. माओ गेटला दहा गाड्या जमल्यानंतरच त्या लष्करी बंदोबस्तात इंफाळच्या दिशेने रवाना होतात. त्यामुळे तुम्ही जितक्या लवकर माओ गेट गाठाल तितक्या लवकर तुमचा इंफाळच्या दिशेने प्रवास सुरू होणार असतो. त्यामुळे मणिपूरला जायचे झाल्यास हे पथ्य पाळणे अत्यावश्यक आहे.

माओ गेटला आमच्या बसच्या जोडीला आणखी नऊ गाड्या जमल्यावर संपूर्णपणे शस्त्रसज्ज व पोझिशनमधल्या जवानांच्या सोबतीने आमचा इंफाळच्या दिशेने प्रवास सुरू झाला. रस्ता वळणावळणाचा असल्याने आमच्या सुरक्षेसाठी आमच्या बसच्या पुढे व आमच्या काफिल्याच्या सगळ्यात शेवटी असणाऱ्या लष्कराच्या जीप्स, त्या जीप्समधून रस्त्याच्या दुतर्फा लक्ष ठेवून असणारे जवान आणि त्यांच्या रोखलेल्या बंदुका आम्हाला दिसत होत्या. रस्त्याच्या बाजूलाही थेट इंफाळपर्यंत ठराविक अंतरावर उभ्या असलेल्या सैनिकांची जाग होती. यातून मनाला धीर मिळत होता पण काही प्रमाणातच. कारण मुळात तशा हिंसाचाराचे भेदक स्वरूपच आम्ही पाहिलेले नव्हते आणि त्यामुळेच लष्कराची अशी सुरक्षा, अशी सोबत ज्या प्रमाणात धीर देत होती त्याच्या कितीतरी जास्त प्रमाणात आमच्या मनावरचा ताण वाढवत होती. रोज दहा-दहा वाहनांमागे दोन लष्करी जीप्स व तेवढे जवान यांच्यावर किती पैसा खर्च होत असेल याचा विचार मनात आला आणि बाजूच्या हिरव्या गार गवताच्या पात्यांना फुटलेले अदृश्य भाले नजरेला आणि मनांना बोचू लागले.

खरे तर मणिपूर हे पूर्वांचलातील अन्य राज्यांप्रमाणेच निसर्गाचा वरदहस्त लाभलेले, कलांचे आगर असलेले राज्य आहे. मणिपूर एक वेळ पाहिले नसेल पण मणिपुरी नृत्य पाहिलेले नाही, त्या विषयी काही ऐकलेले नाही असा कलारसिक भेटणार नाही. पण दैव देते आणि कर्म नेते अशी मणिपूरची गत झाली आहे... घुंगरांचा नाद मानवी चुकांमुळे शस्त्रांच्या खणखणाटात परावर्तित झाला आणि विधात्याच्या एका सुंदर रचनेला गालबोट लागले.

१९७२ साली भारताचे विसावे राज्य म्हणून जन्माला आलेले मणिपूर हे तीन बाजूंनी नागालँड, मिझोराम व आसामला जोडलेले आहे तर चौथ्या बाजूला त्याची सीमा ही ब्रह्मदेशाशी, म्यानमारशी जोडली गेलेली आहे. सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना भारतात शिरली तीही ब्रह्मदेशातून प्रथम मणिपूरमध्येच. पुढे मग नागालँडमध्ये या सैन्याला ब्रिटिश सैन्याकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे या संपूर्ण परिसराला निसर्ग सौंदर्याच्याच जोडीने उज्ज्वल इतिहासाचा संदर्भही आहे. नागालँड - मणिपूर रस्त्यावर आझाद हिंद फौज व ब्रिटिश सैन्यादरम्यान घडलेल्या चकमकींच्या खुणा आजही आढळतात... पण या उज्ज्वल इतिहासाचा अभिमान, त्या युद्धात आझाद हिंद सैन्याला मणिपुरी लोकांनी केलेली मदत याची कृतज्ञ जाणीव मनात जागत असतानाच ब्रह्मदेश (म्यानमार) बरोबरची आपली सीमा मोकळी असल्याने होत

असलेल्या हाहा:काराचे प्रखर चटकेही मनाला बसत होते. तरीही मणिपूरमध्ये ओढ लावण्यासारखे बरेच काही आहे. तिथल्या अंगाला चंदनाचा लेप लावून व्यवसाय सांभाळणाऱ्या गोऱ्या, सुंदर स्त्रिया, तिथली निष्कपट पण परिस्थितीने गांजलेली माणसे, तिथली सुंदर मोहक नृत्ये, मंदिरे, तिथला तो हिरवागार निसर्ग, खळाळत्या नद्या... मणिपूर म्हटले की पहिले हे आठवते. नागालँडच्या नावाबरोबर तिथली दहशत, तिथले लष्कराचे अस्तित्व, भारतीयांना शत्रुवत् मानणारे तिथले लोक आठवतात - तसे मणिपूरचे होत नाही. मणिपूर आपले वाटते. तिथे परत - परत जावेसे वाटते.

या मणिपूरच्या उत्पत्तीची कथा विलक्षण आहे, आणि विशेष म्हणजे ती लाईहरोबा नावाच्या मणिपूरमधील एका अतिप्राचीन, प्रख्यात नृत्यप्रकाराच्या उत्पत्तीशी जोडली गेलेली आहे. या कथेप्रमाणे, एकदा दिव्यलोकी श्रीकृष्णाची गोपींसह रासक्रीडा चालली होती. शिवाला ते नृत्य पाहण्याची इच्छा झाली व त्याने ते नृत्य पाहू देण्याची विनंती श्रीकृष्णाला केली. त्यावर कृष्ण म्हणाला, 'हे शंकरा, तुला हे नृत्य पाहता येणार नाही, पण तुझी इच्छा असेल तर तू येथे पाठ करून उभा राहा व त्यातली लय, ताल आणि पदाघात तेवढे ऐक.' शिवाने तसे केले. पण नृत्य ऐन रंगात आलेले असताना त्याच्या तालात रंगलेल्या शंकराचे भान सुटले आणि त्याने चुकून नृत्याकडे तोंड केले. त्याच क्षणी ते नृत्य बंद झाले. पण शिवाला त्यातला ताल सापडला होता. लय व संगीताचेही ज्ञान झाले होते, त्यामुळे त्याने त्या आधारावर एका नव्या नृत्याची रचना करायचे ठरवले. पार्वतीसह हे नृत्य करण्यासाठी त्याला सुयोग्य अशी भूमी हवी होती. त्यामुळे मनात नृत्याचे पदन्यास निश्चित झाल्यावर अशा भूमीच्या शोधार्थ तो कैलासावरून पार्वतीसह खाली उतरला. पर्वतांच्या रांगांत दडलेली एक दरी त्याला आवडली, पण ती पाण्याने भरलेली होती. शंकराने तत्काळ आपला त्रिशूळ त्या दरीच्या दिशेने फेकला. त्यासरशी पर्वत दुभंगला आणि ते सारे पाणी निचरून गेले. मग पार्वतीसह शंकराने तेथे नृत्य केले. तेच हे मणिपूरमधले प्रख्यात 'लाईहरोबा' नृत्य.

या नृत्याच्या वेळी शंकराच्या गळ्यातील शेषनागाने आपल्या फण्यातल्या मण्याचा प्रकाश सगळीकडे पसरवला म्हणून या प्रदेशाला मणिपूर असे नाव पडले. चहुबाजूंनी उंचच उंच डोंगरांनी वेढलेले मणिपूर नदीचे खोरे अशी जी मणिपूरची भौगोलिक रचना आहे तिच्याशी सुसंगत अशी ही कथा आहे आणि लाईहरोबा हे नृत्य नृत्योत्सवाच्या रूपात पाच वा दहा दिवस असे कृषिदेवतांच्या प्रसादासाठी केले जाणारे नृत्य आहे. शेत लावणीच्या पूर्वी एक महिना साजऱ्या होणाऱ्या या लाईहरोबा नृत्याचे बारा प्रकार आहेत. हे विश्व देवाने कसे निर्माण केले व ते कोणकोणत्या तत्वांनी भरलेले आहे ते भावभंगिना, हस्तमुद्रा व अंगचालन या प्रकारांनी त्यात दाखवायचे असते. हे आध्यात्मिक हे नृत्य आहे. खबक, इशरिचोलमू, औग्रिहैंगल आणि रासलीला

अशी मणिपूरमधली इतर नृत्येही या लाईहरोबा इतकीच प्रसिद्ध आहेत, मोहकही आहेत.

मणिपूर आजही कला व संस्कृतीचे माहेरघर आहे, त्याला कारण मणिपूरला फार प्राचीन आणि सुसंस्कृत असा वारसा लाभला आहे. आर्यांनी भारतात येऊन वसाहती करण्यापूर्वीच मणिपूरमध्ये एक स्वतंत्र आणि सुसंस्कृत असे राज्य नांदत होते असा पुरावा उपलब्ध झाला आहे पण त्या विषयी फारसा तपशील मिळत नाही. मणिपूरचा पहिला उपलब्ध तपशील आहे तो महाभारतकालीन आहे. वनवासाच्या काळात अर्जुन येथे आला असताना त्याचा विवाह मणिपूरची राजकन्या चित्रांगदा हिच्याशी झाला होता. तिला अर्जुनापासून बभ्रुवाहन नावाचा एक पुत्रही झाला. धर्मराजाच्या अश्वमेघ यज्ञाच्या वेळी या बभ्रुवाहनानेच यज्ञाचा घोडा अडवून पांडवांना आव्हान दिले आणि घोडा सोडविण्यासाठी आलेल्या अर्जुनाला युद्धात जखमी करून पराभूत केले होते. त्यावेळी चित्रांगदेने अर्जुनाचे प्राण वाचविले होते. मात्र महाभारतकालीन मणिपूर आणि हे मणिपूर हे वेगवेगळे असावे असा काही पंडितांचा तर्क आहे.

इ.स. आठव्या शतकापासूनचा बराच इतिहास आज उपलब्ध आहे. नागा लोक, काही अनार्य टोळ्यांशी व तेराव्या शतकात एका चिनी सैन्याशी मुकाबला करत, त्यांना पराभूत करत मणिपूरने आपले स्वातंत्र्य टिकविले. या चिनी सैनिकांना कैद करून, त्यांची एक वसाहत मणिपूरमध्येच स्थापन करून मणिपुरींनी त्यांच्याकडून रेशमी वस्त्र विणण्याची कला व विटांची घरे बांधण्याचे शास्त्र शिकून घेतले. मात्र या सततच्या युद्धांमुळे मणिपूरची मूळची संस्कृती जवळ जवळ लोप पावली होती. पण अठराव्या शतकाच्या प्रारंभी मणिपुरात सत्तारूढ झालेल्या पाम्हैबा नावाच्या, गरीब जनतेत अत्यंत लोकप्रिय असल्याने गरीब नवाज म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या राजाने महंत शांतीदास नावाच्या वैष्णव साधूला उदार आश्रय देऊन त्याच्याकडून वैष्णव धर्माची दीक्षा घेऊन, वैष्णव धर्माला राजधर्म म्हणून मान्यता देऊन पुन्हा मणिपुरात हिंदुसंस्कृती रुजवली. राम, हनुमानाबरोबरच कृष्ण हा मणिपूरचा उपास्य देव बनला. याच्याच नातवाने - भाग्यचंद्राने मणिपूरची राजधानी असलेल्या इंफाळमधले प्रख्यात गोविंदजीचे मंदिर बांधले. मणिपूरच्या राजांचे निवासस्थान असलेल्या महालाशेजारीच असलेल्या या आकर्षक, भव्य मंदिरातील कृष्ण, बलराम व जगन्नाथाच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविक दूरदूरच्या प्रदेशातून येतात.

१७६२ मध्ये ब्रिटिशांचा प्रथम या भागात शिरकाव झाला. ब्रह्मी राजांचे आक्रमण परतविण्यासाठी स्थानिक राजाने ब्रिटिशांची मदत मागितली. ती देण्यासाठी ते आले पण तेव्हा त्यांनी मणिपूर स्वतःच्या ताब्यात मात्र घेतले नाही. मागितली तेवढी मदत करून ते परत गेले. १८१९ मध्ये ब्रह्मदेशाने पुन्हा आक्रमण करून मणिपूर जिंकले ते १८२६ पर्यंत त्यांच्याच ताब्यात होते. पण १८२६ मध्ये झालेल्या यांदाबूच्या

तहाने ब्रह्मदेशाने आसामप्रमाणेच मणिपूरवरचाही हक्क सोडला. त्यानंतर मणिपुरी राजांचीच राजवट होती. पण १८९१ मध्ये मात्र ब्रिटिशांनी हे संस्थान खालसा करून कारभार स्वत:च्या ताब्यात घेतला. त्यांच्यामुळे या भागातला शिक्षणाचा अंध:कार नष्ट झाला असला तरीही त्यांनीच केलेल्या प्रशासकीय व्यवस्थेमुळे मणिपूरच्या मूळ रहिवाशांमध्ये नागा, कुकी व मईतई या जमातींमध्ये जी तेढ निर्माण झाली त्याचे दुष्परिणाम आजही या राज्याला भोगावे लागत आहेत.

चहुबाजूंनी डोंगर आणि मध्ये, खाली पठार अशी मणिपूरची भौगोलिक रचना आहे, असा उल्लेख वर केलाच आहे. या डोंगराळ भागात प्रामुख्याने नागा, मिझो व कुकी या जमातींची वस्ती आहे. मणिपूरच्या एकूण भागांपैकी ६६ टक्के भाग हा डोंगराळ भाग आहे आणि मधल्या ३३ टक्के असलेल्या बशीसारख्या पठारावर सहा लाखांवर मईतई लोक राहतात. भौगोलिक रचना लक्षात घेतली तर हे सहा लाख मईतई लोक बाजूच्या डोंगराळ भागामुळे अक्षरश: कोंडले गेले आहेत. त्यातच डोंगराळ भागाचा ताबा ब्रिटिशांनी स्वत:कडे ठेवून केवळ मधल्या खोऱ्याचाच ताबा राजाकडे दिल्याने भावनिक एकात्मता साधली जाण्याऐवजी या जमातींमधे तेढ निर्माण झालेली आहे. या दोन्ही भागांसाठी स्वतंत्र असलेल्या व्यवस्थांचा एक परिणाम असाही झाला आहे की डोंगराळ भाग, ब्रिटिशांच्या ताब्यात राहिल्याने.तिथे ख्रिश्चन धर्मप्रसारकांना मुक्त वाव मिळाला. त्यांनी या जनतेसाठी आधुनिक शिक्षणाची, वैद्यकीय सुविधांची सोय जशी केली तशीच आदिम स्वरूपात वावरणाऱ्या या जमातींना ख्रिश्चन धर्माची दीक्षाही दिली. त्यामुळे डोंगराळ भागात राहणारे नागा, मिझो, कुकी बहुतांशी ख्रिस्ती झाले तर याच कालाखंडात खोऱ्यातील मईतई मात्र हिंदू व त्यातही कर्मठ वैष्णव झाले.

स्वातंत्र्यानंतरही या परिस्थितीचे आकलन राज्यकर्त्यांना न झाल्याने अनुसूचित जाती - जमातींच्या सवलती ख्रिस्ती झालेल्यांना दिल्या गेल्या तर मईतईंना मात्र ते हिंदू असल्याचे कारण दाखवून त्या नाकारल्या गेल्या. मईतईंच्या आर्थिक, सामाजिक पीछेहाटीचे हे एक महत्त्वाचे कारण आहे आणि त्याच बरोबर स्वभावाने शांत असलेल्या मईतईंनी शस्त्र उचलण्यामागचेही ते एक महत्त्वाचे कारण आहे. 'ख्रिस्ती झालेल्यांना दिल्या गेलेल्या या सवलती मईतईंनाही दिल्या गेल्या पाहिजेत. त्या त्यांना नाकारणे अन्यायकारक आहे' असे मणिपूरचे मुख्यमंत्री व मूळचे नागा जमातीचे असलेले रिशांग किशिंग यांचेही मत आहे. तसे त्यांनी वारंवार दिल्ली दरबारलाही सांगितले आहे. पण त्या सवलती हिंदूंना देण्याची दिल्लीची तयारी नाही. कदाचित एका ठिकाणी हिंदूंना अशा सवलती दिल्या तर त्या देशभर द्याव्या लागतील, अशी भीती दिल्लीच्या मनात असावी. पण एकीकडे हिंदू असल्याने 'दिल्ली सरकारचे लोक' अशी अन्य जमातींकडून होत असलेली हेटाळणी आणि दुसरीकडे मात्र दिल्लीने चालवलेली उपेक्षा

अशा कात्रीत सापडलेल्या मईतईंचा संयम न सुटता तरच नवल होते. त्यातूनच मग 'पीपल्स लिबरेशन आर्मी' ही दहशतवादी संघटना बिश्वेश्वर या स्वार्थी नेत्याच्या नेतृत्वाखाली उभी राहिली. हिंदुधर्माला नाकारण्यात आले. धर्मग्रंथ जाळण्यात आले. काहींनी मूळच्या सनामाही पंथाचा अभिमान सांगायला सुरुवात केली तर काहींनी त्यांच्या मूळच्या तिबेटी-बर्मन वंशवेलीचा शोध घ्यायला सुरुवात केली. हिंसाचार, रक्तपात झाला. पण आज सुदैवाने या बिश्वेश्वरचे स्वार्थी राजकारण उघडे पाडल्याने त्याची विश्वासार्हता संपुष्टात आली आहे.

मणिपूरमधल्या दहशतवादी संघटनांमध्ये पीपल्स लिबरेशन आर्मी ही आजही एक प्रमुख संघटना म्हणून गणली जात असली तर बिश्वेश्वर हा स्वत: आज त्या संघटनेत नाही. राजकारणात नाव कमावण्याच्या ईर्षेने त्या संघटनेतून बाहेर पडून नंतर आणखी काही दहशतवादी संघटना स्थापन करून त्याने दहशतीचेच राजकारण केले. पण त्याने स्थापन केलेल्या पोरोम लेन अपुनबा (म्हणजे पुन्हा पी.एल्.एच.) वा पीपल्स रिपब्लिकन आर्मी या संघटनांनी मईतई व मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करून बराच हिंसाचार माजवला. रक्तपात घडवून आणला पण बांगला देशात तळ असलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मीला ही मईतई - मुस्लिम तेढ परवडणारी नव्हती, त्यामुळे त्यांच्यावर तिकडे दबाव यायला लागताच त्यांनी मणिपूरमधल्या स्थानिक वृत्तपत्रांतून शांततेचा फतवा काढला आणि मणिपूरमधला हिंसाचार जादूची कांडी फिरावी तसा शांत झाला. सगळेच असे विचित्र आहे. मईतई हे कर्मठ हिंदू असल्याने होत असलेल्या उपेक्षेच्या विरोधात पेटून उठल्याने त्यांनी पीपल्स लिबरेशन आर्मी ही दहशतवादी संघटना काढली पण तिचे तळ मात्र बांगलादेशात... आणि साऱ्या देशभर हिंदु - मुस्लिम दंगली होत असतात पण माणिपूरमध्ये मात्र हिंदु - मुस्लिम दंगली झालेल्या हिंदूंच्याच दहशतवादी संघटनेला मान्य होत नाहीत. ते शांततेचा फतवा काढतात तोही त्यांच्या परकीय मुस्लिम आश्रयदात्यांच्या दबावानंतर... परदेशांच्या वळचणीला स्थानिक प्रश्न घेऊन गेले की काय होते त्याचा हा नमुना आहे.

मईतई - मुस्लिम, मईतई - नागा किंवा नागा आणि कुकी यांच्यातला संघर्ष हे मणिपूरमधल्या हिंसाचाराचे एकेक पैलू आहेत. मईतई विरुद्ध नागा / कुकी यांच्यातल्या संघर्षाला आर्थिक पीछेहाट वा हिंदू म्हणून मईतईंची होत असलेली उपेक्षा हे कारण आहे, तर नागा व कुकी या दोन जमातींमध्ये सध्या उसळलेल्या भीषण हिंसाचारालाही आर्थिक कारणच जबाबदार आहे. त्याचे स्वरूप मात्र सरकारी नोकऱ्या वा राखीव सवलती असे नाही तर या दोन डोंगराळ जमातींमध्ये सतत संघर्ष चालू आहे तो राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ चा ताबा कुणाकडे असावा या वरून चालू आहे. आपल्याला महाराष्ट्रात बसून या हायवेच्या नियंत्रणाचे महत्त्व समजू शकत नाही, त्यासाठी मणिपूरसारख्या सीमावर्ती राज्यातच जायला हवे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ हा थेट

ब्रह्मदेशाच्या सीमेपर्यंत जाणारा महामार्ग आहे आणि मणिपूरची ब्रह्मदेशाला लागून असलेली ३५२ कि.मी. ची सीमा चक्क मोकळी आहे. ब्रह्मदेशाबरोबर झालेल्या आपल्या एका जुन्या करारानुसार तिथे सीमावर्ती भागात राहणारे लोक एक - दुसऱ्याच्या हद्दीत जाऊन व्यापार करू शकतात. आपल्यासारखे पर्यटकही केवळ दहा रुपयांचे परमिट काढून ब्रह्मदेशात जाऊन येऊ शकतात. 'आम्हीही जाऊन आलो. त्याचा तपशील पुढे येईलच, ही मोकळी सीमा व 'आओ - जाओ घर तुम्हारा' अशी स्थिती असल्यानेच या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ च्या स्वामित्वावरून नागा व कुकींच्या दहशतवादी संघटनांमध्ये जबरदस्त ईर्षा असणे स्वाभाविक आहे. कारण याच महामार्गावरून उघडपणे शस्त्रे येतात, पैसा येतो, हेरॉईन, गांजा, ब्राऊन शुगर सारखी मादक द्रव्ये येतात. त्यामुळे या महामार्गाचा ताबा आपल्याकडे ठेवण्यासाठी या दोन्ही संघटना - नागांची 'नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड' व कुकींची 'कुकी नॅशनल आर्मी' सतत संघर्षरत असतात. सध्या नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (इसाक - मुईवा गट) कडे या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ चा दिमापूर ते इंफाळपर्यंतचा ताबा आहे तर कुकींकडे इंफाळ ते मोरे या आपल्या देशातल्या सीमेवरच्या शेवटाच्या गावापर्यंतचा, तसेच तामू या ब्रह्मदेशातल्या सीमेवरील गावाचा ताबा आहे आणि एन्.एस्.सी.एन. (नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड) लाही या मार्गावरून तस्करी करायची असल्याने त्यांनाही तामूपर्यंतच्या मार्गाचा ताबा हवा आहे. सर्वांत भीषण म्हणजे राज्यकर्त्यांच्या, सरकारी अधिकारी आणि निमलष्करी दलांच्या संगनमतानेच ही तस्करी सुखेनैव चालू आहे.

तस्करी, हिंसाचार याला अलीकडच्या काही वर्षांत एक भीषण परिमाण जोडले गेले आहे आणि ते आहे भारतद्रोहाचे! भारतापासून फुटून निघण्याच्या प्रयत्नांचे. मणिपूरमधल्या सगळ्या दहशतवादी संघटना त्यात सामील आहेत, मग ती पीपल्स लिबरेशन आर्मी असो, युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (UNLF) असो, रिव्होल्यूशनरी पीपल्स फ्रंट (RPF) असो, ऑल मणिपूर स्टूडंटस् युनियन (AMSU) असो, नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (NSCN) असो, कुकी नॅशनल आर्मी (KNA) असो पीपल्स रिव्होल्यूशनरी पार्टी ऑफ कांगलीपाक (PREPAK) असो वा रेड आर्मी असो. या सर्वांना मणिपूर भारतापासून वेगळे - स्वतंत्र राष्ट्र, भारत व म्यानमार (ब्रह्मदेश) दरम्यानचे एक 'बफर स्टेट' व्हायला हवे आहे. मणिपूर भारताला जोडले गेले तो १५ ऑक्टोबर हा दिवस काळा दिवस म्हणून त्यामुळेच पाळण्यात येतो. मणिपूरचा भारतातील सामीलनामा म्हणजे कसा एक 'फ्रॉड' होता याची उजळणी केली जाते आहे. १९४९ मध्ये मणिपूरचे तत्कालीन राजे बोधचंद्र सिंग यांना शिलाँगमध्ये त्यांच्या राजवाड्यातच स्थानबद्ध ठेवून सामीलनाम्यावर त्यांची सही घेतली गेली आणि नंतर घटनेप्रमाणे या सामीलनाम्याला राज्य विधानसभेची मंजुरी मिळवणे आवश्यक

असतानाही ती घेतली गेली नाही, त्यामुळे मणिपूरचे भारतातले विलीनीकरण अवैध व कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार अस्वीकारार्ह आहे असा युक्तीवाद केला जात आहे. त्या आधारावरच मणिपूरला स्वातंत्र्य देण्याची मागणी केली जाते आहे.

हा सामीलनामा म्हणजे एक 'फ्रॉड' आहे असे सांगत मणिपूरच्या स्वातंत्र्याची, सार्वभौमत्वाची केली जाणारी ही मागणी जुनीच आहे. पण इतक्या वर्षांत राज्यातील, दिल्लीतील राज्यकर्त्यांनी त्याबाबत पूर्णत: दुर्लक्ष केल्याने, बेफिकिरी दाखविल्याने ही जखम आता बरीच चिघळली आहे. मणिपूर भारतात अधिकृतपणे सामील झाल्या क्षणापासूनच या विरोधाला सुरुवात झाली आहे. मणिपुरी कम्युनिस्टांनी सर्वांत प्रथम म्हणजे १९४९ मध्ये हिजम इराबॉट यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरच्या सार्वभौमत्वासाठी पहिला सशस्त्र संघर्ष सुरू केला. नंतर १९५३ मध्ये वाय. शायझा आणि एस. इंद्रमणी यांच्या नेतृत्वाखालील मणिपूर नॅशनॅलिस्ट युनियनने इंफाळमधल्या एका जाहीर सभेत मणिपूरला स्वातंत्र्य देण्याची मागणी केली. १९६३ मध्ये बहुसंख्येने असलेल्या मईतई समाजाने डब्ल्यू. तोंबा यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरच्या स्वातंत्र्यसाठी सशस्त्र संघर्ष सुरू केला. १९६४ मध्ये युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट ही दहशतवादी संघटना स्थापन झाली तर १९७८ मध्ये पीपल्स लिबरेशन आर्मी उदयाला आली. या दोन्ही दहशतवादी संघटना आजही निमलष्करी दल व लष्कराच्या हातावर तुरी देत मणिपूरमध्ये समांतर सरकार चालवत आहेत. आणि पीपल्स लिबरेशन आर्मीची राजकीय आघाडी असलेल्या रिव्होल्यूशनरी पीपल्स फ्रंटने तर १९९७च्या प्रारंभापासून मणिपूरमध्ये राहणाऱ्या सर्व गैरमणिपुरींना 'नॉन इमिग्रंटस् रेसिडेन्शियल परमिटस्' आर. पी. एफ. कडून काढणे सक्तीचे केले आहे. आणि मंत्री, नोकरशहा व पोलिसांकडून ही खंडणी उकळण्याइतक्या समर्थ असलेल्या या संघटनेकडून गैरमणिपुरींनी अशी परमिटस् काढायलाही सुरुवात केली असल्याच्या बातम्या आहेत.

जिथे मुख्यमंत्री रिशांग किशिंग यांचे नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (मुईवा गट) सारख्या दहशतवादी संघटनेशी संबंध आहेत आणि ज्यांच्यावर स्वत:वर बृहत नागालँडच्या निर्मितीसाठी कार्यरत असल्याचा आरोप होतो आहे, जिथे माजी मुख्यमंत्री व मणिपूरच्या राजकारणातले एक बडे प्रस्थ असलेल्या दोरेंद्र सिंगांचा पीपल्स रिव्होल्यूशनरी पार्टी ऑफ कांगलाईपाक सारख्या दहशतवादी संघटनेला वरदहस्त लाभला आहे,जिथे सारे प्रशासन, पोलिस, निमलष्करी दले भ्रष्टाचाराने पूर्णत: सडलेली आहेत, जिथे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या युवकांनाही असह्य बेकारीला तोंड द्यावे लागत आहे, आणि जिथे १२० कोटींच्या राज्याच्या अंदाजपत्रकात जेमतेम २ कोटी रु. करांचा महसूल गोळा होतो इतकी राज्याची अर्थव्यवस्था कोलमडलेली आहे तिथे असा दहशतवाद फोफावला तर नवल नाही. मणिपूरची स्थिती बरीचशी काश्मीरसारखीच आहे, पण आपण चुकांपासून कोणताच बोध घेत नाही, त्यामुळे मणिपूर आज धगधगते

आहे. लष्करी व निमलष्करी दलाचे ५६ हजार जवान केवळ वीस लाख लोकसंख्येसाठी तैनात असतानाही मणिपूरमध्ये हिंसाचार चालू आहे. मणिपूरला राज्याचा दर्जा दिल्याने कोणताच प्रश्न सुटलेला नाही. नागालँडप्रमाणेच इथेही संगिनींचे आणि एके-४७चे अस्तित्व कायम आहे.

मणिपूरमध्ये फिरताना हे पदोपदी जाणवले पण लोक अगत्यशील असल्याने व पर्यटकांना त्रास देण्याचे फारसे प्रकार घडत नसल्याने कधी एकदा मणिपूर सोडून जातोय असे होत नाही. मणिपूर आज तरी आपले वाटते. उद्या ही स्थिती राहील की नाही कुणास ठाऊक?

कोहिमाहून निघून १४५ कि.मी वर असलेल्या इंफाळला आम्ही पोहोचेपर्यंत दुपार मावळत आली होती. आणि पर्यटन विभागाने चालवलेल्या हॉटेल इंफाळवर आमचे सामान टाकून ताजेतवाने होईपर्यंत बाहेर अंधार पडला होता. अंधार पडल्यावर तिथले महत्त्वाचे सगळे बाजार बंद होतात. त्यामुळे शॉपिंग कारणे शक्यच नव्हते. हॉटेलवर बसून तरी काय करणार? त्यापेक्षा भटकून येऊ म्हणून आम्ही काही जण बाहेर पडलो. बरोबर पैसे, मूल्यवान गोष्टी ठेवू नका, कारण शस्त्रांचा धाक दाखवून त्या चोरल्या जाण्याची शक्यता आहे, असे आमच्यातल्याच दोघा अनुभवींनी सांगितल्यामुळे हातातली घड्याळे वगैरे खोलीवर ठेवून बाहेर पडलो होतो. आमच्या सुदैवाने आम्हाला त्या दिवशी किंवा नंतरही तीन-चार दिवस मणिपूरमध्ये फिरताना एकदाही तसा अनुभव आला नाही, तरीही मणिपूर आज माफियांच्या ताब्यात गेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

खिस्तपूर्व ३०० सालापासून अस्तित्वात असलेले, भारतीय उपखंडातल्या प्राचीन शहरांपैकी एक असे हे इंफाळ शहर आहे. त्याला प्राचीन वारसा आहे. खिस्तपूर्व कालावधीत या भागावर राज्य करणाऱ्या खाबा राजवंशाची राजधानी असलेले कांगला हे शहर जिथे होते त्याच ठिकाणी आजचे इंफाळ हे शहर उभे आहे असे मानले जाते. इंफाळ या शब्दाचे वेगवेगळे अर्थ सांगितले जातात, पण हे मूळ नाव होते 'युंफाळ' आणि त्याचा अर्थ होता युम म्हणजे घर आणि फाळ म्हणजे संग्रह. थोडक्यात सांगायचे तर 'घरांचा समूह'- पूर्वेला नोंगमाईजिंग टेकड्या आणि उत्तरेला असलेली लांगोल पर्वतराजी यांच्या कुशीत वसलेला घरांचा समूह म्हणजे इंफाळ, मणिपूरची राजधानी.

इंफाळमध्ये आणि इंफाळच्या परिसरात बघण्यासारखे भरपूर आहे. इंफाळमधल्या सुविख्यात गोविंदजी मंदिराचा उल्लेख वर आलाच आहे. बायकांच्या दृष्टीने इंफाळमधले सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे इमा मार्केट. मणिपुरी भाषेतल्या 'इमा' या शब्दाचा अर्थ आहे आई. हे मार्केट पूर्णांशाने स्त्रियांच्या ताब्यात आहे. तीनशे इमा- म्हणजे तीनशे स्त्रिया इथल्या स्टॉलधारक आहेत म्हणून हे इमा मार्केट. हे दोन भागांत विभागले

गेले आहे. एका बाजूला फळे, भाजीपाला, किराणा मालाची दुकाने आहेत तर दुसऱ्या बाजूला शाली, हातमागावर विणलेले गमछे, मणिपुरी स्त्रिया लुंग्यांप्रमाणे नेसतात ती वस्त्रे, लोकरीच्या कानटोप्या, स्कार्फ अशा गोष्टींचे मार्केट आहे. अंगाला चंदनाचा लेप लावलेल्या, कपाळी चंदनाचे गंध लावलेल्या या स्त्रियांनी चालवलेले हे मार्केट बघायला खूप छान वाटते. मणिपूरमध्येही मातृसत्ताक कुटुंब पद्धती आहे, आणि सर्व आर्थिक व्यवहार हे स्त्रियांच्या हातात आहेत. इथे पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्याही जास्त आहे, त्यामुळे एका पुरुषाला एकापेक्षा अधिक भार्या असतात. स्वच्छताप्रिय, कलासक्त अशा या स्त्रिया घर आणि दुकान अतिशय सुंदर पद्धतीने चालवतात. विणकामात तर त्यांचा हात कुणी धरू शकत नाही, अशी स्थिती आहे. मणिपूरमधल्या घराघरांत आज हातमाग आहे आणि मणिपुरी स्त्रिया त्यावर अप्रतिम विणकाम करतात. या सद्यस्थितीलाही एक पौराणिक संदर्भ आहे. मणिपुरींचा मूळ धर्म 'लाई' हा हळूहळू तेथे गेलेल्या ब्राह्मणांच्यामुळे रामायण - महाभारताच्या व पुढे चैतन्य महाप्रभूंमुळे उदयाला आलेल्या वैष्णव चळवळीच्या प्रभावाखाली येऊन बदलायला लागला. त्यांच्या मूळ जंगल देवता, सर्पादि देव हे हळूहळू हिंदू देवतांमध्ये मिसळून गेले. त्यामुळे पानथोईबी ही मूळ देवता दुर्गेच्या रूपात तर नोंगपोक निंगथोऊ हा देव शिवाच्या रूपात मिसळून गेला. कृष्ण हे मुख्य आराध्य दैवत झाले. तर आता दुर्गेच्या रूपात पूजली जात असलेली पानूथोईबी ही देवता हातमागामागची, विणकामामागची प्रेरक देवता आहे. कारण मुळात तिने घराच्या आत जाळे विणणाऱ्या कोळ्यापासून प्रेरणा घेऊन विणकाम करायला सुरुवात केली. त्यामुळे आजही मणिपूरमध्ये स्त्रीच्या शक्तिरूपाचा आदर करणारी मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात आहे. घराघरात स्त्रीच्या हाती हातमाग आहे आणि ते त्यांच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन आहे.

इमा बाजाराच्या आसपास इतरही लहान - मोठे बाजार आहेत. तिथे स्वेटर्स, वुलन जॅकेटस्‌पासून बुटांपर्यंत सगळे काही मिळते. पण ती दुकाने गैरमणिपुरींची आहेत, त्यामुळे पुरुषांच्या हातात आहेत. मणिपूरमध्ये स्वेटर्स बनत नाहीत. तिकडे शाली वापरायची पद्धत आहे. पण या बाजारात स्वेटर्स आहेत आणि ते पंजाबमधून आलेले आहेत. या बाजारात आम्हाला एक विचित्र अनुभव आला. तो नंतर ब्रह्मदेशाच्या सीमेवरील मोरे या गावापर्यंत सतत येत राहिला. पण त्या अनुभवाचा उलगडा मात्र आम्हाला झाला नाही. या बाजारात एका दुकानातून आम्ही काही वुलन जॅकेटस् घेतली. चेहरेपट्टीवरून त्या दुकानातले दोघे युवक मणिपुरी वाटत नव्हते, म्हणून आम्ही त्यांना सहज विचारले की तुम्ही कुठून आलात? ते दोघेही उत्तर प्रदेशचे होते. पण ते सांगितल्यावर ते पटकन् म्हणाले, 'पण आम्ही मुस्लिम आहोत.' ते असे का सांगताहेत हे आम्हाला कळेना, कारण आम्ही काही त्यांचा धर्म विचारला नव्हता. त्यामुळे कुतूहलाने आम्ही त्यांना विचारले की ते असे का सांगताहेत? त्यांना मुस्लिम

म्हणून काही त्रास होतो का? यावर त्यांनी जे उत्तर दिले त्यावरून त्यांना हसे देणे वगैरे प्रकारचा त्रास होत असला तरी मुस्लिम म्हणून काही त्रास होतो असे जाणवले नाही पण तरीही कुणीही न विचारता ते स्वत:ची मुस्लिम अशी ओळख का करून देत होते याचे गूढ उकलले नाही. कदाचित परप्रांतात स्वत:ची मूळ ओळख जपण्याचा तो प्रयत्न असावा. पण हे केवळ तिथेच दिसले असे नाही तर मोरेपर्यंतच्या रस्त्यावर 'हिंदू हॉटेल,' 'मुस्लिम हॉटेल' अशा पाट्या दिसत होत्या. संपूर्ण पूर्वांचलात हा प्रकार आम्हाला फक्त मणिपूरमध्येच दिसला.

इंफाळमधली दोन प्रेक्षणीय स्थळे मणिपूरच्या शौर्याचा वारसा सांगतात. त्यापैकी एक आहे शहीद मिनार. १८९१ मध्ये ब्रिटिशांशी लढता-लढता वीरगतीला गेलेल्या वीरांचे स्मारक म्हणजे इंफाळमधील टिकेंद्रजिती पार्कमधील शहीद मिनार. अशाच स्वरूपाचे दुसरे एक स्मारक म्हणजे इंफाळमधील वॉर सिमेट्री. कोहिमातल्या वॉर सिमेट्रीप्रमाणेच या दफनभूमीचीही कॉमनवेल्थ वॉर ग्रेव्हज् कमिशनतर्फे देखभाल केली जाते. या ठिकाणी चिरविश्रांती घेत असलेल्या, दुसऱ्या महायुद्धातील भारतीय व ब्रिटिश सैनिकांच्या चिरनिद्रेला धक्का न पोहोचेल, या स्थळाचे पावित्र्य भंग न होईल अशा रीतीने ही दफनभूमी ठेवली गेली आहे.

ज्यांना विविध जातींच्या ऑर्किडसमध्ये रस आहे त्यांनी मुद्दाम जाऊन पहावे असे ठिकाण आहे इंफाळपासून सात कि.मी. वर असलेले राष्ट्रीय महामार्ग क्र. ३९ वरील खोंगामपात ऑर्किडेरियम. दोनशे एकराच्या विस्तीर्ण भूखंडावर ऑर्किडसच्या ११० दुर्मिळ जाती बघायला मिळतात.

मणिपूरमधले आवर्जून पहावे असे ठिकाण म्हणजे इंफाळपासून आठ कि.मी. वर असलेले भारत-म्यानमार रस्त्यावरील लांगथाबल हे गाव. ज्यांना प्राचीन अवशेषांत रस आहे, प्राचीन संस्कृतीचा, प्राचीन वास्तुशिल्पांचा वेध घ्यायचा आहे त्यांनी बघितलेच पाहिजे असे हे गाव आहे. वास्तुशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली काही प्राचीन मंदिरे, जुन्या राजवाड्याचे अवशेष इथे बघायला मिळतात.

दुसऱ्या दिवशी आमचे भेटीचे ठिकाण होते मोईरांग. इंफाळपासून ४५ कि.मी.वर असलेले मोईरांग हे अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. एक तर ते मईतई समाजाच्या मूळ संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. या समाजावर हिंदुधर्माचा प्रभाव पडण्यापूर्वीच्या काळातल्या त्यांच्या 'थांगजिंग' या देवाचे एक मंदिर इथे आहे. दर वर्षी मे महिन्यात इथे मोठ्या प्रमाणावर 'लाईहरोबा' हा नृत्योत्सव साजरा केला जातो. तो बघण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असतात. पण याही पेक्षा मोईरांग ठिकाण हे महत्त्वाचे आहे, कारण नेताजी सुभाषबाबूंच्या 'चलो दिल्ली' च्या आदेशानुसार ब्रह्मदेशमार्गे

भारतात आलेल्या आझाद हिंद फौजेचे कर्नल मलिक यांनी भारतीय भूमीवर पहिल्यांदा राष्ट्रध्वज फडकावला ते हे ठिकाण आहे. तो दिवस होता १४ एप्रिल १९४४, आणि ठिकाण होते मोईरांग कांगला - म्हणजे मणिपूरच्या राज्यकर्त्यांचे सिंहासन ज्या ठिकाणी असे ते स्थान. याच स्थानावर आज या गौरवशाली इतिहासाची स्मृती जागी करणारा एक मणिपुरी शैलीतला स्मृतिस्तंभ आहे. याच ठिकाणी विजयी आझाद हिंद सेनेने आझाद हिंद सरकार स्थापन केले होते. याच ठिकाणी त्यांनी पुढच्या मोहिमेच्या आखणीसाठी आपले केंद्र स्थापित केले होते. आज त्या ठिकाणी आझाद हिंद फौजेच्या शहिदांचे स्मारक आहे. या स्मारकाच्या आवारातच नेताजी सुभाषचंद्राचा लष्करी गणवेषातला पूर्ण पुतळा आहे व त्याच्या मागे स्मारकाची वास्तू. त्या वास्तूत आझाद हिंद फौजेसंबंधीच्या अनेक वस्तूंचे, पत्रांचे, त्यांनी वापरलेल्या शस्त्रांचे, असंख्या दुर्मिळ फोटांचे एक संग्रहालयही आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की त्या असंख्य ज्ञात - अज्ञात वीरांच्या स्मारकाबाहेर आज लष्करी पहारा आहे. स्मारकाच्या जतनासाठी त्याच्या समोरच लष्कराला एक सुसज्ज तळ उभारावा लागला आहे, कारण काही मणिपुरी अतिरेक्यांनी १९९३ मध्ये सुभाष बाबुंचा इथला पुतळा बॉंब लावून उध्वस्त केला होता. ज्यांनी अभूतपूर्व दूरदृष्टीचा परिचय घडवत, जपान्यांच्या मदतीने शस्त्रसज्ज सेना उभारून भारताचे स्वातंत्र्य जवळ आणले त्यांच्या पुतळ्याच्या स्वतंत्र भारतातील काही माथेफिरू युवकांनी ठिकऱ्या - ठिकऱ्या उडवल्या. ज्यांनी सेना घडवली त्या सुभाषबाबूंच्या पुतळ्याला आज लष्करी पहाऱ्यात अडकून पडावे लागले आहे हे देशाचे दुर्दैव!

या स्मारकाच्या दुर्दैवाची कहाणी एवढ्यावरच संपत नाही. १९५५ साली तत्कालीन कॉंग्रेस अध्यक्ष यू. एन्. धेबर यांच्या हस्ते या स्मारकाचे भूमिपूजन झाले, पण पैशाअभावी या स्मारकाच्या नशिबी एका तपाचा वनवास आला. शेवटी १९६७ मध्ये या स्मारकाचे काम सुरू होऊ शकले.

या स्मारकाचे दोन - तीन भाग आहेत. तळमजल्यावर असलेल्या नेताजी लायब्ररीचे काम सर्वांत आधी पूर्ण झाले. आझाद हिंद सेनेच्या प्रांतिक सरकारच्या रौप्यमहोत्सवी वर्षात म्हणजे २१ ऑक्टोबर १९६८ रोजी ती जनतेसाठी खुली करण्यात आली. नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेनेच्या बाबतीत अभ्यास, संशोधन करू इच्छिणाऱ्यांसाठी ही लायब्ररी म्हणजे ज्ञानाचा खजिना आहे. या व्यतिरिक्तही लायब्ररीत बरीच पुस्तके, हस्तालिखिते आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढ्या संबंधीच्या नऊ हजार ग्रंथांचा संग्रह इथे आहे. इथेच 'सेंटर फॉर नेताजी : साऊथ ईस्ट एशियन स्टडीज' सुरू करायचा स्मारक समितीचा विचार आहे.

या लायब्ररीच्याच वर आय.एन्.ए. म्युझियम आहे - नेताजींचे असंख्य दुर्मिळ फोटो, त्यांची आदेशपत्रे, आझाद हिंद सेनेने वापरलेली शस्त्रास्त्रे, आझाद हिंद सेनेचे

'सिंबॉल' (चिन्ह), सुभाषबाबूंनी प्रसृत केलेला प्रांतिक सरकारचा जाहीरनामा, जपानी सैन्याने दिलेल्या लष्करी प्रशिक्षणाबाबतचे हँडबिल, काही खाजगी पत्रे आणि त्याच बरोबर आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांबरोबर केलेल्या युद्धाच्या ठिकाणांवरून, त्या युद्धभूमीवरून जमा करून आणलेले अवशेष या ठिकाणी बघायला मिळतात. त्यात शस्त्रास्त्रांबरोबरच कुणाच्या गणवेषाचा एखादा छिन्नविछिन्न झालेला तुकडा बघायला मिळतो, सैनिकांनी जवळ बाळगलेल्या ऑक्सिजन मास्कसूचे दर्शन घडते. त्यांनी बाळगलेल्या विषाच्या कुप्या पाहून मात्र काळीज गलबलून जाते.

याच ठिकाणी आझाद हिंद सेनेच्या सिंगापूरमधील वॉर मेमोरियलची प्रतिकृतीही उभारण्यात आली आहे. सिंगापूरच्या किनाऱ्यालगत उभारण्यात आलेल्या मूळ स्मारकाची पायाभरणी खुद्द नेताजींनी ८ जुलै १९४५ ला केली होती. इंफाळ आणि कोहिमातील युद्धात शहीद झालेल्या आझाद हिंद सेनेच्या जवानांना श्रद्धांजली वाहणारा, त्यांची स्मृती जागवणारा हा स्मृतिस्तंभ होता. नेताजींच्या विश्वासातल्या कर्नल सी. जे. स्ट्रँसे या अँग्लो इंडियन माणसाकडे नेताजींनी ते काम सोपवले होते. त्यांनी स्वत: त्याचे डिझाईन निश्चित केले आणि त्यांना एका महिन्याच्या आत ते स्मारक उभे राहायला हवे होते. कर्नल स्ट्रॅसेने त्यांना तसे आश्वासन दिले आणि खरोखरच त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अक्षरश: रात्रंदिवस खपून फक्त तीन आठवड्यात इतके देखणे स्मारक उभे केले की त्याची गणना सिंगापूरमधल्या देखण्या वास्तूंत होत होती. पण दुर्दैवाने नेताजी स्वत: ते स्मारक बघू शकले नाहीत. त्यांनी ते बघण्यापूर्वीच सिंगापूर जिंकलेल्या ब्रिटिशांनी ते पाडून टाकले. पण त्याचे चित्र पाहूनच तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष धेबर यांनी त्याची उभारणी मोईरांग येथे करण्याविषयी स्मारक समितीला सुचवले आणि त्यांनाही ती कल्पना आवडली. नेताजींचे स्वप्न मोईरांगच्या भूमीवर साकार झाले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी २३ सप्टेंबर १९६८ रोजी त्याचे अनावरण केले. आझाद हिंद सेनेची तीन मार्गदर्शक तत्त्वे त्याच्यावर कोरण्यात आली आहेत. 'इत्तेफाक, इत्मद आणि कुर्बानी' तिथली व्हिजिटर्स नोटबुके आम्ही मुद्दाम उघडून पाहिली. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, आमच्या आधीची नोंद सहा महिन्यांपूर्वीची होती... सहा - सहा महिने इथे एकही पर्यटक, अभ्यासक फिरकत नाही. असे हे अप्रतिम पण उपेक्षित असे स्मारक आहे.

केंद्र सरकारने दिलेल्या १० कोटी रुपये मदतीच्या आधारे आता या स्मारकाचा विस्तार करण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्पही स्मारकसमितीने हाती घेतला आहे. पण लोकांमध्येच त्या विषयी इतकी अनास्था असली तर त्याचा काय उपयोग होणार आहे? जे भूतकाळाप्रती कृतज्ञ नसतात त्यांचा भविष्यकाळ काय असणार असा विचार सहजच तेथून बाहेर पडताना मनात आला. एकीकडे तिथल्या दुर्मिळ फोटोंतून दिसणारे, 'चलो दिल्ली'चा नारा देणारे, 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूँगा'

असे आत्मविश्वासपूर्ण शब्दांत सांगणारे नेताजींचे रूप डोळ्यापुढे तरळत होते आणि त्याच वेळी त्या स्मारकाच्या भोवती ठेवावा लागलेला लष्करी पहारा, व्हिजिटर्स नोंद वहीतील सहा महिन्यांपूर्वीची नोंद, तिथल्या कर्मचाऱ्यांकडून कळलेली स्मारकाच्या उपेक्षेची कहाणी मनात बोचत होती. मनात येत होते त्यांनी आपल्यासाठी प्राण दिले, त्यांच्यासारख्या असंख्य ज्ञात - अज्ञात वीरांच्या बलिदानामुळे आपण आज स्वातंत्र्यात श्वास घेतोय, पण आपण त्यांच्यासाठी काय करतो? त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आपण काहीच करू शकत नाही. हे देशाचे दुर्दैवच!

आमची बस लोकटाक लेकच्या दिशेने धावत होती आणि मनात अस्वस्थतेचा पिंगा चालू होता, पण तिथून अवघ्या तीन कि.मी. वर असलेल्या सेंद्रा टेकडीवर बस पोहोचली आणि तिथून अतिविशाल अशा लोकटाक लेकचे जे दर्शन झाले त्याने दृष्टीच नव्हे तर मनही शांत झाले. लोकटाक लेक हे ईशान्य भारतातले गोड्या पाण्याचे सर्वात मोठे सरोवर आहे. आणि या सरोवरात वॉटर हायसिंथची लहान - मोठी बेटे आहेत. या बेटांवरच तिथले लोक घरे बांधतात आणि वाहत्या पाण्याबरोबर ती बेटे जेव्हा वाहात - वाहात इकडून तिकडे सरकतात तेव्हा त्यांच्यावरची ती घरेही इकडून तिकडे सरकलेली असतात. काय मजा आहे नाही? आज आपले घर इथे असेल तर दुसऱ्या दिवशी सकाळी आपण झोपेतून जागे होऊ तेव्हा भलत्याच कुठल्या तरी ठिकाणी गेलेले असेल. लोक ये - जा करतात तीही बोटीतूनच अगदी बँकॉकसारखे! याच तलावात मच्छीमारी करून लोकांची उपजीविका चालते. एकूणच माशांची शेती हे मणिपूरचे वैशिष्ट्य आहे. इंफाळसारखेच मोईरांगलाही सरकारी फिश फार्म आहे. इंफाळमध्ये तर माशांची जत्राही ( फिश फेअर ) भरते. या लोकांनी उपलब्ध असलेल्या मुबलक पाण्याचा उपजिवीकेच्या दृष्टीने फार छान वापर करून घेतला आहे.

या लोकटाक लेकचे वैशिष्ट्य म्हणजे इथे केवळ मत्स्यशेतीच चालते असे नाही तर जगातले एकमेव तरंगते राष्ट्रीय उद्यान ( नॅशनल पार्क ) या लोकटाक लेकवर आहे. मणिपूरचे सुप्रसिद्ध 'डान्सिंग डीअर' म्हणजे 'सांगाय' याचे हे शेवटचे नैसर्गिक वसतिस्थान आहे. इतरही बरेच प्राणी व नोव्हेंबर ते मार्च दरम्यान परदेशातून येथे येणारे असंख्य प्रकारचे पक्षी येथे बघायला मिळतात. येथे वनविभागाची दोन विश्रामगृहेही आहेत.

मोईरांग - लोकटाक लेकच्या निसर्गरम्य परिसरात भटकून आम्ही इंफाळला परतलो आणि दुसऱ्या दिवशी आपल्या ब्रह्मदेशबरोबरील सीमेवरील ज्या मोरे या शेवटच्या गावी आम्हाला जायचे होते. तिथल्या बसची चौकशी करायला गेलो तर आदल्याच दिवशी मोरेमध्ये अतिरेकी व आपले जवान यांच्यात चकमक झाल्याने बससेवा बंद असल्याची माहिती मिळाली. दुसऱ्या दिवशी बससेवा सुरू होईल फक्त ती पलेल या गावापासून पुढे लष्करी संरक्षणात जाईल असा विश्वास त्या बसचालकांनी दिल्याने

मोरे व विशेष म्हणजे ब्रह्मदेशबरोबरची आपली सीमा बघता येईल याचा खूप आनंद झाला. आदल्या दिवशीच्या चकमकीच्या बातमीने मनात जरा धाकधूकही होती. पण धाडस करायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून कडाक्याच्या थंडीत, उघड्या सायकल रिक्षाने आम्ही मोरेसाठी बसेस ज्या ठिकाणाहून सुटतात तिथे म्हणजे एम्. जी. ॲव्हेन्यूत पोहोचलो. आपल्याकडच्या एस्.टी. बसपेक्षाही खराब अशी एक बस तिथे लागलेली होती. सकाळी सातपासून दर अर्ध्या तासाने या बसेस सुटतात, पण आम्ही पहिली सातची बस घेण्याचे टाळून पुढची बस घेतली कारण इंफाळहून कितीही वाजता निघाल्या तरी या बसेस लष्करी संरक्षणासाठी पलेलला थांबणारच होत्या. मग पलेलला जाऊन कंटाळवाणी प्रतीक्षा करण्याऐवजी जरा उशीराचीच बस घेतलेली बरी असते.

मोरेला मोठा बाजार आहे आणि इंफाळच्या बाजारात येणाऱ्या अनेक गोष्टी तिथून येत असल्याने बसमध्ये खच्चून गर्दी होती. मी व माझे पती सुधीर असे दोघेजण वगळता बाकी सगळेजण हे मणिपूरमधलेच होते. बसमध्ये कर्णकर्कश्य आवाजात काही तरी मणिपुरी कार्यक्रमाची टेप लावली होती. आम्हाला त्यातला एक शब्दही कळत नसल्याने ती टेप म्हणजे आम्हाला डोकेदुखी झाली असली तरी तो तिथला प्रचंड लोकप्रिय विनोदी कार्यक्रम असावा, कारण बसमधले सगळेच मनमुराद हसत तो कार्यक्रम 'एन्जॉय' करत होते. त्यामुळे अर्थातच त्या टेपचा आवाज तरी निदान कमी करण्याची आमची विनंती बसचे ड्रायव्हर, क्लीनर वगैरे मानणेच शक्य नव्हते.

तासाभरातच म्हणजे आठ-साडेआठपर्यंत आम्ही पलेलला पोहोचलो. तिथे दहावाजेपर्यंतचा मुक्काम अटळ होता. ते गाव इतके छोटे आहे की टपरीवजा खानावळींशिवाय तिथे एक-दोन तास मन रमविण्यासारखे काहीच नव्हते. त्यात या पूर्वेकडील राज्यांत सगळीकडे लवकर उजाडते व लवकर मावळते त्यामुळे लोक सकाळी आठ वाजताच भात, मच्छी अशा जेवणावर ताव मारतात. या जेवणात त्यांचा तासभर सहज निघून जातो. आमच्या सारख्यांना मात्र एक-एक मिनिट हे एक-एक तासासारखे वाटत होते. तिथेच काही तरुण उभ्या-उभ्या कॅरम खेळत होते ते बघण्यात शेवटी कसा बसा वेळ काढला. हे उभ्या-उभ्या कॅरम खेळणे ही बहुधा पूर्वांचलाची खासियत आहे. हाच प्रकार आम्हाला मेघालयातही शिलाँगला, चेरापुंजीला बघायला मिळाला.

पलेलहून सकाळी दहाच्या सुमारास आमची बस नऊ वाहनांबरोबर मोरेच्या दिशेने रवाना झाली. जरी लष्करी संरक्षणासाठी बसेस थांबतात आणि मग संरक्षणात पुढे रवाना होतात असे सांगितले असले तरी आमच्या काफिल्याच्या पुढे, मागे लष्कराच्या वा पोलिसांच्या जीप्स असल्याचे आम्हाला काही बघायला मिळाले नाही. फक्त पलेलहून बसेस पुढे रवाना होण्यापूर्वी पलेल पोलिसांनी प्रत्येक वाहनात चढून वरवरचे चेकिंग केले तेवढेच. पलेलच्या पुढे बसेस चढाला लागतात. पुढचा सगळा रस्ता

हा घाटाचा आहे आणि तो प्रवास अविस्मरणीय असा आहे. एका बाजूला हिरवेगार, सूर्यफुलांसारख्या फुलांनी फुललेले डोंगर आणि दुसऱ्या बाजूला हिरवीगार खोल दरी.... दूरवर दिसणारी शेते... तळी... निळ्याशार आभाळात विहरणारे सावरीच्या कापसासारखे मऊसूत, रेशमी ढग...

तुम्ही कधी स्वर्ग पाहिलायत? आम्ही पाहिलाय... याच मार्गावर...! ते दृश्य आजही डोळ्यांपुढून हलत नाही... बस धावत होती. आकाशात विहरणाऱ्या ढगांचे वेगवेगळे आकार बघण्यात मन गुंगून गेले होते आणि तेवढ्यात हलके - हलके एक - एक ढग अलगदपणे खाली त्या दरीत उतरू लागला आणि बघता - बघता अवघ्या काही मिनिटांच्या अवधीत ती आडवी - तिडवी पसरलेली खोल दरी पूर्णपणे पांढऱ्या शुभ्र ढगांनी भरून गेली. बघावे तिथे ढगच ढग होते. या ढगांच्या खाली एक सुंदरशी दरी, एक हिरवेगार खोरे दडलेले आहे- हे कुणाला सांगूनही खरे वाटले नसते. समोर दूरवर दिसणारे डोंगरही त्या ढगांच्या दुलईत पूणपर्ण बुडून गेले होते. सिनेमातल्या स्वर्गदृश्यांत ज्या प्रमाणे देवी - देवता अशा ढगांच्या पायघड्यांवरून चालत येतात तसे चालावेसे वाटत होते... पण बघता बघता आमच्या मनात घर करून हा स्वर्गही दृष्टिआड झाला.

आमची बस तेंगनोपॉलला थांबली. इंफाळपासून ६९ कि.मी. वर असलेले तेंगनोपॉल म्हणजे भारत - म्यानमार सीमेवरचे सर्वाधिक उंचीचे ठिकाण आहे. इथून मणिपूरच्या खोऱ्याचे सुरेख दर्शन होते. या तेंगनोपॉलला मोठे पोलिस ठाणे आहे. आणि तिथेही सगळ्या बसेस चेकिंगसाठी थांबवल्या जातात. पण मोरेला जातानाचे चेकिंग फार वेळकाढूपणाचे नसते. तेंगनोपॉलसारखेच वाटेत आणखीही काही ठिकाणी कधी लष्कराकडून, कधी सीमा सुरक्षा दलाकडून तर कधी पोलिसांकडून चेकिंग होते. या सततच्या चेकिंगमुळे व पलेलला वाया गेलेल्या दीड - दोन तासांमुळे इंफाळ ते मोरे हे ११० कि.मी. चे अंतर कापायला चक्क सहा तास लागतात. आम्हीही दुपारी एकला मोरेला पोहोचलो.

मोरेहून ब्रह्मदेशातल्या तामूला जायचे असेल तर मोरेच्या पोलिस स्टेशनवर माणशी फक्त दहा रुपये भरून तुम्ही परमिट घेऊ शकता. त्या परमिटच्या आधारावर तुम्हाला आपली सरहद्द ओलांडून निर्धास्तपणे ब्रह्मदेशात जाता येते. मात्र हे परमिट दुपारी दोन पर्यंतच दिले जाते. त्या परमिटवर भेटीचे ठिकाण, कारण वगैरे सगळ्या नोंदी असतात पण त्यासाठी आम्हाला तोंडही उघडावे लागले नाही. आमच्या चेहरेपट्टीवरून आम्ही बहुधा खरेदीसाठी तामूला जाणारे पर्यटक असू असा अंदाज त्या पोलिस अधिकाऱ्याने बांधला असावा कारण त्याने तसे आम्हाला न विचारताच परमिटवर लिहून टाकले आणि अवघ्या काही पावलांवर असलेल्या, भारत - म्यानमार सीमारेषेवरील गेट क्र.२ वर जाऊन थडकलो. आंतरराष्ट्रीय सीमा कशी असेल हे बघण्याची खूप

उत्सुकता होती, पण इथे मात्र इतका सगळा मोकळा व्यवहार होता की ती आंतरराष्ट्रीय सीमा वाटतच नव्हती. या गेट क्र. २च्या एका बाजूला आपल्या पोलिसांची एक चौकी आहे तर दुसऱ्या बाजूला त्यांची. या दोन्ही पोलिस चौक्यांवर एक-एक महिला अधिकारी आणि कस्टम्स अधिकारीही असतात. बाकीची सीमा काटेरी तारेने बंद होती म्हणे पण आत्ता ती तशी दिसत नव्हती. जेवढी दिसत होती ती सीमाच वाटत नव्हती. भारतीय गेटवर परमिट दाखवल्यानंतर त्यांच्या आणि आपल्या गेट दरम्यानचा एक लाकडी पूल ओलांडून आपण बर्माच्या गेटवर पोहोचतो. तिथेही परमिट दाखवले. त्यांनी जुजबी चौकशी केली आणि आम्हाला ब्रह्मदेशाच्या हद्दीत सोडले. आमचा आमच्यावर विश्वास बसत नव्हता... हो, चक्क आम्ही ब्रह्मदेशाच्या हद्दीत होतो... कोणत्याही पासपोर्ट शिवाय! तेही फक्त परमिटचे प्रत्येकी फक्त दहा रुपये खर्च करून! ब्रह्मदेशातील ज्या तामूहून सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना मोरेमार्गे इंफाळच्या रस्त्याला लागली होती त्याच रस्त्याने जाऊन आम्हीही ब्रह्मदेशाच्या भूमीवर पाय ठेवला होता. मध्ये ते गेट नसते तर दोन देशांची भूमी सारखीच होती. लोकांची चेहेरेपट्टी सारखी होती, वेषभूषा सारखी होती... आणि कधी काळी या भारतवर्षाचाच एक भाग असलेला तो भूभाग आज आपल्यासाठी एक परका देश होता.

ब्रह्मदेशाच्या म्हणजे आजच्या म्यानमारच्या गेटच्या बाहेरच तामूला जाण्यासाठी रिक्षा, बसेस सतत असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तिथे आपली 'करन्सी' चालते. मोरे-तामू असा सततचा व्यापार असल्याने ब्रह्मदेशातील लोकही अनेक गोष्टींच्या खरेदीसाठी तामूहून मोरेला येत असतात. त्यामुळे बहुधा आपली 'करन्सी' ते स्वीकारतात. कारण इकडे माल खरेदी करण्यासाठी त्यांना ती लागत असावी. बसने तामूच्या मुख्य भागात, बाजारपेठेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अर्धा तास तरी लागतो. तिथले रस्तेही चांगले आहेत आणि आपल्यापेक्षा वेगळा प्रकार म्हणजे ड्रायव्हिंग करताना तिकडे रस्त्याची उजवी बाजू पकडायची पद्धत आहे. त्यामुळे तामूला जाणारी बस रस्त्याच्या उजव्या कडेने चालते तसेच तिकडून येणारीही. डावीकडे काही अंतरावर ब्रह्मदेशातून वाहात आलेली एक नदी दिसते आणि ती ओलांडल्यावर पर्वत. तिथल्या लोकांनी या नदीचे नाव सांगितले पण त्यांच्या वेगळ्या उच्चारामुळे ते नीट समजू शकले नाही. बसने दहा मिनिटांचा मार्ग कापल्यावर ब्रह्मदेशाच्याच हद्दीत, एका नदीवरील पूल लागतो. त्या पूलाच्या एका बाजूला आपल्या सीमासुरक्षा दलाची चौकी तर दुसऱ्या बाजूला बर्मी पोलिसांची चौकी दिसली आणि खूप आश्चर्य वाटले. ब्रह्मदेशाच्या हद्दीत इतक्या आत आपल्या सीमा सुरक्षा दलाची चौकी कशी हे समजेना. शेवटी तामूहून परतल्यावर गेट क्र. दोनवरील आपल्या पोलिसचौकीवर चौकशी करता समजले की आम्ही त्या ब्रह्मदेशाच्या हद्दीत समजत असलेल्या, पुलाचा अर्धा भाग ब्रह्मदेशाच्या मालकीचा आहे तर आपल्याकडच्या बाजूचा अर्धा भाग आपल्या मालकीचा. त्यामुळे

त्या पूलाच्या रक्षणासाठी आपल्या सीमासुरक्षा दलाची एक चौकी तिथे आहे. पण मग जर त्या पूलाचा अर्धा भाग आपल्या मालकीचा असेल तर मग गेट क्र. २ चा मतलब काय, तसेच त्या पूलाच्या खालून वाहणाऱ्या नदीची मालकी कुणाकडे असे अनेक प्रश्न मनात उभे राहिले. पण त्यांची समाधानकारक उत्तरे मिळू शकली नाहीत.

ब्रह्मदेशात बहुसंख्येने बौद्ध धर्मीय आहेत. आम्ही गेलो त्या दिवशी त्यांचा आपल्याकडच्या दिवाळीसारखा कोणता तरी महत्त्वाचा सण होता. मोरेला सतत येणे - जाणे असल्याने थोडं फार हिंदी येत असलेली एक बर्मी स्त्री तामूला जाणाऱ्या आमच्या बसमध्ये होती. तिनेच ही माहिती दिली. त्यामुळे सारे रस्ते शृंगारलेले होते. लोक रस्त्यावर उभे होते आणि एक प्रचंड मोठी मिरवणूक चालू होती. या मिरवणुकीत आपल्यासारखे चित्ररथ होते. नटलेल्या स्त्रिया, मुली, पुरूष होते आणि आपल्या भाल्यांसारख्या आकाराच्या लाकडी पट्ट्यांवर तिथल्या नोटा ( करन्सी ) म्हणजे ' क्याटस् ' (Kyats) लटकवून ते त्या मिरवणुकीने घेऊन चालले होते. हे काय चालले आहे हे आम्हाला समजत नव्हते. त्या बर्मी स्त्रीनेच आम्हाला त्या उत्सवाची माहिती दिली. या उत्सवाच्या महिनाभर आधी स्थानिक मंडळे घरा-घरांतून मंदिरासाठी निधी जमवतात. या प्रकारे मग मोहल्ल्या - मोहल्ल्यातून ते पैसे लटकवून असे ताबुतासारखे आकार तयार केले जातात. त्या उत्सवाच्या दिवशी शहरातले सगळे मोहल्ले असे ताबूत ( त्याला काय म्हणतात माहीत नाही. ताबूत हा शब्द मी समजण्यासाठी वापरला आहे) घेऊन मिरवणुकीने मुख्य मंदिरात जाऊन तो निधी तिथे समर्पित करतात...

ब्रह्मदेशात लष्करी राजवट आहे तिथे मानवी अधिकारांचे जे हनन चालू आहे त्याच्या बातम्या आपण रोज वाचतो आहोत, पण निदान तामूमध्ये तरी तिथल्या लष्करी राजवटीची, लष्कराच्या पोलादी पंजाची जाणीव कुठे झाली नाही. या उत्सवाच्या निमित्ताने तिथल्या जनतेला जे धार्मिक स्वातंत्र्य आहे त्याचेही दर्शन घडले. आणि तिथे बौद्ध धर्म हा मुख्य धर्म असल्याने केवळ बौद्धांनाच हे स्वातंत्र्य आहे असेही नाही. ब्रह्मदेशात आम्हाला शंकराची, दुर्गेची मंदिरेही दिसली. याचा अर्थ तिथे हिंदू व अन्य धर्मीयांनाही तेवढेच स्वातंत्र्य मिळत असावे.

बस तामूच्या बाजारपेठेबाहेर थांबली. समोरच असलेल्या एका भव्य गेटमधून आम्ही तामूच्या बाजारपेठेत शिरलो. तिथे वुलन जॅकेटस्पासून स्वेटर्सपर्यंत, दुलयांपासून शालींपर्यंत, शर्टस्पासून साड्यांपर्यंत आणि सौंदर्य प्रसाधनांपासून ते किराणा मालापर्यंत सगळ्या गोष्टी मिळतात. भारतीय मालही तिथे मोठ्या प्रमाणावर मिळतो. अगदी व्हिको वज्रदंतीपासून ते सोलापुरी चादरीपर्यंत! अशा अनेक भारतीय उत्पादनांची ती एक मोठी बाजारपेठ दिसली. तिथे आपल्यापेक्षा जास्त गरिबी असल्याने आणि त्यांचे चलन असलेल्या ' क्याटस् ' ची किंमत भारतीय रुपयापेक्षा बरीच कमी असल्याने

(आपले अडीच रुपये म्हणजे त्यांचे १० क्याटस्) तिथे या सगळ्या वस्तू खूप स्वस्त मिळतात. फोटोग्राफर्स वापरतात तसले जॅकेट मुंबईच्या रस्त्यांवर साडेचारशे रुपयांपर्यंत मिळते तर त्याहूनही अधिक चांगल्या प्रतीचे तसेच जॅकेट तिथे फक्त १३५ रुपयाला उपलब्ध होते. अतिशय चांगल्या प्रतीच्या वॉटरप्रुफ हॅवरसॅक्स तिथे शंभर ते दीडशे रुपयांपर्यंत उपलब्ध होत्या. त्यामुळेच तिथून मोठ्या प्रमाणावर माल खरेदीसाठी लोक तिथे जातात. तिथे जवळच सर्व इंपोर्टेड इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची एक बाजारपेठ आहे. इंफाळपासून लोक तिथे स्टीरिओ, व्ही.सी.आर, रंगीत दूरचित्रवाणी संचाच्या खरेदीसाठी येतात. सोने मात्र तिथे आम्हाला इथल्यापेक्षा स्वस्त आहे असे दिसले नाही. या बाजारामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होत असला तरी दुर्दैवाने व्यापारासाठी मोकळी ठेवण्यात आलेली ही सीमाच तिथल्या प्रशासनापासून सुरक्षा दलांपर्यंत सगळ्यांच्या भ्रष्टाचाराची आणि मादक द्रव्ये व शस्त्रास्त्रांच्या तस्करीची गंगोत्री ठरली आहे.

मोरेमध्ये एक 'हॉटेल तामिळनाडू' नावाचे छोटे, धाब्यासारखे रेस्टॉरंट आहे. बालू नावाचा एक तामिळी माणूस ते चालवतो. २८ वर्षांपूर्वी तिथे काहीही नसताना तो तिथे गेला आणि त्याने ते हॉटेल सुरू केले. दाक्षिणात्त्य माणसांचा ते जिथे जातील तिथे त्यांची माणसे ओढून घेण्याचा स्वभाव असल्याने व ती माणसे जात्याच उद्योगी असल्याने मोरेमध्ये दाक्षिणात्त्यांची, विशेषतः तामिळनाडूमधल्या माणसांची संख्या लक्षणीय आहे. खरोखर नवल वाटते की कुठे तामिळनाडू, कुठे केरळ आणि कुठे ही ईशान्य टोकाची राज्ये... पण आपले घरदार सोडून ही माणसे तिथे जातात, आपले बस्तान बसवतात. ना त्यांना भाषेची अडचण आडवी येते, ना इतर काही असुविधा त्रास देतात.

बालू सांगत होता, 'पूर्वी मोरेतलं वातावरण खूप चांगलं होतं. पण आता हे गाव पूर्णपणे माफियांच्या ताब्यात गेलं आहे. १९९५ मध्ये इथे मद्रासी आणि कुकी जमातीच्या लोकांतही दंगल झाली तेव्हापासून इथे कायम तणाव असतो. पोलिस, निमलष्करी दले तैनात आहेत. ती बंदोबस्त ठेवतात पण त्यांच्यातही भ्रष्टाचार आहे. येणाऱ्या प्रत्येक बंडलमागे रेट ठरतात. गेटवरचे ऑफिसर्स तर दर दिवसाला १० ते १५ हजार रुपये कमावतात. नंतर ते वरपासून खालपर्यंत आपापसात वाटून घेतले जातात. एकूणच सगळा गैर प्रकार चालतो.'

तिथे असलेल्या दहशतीचा अनुभव तर आम्हीही घेतला - हे सीमेवरचे गाव, त्यात सीमाही उघडी असलेली... तिकडे गेलेल्या सगळ्यांना दुपारी ४च्या आत परत येण्याचे बंधन असले तरी पैशाच्या जोरावर जिथे इमानही विकले जाते तिथे ही असली वेळेची बंधने शिथिल व्हायला किती वेळ लागणार? अशा परिस्थितीत तिथे रोज संध्याकाळी सहानंतर लोड शेडिंग चालते... मोरे ते इंफाळ या रस्त्यावर

दुपारी तीननंतर वाहनांची सर्व वाहतूक कायद्याने बंद असते. तसे फलक ठिकठिकाणी लावलेले आहेत. पण तरीही या रोजच्या लोड शेडिंगचा गैरफायदा उठवत सगळे काळे धंदे तिथे सूर्यास्तानंतर चालतात. आम्ही बालूच्या रेस्टॉरंटमध्ये त्याच्याशी गप्पा मारत बसलो असतानाच अंधारले होते. तिथून निघालो तेव्हा संध्याकाळचे फक्त सहा वाजले असले तरी बाहेर डोळ्यात बोट घातले तरी दिसणार नाही इतका मिट्ट काळोख होता. लोड शेडिंगमुळे पूर्ण गावातले लाईटस् गेले होते. पण त्या अंधारातही रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या निमलष्करी दलाच्या, लष्कराच्या जवानांच्या सरसावलेल्या बंदुका नजरेला आणि मनाला खुपत होत्या. दोनच दिवसांपूर्वी तिथे अतिरेक्यांनी लष्करी जवानांवर गोळीबार करून चौघांना जखमी केल्याची बालूकडून ऐकलेली साद्यंत हकीगत मनावरचा ताण वाढवत होती. आम्ही कसेबसे हॉटेलवर परतलो पण हॉटेल मालकावर विश्वास ठेवायलाही मन तयार नव्हते. कुठे खुट्ट वाजले तरी काळजाचा थरकाप उडत होता... हॉटेल मालक अतिरेक्यांना सामील तर नसेल, अतिरेकी शस्त्रांच्या जोरावर तिथे घुसणार तर नाहीत अशा नाना शंका मन अस्वस्थ करत होत्या. अशा अवस्थेतच कशी बशी रात्र काढली. दुसऱ्या दिवशी सकाळच्या बसने आम्हाला इंफाळला परतायचे होते. बाहेरच्या वातावरणाचा इतका ताण मनावर आला होता की सकाळी अजिबात जेवलेलो नसताना आणि बालूचे आग्रहाचे आमंत्रण असताना आम्ही रात्रीचे जेवायला जायचेही टाळले. कधी एकदा सकाळ होते असे झाले होते.

अखेर सकाळ झाली. बालूच्याच हॉटेलवर कॉफी, नाश्ता उरकून आम्ही बसमध्ये चढलो. नंतर जो काही ठिकठिकाणी चेकिंगचा ससेमिरा मागे लागला की हैराण झालो. मोरेहून निघतानाच मोरे पोलिसगेटवर पोलिस चेकिंग करतात. तिथून अक्षरश: दहा पावले पुढे नाही जात तर कस्टम्स आणि एक्साईजतर्फे चेकिंग होते. हे चेकिंग म्हणजे सगळ्या प्रवाशांना खाली उतरवायचे, सगळे आणलेले सामान तपासायचे, पण तेही वरवर, पैसे खाण्यापुरते... ते मागतील तेवढे पैसे वा आणलेल्या मालातली एखादी वस्तू त्यांना दिली की मगच बसला हिरवा कंदिल मिळायचा. वाटेत दोन ठिकाणी तर आम्हाला एवढा धक्का बसला की संतापाने डोके फिरायची वेळ आली. सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी आमची बस अडवली. दोन जवान बसमध्ये चढले. वरवरचे चेकिंग किंवा अधिक नेमक्या शब्दांत सांगायचे तर चेकिंगचे नाटक झाले. तेवढ्यात तिसरा जवान बसमध्ये चढला. तो या दोघा, आधी चढलेल्या जवानांना सांगत होता की सुपरिटेंडट साहेब (बी.एस.एफ. चे) जीपमध्ये बसलेत. त्यांनी सांगितलंय की कुणी कलर टीव्ही आणला असेल तर 'डीटेन' करा. त्यावर या दोघांपैकी एकाने हसून विचारले,'का? त्यांना घरी घेऊन जायचाय का?' हा सगळा प्रकार पाहिला आणि आपल्याकडे कस्टम्स व पोलिसांनी चांदी समजून आर.डी.एक्स.ला

परवानगी दिली तो भीषण प्रकार आठवला. अक्षरशः संताप आला. सीमेच्या सुरक्षेची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते सीमा सुरक्षा दलच अशा तऱ्हेने पैसे खाऊन वा अशा वैयक्तिक स्वार्थासाठी देशद्रोहच्यांना मोकळीक देणार असेल तर सर्वसामान्यांनी बघायचे कुणाकडे? कशावरून त्या बसमध्ये कुणी काही शस्त्रे वा मादक द्रव्ये लपवून आणली नसतील? दुसऱ्यांदा आम्हाला असाच संताप आला ते ज्यांच्यावर आमचा तोपर्यंत पूर्ण विश्वास होता त्या लष्कराच्या जवानांनी हाच प्रकार केला तेव्हा.

आसामचे मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांना हा प्रकार सांगितला तेव्हा ते हसले. म्हणाले, 'सगळं काही वरपर्यंत माहिती असतं. लोड शेडिंगच्या काळात आधी सिग्नल देऊनच माल येतो. पण सगळेच त्यात सामील आहेत म्हटल्यावर थांबवणार कोण?'

आमच्या बसमध्ये तेंगनोपल पोलिसस्टेशनचा अधिकारी मीरसेंग होता. इंफाळला निघाला होता. तो सांगत होता, 'मणिपूरमधले अनेक तरूण ब्रह्मदेशात शस्त्रं व दारूगोळा आणण्यासाठी जातात व येताना शस्त्रं आणि दारूगोळ्याबरोबरच नं. ४– म्हणजे मादक द्रव्यंही घेऊन येतात.' त्याने दिलेल्या माहितीनुसार आम्ही गेलो त्याच्या तीनच दिवस आधी लष्कराने चार तरुणांना पकडले. त्यांचा मुखिया पळून गेला पण या चौघांकडून सहा हजार रुपयांच्या खऱ्या नोटा आणि पाचशे रुपयांच्या नोटांच्या स्वरूपातील बनावट साडेचौऱ्याण्णव हजार रुपये जप्त करण्यात आले. असे एक लाख रुपये घेऊन ते ब्रह्मदेशात शस्त्रे आणि दारुगोळा आणायला चालले होते. त्यांच्याकडून एक ग्रॅम ब्राऊन शुगरही जप्त करण्यात आली. हे धाडसत्र तेंगनोपॉल पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने लष्कराने ते तेंगनोपॉल पोलिसांच्या स्वाधीन केले. त्याने आम्हाला त्या बनावट नोटाही दाखवल्या.

आमच्या गप्पा ऐकत असलेला एक मणिपुरी तरुण कळवळून म्हणाला, 'जो पर्यंत ही तामूची लाईन बंद करत नाहीत ना तोपर्यंत मणिपूरचा विकास होणार नाही आणि जोपर्यंत येथे काही उद्योगधंदे नाहीत, नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत मुळात शांत असलेले मणिपुरी तरुण या वाममार्गानं जाण्याचं, शस्त्रं उचलण्याचं थांबणार नाही.. मणिपूरमध्ये आज बी.ए., एम.ए. झालेल्या मुलांनी नोकऱ्या न मिळाल्याने शस्त्रं उचलली आहेत. शिक्षण असलं तरी नोकऱ्या मिळवण्यासाठी पैसे द्यावे लागतात. सगळे ते देऊ शकत नाहीत आणि दिले तरी नोकरी मिळेलच याची शाश्वती नाही. अशा परिस्थितीत वैफल्य येणार नाही तर काय होणार? त्यातूनच मग तरुण या मार्गाकडे वळतात.'

आणखी एकाने प्रतिक्रिया व्यक्त केली, 'सरकार जेवढा पैसा येथे लष्कर आणि निमलष्करी दलांवर खर्च करते तेवढा पैसा जर सरकारने या विभागाच्या विकासावर, लोकांना रोजगार मिळवून देण्यावर खर्च केला असता ना, तर या लष्कराची आणि

निमलष्करी दलांची गरजच पडली नसती...'

हे एक दुष्टचक्र होते.... उद्योगधंदे नाहीत म्हणून नोकऱ्या नाहीत. नोकऱ्या नाहीत म्हणून तरूण मोठ्या संख्येने दहशतवाद्यांच्या, परकीय शत्रूंच्या हातातले बाहुले बनतायत... ते तसे बाहुले बनतायत म्हणून बंदोबस्तासाठी लष्कर ठेवावे लागतंय, निमलष्करी दलांना तैनात करावे लागते आहे. या सुरक्षा दलांसाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी पैसा खर्च होतोय... आणि तो तसा होतोय म्हणून विकासाला पैसाच उरत नाहीय...

डोळे मिटले तरी हे गरगर फिरणारे दुष्टचक्र, त्या दुष्टचक्रात पिळवटून निघणारी मणिपुरी जनता, मणिपूरची सुंदर भूमी डोळ्यांपुढे दिसत होती...

हे दुष्टचक्र कोण भेदेल? एक अनुत्तरित प्रश्न!

— —

# ७ / अरुणाचल– जणू दुसरा स्वर्गच

भारतात काश्मीरपेक्षा जास्त सुंदर काय आहे- असा प्रश्न जर कुणी मला विचारला तर एका क्षणाचाही विचार न करता माझ्या तोंडावर नाव येईल ते अरुणाचलप्रदेशचे. हा प्रदेश हिमालयाच्या कुशीत वसलेला आहे. निसर्ग सौंदर्याची अनमोल उधळण विधात्याने या प्रदेशावर केलेली आहे. हिरव्या गर्द झाडीने वेढलेले डोंगर, खळाळत वाहणाऱ्या अल्लड नद्या, असंख्य रंगांची फुले, असंख्य प्रकारचे ऑर्किडस् आणि निसर्गाच्या या अनुपम खजिन्याला कवेत घेऊन राहिलेली नीरव शांतता! या सर्वांवरही कडी करणारे सुख म्हणजे शहरीकरणाचा फारसा स्पर्श न झाल्याने, पर्यटकांच्या दृष्टीने अजूनही बऱ्याच प्रमाणात अज्ञात राहिल्याने या नीरव शांततेचा भंग करणारी गर्दी, वाहनांचे कर्णकर्कश्य भोंगे नाहीत, लाऊड स्पीकर्स नाहीत. चार दिवस निवांत निसर्गाचा स्पर्श अनुभवायचा असेल तर अरुणाचलसारखी जागा नाही.. 'ये कौन चित्रकार है, ये कौन चित्रकार ?' या कवी प्रदीप यांच्या गीतातल्यासारखा प्रश्न पडावा असा येथील निसर्ग आहे.

केशरी पहाट, दाट धुके, ती पानांची सळसळ, त्या पांढऱ्या शुभ्र पुळणीतून, पांढऱ्या दगड गोट्यांतून खळखळत वाहणाऱ्या नद्या.. त्यांचे हात गोठवणारे पाणी, त्या पाण्यात ओथंबलेली झाडे, वेली ... भर दुपारी सूर्य माथ्यावर आल्यावर सुद्धा जराही कमी न होणारी थंडी, दुपारी चार वाजताच आजूबाजूच्या डोंगरांवरून दाटून येऊ लागलेल्या सावल्या, चित्रविचित्र रंगांचे गुलाब, सूर्यफुले, पिवळे धम्मक झेंडू, इतर असंख्य जातीची, फुले.. या हिरवाईच्या चौकटीत खेळणारी गुटगुटीत, लाल लाल गोबऱ्या गालांची- पिचक्या डोळ्यांची मुले.. या मुलांना झाशीच्या राणीच्या अविर्भावात पाठीशी बांधून चालता- चालता विणकाम करणाऱ्या लाल लाल गालांच्या, सुंदर स्त्रिया.. निसर्गाचे हे विभ्रम पाहात बसावेत असेच सारखे वाटत राहते.

आज ज्याला आपण अरुणाचलप्रदेश म्हणून ओळखतो तो प्रदेश पूर्वी नॉर्थ ईस्ट फ्रंटियर प्रॉव्हीन्स म्हणजेच नेफा म्हणून ओळखला जात होता. उत्तरेला तिबेटशी संलग्न असलेली हिमालयन पर्वतराजी, दक्षिणेला आसामातील ब्रह्मपुत्रा - पश्चिमेला भूतान आणि पूर्वेकडे ब्रह्मदेश यांच्यामधे वसलेल्या ८१,५०० चौ. मैलांच्या विस्तीर्ण अरुणाचल प्रदेशाकडे उर्वरित भारताचे लक्ष फार उशीरा म्हणजे १९६२ मध्ये चीनने केलेल्या आक्रमणानंतर गेले. त्यानंतरच तिथे रस्ते, विमानतळ, वीज पुरवठा, आदि पायाभूत इन्फ्रास्ट्रक्चर उभारायला सुरुवात केली गेली पण पर्यटकांचे मात्र अजूनही तिकडे फारसे लक्ष गेलेले नाही. त्यामुळेच पूर्वांचलातली सगळी महत्त्वाची शहरे एकमेकांशी रस्त्याने जोडली गेलेली असली तरी अरुणाचलमध्ये जायचे झाल्यास मात्र अनेक ठिकाणांहून थेट बस सेवा नाही.

आम्ही आमचा मणिपूरचा दौरा आटोपल्यानंतर इंफाळहून अरुणाचलची राजधानी असलेल्या इटानगरला जायचं ठरवलं पण इंफाळमधल्या सगळ्या ट्रॅव्हल एजन्सीजकडे चौकशी केली तरी कुणाचीही इंफाळ ते इटानगर अशी थेट बस सेवा नव्हती. त्यामुळे आम्हाला हा प्रवास दोन - तीन टप्प्यांतच पूर्ण करावा लागणार होता. आमच्यापुढे दोन - तीन पर्याय होते. एक तर सकाळची गुवाहाटीला जाणारी बस पकडून काझीरंगा जवळील गोलाघाटला उतरायचे आणि तिथेच रात्रीचा मुक्काम करायचा, किंवा रात्रीच तेझपूरकडे जाणारी बस तिथेच नाक्यावर उभं राहून पकडायची. पण अनोळखी प्रदेशात आणि त्यातही आसाममध्ये बोडो आणि उल्फा अतिरेक्यांनी धुमाकूळ माजवलेला असताना हा रात्रीचा धोका पत्करायला मन तयार होत नव्हते. शेवटी असेच चौकशी करण्याकरीता हॉटेल इंफाळच्या जवळच असलेल्या नेटवर्क ट्रॅव्हल्सच्या ऑफिसमध्ये गेलो. तिथे श्री. सुब्रतो हे बंगाली गृहस्थ भेटले, ते त्या ऑफिसचे व्यवस्थापक होते. त्यांनी आम्हाला असा एक पर्याय सुचविला की गुवाहाटीचीच सकाळची बस पकडून आम्ही दिमापूरपर्यंत जावं आणि तिथे त्यांच्याच ट्रॅव्हल्सची इटानगरची बस आम्हाला मिळू शकेल. दिमापूर नागा अतिरेक्यांच्या कारवायांमुळे कधीही तणावग्रस्त होऊ शकते अशी स्थिती असली तरीही हा पर्याय आम्हाला जास्त पसंत पडला. कारण एक तर इंफाळहून सकाळी निघालेली बस संध्याकाळपर्यंत दिमापूरला पोहोचणार होती आणि दुसरे म्हणजे दिमापूरहून आम्हाला थेट इटानगरपर्यंत बस मिळणार होती आणि ती सकाळी सातपर्यंत इटानगरला पोहोचणार होती म्हणजे इटानगरला आम्हाला पूर्ण दिवस फिरायला मोकळा मिळणार होता. आणि रात्र प्रवासात जाणार असल्याने वेळही वाचणार होता.

इंफाळहून सकाळच्या सहाच्या बसचे आम्ही रिझर्व्हेशन केले होते, पण तिथे इतका सावळा गोंधळ असतो की सकाळी बस सुटायची वेळ निघून गेली तरी ते बससाठी गिऱ्हाईके शोधत बसतात. आम्ही मात्र थंडीत पहाटे उठून तिथे गेल्याने

व त्यात हा विलंब होत असल्याने वैतागलो होतो. साधा चहाही मिळाला नव्हता. अखेर संयम सुटून आम्ही बरीच तणतण केल्यानंतर ती बस सुटली आणि लगेचच अर्ध्या तासात सेकमाई नावाच्या गावी जेवणासाठी थांबवण्यात आली. मणिपूर हे 'ड्राय स्टेट' असल्याने तिथे दारूबंदी असली तरी सेकमाई मात्र बेकायदा दारू भट्ट्यांसाठी कुप्रसिद्ध असलेले गाव आहे. सेकमाईला आमची बस थांबली तेव्हा घड्याळात सकाळचे फक्त आठ वाजले होते पण मणिपुरी लोक मात्र इतक्या सकाळीही भात आणि मच्छीच्या जेवणावर ताव मारीत होते. सकाळी आठ ही त्यांची नेहमीची जेवणाची वेळच आहे. आम्हाला मात्र इतक्या सकाळी भात खाण्याची कल्पनाच करवत नव्हती. आपल्याला इकडे जशी वेगवेगळ्या प्रकारचे स्नॅक्स खायची पद्धत आहे. तशी तिकडे नाही. त्यामुळे आम्ही तसेच बसमध्ये बसलो. तिकडच्या या खाजगी बसेसचे वैशिष्ट्य म्हणजे त्या जेवणाच्या स्टॉपसाठी ज्या काय थांबतील तेवढ्याच बाकी कुठेही न थांबता सरळ त्यांच्या नियोजित ठिकाणीच थांबतात. आमची ही बस इंफाळहून निघाल्यावर दिमापूरपर्यंत मध्ये कुठेही न थांबता गेली. अपवाद फक्त माओ गेटचा. मात्र इंफाळला जाताना जेवढा वेळ तिथे थांबावे लागले होते तेवढा वेळ येताना मिळाला नाही. तिथे काही तरी खाऊन घ्यायचा आमचा विचार होता, पण बस तिथे जेमतेम पाच मिनिटे थांबली. त्यामुळे तेवढ्या वेळात आम्हाला खाली उतरुन जेमतेम केळी घेणे शक्य होते. तेवढा संपूर्ण दिवस आम्हाला त्या केळ्यांवर काढावा लागला.

दिमापूर ही नागालँडची आर्थिक राजधानी असल्याने तिथे हॉटेल्स वगैरे भरपूर आहेत. त्यामुळे तिथे पोटपूजा करून आम्ही इटानगरच्या बसमधे बसलो. सगळ्या बसेसचे पुन्हा एकदा दिमापूरच्या सीमेवर लष्करातर्फे चेकिंग होत असल्याने तिथे थोडा वेळ जातो तेवढाच. बाकी बस कुठेही न थांबता थेट इटानगरला जाते. अरुणाचलचा विशेष म्हणजे नागालँडला वगैरे जसे एकाच इनरलाईन परमिटवर आपण संपूर्ण राज्यात फिरू शकतो तसे अरुणाचलला नाही. तिथे अरुणाचलची राजधानी असलेल्या इटानगरसाठी वेगळे परमिट काढावे लागते आणि तवांग - बोमदिलाला जायचे झाल्यास तिथल्यासाठी वेगळे परमिट काढावे लागते. ते दिल्ली व कलकत्त्यातील किंवा गुवाहाटी, शिलाँगमधील अरुणाचल प्रदेशच्या ऑफिसेसमधून काढता येते. आम्ही गुवाहाटीतील आर. सी. बरुआ रोडवरील अरुणाचलच्या डेप्युटी रेसिडेंट कमिशनरच्या ऑफिसमधून हे परमिट काढले होते. आणि मुंबईहून आलेले आमच्यासारखे दोघे पर्यटक अरुणाचलला जाऊ इच्छितात याचा त्या डेप्युटी रेसिडेंट कमिशनरनाच इतका आनंद झाला की त्यांनी आमच्या परमिटसूवर अरुणाचलच्या सगळ्या जिल्ह्यांची नावे लिहिली. म्हणजे आम्ही एकाच परमिटवर संपूर्ण अरुणाचल फिरू शकणार होतो. हे परमिट काढणे अत्यावश्यक आहे कारण अरुणाचलच्या सीमेवर प्रत्येक ठिकाणी त्याचे कसोशीने चेकिंग होते,

असा आमचा अनुभव आहे. मुळात बाह्य संस्कृतींच्या आक्रमणापासून स्थानिक ग्रामस्थांना वाचविण्यासाठी ब्रिटिश कालावधीत या इनरलाईन परमिटची सुरुवात झाली. इनरलाईन परमिटमुळे या लोकांची राष्ट्रीय प्रवाहात मिसळण्याची प्रक्रिया बऱ्याच प्रमाणात रोखली गेली असली तरी या इनरलाईन परमिटमुळे अत्यंत मागासलेला असा हा या प्रांतातील समाज आपले स्वत्व टिकवू शकला आहे. अरुणाचलमध्ये फिरताना हे ठायी ठायी जाणवते.

या अरुणाचलचा इतिहास कित्येक शतके मागे, थेट पौराणिक काळापर्यंत जातो. जमदग्नीपुत्र परशुरामाने पित्याच्या आज्ञेनुसार आपल्या मातेचा– रेणुकेचा वध केला आणि तो परशू धुण्यासाठी नदी शोधत तो वणवण फिरू लागला त्याने अनेक प्रदेश, जंगले पालथी घातली पण परशू धुण्यासाठी नदी मिळेना. अखेर त्याने रागाने त्या परशूनेच खडकावर घाव घातले. त्या घावांनी त्या खडकातून पाण्याचा प्रवाह बाहेर पडला. त्याचाच पुढे ब्रह्मपुत्रा हा नद झाला असे म्हणतात. त्या पाण्यातच पुढे परशुरामाने आपला परशू बुडविल्याने ब्रह्मपुत्रा अपवित्र मानली जाते.

ज्या ठिकाणी ब्रह्मपुत्रेचा उगम झाला असे मानले जाते ते ब्रह्मकुंड अरुणाचल प्रदेशात लोहित जिल्ह्यात आहे. श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी हिचा पिता भीष्मक याची भीष्मकनगर ही राजधानी याच भागात होती असे म्हणतात. कौटिल्य आणि मनु यांच्या वास्तुशास्त्राच्या नियमानुसार ही नगरी बांधलेली होती असे उल्लेख सापडतात. तीन बाजूंनी मातीचा तट, उत्तरेकडे पर्वतरांग अणि मध्यभागी १८७० चौ. मी. क्षेत्रफळाचा विटांनी बांधलेला राजवाडा, तेथून १५ कि. मी. वर असलेले शिवमंदिर.. पश्चिमेकडे विटाच्या पायऱ्यांचा घाटही दिसतो. कालिका पुराणानुसार रुक्मिणीचे स्वयंवर इथे झाले. त्यामुळे श्रीकृष्णाबरोबरच शिशुपालादी राजे इथे वावरले. रुंद आणि व्यवस्थित बांधलेल्या रस्त्यांचे अवशेष तिथे आजही दिसतात. स्थानिक लोक त्याला रुक्मिणी आळी म्हणूनच संबोधतात. मिशमी पर्वतराजीच्या पायथ्याशी दिबांग व्हॅलीत असलेल्या भीष्मकनगरात आजही प्राचीन अवशेषांचा खजिना आहे. एका प्राचीन किल्ल्याचे अवशेष आजही दिसतात. पण ते अर्थातच कृष्णकालीन नाहीत. इ. स. १२ ते १६ व्या शतकाच्या दरम्यान या भागावर राज्य करणाऱ्या चूटिया राजघराण्याने बांधलेल्या वास्तूंचे ते अवशेष आहेत. असेच अवशेष मालिनीथान या अरुणाचलच्या सियांग जिल्ह्यातल्या गावीही सापडले आहेत. ते ही अवशेष असेच १४ व्या-१६व्या शतकाच्या आसपासचे असले तरी या गावीही कृष्णाशी निगडित कथा प्रचलित आहेत. रुक्मिणीचे हरण करून तिला द्वारकेला नेताना कृष्ण काही काळासाठी इथे थांबला होता. अशा स्वरूपाच्या कथा स्थानिक लोक सांगतात.

अरुणाचलचा हा भूतकाळ कितीही रमणीय असला तरी आधुनिक इतिहास मात्र कटू आहे. चीनने तिबेट गिळंकृत केल्यानंतर भारताने तिबेटचे धर्मगुरू दलाई

लामा आणि तिबेटींना उदार आश्रय दिल्याने संतापलेल्या चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाचा सर्वाधिक फटका ज्याला बसला असा हा प्रदेश आहे. खरे तर हा सीमा रेषेबाबतचा वाद तसा खूप जुना आहे. आजचा स्वतंत्र भारत अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनचा आहे. उत्तरेकडील ५५० मैल लांबीची सीमारेषा ही त्या वादाच मूळ कारण आहे. ब्रिटिश असतानाच त्यांनी हा वाद सोडवायचा प्रयत्न केला होता - तेव्हा सिमला येथे भरलेल्या बैठकीत ब्रिटन, चीन आणि तिबेटच्या प्रतिनिधींनी तिबेट व भारतादरम्यानची सीमारेषा हिमालयन शिखरांनुसार प्रमाणित करण्यास मान्यता दिली होती. पण चीनने ऐनवेळी माघार घेतली. दलाई लामांना भारताने आश्रय दिल्याचे निमित्त झाले. आणि तोपर्यंत वाढत गेलेल्या कुरबुरींची परिणती चीनने भारतावर केलेल्या पहिल्या हल्ल्यात झाली. २६ ऑगस्ट १९५९ रोजी त्यांनी आपल्यावर पहिला हल्ला केला आणि आपले, अरुणाचलच्या हद्दीतले लोंगजू हे ठाणे जिंकून घेतले. पण त्यांनी ते १९६१ साली स्वत:हूनच सोडून दिले. पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालील भारत सरकार 'हिंदी - चिनी भाई भाई'च्या स्वप्नरंजनात दंग राहिले आणि ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने संपूर्ण तयारीनिशी मोठा हल्ला चढविला आणि भारताला दारूण पराभव पत्करावा लागला. त्या पराभवाचे चटके ज्याने सर्वाधिक सोसले तो प्रांत म्हणजे अरुणाचल प्रदेश! चीनने तेव्हा बळकावलेला बराचासा भूभाग आजही त्यांच्या ताब्यात आहे. आपल्या अरुणाचलच्या भूमीवर एक हेलीपॅड बांधण्याइतकी घुसखोरी त्यांनी केली आहे आणि आपण मात्र अजूनही चर्चेची गुऱ्हाळेच तेवढी चालवत बसलो आहोत. मात्र वाईटातूनही कधी तरी चांगले होते तसे अरुणाचलच्या बाबत झाले आणि तोपर्यंत पूर्णत: दुर्लक्षित राहिलेल्या या सीमावर्ती प्रांताकडे उर्वरित भारताचे लक्ष तरी गेले व काही मूलभूत इन्फ्रास्ट्रक्चर, लष्कराचे सुसज्ज तळ तिथे उभे राहू शकले.

राज्याचा दर्जा मिळण्यासाठी ज्या प्रदेशाला २० फेब्रुवारी १९८७ पर्यंत वाट पाहावी लागली त्या अरुणाचलप्रदेशात चिनी युद्ध लादले जाईपर्यंत एकही पोलिस ठाणे नव्हते. भारतीय प्रशासनाची कोणतीही खूण तिथे अस्तित्वात नव्हती. 'जिथे गवताचे पातेही उगवत नाही..' अशी त्या प्रदेशाबद्दलची भावना खुद्द पंतप्रधान नेहरूंची होती. या परिस्थितीत त्या प्रांताकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले यात नवल ते कसले? त्यामुळे आजही आर्थिक, औद्योगिकदृष्ट्या हा प्रदेश मागासलेलाच राहिला आहे. आता तिथे सरकारी यंत्रणा कार्यरत असली, विवेकानंद केंद्र व खिस्ती मिशनऱ्यांच्या माध्यमातून समाजसेवेचे जाळे उभे राहात आसले तरीही या प्रदेशाला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात यायला अजूनही बरीच वर्षे लागतील अशी इथली स्थिती आहे. हा प्रदेश म्हणजे निसर्गसौंदर्याचा अनुपम खजिना आहे, पण हा खजिना उर्वरित भारतासाठी खुला व्हायला १९८८ हे साल म्हणजे स्वातंत्र्यानंतर ४१ वर्षे उलटावी लागली आणि तरीही आज १९९७ सालातही अनेक महत्त्वाच्या पर्यटन स्थळांवर मोठ्या संख्येने

आलेल्या पर्यटकांना सामावून घेण्याइतक्या पायाभूत सोयी सुविधा इथे उपलब्ध नाहीत, ही गोष्ट दुर्दैवाची असली तरी खरी आहे.

आम्हीं इटानगरला गेलो तेव्हा नेमके तिथे दुसऱ्या दिवसापासून सत्तारूढ अरुणाचल काँग्रेसचे पहिले अधिवेशन होते. त्यामुळे राज्यभरातून अरुणाचल काँग्रेसचे कार्यकर्ते तिथे आले होते. इटानगर हे एकटे शहर नाही. 'नहरलागन - इटानगर' अशा त्या 'ट्विन सिटीज' आहेत. आम्हाला हे माहीत नव्हते, त्यामुळे नहरलागनला जवळ जवळ सगळी बस रिकामी झाली तरी आम्ही इटानगरसाठी बसून राहिले. नहरलागनहून इटानगरला जायला बसने वीस एक मिनिटे लागतात. तिथे ऑटो रिक्षाही आहेत पण त्या मीटरप्रमाणे धावत नसल्याने इटानगरला जायला परवडत नाहीत.

इटानगरला पोहोचल्यावर एकही हॉटेल रिकामे नाही असे आमच्या लक्षात आले. रिक्षातून आम्ही वणवण फिरत होतो - अखेर आम्हाला विवेकानंद केंद्राची पाटी दिसली. निदान तिथे तरी काही तरी सोय होईल किंवा निदान ते कुठे तरी सोय करू शकतील या आशेने तिथे गेलो. तिथे आमच्या सुदैवाने मुंबईचेच श्री. आकूत, श्री. नरेंद्र जोशी व त्यांचे अन्य सहकारी भेटले. श्री. आकूत हे निवृत्त गृहस्थ विवेकानंद केंद्राच्या 'अरुण - ज्योती' प्रकल्पांतर्गत समाजसेवा करण्यासाठी तिथे गेले आहेत, तर श्री. नरेंद्र जोशी हे मुंबईत महींद्र कंपनीत इंजिनीयर होते. ती चांगल्या पगाराची नोकरी सोडून, आपले अवघे तारुण्य पणाला लावून ते तिथे या 'अरुण - ज्योती' प्रकल्पांतर्गतच काम करताहेत. श्री. आकूत यांनी स्वत: आमच्याबरोबर हॉटेल शोधण्यासाठी पायपीट केली. अखेर कुठेच रूम मिळू न शकल्याने 'अरूण सुबान्सिरी' या इटानगरमधल्या महागडच्या हॉटेलात जागा घ्यावी लागली.

हे हॉटेल डोलमू नावाच्या एका काँग्रेस जनाचे. अरुणाचलचे मुख्यमंत्री श्री. गेगाँग अपांग यांनी एक - दीड वर्षांपूर्वी इंदिरा काँग्रेसमधल्या जवळ - जवळ सगळ्यांना घेऊन आपला स्वतंत्र 'अरुणाचल काँग्रेस' हा पक्ष काढला, तेव्हा जे फक्त पाचजण इंदिरा काँग्रेसमध्ये राहिले त्यांतील श्री. डोलमू हे एक होते. अरुणाचलमध्ये आता सरळ अरुणाचल काँग्रेस व उरलेली काँग्रेस असाच सामना असल्याने केवळ इटानगरच नव्हे तर नहरलागनचीही सगळी हॉटेल्स तुडुंब भरलेली असताना डोलमूंचे अरुण सुबान्सिरी हे देखणे हॉटेल मात्र पूर्ण रिकामे होते. स्वत: डोलमूही इटानगर सोडून या अधिवेशनाच्या निमित्ताने होत असलेल्या अरुणाचल काँग्रेसच्या शक्तिप्रदर्शनाच्या वेळी दिल्लीला निघून गेले होते. त्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. त्यांच्याचप्रमाणे अरुणाचलचे कविमनाचे राज्यपाल माताप्रसादही या काळात दिल्लीला गेले होते. अरुणाचलवर राज्य होते ते अरुणाचल काँग्रेसचे. 'अरुणाचल एकता झिंदाबाद', 'बिजली, पानी और मकान, बनेगा अरुणाचल महान', 'लाँग लिव्ह अरुणाचल काँग्रेस, लाँग लिव्ह गेगाँग अपांग' अशा घोषणा देत ट्रक्स भरभरून आपल्या पारंपारिक

वेषात सजलेले अरुणचलवासी इटानगरला - नहरलागनला येत होते. अरुणाचल काँग्रेस हा सत्तारूढ पक्ष असल्याने सारी सरकारी यंत्रणा या अधिवेशनाच्या यशासाठी राबत होती. तुम्ही पर्यटन विभागाच्या कार्यालयात गेलात तरी तिथले कर्मचारी अधिवेशनाच्या तयारीत गुंतले असल्याचेच चित्र दिसत होते. राज्य परिवहन मंडळाच्या कार्यालयात गेलात तरी तिथले कर्मचारी या कामात गुंतल्याने व बसेस अरुणाचल काँग्रेसच्या दिमतीला गेल्याने बोमदिलाची बससेवा स्थगित ठेवण्यात आली असल्याचेच उत्तर मिळत होते.

विवेकानंद केंद्राच्या कार्यकर्त्यांकडून तिथली बरीच माहिती मिळाली. अरुणाचलमध्येही ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कारवाया आता प्रचंड वाढल्या आहेत, पण अरुणाचलचे सध्याचे मुख्यमंत्री गेगाँग अपांग यांनी सतत त्याला विरोधच केला आहे. दीड वर्षांपूर्वी त्यांनी अरुणाचलच्या चार काँग्रेस मंत्र्यांना तडकाफडकी काढून टाकले. त्यामुळे काँग्रेस श्रेष्ठींनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला. त्यामुळे त्यांनी एका फटक्यात काँग्रेसमधल्या जवळ - जवळ सगळ्यांना बरोबर घेऊन अरुणाचल काँग्रेस हा नवा पक्ष काढला आणि पुन्हा आपले बहुमत सिद्ध करून सत्ता आपल्याकडेच राखली. अरुणाचलच्या विधानसभेत एकूण ६० आमदार आहेत. त्यांपैकी ३६ ते ४० जणांना अपांगनी मंत्रीपदे देऊन खूष केले आहे, आणि उरलेल्यांना विविध महामंडळांची अध्यक्षपदे देऊन. मात्र तिथल्या या सत्तेच्या ओढाताणीपासून दूर तिथल्या जनतेच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या विवेकानंद केंद्राचे काम मला अधिक मोलाचे वाटले. अरुणाचलमध्ये आज विवेकानंद केंद्राच्या सोळा शाळा आहेत, रामकृष्ण मिशनच्या दोन तर शारदा मिशनची एक शाळा आहे. या शाळांत हिंदू धर्माचे शिक्षण दिले जात नाही, केंद्र सरकारचाच अभ्यासक्रम असतो. पण विवेकानंद रामकृष्ण यांच्या शिकवणुकीचे संस्कार मात्र आवर्जून केले जातात. त्यामुळेच आज अरुणाचलच्या प्रत्येक आमदाराला मग भलेही तो ख्रिश्चन असो, त्याच्या मतदार संघात विवेकानंद केंद्राची शाळा हवी आहे. विवेकानंद केंद्राची मात्र अडचण ही आहे की जेवढ्या प्रमाणात त्यांना कार्यकर्ते हवे आहेत तेवढ्या प्रमाणात ते उपलब्ध होत नाहीत. आकूत आणि जोशी सांगत होते, 'आमचे जे कार्यकर्ते आहेत ते प्रामुख्याने महाराष्ट्रातले तरी आहेत नाही तर केरळ, तामिळनाडूतले. एकनाथजी रानडे महाराष्ट्राचे होते त्यामुळे महाराष्ट्रीय लोकांना विवेकानंद केंद्राबद्दल विशेष ममत्व आहे. त्यामुळे अरुणाचलमध्येही सोळा शाळांपैकी पाच शाळांत मराठी प्राचार्य आहेत.' तेझपूरमध्येही विवेकानंद केंद्रात आम्हाला सुधीर फडणीस नावाचे ग्वाल्हेरचे मराठी कार्यकर्ते भेटले. दिब्रूगडला भूषण कुलकर्णी हे एक मराठी गृहस्थच केंद्राचे काम बघतात, तर गुवाहाटीला केंद्राच्या विश्वास कपालीकर या आणखी एका मराठी कार्यकर्त्याची ओळख झाली. ज्यांच्यापर्यंत आम्ही वेळेअभावी पोहोचू शकलो नाही असेही असंख्य मराठी लोक, काही मराठी

स्त्रियाही दुर्गम, मागास अरुणाचलमध्ये ज्ञानाची पहाट फुलविण्यासाठी झटत आहेत.

विवेकानंद केंद्राप्रमाणेच मिझोरामचा अपवाद वगळता उर्वरित संपूर्ण पूर्वांचलात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही काम बरेच वाढले आहे. आसाममध्ये तर संघाच्या कामाला ५० वर्षे पूर्ण झाली असून संघाच्या ५५० शाखा आसामच्या विविध भागांत चालतात. स्थानिक आसामींमधूनही आता संघाचे प्रचारक बाहेर पडायला लागले असल्याची माहिती १९५० पासून आसाममध्ये संघकार्य करणाऱ्या मधुकरराव लिमये यांनी दिली. मिझोराम पूर्णांशाने ख्रिश्चन झाले असल्याने तिथे संघाला फारसे यश मिळालेले नसले तरी बहुतांशी ख्रिश्चन असलेल्या नागालँडमध्ये मात्र संघाच्या दोन शाळा चालू आहेत आणि विशेष म्हणजे भारतापासून फुटून निघण्याची स्वप्ने पाहणाऱ्या नागा दहशतवाद्यांनी प्रारंभीचा अपवाद वगळता या शाळांच्या व कार्यकर्त्यांच्या वाटेत काहीही अडचणी उभ्या केलेल्या नाहीत.

मणिपूर आणि मेघालयमध्ये हिंदुत्ववादी म्हणून रा. स्व. संघाला अस्पृश्य मानले जाते, तरीही तिथे महाराष्ट्रातल्या संघप्रचारकांनी 'सेवाभारती' या संस्थेच्या माध्यमातून तेथील जमातींना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने काम चालवले आहे. त्यांच्या या गौरवास्पद कार्याची माहिती मुधकरराव लिमये यांच्याकडून मिळाली, तशीच ते काम प्रत्यक्ष पाहून आलेली माझी मैत्री लोकसत्ताची पत्रकार शुभदा चौकर हिच्याकडूनही मिळाली.

श्री. लिमये सांगत होते की तिकडे विज्ञानाचे शिक्षक मिळत नाहीत, त्यामुळे सुनील देवधर हा मुंबईतला एक विज्ञान पदवीधर तरूण चक्क शिक्षक म्हणून तिथल्या एका शाळेत नोकरीला लागला. एका महिन्यात तो खासी जमातीची खासी भाषाही शिकला. नंतर त्याने ती नोकरी सोडून दिली आणि मेघालयातील खासी टेकड्यांच्या परिसरातील, मॅक्लिऑव्ह येथे सेवाभारतीची शाळा सुरू केली. पुण्याच्या 'तरूण भारत' चे माजी संपादक वि. ना. देवधर यांचा सुपुत्र असलेला सुनील आज उत्तम तऱ्हेने खासी भाषा बोलतो. गारो भाषा तो शिकतोय. पुण्याहून गेलेला किशोर ऐनापुरे आणि एस्सार शिपिंगमधील प्रतिष्ठेची नोकरी सोडून तेथे गेलेला मरीन इंजिनीअर सुमंत अमशेकर हे तरूणही खासी लोकांमध्ये पूर्णपणे मिसळून जाऊन सेवाभारतीचे काम करत आहेत.

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी म्हणून स्थापन झालेल्या 'सेवाभारती'च्या शाळांमध्ये संघगीते म्हटली जात नाहीत तर राष्ट्रगीते, राष्ट्राची प्रार्थना, प्रतिज्ञा म्हटली जाते. ख्रिस्ती मिशनरी ज्याप्रमाणे त्या लोकांना ख्रिश्चन होण्याचे व हिंदू धर्माशी, राष्ट्राशी नाते तोडण्याचे आवाहन करतात तसे 'सेवाभारती'चे कार्यकर्ते करत नाहीत. उलट तुम्ही गळ्यात क्रॉस तसाच ठेवा पण 'वंदे मातरम्' म्हणा, राष्ट्राशी एकनिष्ठ राहा असे आवाहन करतात. तसेच खासी, गारो, जैंतिया आदी जमातींमधील मतभेद मिटवून त्यांना एकत्र आणण्याचाही प्रयत्न सेवाभारतीने चालवला

आहे.

आणखी एक चांगले काम म्हणजे व्यसनांच्या आहारी जात असलेल्या तिथल्या तरूण पिढीला त्या मार्गापासून परावृत्त करण्याचे कामही सेवाभारती करते आहे. सेवाभारतीच्या या कामामुळे तिथली 'सेंग खासी' ही खासींची प्रबळ संघटनाही इतकी प्रभावित झाली आहे की, ही संघटनाही सेवा भारतीच्या बरोबरीने कामात उतरली आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भुलवून, फसवून ख्रिस्ती केलेल्या खासींना आपल्या धर्मात परत आणण्याचे जणू व्रतच या सेंग खासी संघटनेने घेतले असून ख्रिस्ती झालेल्या सर्वच्या सर्व खासींना २००० सालापर्यंत परत खासी पंथात आणण्याचे लक्ष्य या 'सेंग खासी'ने ठेवले आहे.

महाराष्ट्रातले संघाचे अनेक प्रचारक या सेवाभारतीच्या माध्यमातून मणिपूरमध्येही काम करत आहेत.

विवेकानंद केंद्रातर्फे, संघातर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळा हा एक भाग झाला. त्याशिवाय चार वर्षांपूर्वी, अरुणाचलच्या लोकांना त्यांच्या संस्कृतीचे जतन, संवर्धन व संरक्षण करता यावे आणि ते टिकवून धरतानाच राष्ट्रीय प्रवाहातही त्यांनी मिसळून जावे यासाठी विवेकानंद केंद्राने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी असा 'अरुण ज्योती' हा प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत वैद्यकीय शिबिरे, सेवा प्रकल्प, स्थानिक सण, परंपरा, संस्कृती या विषयांची चर्चासत्रे आयोजित करणे, त्या विषयीचे साहित्य प्रकाशित करणे, रामकृष्ण - विवेकानंदांचे साहित्य स्थानिक बोली भाषांत भाषांतरीत करणे, ग्रामीण भागात राहणाऱ्यांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी आरोग्य, बालसंगोपन, पर्यावरण यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, तरुणांसाठी राष्ट्रीय एकात्मता शिबिरे, व्यक्तिमत्व विकास शिबिरे आयोजित करणे, सांस्कृतिक, क्रीडामहोत्सव आयोजित करणे, वाचनालये काढणे, त्यांच्यासाठी भारत दर्शन सहली आयोजित करणे असे अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. या अरुण ज्योती प्रकल्पाचे प्रमुख श्री. बालकृष्णन् यांच्याकडून या प्रकल्पाबाबत माहिती मिळाली होती. तिकडे ते प्रत्यक्ष बघता आले. अजूनही असंख्य आदिम जमातींचे आश्रयस्थान असलेल्या, उगवत्या सूर्याचा प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अरुणाचलचा विकास या अशा प्रयत्नांतूनच होणार आहे हे निश्चित. फक्त त्यासाठी असे असंख्य आकूत, जोशी, फडणीस, कपालीकर तयार व्हायला हवेत. 'ही दोन - तीन वर्षे खूप महत्त्वाची आहेत.' असे नरेंद्र जोशी सांगत होते. अरुणाचल काँग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्ताने इटानगरमध्ये आलेल्या भोळ्या - भाबड्या अशिक्षित अर्धशिक्षित लोकांकडे पाहताना त्याची प्रचिती येत होती.

इटानगर हे राजधानीचे शहर असले तरी तिथे बघण्यासारखे फारसे काही नाही. इटानगर हे शहर 'इटा फोर्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्राचीन किल्ल्याच्या,

प्राचीन नगराच्या अवशेषांवर वसलेले आहे. एक चौरस किलोमीटरच्या परिसरात वसलेल्या या इटाफोर्टचे अवशेष आजही बघायला मिळतात. दोन विटांचे बुरुज, तीन प्रवेशद्वारे असलेला हा किल्ला चौदाव्या शतकात बांधला गेला होता असे म्हणतात. तिथे आता एक हॉटेलही आहे. त्याशिवाय इटानगरचे जोडशहर असलेल्या नहरलागन इथले हस्तकला केंद्र– पोलो पार्क ही तर प्रेक्षणीय ठिकाणे आहेतच पण इटानगरमधले जवाहरलाल नेहरू म्युझियम व त्या म्युझियमच्याच मागे एका टेकडीवर असलेली बुद्धिस्ट मोनास्ट्रीही आवर्जून बघावीत अशी ठिकाणे आहेत. या बुद्धिस्ट मोनास्ट्रीच्या बाहेरून डोंगरावर वसलेल्या संपूर्ण इटानगरचे विहंगम दर्शन होते. मुख्यमंत्री अपांग यांचा बंगलाही तिथल्याच एका टेकडीवर वसलेला आहे. त्या अतिशय देखण्या बंगल्याचे व तिकडे जाणाऱ्या वळणा - वळणाच्या नीटस् मार्गाचे दर्शनही लुभावणारे आहे. बाकी इटानगरमध्ये पाहण्यासारखे काही नाही. एक तलाव आहे, पण आपल्या इकडच्या सुशोभीत तलावांच्या तुलनेत तो मुद्दाम वाकडी वाट करून जाण्याइतका खास नाही.

इटानगर हे आता एक मोठे शहर म्हणून नावा रूपाला येत असल्याने औद्योगिक आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या अरुणाचल प्रदेशातली पहिली इंडस्ट्रियल इस्टेट इटानगरमध्ये स्थापन झाली आहे हे इटानगरचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. बाकी हस्तकलांना उद्योगाचा दर्जा देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली काही क्राफ्टस् सेंटर्स अरुणाचलमध्ये आहेत. बाकी उद्योगांच्या दृष्टीने अरुणाचलमध्ये सगळा ठणठणाटच आहे.

जंगले हे मात्र अरुणाचलचे वैभव आहेत. अरुणाचलचा जवळ जवळ साठ टक्के भाग जंगलांनी व्यापलेला आहे आणि त्यामुळेच असंख्य दुर्मिळ पशु - पक्ष्यांचे, अनेक सुंदर - आकर्षक फुलांचे आणि ऑर्किडस्च्या तब्बल साडेचारशे दुर्मिळ जातींचे अरुणाचल हे माहेरघर आहे. रेल्वेला लागणाऱ्या लाकडी स्लीपर्स पैकी २,२० लाख स्लीपर्स हे एकट्या अरुणाचलमधून आलेले आहेत हे लक्षात घेतले की अरुणाचल किती वैभवसंपन्न आहे हे लक्षात येते.

इटानगरहून बोमदिलाला जाताना या वैभवाच्या पाऊलखुणा ठिकठिकाणी उमटलेल्या दिसतात. कामेंग, सुबान्सिरी, सियांग, लोहित आणि टिरप या पाच नद्यांच्या व त्यांच्या असंख्य उपनद्यांच्या खळाळत्या प्रवाहांनी सुपीक केलेला, समृद्ध केलेला हा प्रदेश आहे. घनदाट वृक्षराजीने हिरवीगार दिसणारी या नद्यांची खोरी, त्या हिरवाईवर जणू आकर्षक रंगांनी भरतकाम करावे अशी उठून दिसणारी रंगीबेरंगी फुले, चहूबाजूंनी उंचच उंच डोंगर, त्यांवरच्या श्वास रोधून ठेवणाऱ्या वळणा - वळणाच्या वाटा, गोठवून टाकणारी थंडी... बोमदिलाला जाताना हे निसर्गसौंदर्य डोळ्यात साठवता - साठवता आम्ही भान हरपून बसलो होतो. तेवढ्यात बस भालुकपोंग नावाच्या गावी थांबली. हे गाव अर्धे आसाममध्ये आहे आणि अर्धे अरुणाचलमध्ये. इटानगरहून बोमदिलाला

किंवा तवांगला जाताना बस आसाममधून जाते आणि भालुकपोंगला अरुणाचलमध्ये शिरते. भालुकपोंगला 'हॉटेल केरला' नावांचे एक हॉटेल आहे. तिथे अतिशय चविष्ट असा मसाला डोसा मिळतो. तो खाऊन आम्ही बाहेर आलो तर बाहेर काही जवान फिरत होते. त्यांत आम्हाला नायर नावाचा एक देहूरोडचा महाराष्ट्रीय जवान भेटला. तो शीख रेजिमेंटमध्ये आहे. बरीच वर्षे तवांगला तैनात होता, आता त्याला उल्फा विरुद्धच्या कारवाईसाठी दिब्रूगडला पाठवण्यात आले आहे. उल्फाविरुद्धच्या लष्करी मोहिमेची बरीच माहिती त्याने दिली. आणि उल्फाच्या जरी एका अतिरेक्याला वा उल्फाशी संबंधित कुणालाही साधे चौकशीसाठी ताब्यात घेतले तरीही तिथल्या तथाकथित मानवी हक्क संघटना कशा न्यायालयात जातात आणि लष्कराला अर्धा अधिक वेळ न्यायालयीन लढ्यातच गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न कसा चालतो याचीही धक्कादायक माहिती त्याने दिली.

तो जवान निघून गेला. आमची बसही सुरू झाली. एक भव्य असे शिंगाच्या आकाराचे गेट ओलांडून बसने अरुणाचलप्रदेशमध्ये प्रवेश केला, आणि बस लगेच परमिट चेकिंगसाठी थांबली. तिथे कसून चेकिंग झाल्यावर बस एका उंचच उंच डोंगराच्या चढाला लागली. तिथले चढ खतरनाक आहेत पण त्या चढावरून दिसणारे सौंदर्य मात्र अनुपम आहे. तिथून काही अंतरापर्यंत ठिकठिकाणी पाण्याने भरलेल्या आसामचेही विहंगम दर्शन होते. कामेंग नदीचे खोरे पार करत बस पुढे सरकत असते. वाटेत टिपी हे छोटेसे गाव लागते. इथे ऑर्किड संशोधनकेंद्रही आहे आणि इथेच कामेंग नदीत 'रिव्हर राफ्टींग' ची सोय असल्याने हे पर्यटकांच्या दृष्टीने एक आकर्षण केंद्रही आहे. तिथून पुढे सरकल्यावर अनेक डोंगर चढत - उतरत बस बोमदिलाला जाऊन पोहोचते. आम्ही बोमदिलाला पोहोचलो तेव्हा संध्याकाळचे सात वाजले होते. मिट्ट अंधार पडला होता हे तर वेगळे सांगायची गरजच नाही. थंडी अक्षरशः गोठवून टाकत होती. हातातले सामान सावरत टूरिस्ट होमचा रस्ता चढताना दमछाक होत असूनही थंडी मात्र कमी होत नव्हती. मात्र नशिबाने टूरिस्ट होममधे जागा मिळाली. पण बोमदिला हे अरुणाचलमधले एक प्रमुख पर्यटन स्थळ असले, त्याला ऐतिहासिक महत्त्व असले तरी बोमदिलात एक टूरिस्ट होम व सर्किट हाऊस सोडले तर पर्यटकांना राहण्यासाठी चांगली हॉटेल्स नाहीत. या टूरिस्ट होममध्येही रुम हिटरसारख्या आधुनिक सोयी नाहीत. तिथे एक तद्दन स्थानिक असा प्रकार खोलीतले वातावरण उबदार ठेवण्यासाठी वापरतात. त्यात आपल्या चुलीचेच तंत्र वापरलेले असते त्यामुळे त्यात सतत लाकडे घालत बसावे लागते आणि तरीही थंडी फारशी कमी होत नाही ती नाहीच. त्यात रात्री आपण झोपल्यावर मध्येच कधी तरी त्यातली लाकडे विझून जातात. त्यामुळे आपण असे काही त्या थंडीच्या तडाख्यात सापडतो की आपला बर्फ व्हायचाच तेवढा शिल्लक राहिलेला असतो.

बोमदिला हे अरुणाचलच्या पश्चिम कामेंग जिल्ह्याचे मुख्यालय आहे. बोमदिलाची उंची आहे साडे आठ हजार फूट. या ठिकाणाला ऐतिहासिक महत्त्व आहे, १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या वेळी हे ठाणे पडले होते. चिनी बुटांखाली चिरडले गेले होते. बोमदिलातला आमचा वाटाड्या सांगत होता की टूरिस्ट होमच्या मागेच जो डोंगर आहे तिथे चिनी युद्धाच्या खुणा अजूनही दिसतात. तिथे आजही मोठ मोठे खड्डे पडलेले दिसतात. आज तो सगळा भाग लष्कराच्या ताब्यात आहे, त्यामुळे त्यांच्या परवानगीशिवाय आपण तिथे जाऊ शकत नाही. केवळ बोमदिलालाच नव्हे तर बोमदिलाच्या पुढे भूतानच्या अगदी जवळ असलेल्या तवांगपर्यंत सर्वत्र लष्कराचे अस्तित्व सतत जाणवते. या संपूर्ण मार्गावर लष्कराचे, सीमा सुरक्षा दलाचे मोठे-मोठे तळ आहेत. ठिकठिकाणी १९६२ च्या युद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या, अधिकाऱ्यांच्या, स्थानिक माणसांच्या नावाने लावण्यात आलेल्या शिला आहेत. १९६२ च्या युद्धानंतर आपण बोध घेऊन तिथला लष्करी पहारा अधिक कडक केला आहे, हे जसे पदोपदी जाणवते तसेच तेव्हा कसल्याही सुविधा- अगदी जबरदस्त क्षमतेचे लोकरी कपडेसुद्धा नसताना अचानक झालेल्या सुसज्ज चिनी आक्रमणाला तोंड देणे आपल्या सैनिकांना किती कठीण गेले असेल याचीही जाणीव होते. दोन-दोन स्वेटर्स, कानटोपी, मोजे घालूनही अंगातून थंडी निघत नव्हती. हाता पायांची बोटे गोठायला आली होती आणि मस्तक सुन्न झाले होते. नेहरूंच्या भाबड्या आशावादाने तिथे असंख्य सैनिक कसे हकनाक बळी गेले हे आठवून अस्वस्थ होत होते.

इतिहासाचा हा संदर्भ जरी मन अस्वस्थ करुन टाकत होता तरी तिथे मन प्रसन्न करणारेही बरेच काही आहे. विविध प्रकारची आकर्षक रंगांची, टवटवीत फुले आहेत, सफरचंदांच्या बागा आहेत, शुद्ध हवा आहे, अगत्यशील माणसे आहेत. फक्त तिथल्या थंडीत जर आमचा निभाव लागू शकला असता तर आणखी कितीही काळ तिथे राहायची आमची तयारी होती.

बोमदिलाच्या टूरिस्ट होमच्या मागेच अपर गोंपा ही बुद्धिस्ट मोनास्ट्री आहे. अतिशय सुंदर चित्रे असलेली ही मोनास्ट्री दोन भागांत विभागलेली आहे. एका वास्तूत प्रार्थनामंदिर आहे. तर त्याच्या समोरच असलेल्या घुमटाकृती वास्तूविषयी आमच्या वाटाड्याने विलक्षणच गोष्ट सांगितली. तवांगचा सध्याचा आमदार असलेला जो लामा आहे त्याच्या आधीच्या जन्माचे शरीर म्हणे त्या वास्तूत जतन करून ठेवण्यात आले आहे. त्याचे नाव काही त्यांना सांगता आले नाही, पण तिथे ठेवलेले शरीर हे त्याचेच आधीच्या जन्माचे शरीर आहे हे कशावरून- या प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर मात्र त्यांच्या भाबडेपणाचे निदर्शक होते. दलाई लामांना सगळे कळते असा त्यांचा भाबडा युक्तिवाद होता.

बोमदिलाहून आम्हाला खरेतर तवांगला जायचे होते. तवांगहून भूतानच्या हिमालयीन

रांगा फार सुंदर दिसतात असे ऐकले होते. तवांगची बुद्धिस्ट मोनास्ट्री ही सर्वात प्राचीन व सर्वांत मोठी मोनास्ट्री आहे, तीही पाहायची होती. वाटेतली १४ हजार फूट उंचीवरील सेला खिंड ओलांडायची होती पण तवांगला बर्फ पडू लागल्याचे कळले आणि तवांगची बस सेवाही अनियमित होती. त्यामुळे तवांगचा बेत रहित करावा लागला. बोमदिलाचीच थंडी निभत नव्हती तर तवांगला जाऊन अडकून पडावे लागले तर काय होईल या कल्पनेनेच हादरायला होत होते. शेवटी तवांग पुन्हा कधी तरी - अशी मनाची समजूत घालून परत फिरलो.

वाटेत बसमधे एका कुटुंबाशी ओळख झाली. दोन विवाहित मुली व त्यांचे आई - वडील असे ते चौघे होते. त्यांची चेहरेपट्टी अरुणाचलच्या लोकांपेक्षा वेगळी होती. त्यामुळे सहज त्यांना ते कुठले असा प्रश्न विचारला. त्या स्त्रिया उडवाउडवी करत होत्या. आता अरुणाचलमध्येही चकमा, हाजो, आदि जमातींच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या घुसखोरीमुळे परक्यांविरुद्धचे आंदोलन मूळ धरू लागले आहे. त्यामुळे तिथे वेगळ्या चेहरेपट्टीचा कुणीही दिसला तरी त्याला हटकल्यावर तो आपण बंगालचे - नाही तर बिहारचे असल्याचे सांगतो हा आमचा अनुभव होता. त्यामुळे आम्हीही ते लोक सांगत नाहीत म्हटल्यावर त्यांना फार काही खोदून विचारले नाही. येताना भालुकपोंगला बस जेवणासाठी थांबल्यावर ते वृद्ध गृहस्थच स्वत:हून येऊन माझ्याशी भरभरून बोलायला लागले.

ते म्हणाले, 'मी मूळचा नेपाळचा आहे. गुरखा. ब्रिटिशांनी त्यांना इथं कामाला माणसे हवी होती म्हणून आम्हाला ट्रकमध्ये घालून इथं आणलं तेव्हा इथं ही दुकानं, हॉटेल्स हे काही नव्हतं. धड रस्ताही नव्हता. मीही जेमतेम विशीचा होतो आणि आता पन्नास वर्षं इथे काम केल्यावर, हा भाग आपला मानल्यावर ही काही तरूण पोरं सांगतात - तुम्ही परके आहात, इथून ताबडतोब निघून जा म्हणून? इथे इतकी वर्षे आम्ही रक्त आणि घाम गाळला, माझ्या मुलींचा जन्म इथं झाला आणि इथं आज आम्ही परके ठरलो? आणि जा म्हणजे काय? कुठे जाणार? तिथे आता आहेच कोण आमचं? आणि इथे सगळं काही आहे तर इथे आम्ही परके?.. पण काय करणार? ठीक आहे.. जा तर जाऊ.. कुठंही.. नाही तरी एक दिवस या जगातून जायचंच आहे.. आज इथून जाऊ.. उद्या या जगातून.. '

परक्यांविरुद्ध पूर्वांचलातील अनेक राज्यांत चालू असलेल्या आंदोलनाचा हा दुसरा पैलू खरोखर अस्वस्थ करणारा होता. हे असे असंख्य लोक खरेच परके आहेत का? देशाच्या सीमा बदलल्या, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिस्थिती बदलली, संदर्भ बदलले त्यात या लोकांचा काय दोष? बस झपाट्याने तेझपूरकडे धावत होती.. माझ्या मनात प्रश्नांनी फेर धरला होता.

— —

# ८ / टेकड्यांचे राज्य : मिझोराम

जिथे हिरव्या गर्द, धुक्यात लपेटलेल्या टेकड्या आभाळात मान खुपसून जणू चिंतन करत बसलेल्या असतात, श्वेत - लाल वस्त्रे परिधान केलेले आकर्षक, रूपवान तरुण - तरुणी सुमधुर गीते गाऊन सारे श्रम, थकवा हलकेच दूर करत असतात असा प्रांत म्हणजे मिझोराम. पूर्वी लुशाई हिल्स डिस्ट्रिक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशाला १९७२ मध्ये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला आणि १९८७ मध्ये ते भारतीय संघराज्यातील एक राज्य बनले. भारतीय स्वातंत्र्यानंतर लगेचच, नागालँडच्या धर्तीवर इथे राष्ट्रविरोधी चळवळ उभी राहिली. ज्या राज्यात संगीत अनेक वर्षे गोळीबाराच्या आवाजात आणि शस्त्रांच्या खणखणाटात झाकोळून राहिले ते हे राज्य आहे. जिथल्या हिरव्यागार वृक्षराजींवर, कोवळ्या लतावेलींवर रक्तफुलेच उमलत राहिली ते हे राज्य आहे. नागालँडप्रमाणेच ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली राष्ट्रविरोधी मोहिमा जिथे चालल्या ते हे राज्य आहे.

२१ हजार ८१ चौ.कि.मी. क्षेत्रात पसरलेल्या या राज्याची भौगोलिक स्थिती पाहिली तरी हे राज्य राष्ट्रविरोधी शक्तींच्या हातातले बाहुले कसे बनले असेल ते लक्षात येते. त्याच्या एकीकडे बांगले देश आहे तर दुसरीकडे ब्रह्मदेश. वरच्या बाजूला त्याच्या सीमा त्रिपुरा, आसाम व मणिपूरला जोडलेल्या आहेत आणि पूर्वांचलातील विविध दहशतवादी संघटनांचे अड्डे, त्यांची प्रशिक्षण केंद्रे ब्रह्मदेशातील ज्या कचिन टेकड्यांच्या परिसरात आहेत त्या कचिन टेकड्यांचा परिसर मिझोरामला अतिशय जवळ आहे. या परिस्थितीत एकीकडे अज्ञान, भाबड्या अंधश्रद्धा, त्यांचा शिताफीने फायदा करून घेणारे, शिक्षण आणि सेवेच्या माध्यमातून एकोणिसाव्या शतकातच या लुशाई टेकड्यांच्या परिसरात उतरलेले ख्रिस्ती मिशनरी आणि दुसरीकडे आंतरराष्ट्रीय सीमा लागून असल्याने तिथून होणारी घुसखोरी, शस्त्रांची तस्करी आणि देशविघातक

कारस्थाने यांच्या तावडीत मिझो नागरिक सापडले नसते तरच नवल.

मिझो या शब्दाचा अर्थ आहे उंच डोंगरावर राहणारा. मिझोराम हा जवळजवळ पूर्णांशाने टेकड्यांचा प्रदेश आहे, आणि म्हणूनच नितांत रमणीय आहे. अजूनही राजकीयदृष्ट्या हा प्रदेश धुमसत असला तरी पूर्वीच्या तुलनेत बराच शांत आहे. औद्योगिकदृष्ट्या अजूनही पूर्ण मागासलेला असल्याने नैसर्गिक सौंदर्याच्या बाबतीत मिझोराम परिपूर्ण आहे. आधुनिक संस्कृतीची झळ त्याला लागलेली नाही.

इथले लोक प्रामुख्याने मंगोलॉईड वंशाचे आहेत. ब्रह्मदेशातील कचिन टेकड्यांच्या परिसरातूनच ते इथे आले असल्याने आजही त्यांचे त्या भागाशी संबंध आहेत. त्यांच्यातही असंख्य जमाती आहेत. ज्यांच्यावरून हा प्रदेश आत्तापर्यंत ओळखला जात होता ती लुशाई जमात (कुणी त्याचा उच्चार लुशेई असा ही करतात) ही इथली एक प्रमुख जमात आहे. त्यांच्या व्यतिरिक्त इथे हमार, फानाईस, लँगलॅन्स पँग्स, पाकी, लारवेर, रियांग व चकमा आदि जमाती वास्तव्य करून आहेत. एकोणिसाव्या शतकात येथे आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांमुळे या जमाती आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या असल्या तरी साक्षर आहेत व बहुसंख्येने सुशिक्षितही आहेत. १९६१ च्याच जनगणनेच्या वेळी हा भाग भारतातला सर्वांत सुशिक्षित भाग होता, तर १९७१ च्या जनगणनेच्या वेळी या लुशाई हिल्स डिस्ट्रिक्टमध्ये (परिसर ओळखण्यासाठी हे नाव वापरले आहे. हा डिस्ट्रिक्ट या स्वरूपात १९७२ मध्ये अस्तित्वात आला.) ५०.९१ टक्के साक्षरता नोंदली गेली. त्यात साक्षर स्त्रियांचे प्रमाणही ४२.५० टक्के इतके होते. या लोकांच्या प्रत्येक जमातीच्या वेगवेगळ्या बोली आहेत. लुशाई लोकांची मातृभाषा असलेली मिझो ही भाषा रोमन लिपीत लिहिली जाते.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या भागात राष्ट्रद्रोहाची बीजे पेरली हे खरे असले तरीही काही गोष्टींबाबत ते निःसंशय गौरवास पात्र आहेत. ज्या भागात आजही रेल्वे नाही, जिथले रस्त्यांचे जाळे आजही अत्यंत दयनीय अवस्थेत आहे, जिथे अंधश्रद्धा आणि अज्ञानापायी अत्यंत क्रूर रूढी अस्तित्वात होत्या, जिथे आज स्वातंत्र्यानंतर ५० वर्षांनीही आपल्यासारख्या देशवासियांनासुद्धा भाषेची अडचण आडवी येते, तिथे हे मिशनरी दीडशे वर्षांपूर्वी कसे गेले असतील, त्यांनी तिथे कसा जम बसवला असेल, या मातीला अगदी परका असलेला एक धर्म या मातीत कसा रुजवला असेल, या आदिम जमातींच्या बोली ते कशा शिकले असतील, त्या बोलींना त्यांनी रोमन लिपीचे लेणे कसे चढवले असेल- याचा विचार केला तरी थक्क व्हायला होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज मिझोरामची ८९ टक्के जनता ख्रिस्ती झाली आहे. मिझोराममध्ये प्रामुख्याने कार्यरत होती ती बाप्तिस्ट चर्च ऑफ मिझोराम ही ब्रिटिश संघटना. एकीकडे या आदिम जमातींच्या हक्क रक्षणासाठी, त्यांची संस्कृती अबाधित राखण्यासाठी आणि या भागातले इतरांचे अतिक्रमण रोखण्यासाठी ब्रिटिश सरकारने या लुशाई टेकड्यांनाही

नागालँड आणि अरुणाचलच्या बरोबरीने इनर लाईन परमिट लागू केले होते. त्यामुळे या भागाचे बऱ्याच प्रमाणात संरक्षण झाले हे खरे असले तरी त्यामुळे या भागाचा बाह्यजगाशी नगण्य संबंध आला- दुसरीकडे सेवा आणि शिक्षणासाठी या भागात उतरलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांचे काम सरकारी वरदहस्ताखाली निर्धोकपणे चालू होते, आणि तिसरी गोष्ट म्हणजे अन्य प्रांतातून पूर्वांचलात आलेल्या ब्राह्मणांनी सुरमा व इंफाळच्या खोऱ्यात रामायण - महाभारताचा वारसा रुजवून तिथल्या मागास जमातींना त्यांच्या देवांसकट हिंदुधर्मात ओढले असले तरी दुर्गमतेमुळे टेकड्यांच्या परिसरात ते पोहोचलेच नाहीत. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या उर्वरित भारतापासून वेगळे राहिलेले हे लोक सतत ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली राहिले. भारतापासून स्वत:ला वेगळेच समजत राहिले. त्यामुळेच स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी त्यांना ब्रिटिश साम्राज्याची एखादी वसाहत बनणे मंजूर होते, पण स्वतंत्र भारताचा एक भाग बनणे मंजूर नव्हते. त्यामुळेच तिथे लालडेंगाच्या नेतृत्वाखाली मोठे राष्ट्रविरोधी आंदोलन उभे राहिले.

शाही वसाहत बनणे अशक्य आहे असे लक्षात आल्यावर मिझोंनी भारतात सामील होण्याऐवजी ब्रह्मदेशात सामील होण्याचा पर्याय स्वीकारला. पण मिझो युनियन या संघटनेने मात्र भारतात सामील होण्याचे मान्य केले आणि तेव्हाच्या विशाल आसाममधील काँग्रेसबरोबर कामही केले. पुढे १९५८ मध्ये आसाममधील सरकार बदलले. नव्या सरकारने मिझो युनियनमधून फुटून निघालेल्या लालडेंगाच्या मिझो नॅशनल फ्रंटला पाठिंबा दिला. १९६१ मध्ये मिझो युनियन पुन्हा फुटली आणि मिझो हिल्स डिस्ट्रिक्ट कमिटी स्थापन झाली. काँग्रेसने उघड - उघड या फुटीर शक्तींना पाठिंबा देऊन स्वत:चे राजकारण पुढे रेटायचा प्रयत्न केले. पण त्याला फार भयानक फळे आली.

१९६५ मध्ये मिझो नॅशनल फ्रंटने भारत, पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश) व ब्रह्मदेशातील मिझो वसाहतींचा सर्व भाग एकत्र करून स्वतंत्र मिझोराम देशाची मागणी केली. मिझो युनियनला देशापासून फुटून निघणे मान्य नव्हते. लालडेंगाच्या स्वतंत्र मिझोरामच्या घोषणेला शह देण्यासाठी मिझो युनियनने मिझोंसाठी भारतातच एक स्वतंत्र राज्य बनविण्याची मागणी केली. त्या मागणीसाठी त्यांनी १९६६ मध्ये हिंसाचाराचाही आश्रय घेतला. एकीकडे मिझो नॅशनल फ्रंटने स्वतंत्र, सार्वभौम मिझोरामसाठी रक्तरंजित संघर्ष चालवला होता तर दुसरीकडे स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी मिझो युनियनने हिंसाचाराचा मार्ग अवलंबला होता. हा हिंसाचार रोखण्यासाठी लष्करी कारवाई अपरिहार्य होती. प्रशासकीय, राजकीय दिलासाही अपरिहार्य होता. लुशाई हिल्स डिस्ट्रिक्ट कौन्सिलच्या रूपाने तो दिला गेला आणि लष्करी कारवाईचा फटका बसला तरी मिझो युनियनच पुन्हा कौन्सिलमध्ये सत्तारूढ झाली. मिझो नॅशनल फ्रंटलाही काही काळ गप्प बसावे लागले पण जानेवारी १९७५ मध्ये त्यांनी आत्ताच्या मिझोरामची

राजधानी असलेल्या ऐझॉलमध्येच तीन वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची हत्या घडवून आपले अस्तित्व दाखवून दिले. लालडेंगाच्या मिझो नॅशनल फ्रंटने मिझोराममध्ये जवळ-जवळ समांतर सरकार चालवले होते. सर्व गैर मिझोंनी ताबडतोब मिझोराम सोडून जावे असे इशारे देणेही सुरू केले होते. दरम्यान १९७४ मध्ये मिझो युनियन काँग्रेसमध्ये विलीन झाली आणि एकीकडे मिझो युनियनशी वैर व काँग्रेसशी सख्य असणारा लालडेंगा भलताच अडचणीत आला. या नव्या काँग्रेसशी जमवून घेणे त्याला जमेना. त्याने दिल्लीत जाऊन काँग्रेसबरोबर शरणागतीच्या वाटाघाटी सुरू केल्या. तसा कराराही केला. त्यामुळे मिझोराममध्ये काही काळ शांततेचे वातावरण राहिले. इंदिरा गांधींनी १९८१ मध्ये पुन्हा पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर लाल डेंगाविरुद्धचे खटले मागे घेऊन दहशतवाद विरोधी मोहीमही थांबवली, पण त्याचा उलटाच परिणाम झाला. मिझोरामला पुन्हा हिंसाचाराने वेढले. मुजोर लालडेंगाने ब्रिगेडीयर सायलोंच्या नेतृत्वाखाली राज्यात सत्तारूढ असलेल्या पीपल्स कॉन्फरन्स सरकारच्या हकालपट्टीची पूर्व अट शांततेसाठी घालून 'बार्गेनिंग' सुरू केले. अखेर इंदिरा गांधींना लालडेंगाला देशाबाहेर काढावे लागले, मिझो नॅशनल फ्रंटवर बंदी घालावी लागली आणि राज्यात दहशतवादविरोधी मोहीम पुन्हा सुरू करावी लागली.

त्यामुळेच आज मिझोराम शांत असले तरी ती शांतता कायमस्वरूपी आहे असे विधान करता येत नाही, कारण आजही तिथे अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. मिझोराममध्ये मोठ्या संख्येने असलेल्या गैरमिझो (त्यांना 'मायांग' म्हणतात) व परदेशी घुसखोरांच्या विरुद्ध आजही तिथे लोक प्रक्षुब्ध आहेत. त्यांच्याविरुद्ध तिथे सतत आंदोलनेही चालू असतात.

तिथल्या हमार जमातीची हमार पीपल्स कन्व्हेन्शन ही एक दहशतवादी संघटना आहे. त्यांचा हिंसाचार रोखण्यासाठी १९९४ मध्ये मिझोराम सरकारने त्यांच्याशी एक करार केला- या करारान्वये त्यांनी शस्त्रत्याग करायचा होता. त्या शरण आलेल्या अतिरेक्यांना सरकार पुनर्वसनासाठी तीस-तीस हजार रुपये देऊन हमार जमातीसाठी सिंगलुंग हिल्स डेव्हलपमेंट कौन्सिल स्थापन करणार होते. मात्र या कराराची अंमलबजावणी झाली नाही. तीनशे अतिरेक्यांनी शस्त्रे खाली ठेवली पण त्यांना पैसे दिले गेले नाहीत आणि डिस्ट्रिक्ट कौन्सिलच्या सीमांबाबत सरकार व हमार पीपल्स कन्व्हेन्शन यांच्यात एकवाक्यता होऊ शकत नसल्याने ती अस्तित्वातच येऊ शकली नाही. आता दोन्हीकडून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी चालू आहेत. सरकारने विश्वासघात केला असा हमार पीपल्स कन्व्हेन्शनचा आरोप आहे तर 'या संघटनेने फक्त गावठी हत्यारे सरकारच्या स्वाधीन केली आणि लाईट मशीनगन्स, एके-४७ आदि शस्त्रे मणिपूर-मिझोराम सीमेवर कुठे तरी दडवून ठेवली आहेत' आणि शरणागत अतिरेक्यांना वाटण्यासाठी सरकारने जे प्रत्येकी ३० हजार रुपये वाटले ते या संघटनेचा नेता मिंगचुंगनुंग

(Hmingchungnung) याने मधल्यामध्ये ढापले आणि त्या अतिरेक्यांना फक्त ५ ते १० हजार रुपयेच वाटले,' असे आरोप सरकारतर्फे केले जात आहेत. याचा अर्थ उघड आहे. मिझोराममधली शांतता तत्कालिक आहे.

काय मजा असते पहा. 'लॉम्नगायना' म्हणजे 'स्वार्थत्याग' हा मिझो जीवनाचा आदर्श आहे. याच जीवन तत्वज्ञानाच्या आधारावर इथल्या पिढ्यान्‌पिढ्या आपली वाटचाल करत आल्या. आणि त्याच तत्वज्ञानाला मूठमाती देऊन या भूमीत स्वातंत्र्योत्तर काळात स्वार्थी राजकारण बहरले. त्याचे पर्यावसान हिंसाचारात झाले, रक्तपातात झाले, आधीच मागास असलेला प्रांत आणखी आर्थिक विपन्नावस्थेत ढकलण्यात झाले. फायदा काही मूठभर लोकांचा झाला पण दुर्दैव सगळ्या समाजाच्या माथी आले.

मिझोरामध्ये फिरताना तिथली गरिबी, तिथली विपन्नावस्था, तिथला मागासलेपणा आदि दुर्दैवाचे दशावतार मन विषण्ण करतात आणि निसर्ग सौंदर्याचा खजिना असलेले हे राज्य या अवस्थेत राहावे, पर्यटकांपासून दुर्लक्षित राहावे हे मनाला खटकत राहते.

मिझोराममध्ये रेल्वे पोहोचलेली नाही. मिझोरामला स्वत:चा असा विमानतळही नाही. त्यामुळे मिझोरामला जायचे असल्यास आसाममधून वा त्रिपुरा किंवा मणिपूरमधून जावे लागते. आसामहून मिझोरामला जायचे झाल्यास तीन पर्याय आहेत. गुवाहाटी किंवा कलकत्त्याहूनच विमानाने आसाममधल्याच सिल्चर पर्यंत जायचे आणि मग सिल्चरहून रस्तामार्गे ऐझॉलला पोहोचायचे. दुसरा जरा कमी खर्चाचा पर्याय आहे तो असा की गुवाहाटीहून रेल्वेने सिल्चरला जायचे आणि मग पुढे सिल्चर-ऐझॉल हे अंतर रस्त्याने कापायचे. तिसरा अत्यंत तापदायक आणि वेळखाऊ मार्ग आहे तो गुवाहाटीहून थेट बसने ऐझॉल गाठायचे. या तिसऱ्या पर्यायात बदलाबदलीची कटकट नसली तरी गुवाहाटी-ऐझॉल हे अंतर सिल्चरमार्गे ५०६ कि.मी. इतके प्रचंड आहे. शिवाय तिथल्या रस्त्यांची खराब अवस्था, घाट रस्ते आणि दहशतवाद्यांनी मार्ग अडवल्यास होणारी कोंडी हे घटक लक्षात घेतले तर हे अंतर कापायला कितीही दिवस लागू शकतात. तसे ऐझॉल हे राष्ट्रीय महामार्ग क्र.५ ने केवळ आसामलाच नव्हे तर सर्वच पूर्वांचलाला जोडले गेले आहे. त्यामुळे ऐझॉलला जायचे झाल्यास गुवाहाटीहून जाण्याऐवजी मणिपूरमधील इंफाळहून जाणे सोयीचे पडते. हे अंतर त्यातल्या त्यात कमी म्हणजे तरी ३७४ कि.मी. इतके आहे आणि हाच त्यातल्या त्यात सोयीचा पर्याय आहे.

ऐझॉल हे पूर्वांचलातील अन्य मोठ्या शहरांप्रमाणेच परंपरा आणि आधुनिकता जिथे हातात हात घालून फिरताना दिसतात असं एक शहर आहे. जुन्या पद्धतीच्या घरांप्रमाणेच तिथे ब्रिटिश थाटाच्या सरकारी इमारती आणि मंत्र्यांचे बंगले आपले लक्ष वेधून घेतात. या चित्रासारख्या सुंदर शहरात आता पर्यटकांच्या सोयींसाठी पर्यटन विभागाच्या विश्रामगृहांबरोबरच काही बऱ्यापैकी खाजगी हॉटेल्सही उभी राहू लागली

आहेत. तिथे पर्यटकांचा फारसा ओघ नसल्याने आधी बुकींग न करताही जागा मिळू शकते. ऐझॉलला जाण्यापूर्वी एका गोष्टीची मात्र खबरदारी घेणे आवश्यक आहे. मिझोरामला 'इनर लाईन परमिट' पद्धत लागू असल्याने आपल्यासारख्या भारतीय प्रवाशांनाही तिथे जाण्यापूर्वी परमिट काढावे लागते. नाही तर मिझोरामच्या सीमेवरून परत फिरण्याची वेळ येऊ शकते. हे परमिट कलकत्ता, गुवाहाटी किंवा सिल्चरला काढले जाऊ शकते आणि ते एका दिवसात मिळू शकते.

खुद्द ऐझॉलमध्ये बघण्यासारखे खूप आहे आणि ऐझॉलच्या आसपासही मिझोराम म्हणजे टेकडयांचा प्रदेश असल्याने आणि त्रिपुराप्रमाणेच इथेही घनदाट जंगल असल्याने निसर्गाचे चमत्कार पावलोपावली दिसतात. त्यांना जोड असते ती या लोकांच्या कारागिरीची, हस्तकौशल्याची. ते बघूनच मुग्ध व्हायला होते. ऐझॉलमधल्या मिझोराम स्टेट म्युझियममध्ये या कारागिरीचे असंख्य दुर्मिळ नमुने पाहायला मिळतात आणि या राज्याच्या कलावैभवाची साक्ष पटते. तर डिस्ट्रिक्ट कमिशनरच्या कार्यालयाजवळ असलेल्या दिगंडी आर्ट गॅलरीमध्ये मिझोरामच्या कलावस्तूंचा सर्वात मोठा खजिना पाहायला मिळतो. त्यात चित्रकारी जशी आहे तसेच शिल्पकलेचे नमुनेही आहेत. माणसांच्या कलाविष्कारापासून जरा दूर जाऊन या सृष्टीच्या निर्मात्याचा कलाविष्कार बघायचा असेल तर ऐझॉलच्या उत्तर भागात असलेल्या उर्टलांग हिल्स परिसरात फेरफटका मारायला हवा. गर्द झाडीने वेढलेली, कधी धुक्यात, पांढऱ्या शुभ्र अभ्रांत लपेटली गेलेली वाट तिथे घेऊन जाते. बाजूला नाना तऱ्हांची फुले फुललेली असतात आणि त्या ठिकाणी पोहोचल्यावर हिरव्यागार दऱ्या आपली नजर बांधून ठेवतात. बडा बाजार हे ऐझॉलमधले आणखी एक आकर्षण स्थळ. पूर्वांचलात अनेक ठिकाणी असे 'बडा बाजार' असतात. फक्त प्रत्येकाचे वैशिष्ट्य, तिथे मिळणाऱ्या चिजा वेगवेगळ्या असतात. ऐझॉलमधल्या बडा बाजारात दैनंदिन वापराच्या वस्तूंबरोबरच स्थानिक कलाकारांनी बनवलेल्या असंख्य कलावस्तूही विकत मिळतात. इथल्या हस्तकला वस्तूंत मुख्य असतात त्या बांबूपासून बनवलेल्या वस्तू. बांबूच्या हॅटस्पासून ते फर्निचरपर्यंत असंख्य देखण्या वस्तू अत्यंत माफक दरात इथे मिळू शकतात. इथे हातमाग उद्योगही बऱ्याच प्रमाणात चालतो. जवळजवळ प्रत्येक घरात हातमाग असतो आणि इथल्या स्त्रिया त्यावर त्यांची दैनंदिन वापराची वस्त्रे तर विणतातच पण अतिशय सुंदर 'टिपिकल मिझो' शालीही बनवतात. त्या शालीही माफक दरात इथे मिळू शकतात. पण बडा बाजार हा इथला एकमेव बाजार नाही. इथे आणखीही लहान - मोठी मार्केटस् आहेत. न्यू मार्केट, रिटझ् मार्केट, बाझार बंगकॉन, ठाकथिंग बाजार, बर्मा लेन आणि सॉलोमन्स केव्ह ही त्यांपैकीच काही. या बाजारांतूनही बडा बाजारप्रमाणेच वस्तू मिळतात पण ब्रह्मदेशची सीमा जवळ असल्याने इंफाळप्रमाणेच इथे जॅकेटस्, जिन्स व इलेक्ट्रॉनिक वस्तूही मिळू शकतात.

इथे एक लहान प्राणिसंग्रहालयही आहे. ते गुवाहाटीच्या प्राणी संग्रहालयाइतके मोठे नसले तरी तिथे असंख्य वैविध्यपूर्ण प्राणी - पक्षी बघायला मिळतात.

ऐझॉलपासून अवघ्या १५ कि.मी. वर असलेले बंग हे एका टेकडीवरचे पर्यटनस्थळही सुरेख आहे. तिथून तसेच ऐझॉलपासून १६ कि.मी. वर असलेल्या पायरवाई या शांत पण सुंदर पिकनिक स्पॉटवरून निसर्गाचे इतके सुंदर आविष्कार दिसतात की थक्क व्हायला होते. तिथे आपण पूर्ण दिवसही काढू शकतो इतके ते सुंदररीत्या विकसित करण्यात आले आहे.

घनदाट जंगलात असलेल्या लुंगकी या गावी गेल्याशिवाय तर मिझोरामची भटकंती पूर्णच होऊ शकणार नाही. मोठमोठ्या झाडांच्या भाऊगर्दीतून मावळतीला जाणारा, आपला निरोप घेणारा सूर्य पाहायचा असेल, निसर्गाची ताजी, सुगंधित हवा रंध्रा - रंध्रात भरून घ्यायची असेल, पक्ष्यांचे गोड कूजन ऐकायचे असेल तर लुंगकीला जायलाच हवे. लुंगकीला जाताना वाटेत सरच्छिप नावाचे खेडे लागते. इथे अनेक पारंपारिक वस्तू, हस्तकलांचे नमुने मिळतात स्थानिक भाजीपाला-फळे यांचा आस्वाद घेता येतो. त्यामुळे लुंगकीला जाताना सरच्छिपचा स्टॉप ठरलेलाच असतो.

मिझोराम हा पहाडांचा प्रदेश असल्याने तिथे अनेक नैसर्गिक तळीही आहेत. ऐझॉलपासून ६० कि.मी. वर असलेले तामदिल हे त्यापैकीच एक तळे. आजूबाजूंनी घनदाट जंगलांनी वेढलेल्या या तळ्यापाशी गेल्यावर तिथले ते शांत वातावरण आपल्याला इतके भारून टाकते की तिथून निघावेसेच वाटत नाही. तिथे बोटिंगचीही सोय आहे.

या नैसर्गिक तलावाइतकीच सुंदर, खिळवून ठेवणारी जागा म्हणजे वाँटाँग. ऐझॉलपासून १३७ कि.मी. वर असलेला हा धबधबा म्हणजे मिझोराममधला सर्वांत मोठा धबधबा आहे. मेघालयातील एलिफंट फॉल्सप्रमाणेच गर्द झाडीने वेढलेला, ती हिरवाई आपल्या निर्मळ जलात साठवून घेणारा, प्रतिबिंबित करणारा हा फेनशुभ्र धबधबा म्हणजे मिझोरामचे भूषण आहे. मिझोराममधल्या थेनझॉल या थंड हवेच्या ठिकाणापासून तो अवघ्या ५ कि.मी. वर आहे. त्यामुळे थेनझॉनला मुक्काम करून वाँटाँगला सहज जाता येते.

मिझोरामची सीमा ब्रह्मदेशाला लागून आहे हे वर आलेच आहे. मिझोरामच्या भूमीवरून ब्रह्मदेशच्या पर्वतराजींचे नेत्रसुखद दर्शन घ्यायचे असेल तर ऐझॉलपासून २०४ कि.मी. वरील चांफाईला जायला हवे. उपविभागीय मुख्यालयाचे ठिकाण असलेले चांफाई हे सीमेवरचे गाव असल्याने तिथे बंदोबस्त खूप असतो. त्या बंदोबस्ताचा, लष्करी, पोलिसी तपासण्यांचा थोडा त्रास होऊ शकतो, पण एक वेगळा अनुभव म्हणून तोही घ्यायला हरकत नाही.

जे अभयारण्यांचे शौकिन आहेत, ज्यांना प्राणी जीवन न्याहाळायला आवडते त्यांच्यासाठी एक आकर्षणस्थळ म्हणजे मिझो टेकड्यांच्या परिसरात वसलेले डांपा

अभयारण्य. हे फायलेंग या शहरापासून १० कि.मी. वर आहे आणि तिथे जाण्यासाठी ऐझॉलहूनही खाजगी, सरकारी बसेस मिळू शकतात. १९७६ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या अभयारण्यात एक पंचमांश जंगल बांबूचे आहे, तर उर्वरित सदाहरित वृक्षांचे. या अभयारण्यात हरणे, हत्ती, हिलॉक गिबन, वाघ असे विविध प्राणी बघायला मिळतात. तिथे राहण्यासाठी सरकारी विश्रामगृह आहे. त्याचे बुकिंग मात्र आधी करावे लागते.

मिझोरामच्या पर्यटन स्थळांइतकीच तेथील लोकांची घरे, त्यांचे जीवनही अभ्यासण्यासारखे असते. त्यांच्यात अडाणीपणामुळे अनेक चित्रविचित्र प्रथा होत्या पण ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शिकवणुकीमुळे त्या दूर झाल्या. ते चौकोनी आकाराची, बांबूच्या भिंतींची व गवताने, पानांनी शाकारलेल्या छपरांची घरे बांधतात. त्या घरांची जमीनही घट्ट विणीच्या बांबूच्या चटयांची असते. आणि प्रत्येक घराला गच्ची असते. चूल घराच्या बरोबर मध्यभागी असते. त्या चुलीच्या एका बाजूला आई - वडील तर दुसऱ्या बाजूला मुले असे झोपतात. घराला खोल्याच नसतात. पूर्वी खिडक्याही करायचे नाहीत. खिडक्या नसलेली काही घरे अजूनही ग्रामीण भागात आढळून येतात. खिडक्या न करण्याचे कारण असे होते की काही विशिष्ट धार्मिक विधी केल्याशिवाय घराला खिडक्या केल्या तर संकटे येतात अशी त्यांची समजूत होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ती दूर केल्यावर आता ते लोक घरांना खिडक्या करायला लागले आहेत.

पूर्वी हे लोक भुताखेतांच्या पूजा करीत. त्यांच्या लेखी भुतांचे चांगले आणि वाईट असे दोन प्रकार असतात. त्यापैकी सर्वोच्च भुताला ते पथिअन असे म्हणतात, त्याने ही सृष्टी निर्माण केली असा या लोकांचा समज होता. माणूस मेल्यानंतर त्याचा आत्मा त्याच्या डोक्यातून निघून ब्रह्मदेशातील कचिन टेकड्यांच्या परिसरात असलेल्या रिह नावाच्या तळ्यात राहायला जातो पण तिथून तो लगेच परततो आणि तीन महिन्यांपर्यंत आपल्या मूळ घराच्या आसपास राहतो अशीही त्यांची समजूत होती. केवळ मिझोराममधलेच नाही तर संपूर्ण पूर्वांचलातले आदिवासीच आत्म्याचे अस्तित्व मानतात. पण आत्म्याविषयीच्या त्यांच्या समजुती मात्र वेगवेगळ्या आहेत. मिझोराममधल्या लाखेर जमातीचे लोक आत्मा हा त्या - त्या माणसाच्या शरीराइतकाच मोठा व त्याच्यासारखाच दिसणारा असतो असा मानतात. मणिपूर आणि नागालँडमधल्या नागा जमातींतही अशीच समजूत प्रचलित आहे. सेमा नागांची समजूत मात्र जरा वेगळी आहे. त्यांच्या मते आत्मा म्हणजे शरीराचे प्रतिबिंब असते. काही जमातींच्या मते एका शरीरात एकच आत्मा नसतो तर असंख्य आत्मे असतात. तर एओ नागांच्या मते प्रत्येक माणसाचा एकेक अध्यात्मिक प्रतिनिधी ( जीव ) आकाशात वसत असतो. त्याला ते 'टिया' असे म्हणतात. आपण ज्याला नशीब वा दैव मानतो त्यासारखीच साधारण ही कल्पना आहे. या अध्यात्मिक जीवाव्यतिरिक्त त्या माणसाचे तीन - तीन

असे आणखी सहा आत्मे असतात. त्यांपैकी तीन जमिनीवर तर तीन आकाशात राहतात. या तीन आत्म्यांपैकी एक दैवाच्या अधीन असतो, दुसरा जेव्हा - जेव्हा तो माणूस घरातून बाहेर पडतो तेव्हा - तेव्हा त्याची संगत करतो, तर तिसरा कायम घरात राहतो असा त्यांचा समज आहे.

मृत्यूनंतर माणसाचे काय होते या विषयीच्या त्यांच्या समजुतीही अशाच भन्नाट आहेत. मृत्यूनंतर आत्मा आकाशातील मृतांच्या प्रदेशात जातो आणि तिथले जीवन पृथ्वीवरील जीवनासारखेच असते. त्या माणसाचे पुढल्या जन्मीसुद्धा आदल्या जन्मातल्या बायकोशीच लग्न होते आणि त्यांना पुढच्या जन्मीही आदल्या जन्मीचीच मुले होतात असाही त्यांचा समज आहे. पुढचे जीवन चांगले जावे यासाठी या जन्मी चांगले कृत्य करा, परोपकार करा अशा समजुती आपल्याकडल्याप्रमाणे तिकडे नाहीत. या जन्मातले पाप वा पुण्य हे पुढल्या जन्मातले जीवन चांगले मिळावे यासाठी काही भूमिका बजावते हे त्यांना मान्य नाही. त्यांच्या मते मृत्यू कसा झाला आणि त्या देहाचे अंतिम संस्कार कसे केले यावर पुढचा जन्म अवलंबून असतो. त्यामुळे खून वा अपघात यांसारख्या हिंसक पद्धतीने आलेला मृत्यू अशुभ मानला जातो.

मिझोराममधल्या असंख्य जमातींच्या मते या अखिल जगाचे भवितव्य एकाच देवाच्या हातात आहे आणि तो देव म्हणजे 'खाझांग्पा'. या देवतेच्या पूजेप्रमाणेच आपल्या मृत पूर्वजांची पूजा करायची पद्धतही खासी, जैंतिया, नागा जमातींप्रमाणे मिझोराममधील लाखेर व अन्य जमातींमध्ये पूर्वी होती. आता मात्र मिझोराम, नागालँडमधल्या बहुतांश जमातींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असल्याने या भाबड्या समजुती पूर्णांशाने जरी नाही तरी बऱ्याच प्रमाणात कमी झाल्या आहेत. ख्रिश्चन धर्म स्वीकारला तरी त्यांची जीवनपद्धती मात्र बदललेली नाही. ती पूर्वीप्रमाणे मातृसत्ताकच राहिली आहे. लग्नाच्या वेळी मुला - मुलींनी एकमेकांना पसंत केल्यानंतर मुलाच्या आई - वडिलांना मुलीकडे विवाहाचा प्रस्ताव घेऊन यावे लागते. हुंडा - ज्याला ते 'देज' असे म्हणतात तो मुलाकडच्यांना मुलीच्या पित्याला द्यावा लागतो. त्यातली काही रक्कम वधुपिता आपल्या जवळच्या नातेवाईकांना वाटतो. मुलीवर विवाहोत्तर काळात काही संकट आले तर त्यांनी तिच्या पाठीशी उभे राहावे हा विचार त्यामागे असतो. संपत्तीचा वारसा मात्र मुलीकडे नव्हे तर सर्वांत धाकट्या मुलाकडे जातो.

या लोकांच्या भाबड्या समजुती, जीवनपद्धती, वेषभूषा पाहिली की मनात विचार येतो, ते आपले देशबांधव आहेत पण सांस्कृतिकदृष्ट्या आपण त्यांच्यापेक्षा किती वेगळे आहोत? हे अंतर कमी करण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय माध्यमांतून प्रयत्न होणे अत्यंत आहे. पण त्याची फिकीर कोणाला आहे?

लुंगकीचा अप्रतिम सूर्यास्त बघताना हेच विचार पुन:पुन्हा मनात येत होते.

# १ / रवींद्रनाथांचा आवडता प्रदेश – त्रिपुरा

'त्रिपुरातल्या जंगलांनी दक्षिणेच्या वाऱ्याबरोबर मला तिथल्या बहारदार, प्रफुल्लित फुलांच्या सुगंधी मेजवानीसाठी निमंत्रण पाठवलं आणि मी त्यांचा मित्र म्हणून लगेच निघून आलो...' असे गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांनी लिहिले आहे.

साक्षात गुरुवर्य टागोरांशी असे मैत्रीचे घनिष्ट नाते प्रस्थापित करणारा, ते रवींद्रनाथांच्या अंतापर्यंत निभावणारा, त्यांच्या काव्यांना प्रेरणा देणारा ईशान्य भारतातला एक छोटासा, सुंदर प्रांत म्हणजे त्रिपुरा. आपल्या देशाचा व विशेष करून पूर्वांचलाचा नकाशा बघितला तर आपल्या लक्षात येईल की त्रिपुरा हा भारतातल्या दोन चिमुकल्या राज्यांपैकी एक आहे. उत्तर, दक्षिण, पश्चिम व अग्नेयेकडून बांगलादेशाशी संबंध असलेले हे भौगोलिकदृष्ट्या एक अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. त्याच्या स्थानवैशिष्ट्यामुळे तिथे पोहोचणे अत्यंत अवघड आहे.

आजही अर्ध्याहून अधिक भाग जंगलांनी व्यापलेल्या अशा या १०,५०० चौ.कि.मी. च्या भूभागात पाय ठेवायचा म्हटले तर अनेक अडचणींशी सामना करावा लागतो. त्रिपुरात रेल्वेमार्ग आहे तो फक्त ४५ कि.मी. लांबीचा आणि तोही मिटरगेज. त्यामुळे रेल्वेने त्रिपुराला जायचे झाल्यास त्रिपुराची राजधानी असलेल्या आगरतळापासून १६० कि.मी. वर असलेल्या कुमारघाट या शेवटच्या रेल्वेस्थानकावर उतरून पुढे बसने जावे लागते. हे कुमारघाट स्थानक लुमडिंगमार्गे गुवाहाटीला जोडले गेलेले आहे. जर मुंबईहून थेट आगरतळाला जायचे असेल तर धरमनगर या रेल्वेस्थानकावर उतरणे सोयीचे पडते. तिथे उतरून थेट आगरतळ्यासाठी बस मिळू शकते. मात्र हे धरमनगरही आगरतळ्यापासून २०० कि.मी. वर आहे. पूर्वांचलातील अन्य राज्यांच्या राजधान्यांशीही आगरतळा रस्त्याने जोडले गेले आहे, या राज्यांशी आगरतळ्याला जोडणारा जो एकमेव दुवा आहे तो राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ हा एकपदरी आहे.

त्यामुळे 'ट्रॅफिक जॅम' वगैरेचा त्रास होतो, शिवाय तिथे उत्पात माजविणाऱ्या जवळपास पाच हजार अतिरेक्यांनी जर या महामार्गाची नाकेबंदी करायची ठरवली तर अनिश्चित काळपर्यंची प्रतीक्षा व कमालीचे ताणतणाव यांचाही सामना करावा लागतो. हा 'सुहाना सफर' मग 'सुहाना' राहातच नाही. कुठून दुर्बुद्धी सुचली आणि या वाटेला आलो, असे वाटायला लागते. हे सगळे टाळायचे असेल तर त्रिपुराला जाण्याचा थेट आणि सर्वांत सोपा मार्ग म्हणजे सरळ कलकत्त्याहून आगरतळ्याला जाणारे विमान पकडायचे की अवघ्या ४० मिनिटांत तुम्ही त्रिपुराच्या निसर्गसुंदर भूमीवर असता. पूर्वांचलातल्या अन्य राज्यांतून वा कलकत्त्याहून रेल्वे, बसमार्गे आगरतळ्याला जायचे तर अनैसर्गिक असे काही तुमच्या वाटेत आडवे आले नाही तरीही किमान तीन दिवस लागतातच. पुन्हा प्रवासाचे श्रम, पैसे, प्रवासात खाण्या-पिण्यावर खर्च होणारे पैसे ह्रा सगळा हिशेब केला तर ना पैसे फारसे वाचतात ना वेळ. त्यापेक्षा विमान प्रवास परवडतो कारण तो तुमचे श्रमही वाचवतो आणि रजेचे बहुमूल्य दिवसही. कलकत्ता-आगरतळा विमानप्रवासाचे भाडे माणशी साडेबाराशे रुपये आहे.

एकोणिसाव्या शतकात आगरतळा ही तिथल्या राज्यकर्त्या माणिक्य राजघराण्याची राजधानी बनली आणि आगरतळा एकदम प्रकाशात आले. बांगलादेशच्या सीमेपासून अवघ्या काही किलोमिटर्सवर असलेल्या आगरतळ्यामध्ये बघण्यासारखे बरेच काही आहे. त्रिपुरा या छोट्याशा राज्यावर दोन हजार वर्षांहून अधिक काळ एकछत्री अंमल गाजविणाऱ्या माणिक्य राजवंशाने बांधलेले अप्रतिम, भव्य असे राजवाडे आहेत, बुद्ध-विहार आहे, मंदिरे आहेत आणि आगरतळ्याच्या बाहेर पडून आसपासच्या परिसरात भटकायचे म्हटले तर मग सुंदर स्थळांचा, अप्रतिम शिल्पांचा खजिनाच तुमच्या हाती लागू शकतो. आवश्यकता असते ती फक्त शहरी सुखांचा, आलिशान राहणीचा त्याग करण्याची – कारण त्रिपुरा निसर्गसौंदर्याने, शिल्पसमृद्धीने कितीही संपन्न असले तरी आर्थिकदृष्ट्या अतिशय गरीब राज्य आहे. पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर सामावून घेता येईल इतक्या सुखसुविधा तिथे नाहीत. त्यामुळे आलिशान हॉटेल्स, मनपसंत– चवीढवीचे अन्न आणि या साऱ्या 'एन्जॉयमेंट' मध्ये एक भर म्हणून पर्यटन असा दृष्टिकोन ठेवून जर त्रिपुरात जायचे म्हटले तर निराशाच पदरी येण्याची शक्यता अधिक आहे. पण अस्सल भटके म्हणून निसर्गाचे साक्षात्कार अनुभवायची, कित्येक शतकांपूर्वी समृद्ध स्थितीत आलेल्या संस्कृतीची ओळख करून घ्यायची ओढ बाळगून जर त्रिपुराच्या भूमीवर पाय ठेवला तर खूप काही हाती गवसण्याची शक्यता आहे.

या सौंदर्य सफरीला आगरतळ्यापासूनच सुरुवात करायची म्हटले तर प्रथम आपले लक्ष वेधून घेतो तो अतिभव्य असा उज्जयंता राजवाडा. महाराजा कृष्ण किशोर माणिक्य बहादूर यांनी १८८९ मध्ये या अतिभव्य राजवाड्याचे बांधकाम सुरू करवले

आणि ते पूर्ण व्हायला तब्बल एक तप जावे लागले. १९०१ साली ते बांधकाम पूर्ण झाले. अतिशय भव्य असा ८६ फुटी घुमट, एक भव्य प्रवेशद्वार, भरपूर कारंजी, सुंदर कोरीवकाम केलेले दरवाजे, लोखंडी लँप स्टँडस् आणि रंगीबेरंगी काचांचा अतिशय नजाकतीने केलेला वापर अशी ही आकर्षक वास्तू बघताक्षणी आपली नजर बांधून ठेवते. गर्दीने गजबजलेल्या, गरीब, अस्वच्छ आगरतळ्याला भव्यतेचे एक विलक्षण परिमाण देते. या वास्तूतच आता राज्य विधिमंडळ भरते. काही सरकारी कार्यालयेही तिथे आहेत, आणि सरकारी कार्यालये आली की काय होते हे आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे. त्यामुळे या भव्य राजवाड्याचेही सौंदर्य आज थोडे फार हिरावून घेतले गेले आहे. पण तरीही त्याचे मूळचे सौंदर्य काही लपत नाही.

या राजवाड्याप्रमाणेच सुंदर, भव्य असलेल्या आगरतळातल्या 'कुंजबन' या दुसऱ्या राजवाड्यात आज राज्यपालांचे निवासस्थान आहे. म्हणजे कुंजबन हे आता राजभवन झाले आहे. महाराजा बीरेंद्र किशोर माणिक्य बहादूर यांनी १९१७ साली हा राजवाडा बांधला. रवींद्रनाथ टागोर हे त्यांच्या सात त्रिपुरा दौऱ्यांत याच राजवाड्यात राहिले होते. १९२६ मध्ये झालेल्या त्यांच्या शेवटच्या त्रिपुराभेटीचा साक्षीदार होण्याचे भाग्यही याच राजवाड्याला लाभले आहे.

त्रिपुराच्या माणिक्य राजघराण्याशी रवींद्रनाथांचा स्नेह त्यांच्या तारुण्यातच जुळला. त्रिपुराच्या दूरगामीपणामुळे तिथे इतर प्रांतांतील लोकांचे येणे - जाणे कमी होते. त्यामुळे तिथल्या माणिक्य राजवंशाने अन्य प्रांतांतील ब्राह्मणांना, कवींना, लेखकांना, शिल्पकारांना उदार आश्रय दिला होता. त्याची साक्ष आजही त्रिपुरात फिरताना मिळते. या अशाच सांस्कृतिक देवाण - घेवाणीच्या प्रयत्नांत बंगालचे तरुण व त्यावेळी फारसे प्रसिद्ध नसलेले कवी रवींद्रनाथ टागोर राजे वीरचंद्र माणिक्य यांच्या संपर्कात आले. वीरचंद्रांनी रवींद्रनाथांची प्रतिभा ओळखली आणि तेव्हापासून रवींद्रनाथांचा माणिक्य राजघराण्याशी अतूट स्नेह जडला. रवींद्रनाथ माणिक्य राजवंशाच्या व त्रिपुराच्या प्रेमात अडकले तर माणिक्य राजघराणे रवींद्रनाथांच्या प्रतिभेच्या व काव्याच्या प्रेमात पडले. राजे वीरचंद्र रवींद्रनाथांना प. बंगालमधील कुर्सियांग, दार्जिलिंग आदि थंड हवेच्या ठिकाणी आपल्यासोबत आवर्जून नेऊ लागले. वीरचंद्रांचा मुलगा राधाकिशोर हा रवींद्रनाथांचा घनिष्ट मित्र बनला. या स्नेहामुळेच शांतीनिकेतनच्या स्थापनेतही माणिक्य राजघराण्याने रवींद्रनाथांना खूप मदत केली तर रविंद्रनाथांनीही या राजघराण्यावर 'राजर्षी', 'बिसर्जन' व 'मुकुट' अशी तीन काव्ये लिहून आपल्या मैत्रीचे पारणे फेडले.

रवींद्रनाथांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आणखी एक वास्तूही आपल्याला आगरतळ्यात बघायला मिळते आणि ती म्हणजे 'मालांछा निवास' हा राजवाडा. आज ही वास्तू फारशा चांगल्या स्थितीत नाही. पण तिचे हे ऐतिहासिक, भावनिक महत्त्वही नजरेआड करण्याजोगे नाही.

आगरतळ्यातील वीर विक्रम महाविद्यालयाची भव्य वास्तू, तेथील दुर्मिळ शिल्पे, चित्रांचा, नाण्यांचा खजिना असलेले राज्य वस्तुसंग्रहालय या गोष्टी तर बघण्यासारख्या आहेतच, पण मुद्दाम जाऊन पहावे असे ठिकाण म्हणजे बुद्धविहार. ब्रह्मदेशाच्या पद्धतीच्या तिथल्या बुद्धाच्या धातुमूर्ती मुद्दाम बघण्यासारख्या आहेत. इथे बुद्ध पौर्णिमेला मोठ्या धूमधडाक्यात बुद्धजयंती साजरी केली जाते. आगरतळ्यातले जगन्नाथ मंदीर हेही असेच भाविकांची नेहमी गर्दी असणारे ठिकाण आहे.

आगरतळ्याच्या बाहेरही बघण्यासारखे बरेच काही आहे. असे पहिले ठिकाण म्हणजे कमलासागर. आगरतळ्यापासून फक्त २७ कि.मी. वर असलेला हा तलाव पंधराव्या शतकात महाराजा धन्य माणिक्य यांच्या आज्ञेवरून बांधला गेला. या तलावाच्याच बाजूला असलेल्या एका टेकडीवर एक काली मंदीर आहे. ते सोळाव्या शतकातले आहे आणि तेथे दर नवरात्रात मोठी जत्रा भरते. हा एक नयनरम्य पिकनिक स्पॉट आहे.

या कमलासागरपेक्षा जरा लांब– म्हणजे आगरतळ्यापासून ४८ कि.मी. वर असलेले दुसरे आवर्जून पहावे असे ठिकाण म्हणजे ब्रह्मकुंड. दरवर्षी एप्रिल आणि नोव्हेंबरमध्ये भरणाऱ्या जत्रांमुळे प्रसिद्ध झालेल्या या ठिकाणी शंकराचे एक प्राचीन मंदीर आहे. त्रिपुरातील अन्य रस्त्यांप्रमाणेच ब्रह्मकुंडाला जाणारा रस्ताही फारसा चांगला नाही, पण रस्त्याच्या दुतर्फा असलेले चहाचे मळे मात्र आपला हा प्रवास निश्चितच आनंददायी करतात.

आगरतळ्यापासून ५३ कि.मी. वर असलेला नीर महाल म्हणजे तर वास्तुशास्त्राची कमाल आहे. एखाद्या विस्तीर्ण तलावात बांधलेले असे भव्य महाल आपल्याला राजस्थानात बघायला मिळतात पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल, पोहोचायला अत्यंत अवघड असलेल्या त्रिपुरामध्ये जेव्हा असा राजस्थानी मुघल वास्तुशैलीशी नाते सांगणारा महाल बघायला मिळतो तेव्हा आश्चर्य वाटते. महाराज वीर विक्रम किशोर माणिक्य यांच्या आज्ञेनुसार रुद्रसागर तलावाच्या मधोमध हा राजवाडा बांधण्यात आला आहे. १९३० साली याचे बांधकाम सुरू झाले आणि ते पूर्ण व्हायला नऊ वर्षे लागली. बोटीने या महालापर्यंत पोहोचायला अर्धा तास लागतो. या नीर महालातले राजपरिवाराचे कक्ष, बैठकीच्या खोल्या, नृत्यागार, शाही भोजनकक्ष, अतिथींच्या खोल्या, बुद्धिबळ खेळण्यासाठी स्वतंत्र खोली, मनोरंजन कक्ष हे सारे बघता-बघता आपणही मनाने त्या जुन्या शाही जमान्यात गुंगून जातो. आपलेही वर्तमानाचे भान सुटते आणि मग चांदण्या रात्री नीरमहालाच्या एखाद्या गवाक्षात बसून आपणही त्या रुद्रसागराच्या संथ, चमचमत्या पाण्यात नजर जडवून बसतो, चांदणे कवेत घेऊन नीरमहालाला बिलगणाऱ्या त्या जलाशयात नौकाविहार करू लागतो. पण अशी स्वप्ने, अशी भावविभोर अवस्था वर्तमानाच्या खडकावर आदळते तेव्हा तिचा चक्काचूर हा ठरलेलाच असतो. तसा

तो आपल्याही अनुभवाला येतो. या नीरमहालाच्या जवळच, रुद्रसागराच्या किनाऱ्यावर त्रिपुरा पर्यटन विकास महामंडळाने बांधलेल्या सागरमहालात बसून मात्र हे सुख आपण काही अंशाने का होईना पण निश्चितच मिळवू शकतो.

आगरतळ्यापासून ५७ कि.मी. वर असलेल्या त्रिपुरासुंदरीच्या मंदिरात भाविकांना त्रिपुरासुंदरीच्या दर्शनाने जे मिळते ते सुख भौतिक सीमांच्या पलीकडचे असते. एका टेकडीवर, विस्तीर्ण जलाशयाच्या काठी बांधलेले हे मंदिर साडेचार शतकांपूर्वी तत्कालीन महाराजाने बांधलेले मंदिर आहे. शक्तीच्या ५१ पीठांपैकी हे एक पीठ मानले जाते. या आधी आसाममधील कामाख्येच्या वर्णनात या ५१ पीठांमागची कथा आलीच आहे. या ५१ पीठांपैकी हे एक जागृत पीठ मानले जात असल्याने दर नवरात्रात येथे भाविकांची प्रचंड गर्दी असते. हे मंदिर ज्या उदयपूर या गावी आहे तिथलेच महादेवबारी हे मंदिरही भाविकांचे आकर्षण स्थळ आहे. मात्र या सर्वांवर कडी करणारे, त्रिपुराचे नाव शिल्पकलेच्या क्षेत्रात अजरामर करणारे ठिकाण म्हणजे त्रिपुराच्या उत्तर भागातले, आगरतळ्यापासून १८० कि.मी. वर व कोयला शहर या उत्तर त्रिपुरा जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणापून १० कि.मी. वर असणारे 'उनाकोटी' म्हणून प्रख्यात असणारे ठिकाण. हे ठिकाण पर्यटकांच्या फारसे परिचयाचे नाही आणि म्हणूनच बरेचसे अस्पर्श्य व सुंदर राहिले आहे. हे ठिकाण सुखसुविधांना चटावलेल्या, निव्वळ उपभोक्ता संस्कृतीचे घटक असलेल्या पर्यटकांच्या नजरांपासून दूर राहण्याचे आणखी एक कारण ते आगरतळ्यापासून लांब आहे, तिथे जाण्याचा रस्ता खडबडीत आहे, तिथे राहण्याची चांगली सोय नाही आणि दुसरे म्हणजे या भागात अतिरेक्यांचा त्रास होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे पर्यटक अजून तरी या शिल्पखजिन्यापासून बरेचसे दूरच राहिले आहेत.

उनाकोटी म्हणजे अकराव्या - बाराव्या शतकात एका अज्ञात शिल्पकाराने दगडातून घडवलेल्या अगणित शिल्पांचा खजिना आहे. 'उनाकोटी' हा मूळ बंगाली शब्द आहे. उनाकोटी म्हणजे कोटीला एक कमी. या बाबत कथा अशी सांगितली जाते की एका अज्ञात शिल्पकाराने देवाचा वर प्राप्त करून घेण्यासाठी एका रात्रीत एक कोटी देवप्रतिमा या मोठमोठ्या शिलाखंडांतून कोरून काढण्याचा ध्यास घेतला. आणि तो कामाला लागला. बहुतेक प्रतिमा या शंकर, पार्वती, गणपती यांच्याच आहेत. त्याने त्याच्या संकल्पाप्रमाणे एक कोटी शिल्पे घडवतही आणली. फक्त एक शिल्प घडवणे बाकी होते आणि तेव्हा उजाडायला थोडा वेळ होता, तेव्हा थोडी विश्रांती घेतली तरी चालेल या विचाराने तो जरा विश्रांतीसाठी थांबला आणि त्याला झोप लागली. त्याला जाग आली तेव्हा सकाळ झाली होती. त्याचा संकल्प अपूर्ण राहिला होता आणि दैवी वर मिळविण्याचे त्याचे स्वप्नही भंगले. म्हणून हे ठिकाण आहे 'उनाकोटी'.

ही उनाकोटी शिल्पे त्या अज्ञात शिल्पकाराप्रमाणेच अज्ञाताच्या गडद पडद्यामागे हजार वर्षांहून अधिक काळ दडून राहिली होती. पण काही वर्षांपूर्वी अचानक वृक्षवल्लरींच्या घनगर्द जाळ्यातून शिवाची एक प्रतिमा अचानक प्रगटली आणि मग आर्किऑलॉजिकल सर्व्हे ·ऑफ इंडियाने त्या परिसराचा ताबा घेऊन हा शिल्पखजिना शोधून काढला. ते वर्ष होते १९२१. 'पूर्वोत्तर भारतातला सर्वांत मोठा शोध' असे याचे वर्णन पुरातत्त्व खात्याने आपल्या अधिकृत अहवालात केले आहे इतका हा शोध महत्त्वाचा आहे.

हा शोध महत्त्वाचा आहे कारण तज्ज्ञांच्या मते इथली शिल्पे म्हणजे त्रिपुरातल्या दोन संस्कृतींच्या संगमाचे प्रतीक आहेत. एक संस्कृती आहे ती पुरातन हिंदुसंस्कृती आणि दुसरी संस्कृती ही स्थानिक वन्य जमातींची संस्कृती आहे. त्यामुळेच इथल्या प्रतिमांचा चेहेरा मंगोलॉईड ठेवणीचा आहे आणि या मूर्तींच्या अंगावर भरपूर दागिने कोरलेले असले तरी त्या प्रतिमांची वस्त्रे मात्र वन्य जमातींच्या वस्त्रांशी साधर्म्य सांगणारी आहेत. या शिलाप्रतिमांमध्ये मुख्यत्वेकरून शंकर व पार्वती यांच्या मूर्ती असल्या तरी त्यांच्या व्यतिरिक्त वीरभद्र, गंगा, गौरी, भैरव, भैरवी, गणपती आणि विष्णूच्या मूर्तीही तेथे आढळतात. गौरी आणि पार्वती ही खरे तर एकाच शक्तीची रूपे पण त्यांना वेगवेगळे स्थान आहे. या असंख्य प्रतिमांच्या मध्यभागी दोन्ही बाजूंनी गंगा व गौरींना स्थान दिलेली शंकराची प्रचंड मोठी मूर्ती आहे. पुरातत्ववेत्त्यांच्या मते या मूर्तींवर कंबोडियाच्या 'देवराज' पद्धतीचा ठसा स्पष्टपणे जाणवतो. ब्रह्मदेश, मणिपूरमार्गे देवराज शिल्पशैलीचा प्रवाह त्रिपुरापर्यंत येऊन पोहोचला असावा असाही पुरातत्ववेत्त्यांचा अंदाज आहे.

दंतकथेप्रमाणे ही सर्व शिल्पे एका रात्रीत घडवलेली असली तरी पुरातत्ववेत्त्यांच्या मते मात्र त्यांतली काही शिल्पे ही बुद्धकालीन असावी तर काही अकराव्या - बाराव्या शतकातली असावीत. मात्र ही शिल्पे जन्मापासूनच दुर्दैवी ठरली आहेत. या शिल्पकारांनी ही शिल्पे घडवताना हिंदू मूर्तिशास्त्राला स्वतःच्या कल्पनेची जास्त जोड दिल्याने माणिक्य राजवंशाच्या दरबारी असलेल्या ब्राह्मण गुरूंनी या शिल्पांना धार्मिक दर्जा देण्यास नकार दिला. त्यामुळे माणिक्य राजवंशाने या शिल्पखजिन्याबाबत अलिप्ततेचे धोरण पत्करले. पण सामान्य लोकांनी मात्र याला तीर्थस्थानाचे महत्त्व दिले आणि त्यांची रीघ इथे सतत चालू राहिली. पण इथे येणाऱ्यांत सर्वसामान्य भाविक जसे होते तसेच मूर्तींची तस्करी करणारेही होते. त्यामुळे यांतल्या अनेक लहान मूर्ती त्यांनी पळवून नेल्या आहेत. तर काही गावकऱ्यांनी पूजा करण्यासाठी आपल्या घरी नेल्या आहेत. पूर्वीच्या राजांप्रमाणेच राज्यसरकारचे हे दुर्लक्ष अक्षम्य आहे. हे असेच चालू राहिले तर आणखी काही वर्षांनी उनाकोटीचे नावही भारताच्या सांस्कृतिक पटलावरून पुसले जाण्याची शक्यता आहे दक्षिण त्रिपुरातील पिलक व देवतामुरा या ठिकाणांचीही अशीच गत आहे.

पिलकचे महत्त्व खूप आहे, कारण इथे हिंदू आणि बौद्धधर्मांच्या आदान - प्रदानाची प्रक्रिया आपल्याला बघायला मिळते. पूर्वांचलातील अन्य राज्यांप्रमाणेच त्रिपुरातही बौद्धधर्माने प्रवेश केला होता, पण तो येथे रुजला नाही, कारण त्रिपुरावर राज्य करणारे माणिक्य राजे हे कट्टर हिंदू होते. त्यांनी बौद्ध धर्माला अजिबात उत्तेजन, आश्रय दिला नाही. त्यामुळे हळूहळू त्रिपुरातून बौद्धधर्म लयाला गेला. इथली शिल्पेही मध्ययुगीन काळातली असल्याचे मानले जाते. पिलकमधील सर्वांत मोठा शोध म्हणजे देवी चुंडा या बौद्ध देवतेची पाषाण मूर्ती. बी. के. देवरामन् या त्रिपुरातील नामवंत पुरातत्ववेत्त्याने ती शोधून काढली. ही १८ हातांची मूर्ती म्हणजे भारतात सापडलेली अशा प्रकारची एकमेव मूर्ती आहे असा त्यांचा दावा आहे. पिलकच्या राजेश्वरी आश्रमात सध्या ती पूजेसाठी ठेवण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त अवलोकितेश्वर, नरसिंहाच्या मूर्तीही येथे सापडल्या आहेत.

त्रिपुरातील देवतामुरा म्हणजे देवतांची टेकडी म्हणजे आपल्याकडच्या अजिंठा - वेरुळशी नाते सांगणारी आहे. दक्षिण त्रिपुरा जिल्हयातील अमरपूर परिसरात असणाऱ्या या टेकडीवर असंख्य पाषाणमूर्ती जशा आहेत तशीच कोरलेली असंख्य चित्रेही आहेत. त्यामुळेच या टेकडीला ‘छबीमुरा’ वा चित्रांची टेकडी असेही म्हटले जाते. या शिल्प - चित्रांबद्दल फारसे संशोधन झाले नसले तरी तीही मध्ययुगीन असावीत असे मानले जाते. काही तज्ज्ञांच्या मते या शिल्प - चित्रांमध्ये हिंदू व बौद्ध धर्मविचारांचा संगम झालेला दिसतो. या टेकडीच्या पायथ्याशी भगवान शंकर, विष्णूचा नरसिंह अवतार आणि भगवान बुद्धाची चित्रे आढळतात तर टेकडीवरही शिव, विष्णू आणि बुद्धाचीच शिल्पे आढळतात. या व्यतिरिक्त एका रांगेत वेगवेगळ्या राजे - राण्यांची ३७ चित्रेही दिसतात तर दुसऱ्या एका पॅनलवर एक अत्यंत विलक्षण प्रतिमा बघायला मिळते. ती महिषासुर मर्दिनीची प्रतिमा आहे आणि विशेष म्हणजे या ४५ फुटी प्रतिमेत त्रिपुरातील वन्य स्त्रिया घालतात ते ‘पछरा’ हे वस्त्र महिषासुर मर्दिनीने परिधान केलेले दिसते. या महिषासुर मर्दिनीचे दागिनेही ‘रिआंग’ या वन्य जमातीचे दागिने आहेत. त्यामुळे पुरातत्ववेत्त्यांचे या शिल्पांबद्दलचे कुतूहल वाढले आहे. मात्र दुर्दैवाने शिल्प - चित्रांचे हे वैभव जपण्यासाठी त्रिपुरा सरकारकडे पुरेशी साधने नाहीत. त्यांचे जतन - संवर्धन करण्यासाठी त्रिपुरा सरकारच्या हातात आर्किऑलॉजिकल ॲक्टचेही साधन नाही. सरकारने असा कायदा केला तरीही त्याचा फार उपयोग होईल असे नाही कारण मुळात या अशा अत्यंत महत्त्वाच्या स्थळांवर उत्खनन करण्यासाठी व या शिल्प - चित्रांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन करण्यासाठी लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देणेही हलाखीच्या स्थितीत असलेल्या त्रिपुरा सरकारला शक्य नाही. त्यामुळे या बाबतीत केंद्रसरकारने काही सहाय्य केले तरच हा खजिना वाचण्याची शक्यता आहे. अन्यथा पुढच्या पिढ्यांच्या हाती हे संचित लागणे कठीण आहे.

त्रिपुरात आणखी काही अप्रतिम पर्यटन स्थळे आहेत. जांपुई हे थंड हवेचे ठिकाण हे त्यांपैकीच एक. तिथले स्पर्शाच्या आवाक्यात असलेले सावरीच्या कापसासारखे शुभ्र ढग, संत्र्याच्या बागा, आदिम संस्कृती जोपासणारी भोळी - भाबडी माणसे, बहारदार निसर्ग आणि अत्यंत प्रसन्न वातावरण यामुळे तिथले वास्तव्य संपूच नये असे वाटते. तिथे राहण्यासाठी पर्यटन विभागाचा यात्रीनिवास वांगमुन भागात आहे. त्याचे नाव आहे 'एडन'. जांपुई हे मिझोरामच्या सीमेला लागून असलेले तीन हजार फूट उंचीवरचे पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे तिथे लुशाई मिझो जमातीची वस्ती जास्त आढळते.

जांपुई इतकेच आणखी एक सुंदर आणि अनाघ्रात पर्यटन स्थळ म्हणजे ४१ चौ.कि.मी. परिसरात पसरलेले विस्तीर्ण दुंबुर लेक. या तलावाचे वैशिष्ट्य म्हणजे या विस्तीर्ण जलाशयात एक-दोन नव्हे तर तब्बल ४८ बेटे आहेत. तिथे वाहतूक चालते तीही बोटींतूनच. मंदिर घाटापर्यंत बसने जाऊन पुढे आपण नौकाविहार करत या जलाशयातून फेरफटका मारू शकतो. रस्ता चांगला असल्याने तिथे जरातरी शहरीकरणाचा स्पर्श झालेला आहे. मोटरबोटस् वगैरेही तिथे आढळतात. मात्र पुढे सगळे अधिराज्य आहे ते साध्या नौकांचे. इथे कसली घाई गडबड नाही. शांत, प्रसन्न वातावरणात भरपूर ताजी हवा फुफ्फुसात भरून घेत आपल्याच मस्तीत नौकाविहार करण्याचे सुख काही औरच. घड्याळाच्या काट्याकडे बघून धावण्याऱ्या शहरी लोकांना तर त्याचे फारच अप्रूप वाटते. इथे ४८ बेटे असून 'कोकोनट आयलंड' म्हणून ओळखले जाणारे बेट त्यात प्रमुख आहे. आता या बेटांपैकी काही बेटे तरी पर्यटन स्थळे म्हणून विकसित करायचा राज्य शासनाचा विचार चालू आहे. तसे झाले तर मोठ्या संख्येने पर्यटक हा आनंद उपभोगू शकतील.

पण दुर्दैवाने आज तरी या आनंदाला दहशतवादाचे ग्रहण लागले आहे. या दहशतवादाची मुळेही आसामप्रमाणेच बांगलादेशातून मोठ्या प्रमाणात झालेल्या घुसखोरीतच दडलेली आहेत. बांगला देशाला सर्वात जवळ असलेले राज्य त्रिपुरा आहे. त्याची तब्बल ८६१ कि.मी. ची सीमा बांगलादेशाला जोडली गेलेली आहे. त्यांपैकी ८३ कि.मी. ची सीमा ही समुद्री सीमा आहे. बांगला देशमधून घुसखोरीचा प्रश्न सतत टांगत्या तलवारीसारखा आपल्या डोक्यावर लटकलेला असूनही सीमासुरक्षादलाच्या फक्त सात बटालियन्स येथे तैनात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे खरे तर दर साडे सात कि.मी. वर सीमासुरक्षादलाचे एक - एक ठाणे असणे अत्यावश्यक असतानाही काही ठिकाणी– विशेषत: बांगला देशातील चितगाँव जिल्ह्याला लागून असलेल्या सीमेवर वीस - वीस कि.मी. अंतरापर्यंतही सीमासुरक्षादलाचे एकही ठाणे नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे राजरोसपणे घुसखोरी चालू असते. आधीच गरीब असलेल्या त्रिपुरावर हा घुसखोरीमुळे पडणारा भार असह्य असाच आहे. याचे पर्यावसान गरीब आदिवासींच्या जमिनी गैर आदिवासींनी बळकावण्यात झाले आहे आणि त्यातूनच

त्रिपुरातला दहशतवादाचा राक्षस फोफावला आहे.

त्रिपुरा हे खरे तर आदिवासींचे राज्य आहे. त्रिपुरात नऊ अनुसूचित जमाती आहेत. आणि त्यांच्या पुन्हा उपजमाती आहेत. कुकी या जमातीच्याच २६ उपजमाती आहेत. त्रिपुरी, रियांग, चकमा, हलाम, नोझालिया, मोघ अशा जमातींनी त्रिपुराचा सामाजिक पट विणला गेला आहे. हे आदिवासी - वनवासी हेच खरे तर इथल्या जमिनीचे राजे होते पण घुसखोरीचे प्रमाण वाढायला लागले तशा त्यांच्या जमिनी त्यांच्या हातातून सुटून बिगर आदिवासींच्या, घुसखोरांच्या हातात जायला लागल्या. आधीच गरिबी, बेकारी आणि त्यात ज्या शेतीवर गुजराण ती शेतीही हातातून निसटल्यावर त्याची हिंसक प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. तशी ती उमटलीही. आदिवासींच्या हातून त्यांच्या जमिनी जाऊ नयेत, त्या त्यांना मिळाव्यात म्हणून त्रिपुरा सरकारने १९७४ मध्ये त्रिपुरा लँड रेव्हेन्यू अँड लँड रिफॉर्म्स अॅक्ट करून त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला, पण प्रशासनातील भ्रष्टाचार, त्यांची बेपर्वाई, यामुळे कायद्यातील तरतुदी कागदावरच राहिल्या. परिणामी आदिवासींच्या हातात शस्त्रे आली. बांगलादेशाची मदत, आश्रय होताच. परिणामी त्रिपुराचा सामाजिक पट हिंसाचाराच्या, रक्तपाताच्या, विद्वेषाच्या भडक रंगांनी रंगून निघाला. आधीच गरीब असलेल्या, राज्यातील जनतेला सुखाची भाकरीही देऊ न शकणाऱ्या त्रिपुराच्या आर्थिक स्थितीवर या हिंसाचाराचा ताण पडू लागला. आणि तिथली शांती, सौख्य विस्कटून गेले.

बिगर आदिवासींच्या वर्चस्वामुळे, त्यांच्या हातात सारी सूत्रे जात असल्याच्या भावनेमुळे आदिवासींच्या मनात गेली काही दशके मूळ करून राहिलेली आपण उपेक्षित असल्याची भावना आता अतिशय स्फोटक रूपात बाहेर येऊ लागली आहे. त्रिपुराला हिंसाचार नवीन नाही. १९८० च्या दशकापासून तो तेथे सातत्याने चालू आहेच. १९९७ च्या प्रारंभीच्या दोन महिन्यांत म्हणजे आम्ही पूर्वांचलातून परतल्यानंतर लगेचच तिथे सुमारे शंभर बिगर आदिवासींची क्रूरपणे हत्या करण्यात आली आणि साऱ्या देशाचे लक्ष तिकडे वेधले गेले. बिगर आदिवासींच्या (प्रामुख्याने बंगाली भाषिक) घरांना मध्यरात्री अचानक आगी लावायच्या आणि ते मुला - बाळांसह जीव वाचवण्यासाठी धावत सुटले की एके - ४७ किंवा एके - ५६ मधून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव करायचा अशा निर्घृण पद्धतीने या हत्या करण्यात आल्या आहेत. हा हिंसाचार रोखण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, पैसा, शस्त्रसामुग्री आपल्याकडे नाही, त्यामुळे हा हिंसाचार रोखण्यासाठी केंद्रानेच लष्कर पाठवावे अशी मागणी त्रिपुराचे मुख्यमंत्री दशरथ देव यांनी केली आहे. त्रिपुरात ज्या डाव्या आघाडीचे सरकार आहे ती डावी आघाडी केंद्रात सत्तारूढ असलेल्या संयुक्त आघाडीची घटक आहे. त्यामुळे त्रिपुरातल्या हिंसाचारामुळे संयुक्त आघाडी सरकार व विशेष करून केंद्रीय गृहमंत्री इंद्रजित गुप्त हे अडचणीत आले व त्यांनी त्रिपुरा सरकारच्या मदतीसाठी लष्कराची कुमक पाठवली

पण ही अशी मदत म्हणजे तात्पुरती, वरवरची मलमपट्टी ठरणार आहे. कारण जोपर्यंत त्रिपुराची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, आदिवासींना त्यांच्या जमिनी, रोजी-रोटी मिळवून देण्यासाठी व जे दहशतवादाच्या मार्गाला गेले आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी काही ठोस उपाय केले जात नाहीत तोपर्यंत त्रिपुराची जखम वाहतीच राहणार आहे.

त्रिपुरात आज ऑल त्रिपुरा टायगर फोर्स (ATTF), नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा (NLFT), त्रिपुरा रिसरेक्शन आर्मी (TRA), त्रिपुरा नॅशनल व्हॉलेंटिअर्स (TNV) आदि प्रमुख संघटनांसह एकूण १४ दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. एकूण पाच हजार तरूण या संघटनांच्या माध्यमातून दहशतवादाच्या मार्गाला लागले आहेत. राज्याचे गृहमंत्री समर चौधरी यांच्या मते या पाच हजार तरुणांच्या पुनर्वसनासाठी राज्याला ७३ कोटींच्या निधीची गरज आहे. तशी त्यांनी केंद्राकडे मागणीही केली होती. पण केंद्राने दिले फक्त सव्वा दोन कोटी. त्यातून १३२१ तरुणांना सरकारी खात्यातून नोकऱ्या दिल्या गेल्या, पण बाकीच्यांचे काय? त्यांच्यासाठी एक तर नोकऱ्या उपलब्ध करून द्यायला हव्यात किंवा स्वयंरोजगाराची व्यवस्था करायला हवी. ते करण्याची आर्थिक क्षमता राज्यसरकारजवळ नाही आणि एखाद्या राज्याचा डोलारा पूर्णांशाने आपल्या डोक्यावर घेणे केंद्रसरकारला शक्य नाही.

याच्याशीच निगडीत आणखी एक प्रश्न आहे. आणि तो आहे राजकीय इच्छाशक्तीचा. त्रिपुरातील सत्तारूढ डावी आघाडी असो वा प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस. या दोघांनीही आत्तापर्यंत वेळोवेळी आपापल्या राजकीय स्वार्थासाठी या दहशतवादी संघटनांची मदत घेतली आहे. काँग्रेस– त्रिपुरा उपजाती जुबा समिती या आघाडीचा पराभव करण्यासाठी त्रिपुरातील सत्तारूढ डाव्या आघाडीने खुले आम त्रिपुरा टायगर फोर्सची मदत घेतली होती. असंख्य खून, अपहरणांत दोषी असलेल्या या दहशतवादी संघटनेचे सदस्य अपहरणासारख्या गुन्ह्यानंतर मार्क्सवादी पक्षाच्या कार्यालयात बसूनच पुढची देवाणघेवाणीची बोलणी करायचे तर बिगर आदिवासींची आपली मतपेढी हातची जाऊ नये म्हणून या दहशतवादी संघटनांवर बंदी घालण्याची ओरड आज करणाऱ्या काँग्रेसने १९८८ साली त्रिपुरातील लोकनियुक्त डाव्या आघाडीचे सरकार पाडण्यासाठी त्रिपुरा नॅशनल व्हॉलेंटिअर्स या दहशतवादी संघटनेची मदत घेतली होती व नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा या कट्टर दहशतवादी संघटनेशी तर असंख्य काँग्रेसजनांचे घनिष्ट संबंध होते. या परिस्थितीत त्यांच्यावर कारवाई कोण आणि कशी करणार?

आज तरी त्रिपुरा एका राजकीय दुष्टचक्रात घेरल्यासारखे दिसते आहे. राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जो पर्यटन उद्योग अतिशय सहाय्यभूत ठरू शकतो तो उभारण्यासाठी, पर्यटकांसाठी 'बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर' उभे करण्यासाठी राज्याकडे पैसा नाही. पर्यटकांचा ओघ वाहावा यासाठी जे सुरक्षित वातावरण तयार करावे लागेल ते करण्यासाठी, दहशतवादाला आळा घालण्यासाठीही पुन्हा पैशाचीच जरुरी

आहे. तो पैसा त्रिपुरा सरकारकडे नाही. तिथे रस्ते, रेल्वे आदि नसल्यामुळे पर्यटन वा अन्य कोणताही उद्योग उभा राहू शकत नाही. तो राहात नाही तोपर्यंत रोजगार निर्मिती होऊ शकत नाही. रोजगार निर्मिती होत नाही तोपर्यंत राज्याची आर्थिक स्थिती सुधारू शकत नाही आणि आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने, दोन वेळची भाकरही उपलब्ध होत नसल्याने तरुण मोठ्या संख्येने दहशतवादाकडे वळत आहेत आणि त्यांना त्या मार्गावरून परत आणण्याऐवजी राज्यकर्ते आपल्या स्वार्थासाठी त्यांचा वापर करत असल्याने दहशतवाद लवकर शमण्याची चिन्हे नाहीत आणि जोपर्यंत दहशतवादाला विराम मिळत नाही तोपर्यंत बाकी उद्योगधंदे तर सोडाच पण पर्यटन उद्योगही उभा राहू शकत नाही.

हे दुष्टचक्र फिरून परत एकाच ठिकाणी येऊन थांबते आहे आणि निसर्गसुंदर त्रिपुरा त्या चक्रात पिळून निघालेला असहाय्यपणे पाहणे एवढेच आपल्या हातात आहे. आपण फार तर निडरपणे सुंदर रवींद्रनाथ टागोरांना अतिप्रिय असलेल्या सुंदर त्रिपुराच्या भेटीला जाणे एवढेच करू शकतो. अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या सीमावर्ती राज्याच्या अर्थव्यवस्थेला तेवढाच हातभार लावू शकतो. तो आपण लावायचा. आलिशान सुखसोयींच्या हव्यासापायी वा दहशतवाद्यांच्या भीतीपायी आपणच आपले एक महत्त्वाचे राज्य आपल्या मनाच्या नकाशातून कशासाठी पुसून टाकायचे? प्रफुल्लित फुलांच्या सुगंधी आणि नयनमनोहर मेजवानीसाठी त्रिपुरातली जंगले गुरुवर्य रवींद्रनाथांप्रमाणेच आपल्यालाही साद घालत आहेत!

— —

# १० / ब्रह्मपुत्रेची साद

हा उपसंहार म्हणजे पूर्वांचलाच्या आमच्या भटकंतीनंतर आलेले एक विरामचिन्ह आहे, पण हा पूर्णविराम नाही. कारण साराच पूर्वांचल आपल्या वेड लावणाऱ्या प्राकृतिक सौंदर्यानिशी आणि अस्वस्थ करणाऱ्या, ज्वालामुखीच्या तोंडावर टेकलेल्या सद्यस्थितीनिशी मनी – मानसी इतका भिनला आहे, की आता लिखाणातही पूर्वांचलापुढे पूर्णविराम टाकायला मन राजी होत नाही.

खरे तर प्रत्येक राज्याविषयी एवढे तपशीलवार लिहिल्यानंतर या उपसंहाराची काय गरज होती? बराच काळ या प्रश्नाभोवती घोटाळल्यानंतर मन या प्रश्नाच्या होकारार्थी उत्तराकडे झेपावले आहे. हो! त्याची गरज आहे, कारण आत्तापर्यंत आला तो त्या - त्या राज्याचा स्वतंत्रपणे केलेला विचार होता, पण समग्र पूर्वांचलाचा एकत्रितपणे विचार, समग्र पूर्वांचलाने गेल्या शे - दीडशे वर्षांत अनुभवलेली स्थित्यंतरे, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे जे तुकडे झाले त्यामुळे त्या भागात नव्याने उदयाला आलेल्या आंतरराष्ट्रीय सीमा, त्या सीमांचा स्थानिक लोकांना बसलेला फटका, काही ठिकाणी अस्तित्वात असलेल्या राजेशाहीमुळे तर काही ठिकाणी प्रभावशाली असलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांमुळे स्वातंत्र्य चळवळीपासून पूर्णत: अनभिज्ञ असलेल्या पूर्वांचलवासियांच्या जीवनात स्वातंत्र्याच्या एका फटकाऱ्यानिशी घडलेली उलथापालथ, त्यांचे जीवन सुधारण्यासाठी भारतसरकारने आत्तापर्यंत केलेली उपेक्षा, यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे असे सतत जाणवत होते, कारण शेवटी त्या भागातल्या सातही राज्यांची नियती एकमेकांशी इतक्या घनिष्टपणे निगडीत आहे की समग्र पूर्वांचल हा एक घटक मानून त्याचा विचार करणे गरजेचे ठरते.

एकीकडे सातही राज्यांचा एकत्रित विचार करून, त्यांचे एकमेकांवरील आर्थिक परावलंबित्व लक्षात घेऊन, त्यांच्या हिताला, त्यांच्या संस्कृतीला अजिबात धक्का

न लागेल अशा पद्धतीने त्यांना केंद्रातर्फे भरघोस आर्थिक सहाय्य देऊन त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी नॉर्थ ईस्ट कौन्सिलसारखी शिखर संस्था स्थापून प्रयत्न सुरू आहेत. त्याच वेळी यू.एस.ए. (द युनायटेड स्टेट्स् ऑफ आसाम) किंवा नॅमॅट (नागालँड, आसाम, मणिपूर, मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरा यांची अद्याक्षरे) अशा आघाड्या उघडून संपूर्ण पूर्वांचलातील दहशतवादी संघटनांना एकत्र करून त्यांच्या माध्यमातून सारा पूर्वांचल भारतापासून तोडण्याचे कारस्थानही रचले गेले. त्याच्यावर अंमल चालू आहे. प्रत्येक राज्याच्या स्वतंत्र मुक्तिसैन्यांव्यतिरिक्त नॉर्थ ईस्टर्न रिजन डिफेन्स आर्मी (NERDA) अस्तित्वात आली आहे. तिथल्या मंगोलॉईड वंशाच्या लोकांना एकत्र करून त्यांचे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आणायचा प्रयत्न चालू आहे. हे एक व्यापक कारस्थान आहे आणि निव्वळ कायदा वा सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करणे वा लष्कराच्या जादा तुकड्या तिकडे पाठवल्या की हा प्रश्न मिटेल असा भ्रम जोपासणे हितावह नाही. या कारस्थानाचे मूळ समजून घेण्यासाठी, तिथल्या सद्यस्थितीचे आकलन होण्यासाठी गरज आहे ती त्या भागाच्या इतिहासाचा वेध घेण्याची. त्या भागाने अनुभवलेल्या स्थित्यंतरांची जाणीव करून घेण्याची. या साठी फार खोलात जाण्याची गरज नाही गेल्या एक दीड शतकाचा इतिहासच या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

एकोणिसाव्या शतकात साऱ्या भारतात ब्रिटिशांच्या आगमनामुळे जे वैचारिक मंथन सुरू झाले होते, पाश्चिमात्य ज्ञानाची, उद्योगांची माहिती झाल्याने, वाहने, रेल्वे आदींसारखी दळणवळणाची साधने उपलब्ध झाल्याने जे बदल होत होते, स्वातंत्र्य चळवळीच्या जोरदार वाऱ्यांमुळे समाजमनाची जी जबरदस्त घुसळण चालू झाली होती त्याचा यत्किंचितही स्पर्श पूर्वांचलाला झाला नव्हता. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात राहणाऱ्यांना ब्रह्मपुत्रेच्या पलीकडचे जग माहीत नव्हते. आणि टेकड्यांच्या परिसरात राहणाऱ्या आदिम जमातींना तर त्यांच्या जमातीच्या बाहेरही काही जग आहे याची जाणीव नव्हती. ते सारे आपापल्या चिमुकल्या विश्वात मग्न होते. लोहार जी कोयता, खुरपे, बाण आदि शस्त्रे बनवत होता ती शेतीसाठीही उपयोगात येत होती आणि शिकारीसाठीही. लाज झाकायला जे कापड वापरायचे ते घरच्या हातमागावर विणलेलेच असायचे आणि त्याला रंग द्यायचा तर तोही नैसर्गिक रंगांपैकीच एखादा असायचा. जंगलातून लाकूड आणून त्याची घरे बांधायची आणि जमीन तर सामुदायिक मालकीचीच असायची त्याच्यावर उगवेल ते खायचे– इतकी त्यांची साधी जीवन पद्धती होती. पठारी प्रदेशात राहणाऱ्यांशी संबंध यायचा तो फक्त बाजारापुरता.

पठारी प्रदेशात विशेषत: ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात राहणाऱ्यांचे जीवन मात्र त्या मानाने पुढारलेले होते. इथली अर्थव्यवस्था शेतीशी निगडीत होती. अतिशय उत्तम प्रतीचे सिल्क इथे बनत होते. विविध हस्तकलावस्तूंचे उत्पादन तिथे होत होते. पण

आसामचा ताबा घेऊन ब्रिटिशांनी तिथे चहा उद्योगाचा पाया घातल्यानंतर ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्याचा आधुनिक ज्ञान - विज्ञानाशी संबंध यायला सुरूवात झाली होती. मोटारी, रेल्वे यांची माहितीही त्यांना झाली होती आणि टेकड्यांप्रमाणेच या खोऱ्यातही बार्टर पद्धतच अस्तित्वात असली तरी नोटा आणि नाणी यांचा वापरही विशेषत: सरकारी कामांसाठी तरी सुरू झाला होता. त्यातच शिक्षणाच्या निमित्ताने आसाममधील तरुण बंगालमध्ये गेल्याने व नोकरीच्या निमित्ताने ब्रिटिशांनी बंगाली आणि बिहारींना मोठ्या प्रमाणावर आसाममध्ये आणून वसविल्याने स्वातंत्र्य चळवळीचे वारेही अत्यल्प प्रमाणात का होईना पण आसाममध्ये पोहोचले होते.

महात्मा गांधींकडे स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गेल्यानंतर तर या परिस्थितीत व्यापक बदल घडत गेला. मुळात शंकरदेवांसारख्या संत कवींनी आसामच्या जनतेच्या मनावर आपण विशाल भारतवर्षाचे भाग आहोत असेच ठसवले होते. त्यात स्वातंत्र्य चळवळीचे वारे आसामपर्यंत पोहोचल्याने हीच जाणीव कायम व्हायला मदत झाली. पण मेघालय, नागालँड, मिझोरामच्या पर्वतराजींमध्ये आणि मणिपूर, त्रिपुराच्या राजेशाहीत स्थिती वेगळी होती. मणिपूर - त्रिपुराच्या राजांनी साहजिकच त्यांचे स्वतंत्र अस्तित्व जोपासले होते तर मेघालय, नागालँड आणि मिझोराममध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाचा स्पर्श व ते सगळे विशाल भारतभूचाच एक भाग आहेत ही जाणीव तिथल्या जमातींपर्यंत पोहोचूच दिली नाही. त्यामुळे ज्या देशाबद्दल ते अनभिज्ञ होते, त्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्या देशाशी त्यांची नाळ जोडली गेल्याने ते थक्क झाले.

त्यातच भारताच्या स्वातंत्र्या पाठोपाठ त्या भागाची भौगोलिक फेररचना झाली. तिबेट चीनच्या घशात गेले, ब्रह्मदेश स्वतंत्र झाला आणि पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश) अस्तित्वात आला. त्यामुळे त्यांच्या स्वाभाविक हालचालींवरही निर्बंध आले. पूर्वी नागालँडमधले नागा वा मिझोराममधले मिझो सहजपणे ब्रह्मदेशात जाऊ शकत होते. आसाममधले वा त्रिपुरातले लोक रस्त्याने वा जलमार्गाने चितगाँगला जाऊन त्यांचा माल विकू शकत होते. त्यांचे रोटी - बेटीचे व्यवहार चालू होते, पण या भौगोलिक फेररचनेमुळे ज्या आंतरराष्ट्रीय सीमा उदयाला आल्या त्यामुळे त्यांच्या हालचालींवर निर्बंध आले. एकीकडे आर्थिक विपन्नावस्था, शिक्षणाचा अभाव, तर दुसरीकडे या भौगोलिक फेररचनेच्या फटक्यामुळे स्वातंत्र्याबद्दलच मनात निर्माण झालेली नाराजी आणि तिसरीकडे सत्तेचे प्रतीक म्हणून भारत सरकारचे प्रशासन अस्तित्वात आल्यानंतर सुरू झालेला निष्ठांचा संघर्ष यांच्या कात्रीत पूर्वांचल सापडला. तोपर्यंत राजाला वा टोळीप्रमुखाला वाहिलेल्या निष्ठा अचानकपणे भारत सरकारच्या चरणी वाहायला त्यांचे मन तयार नव्हते. त्यातच साठच्या दशकापर्यंत अरुणाचल व मिझोराम सारख्या दुर्गम प्रदेशात प्रशासन अंशरूपानेच पोहोचू शकले होते आणि पोलिस यंत्रणा तर अस्तित्वातच आली नव्हती आणि याच वेळी पूर्व पाकिस्तान व ब्रह्मदेश हे

भूभाग वेगळे देश झाले तरी तिथून घुसखोरी मात्र मोठ्या प्रमाणावर चालूच होती.

१८२६ मध्ये ब्रिटिश कार्यकालात या भागाची खानेसुमारी केली तेव्हा संपूर्ण पूर्वांचलाची लोकसंख्या एक दशलक्षाहूनही कमी होती ती १९८१ पर्यंत म्हणजे दीड शतकात २६ दशलक्षांवर जाऊन पोहोचली. या सगळ्या घटकांचा एकत्रित ताण साऱ्या पूर्वांचलाला सहन करावा लागला आहे. स्वातंत्र्यानंतर लगेचच नागालँड आणि मिझोराममध्ये सुरू झालेल्या आणि नंतर मणिपूर, त्रिपुरा आणि आसामपर्यंत पसरलेल्या स्वातंत्र्य चळवळींचा उगमही याच परिस्थितीत शोधावा लागतो.

या सगळ्याला एक वेगळे परिमाणही आहे, ते आहे पूर्वांचलाच्या सामाजिक विणीचे. ही वीण वेगवेगळ्या धाग्यांनी गुंफली गेली आहे. यात तीन धागे प्रकर्षाने जाणवतात. त्यांपैकी एक धागा म्हणजे टेकड्यांच्या परिसरात राहणाऱ्या जमाती, दुसरा धागा म्हणजे ब्रह्मपुत्रा वा सुरमा नद्यांच्या खोऱ्यात राहणाऱ्या जमाती आणि तिसरा धागा म्हणजे कोणत्याही जमातींमध्ये न मोडणारे लोक. टेकड्या वा खोऱ्यात राहणाऱ्या जमातींबाबतच बोलायचे तर त्यांच्यात सात प्रकारचे वांशिक गट आढळतात. इंडो - बर्मी, इंडो - तिबेट, कुकी - लुशाय, मईतई, चिन् - कुकी, शान - ताई व इंडो - आर्य हे ते सात गट आणि विशेष म्हणजे या प्रत्येक वांशिक गटाची स्वत:ची बोली आहे आणि स्वत:ची संस्कृती आहे. एकट्या पूर्वांचलातच त्यामुळे चारशे भाषा, बोली बोलल्या जातात आणि या जमातींचा आणखी एक विशेष म्हणजे या सर्व जमातींना 'बाहेरच्या' लोकांचा प्रचंड राग आहे. पूर्वांचलातल्या विविध राज्यांत वेगवेगळ्या काळात 'बाहेरच्या' विरूद्ध जी आंदोलन उभी राहिली त्याच्या मागेही या जमातींच्या मनात असलेला बाहेरच्यांबद्दलचा द्वेष व अविश्वासच आहे. बाहेरच्यांबद्दलचा हा द्वेष फक्त टेकड्यांच्या परिसरात राहणाऱ्या जमातींपुरताच मर्यादित नाही. ब्रह्मपुत्रा आणि सुरमा खोऱ्यांतही तो आढळून येतो. त्याच इतिहासात मूळ शोधायचे झाल्यास तत्कालिन मुघल राजांनी आसाम बळकावण्याचे जे प्रयत्न केले त्यात आणि नंतर ब्रिटिश काळात ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणावर बंगाल्यांची नोकरभरती सुरू केल्याने बंगाली व आसामी यांच्यात जी तेढ निर्माण झाली त्यात सापडू शकते.

या परिस्थितीत औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पूर्वांचलाला विकसित करण्याचे, त्याला उर्वरित भारताशी जोडण्याचे आव्हान केंद्र सरकारपुढे होते. ते आव्हान पेलताना अनेक उपाय योजले गेले. डिस्ट्रिक्ट कौन्सिल स्थापन केली गेली. राज्यांची फेररचना केली गेली. आपल्या प्रजासत्ताकाच्या जन्मदिनी पूर्वांचल म्हणजे आसाम हे विशाल राज्य आणि मणिपूर व त्रिपुरा हे केंद्रशासित प्रदेश असे स्वरूप होते. पण नंतरच्या काळात त्या - त्या प्रदेशाच्या मागणीवरून, तिथल्या स्थानिक अस्मितांना शांत करण्यासाठी एका आसामची पाच राज्ये झाली आणि मणिपूर व त्रिपुरा यांनाही राज्याचा दर्जा दिला गेला. पण प्रदेशाच्या पुनर्रचनेमुळे प्रश्न सुटत नाहीत असे लक्षात

आले आहे. आसामची तर स्वातंत्र्यापर्यंतच १८७४, १९०५, १९१२, १९१९ आणि १९४७ अशी पाच वेळा पुनर्रचना करण्यात आली होती. त्यात स्वातंत्र्योत्तर काळात पाच राज्ये आसाममधून कोरून काढताना करण्यात आलेल्या पुनर्रचनेची भर पडली. तरीही प्रश्न सुटलेले नाहीतच. बोडोंचे स्वतंत्र राज्याचे आंदोलन जोरात आहेच, त्यात इतरही लहान-मोठे गट वेळोवेळी डोकं वर काढत आहेत. त्यामुळे प्रादेशिक पुनर्रचना हा तिकडच्या अशांततेवरचा उपाय नाही, हे निर्विवादपणे स्पष्ट झाले आहे.

आता गरज आहे ती अन्य उपायांची. केंद्राचे दुर्लक्ष व अनेकदा काँग्रेसने खेळलेले स्वार्थी व मतपेढीचे राजकारण यामुळे या भागाचे प्रश्न अधिक बिकट झाले असले तरी केंद्राने या भागासाठी काहीच केले नाही अशी स्थिती नाही. काश्मीरमध्ये भारत सरकारने पाण्यासारखा पैसा खर्च केल्यानंतरही तिथली जनता संतुष्ट होऊ शकली नाही, भारतद्रोही बनली हाच इतिहास दुर्दैवाने पूर्वांचलातही पुनरावृत्त झाला आहे. एकट्या नागालँडचेच उदाहरण घ्यायचे तर गेल्या २५ वर्षांत भारत सरकारने नागालँडवर ३० हजार कोटी खर्च केले आहेत. तिथली अवघी १२ लाखाची लोकसंख्या लक्षात घेतली तर ही रक्कम माणशी २५ लाख इतकी प्रचंड होते. तरीही आज नागालँडची स्वातंत्र्याची मागणी आणि भारत द्वेष कायमच आहे.

हा द्वेष मिटवण्यासाठी, पूर्वांचलाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पहिली प्राथमिकता द्यायला हवी ती या क्षेत्राच्या विकासाला– या सात राज्यांपैकी मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेश पूर्णांशाने अविकसित आहेत तर आसाममधले सात जिल्हे, मेघालयातले दोन जिल्हे, आणि नागालँडमधले तीन जिल्हे पूर्णांशाने मागासलेले आहेत. १९८६ पर्यंत संपूर्ण पूर्वांचलात मिळून फक्त ६२ मध्यम वा मोठे कारखाने होते आणि त्यांपैकी ४८ तर एकट्या आसाममध्ये होते. संपूर्ण पूर्वांचल हा ख़निज पदार्थांनी समृद्ध आहे. त्यामुळे तिथे उद्योग धंदे स्थापन करण्यास भरपूर वाव आहे. त्या भागात साक्षरतेचे प्रमाणही बऱ्यापैकी असल्याने कर्मचारी वर्गही उपलब्ध होऊ शकतो. पण विविध शाखांच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने तो भाग मागासलेला आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी तिथे उपलब्ध करून द्यायला हव्या. तिथे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्या. मोठ्या प्रमाणावर तस्करांच्या आणि माफिया टोळ्यांच्या पकडीत सापडणाऱ्या तिथल्या तरुणाईला वाचवायचे असेल तर हाच एक मार्ग आहे. यासाठी राज्यकर्त्यांना स्वार्थी राजकारण बाजूला सारावे लागेल. तस्करी टोळ्यांशी असलेले संबंध तोडावे लागतील. केंद्राकडून लोकांसाठी येणारा पैसा मधल्यामध्ये हडप करणारा भ्रष्टाचार रोखावा लागेल. यासाठी गरज आहे ती जबरदस्त राजकीय इच्छाशक्तीची आणि दुर्दैवाने आज तिचाच अभाव जाणवत आहे.

या संपूर्ण विभागाच्या विकासासाठी आणि सुरक्षेसाठी ७ नोव्हेंबर १९७२ रोजी स्थापन झालेली नॉर्थ ईस्टर्न कौन्सिल खरे तर महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

या भागातील मनुष्यबळ विकासासाठी आणि दळणवळणाच्या सोयी सुधारण्यासाठी कौन्सिलने प्राधान्याने प्रयत्न सुरू केले आहेत. या भागात अनेक नवीन प्रकल्प सुरू करणं, सातही राज्यांमध्ये समन्वय वाढवून एकत्रितपणे या विभागाच्या विकासाच्या योजना राबवणे आदि उद्दिष्टे या कौन्सिलपुढे आहेत. ही कौन्सिल अधिक कार्यक्षम केली तर या भागातल्या अनेक विकासाच्या योजना मार्गी लागू शकतात. त्याच बरोबर या विभागाच्या सुरक्षेच्या बाबतीतही कौन्सिल समन्वयकाची, सल्लागाराची भूमिका पार पाडू शकली तर ते अधिक हिताचे होईल. सध्या आपल्या पूर्व सीमांच्या संरक्षणाची जबाबदारी ज्या ईस्टर्न कमांडवर आहे त्यांचे मुख्यालय कलकत्त्यात आहे. त्यांच्या मदतीसाठी असलेली दोन कॉर्प्स हेडक्वाटर्स तेझपूर आणि शिलाँगला आहेत. लष्कराला सीमा सुरक्षा दल, आसाम रायफल्स, आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाची मदत मिळते आहे. सर्व सातही राज्यांत आज लष्कराच्या अनेक डिव्हीजन्स दहशतवादाला रोखण्यासाठी तैनात कराव्या लागल्या आहेत. एकीकडे पुरासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यायचे, दुसरीकडे सीमांचे संरक्षण करायचे आणि तिसरीकडे दहशतवादाचा मुकाबला करायचा अशा तिहेरी आव्हांनाना तोंड देणाऱ्या लष्कर व निमलष्करी दलांना जर कौन्सिल सल्लागारासारखी उपयोगी पडली तर त्यांच्यावरचा ताण जरा हलका होऊ शकतो. कौन्सिलने सुरक्षेच्या बाबतीत काही भूमिका वठवायला आज सातही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा विरोध आहे. पण कौन्सिलचा या बाबतीत काही उपयोग होऊ शकतो अस लक्षात आले तर तो विरोध मावळू शकेल.

या सगळ्याच्याच जोडीला गरज आहे ती नोकरीमुळे तेथे जाणाऱ्या विविध उपक्रमांच्या कर्मचाऱ्यांनी तसेच पर्यटक म्हणून तिथे जाणाऱ्या अन्य देशवासियांनी सामाजिक अभिसरणाला गती देण्याची. नोकरीनिमित्त पूर्वांचलात जाणारे अनेक कर्मचारी आज 'पनिशमेंट पोस्टिंग' मिळाल्यासारखे वागतात. त्यामुळे मैत्री तर नाहीच पण तेढ मात्र वाढते. पर्यटकांच्या नाना तऱ्हा तर नमूद करायचीही गरज नाही. सगळेच तो अंदाज बांधू शकतात. कर्मचारी व पर्यटक या दोन गटांप्रमाणेच ज्यांना ज्यांना शक्य आहे, ज्यांच्या मनात मातृभूचे काही देणे फेडायची इच्छा आहे त्यांनी सेवाकार्यासाठी तिथे जाणे आवश्यक आहे. परदेशातून फार मोठ्या प्रमाणावर तिथे पैसा येतो आहे. त्या पैशाच्या माध्यमातून ख्रिस्ती मिशनरी तिथे भारत द्वेषाची पेरणी करत आहेत. त्या विषवृक्षांची फळे आजच तिथले जीवन होरपळून टाकत आहेत. त्याचा मुकाबला करण्यासाठी आज तिथे काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांना पैशाचीही अडचण सतत भासते आहे आणि कार्यकर्त्यांचीही कमी जाणवते आहे... ज्याला ज्या प्रकारे शक्य आहे त्याने त्या प्रकारे ती कमी दूर करण्यासाठी झटणे हे आपले कर्तव्य आहे. कारण अखेर पूर्वांचल आपला आहे. विशाल ब्रह्मपुत्रा आपल्याला साद घालते आहे!

— —

# परिशिष्ट – १

**इनर लाईन परमिटस्**

पूर्वांचलातील सातपैकी तीन राज्यांत प्रवेश करण्यापूर्वी इनर लाईन परमिटस् मिळवणे आवश्यक असते. ती तीन राज्ये आहेत - नागालँड, अरुणाचलप्रदेश आणि मिझोराम. ती परमिटस् पुढील ठिकाणी मिळू शकतात.

**नागालँड**

१. डेप्युटी रेसिडंट कमिशनर, नागालँड हाऊस, नवी दिल्ली.
२. डेप्युटी रेसिडंट कमिशनर, नागालँड हाऊस, कलकत्ता.
३. असिस्टंट रेसिडंट कमिशनर, शिलाँग.
४. ॲडिशनल डेप्युटी कमिशनर, दिमापूर.
५. पूर्ण माहितीसाठी : डायरेक्टरेट ऑफ टूरिझम– नागालँड, कोहिमा. दूरध्वनी - २१६०७ / २२२१४ / २१९४५.

**अरुणाचलप्रदेश**

१. द लायेजन कमिशनर, अरुणाचल भवन, कौटिल्य मार्ग, चाणक्यपुरी, नवी दिल्ली. दूरध्वनी - ३०१३९५६ / ३१२६९३.
२. द लायेजन ऑफिसर, गव्हर्मेंट ऑफ अरुणाचलप्रदेश, ४बी, चौरिंगी प्लेस, कलकत्ता -१३. दूरध्वनी - २८६५००.
३. द लायेजन ऑफिसर, गव्हर्मेंट ऑफ अरुणाचलप्रदेश, शिलाँग -७९३००१.

दूरध्वनी - २४५५०.

४. द लायेजन ऑफिसर, गव्हर्मेंट ऑफ अरुणाचलप्रदेश, आर. जी. बरुआ रोड, गुवाहाटी -७८१०२१. दूरध्वनी - ८३१६५ / २६५४४.

५. द लायेजन ऑफिसर, गव्हर्मेंट ऑफ अरुणाचलप्रदेश, पार्वतीनगर, तेझपूर, आसाम. दूरध्वनी - २४१.

६. द लायेजन ऑफिसर, गव्हर्मेंट ऑफ अरुणाचल प्रदेश, मोहनबारी, दिब्रुगड, आसाम.

**मिझोराम**


१. डेप्युटी डायरेक्टर -कम -लायेजन ऑफिसर, २४, ओल्ड बालिगंज रोड, कलकत्ता -१९. दूरध्वनी - ४७७०३४.

२. गव्हर्मेंट ऑफ मिझोराम, मिझोराम हाऊस, रंगीर खारिया ( Rangir Dharia ), सिल्चर, आसाम. दूरध्वनी - ५५९ / ६५९ / ७५४.

३. लायेजन ऑफिसर, मिझोराम हाऊस, झू रोड, (Zoo Road), गुवाहाटी -७८१००५. दूरध्वनी - ८०९१.

भू-प्रवास
८९२
२०३६४
२१।७।९८

# परिशिष्ट - २


बोडो चळवळ
ABSU + BPAC
बोडो करार
ABSU
BPP
BPP (P)
BPP (S)
BSMC
BSMC
BPP (P)
PTCA ABSU (R)
UTNLF
PTCA
UDF
PDF
भूमिगत
BLTF
BDSF
NDFB
बोडोलँड आर्मी

ABSU ऑल बोडो स्टुडंटस् युनियन- उपेंद्रनाथ ब्रह्मांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली, शक्तिशाली बनलेली चळवळ. २० फेब्रु. ९३ रोजी बोडो करारावर स्वाक्षरी.
सद्यस्थिती- मूळ मागणीबाबतच गोंधळात.

BPAC द बोडो पीपल्स ॲक्शन कमिटी– एबीएस्यु व्यतिरिक्त अन्य सर्व बोडो आंदोलकांची कृती समिती.
सद्यस्थिती- बोडो करारानंतर बरखास्त. सान्सुमा विश्वमुटियारी यांच्या बोडोलँड पीपल्स पार्टीमध्ये परिवर्तित.

BPP द बोडोलँड पीपल्स पार्टी. सान्सुमा विश्वमुटियारींनी मुख्य कार्यकारी पदाचा राजीनामा दिल्यावर प्रेमसिंग ब्रह्मा त्या जागी आले आणि बी.पी.पी. फुटली.
सद्यस्थिती- बोडोलँड स्टेटहूड मूव्हमेंट कौन्सिल स्थापन झाल्यावर बरखास्त, पण अलीकडेच प्रेमसिंग ब्रह्मा यांनी बीपीपी (पी) गटाचे पुनरुज्जीवन करत असल्याचे घोषित केले आहे.

BSMC : बोडोलँड स्टेटहूड मूव्हमेंट कौन्सिल– पीपल्स डेमॉक्रेटिक फ्रंटला शह देण्यासाठी शेवटच्याक्षणी बीपीपीच्या दोन्ही गटांनी हातमिळवणी करून स्थापन केलेली संघटना.
सद्यस्थिती- गोंधळलेली. स्वतंत्र राज्याची मागणी पुन्हा वर आणण्यासाठी सान्सुमा विश्वमुटियारी व रबिराम ब्रह्मा यांचे प्रयत्न जारी.

BLTF : द बोडोलँड लिबरेशन टायगर फोर्स– बीपीपी (पी) गटाची भूमिगत दहशतवादी संघटना.
सद्यस्थिती- कोकराझार व आसपासच्या परिसरात कार्यरत.

PTCA : द प्लेन ट्राईबल्स कौन्सिल ऑफ आसाम– १९६७ पासून बोडो बहुल विभागात 'उदयाचल' स्थापन करण्यासाठी चरण नाईरी व समर ब्रह्मा चौधरी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत.
सद्यस्थिती- एबीएस्युने या चळवळीतील हवा काढून घेतल्यावर १९९६ मध्ये पीपल्स डेमॉक्रेटिक फोर्समध्ये विलीन. ब्रह्मा चौधरींची हत्या झाली तर नाईरी भाजपात गेले.

ABSUCR ऑल बोडो स्टुडंटस् युनियन (रामचियारी)– तत्कालीन आसाम गण परिषद सरकारने उपेंद्रनाथ ब्रह्मांच्या एबीएस्यूला शह देण्यासाठी स्थापन केल्याचा संशय- आरोप.
सद्यस्थिती- बरखास्त.

UTNLF : द युनायटेड ट्रायबल नॅशनॅलिस्ट लिबरेशन फोर्स– १९७७ मध्ये प्लेन ट्राईबल्स कौन्सिल ऑफ आसामने जनता सरकारात सामील होण्याचा निर्णय घेतल्यानंतर बिनाई खुंगुर बसुमातारी यांनी स्थापन केलेली संघटना.

सद्यस्थिती - अन्य बोडो संघटनांबरोबरच पीपल्स डेमॉक्रेटिक फोर्समध्ये विलीन.

PDF : द पीपल्स डेमॉक्रेटिक फोर्स. मवाळ व जहाल बोडो संघटनांची शिखर संघटना.

सद्यस्थिती - सर्वांत शक्तिशाली संघटना– बोडो ऑटोनॉमस कौन्सिलची नियंत्रक तसेच आसाम विधान सभेत ६ आमदार.

BDSF : द बोडो सिक्युरिटी फोर्स– बोडोलँडच्या मागणीसाठी हिंसाचाराचा मार्ग अवलंबणारी सर्वात खतरनाक दहशतवादी संघटना– रंजन दायमारीव्यतिरिक्त अन्य एकही नेता माहित नाही इतकी गुप्तता पाळणारी संघटना.

सद्यस्थिती - कोकराझार व्यतिरिक्त बोडो ऑटोनॉमस कौन्सिलच्या अधिकारक्षेत्रांत येणाऱ्या सर्व विभागांत कार्यरत.

NDFB नॅशनल डेमॉक्रेटिक फ्रंट ऑफ बोडोलँड– बोडो सिक्युरिटी फोर्सची नागरी आघाडी.


बोडोलँड आर्मी : बोडो सिक्युरीटी फोर्सची लष्करी आघाडी.

सद्यस्थिती - ४०० सदस्य कार्यरत पीपल्स डेमॉक्रेटिक फोर्सबाबत मवाळ धोरण.

— —

# परिशिष्ट - ३

## उल्फाची रचना




REFBK-0029364